TIGHT BINDING

UNIVERSAL
LIBRARY
OU_192534
UNIVERSAL
LIBRARY

सरस्वती प्रकाशन : पुस्तक १ लें

# स्मृतिस्थळ

पाठभेद, तीन परिशिष्टें, टीपा, शब्दकोश, सूची व प्रस्तावना यांसह

संपादक

वामन नारायण देशपांडे

(सर्व हक्क संपादकांच्या स्वाधीन)

इ. स. ) किंमत दोन रुपये ( १९३२

# प्रकाशकांचे दोन शब्द

Checked 1969

गंभीर ग्रंथांचें प्रकाशन करणाऱ्या संस्था वऱ्हाड-मध्यप्रांतांत अत्यल्प आहेत. यामुळें आपल्याकडे अशा प्रकारचें वाङ्मय व्हावें तितकें प्रसिद्ध होत नाहीं. हें जाणून आम्ही एक प्रकाशन—संस्था काढून तिजतर्फे गंभीर ग्रंथ यथावकाश प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. या दृष्टीनें प्रयोगादाखल प्रकाशित केलेल्या प्रस्तुत ग्रंथास वाङ्मयभक्तांनीं पुरेसा आश्रय दिल्यास संस्थेचें प्रकाशनकार्य पुढें चालू ठेवण्यास आम्हांस उत्साह वाटेल.

आमच्या संस्थेचा गंभीर-ग्रंथ-प्रकाशन हा मुख्य हेतु असला, तथापि ललितवाङ्मयाचें तिला वावडें आहे, असें नाही, हेंहि येथे सांगणें जरूर आहे.

येथील 'शारदाश्रमा'चे सदस्य **रा. वा. ना. देशपांडे** यांनीं संपादिलेला **'स्मृतिस्थळ'** ग्रंथ प्रकाशित करण्यास आम्हांस अत्यानंद वाटतो. या ग्रंथाचें त्याच्या योग्यतेनुरूप उचित चीज होवो, एवढीच आमची मनीषा आहे.

'माधव प्रिंटिंग प्रेस'नें या पुस्तकाचें मुद्रण अत्यंत सवलतीनें व त्रास घेऊन केलें, याबद्दल त्याच्या चालकांचे आम्ही फार आभारी आहों.

**पु. वि. देशमुख.**

**प्रकाशक**—**डॉ. पु. वि. देशमुख**, एम्. बी. बी. एस्.,
कार्याध्यक्ष, **सरस्वती प्रकाशन, यवतमाळ** (वऱ्हाड).

**मुद्रक**—**दि. श्री. गोडबोले, माधव प्रिंटिंग प्रेस**, महाल, **नागपुर** (सी. पी.).

# अभिप्राय

### महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध संशोधक व प्राचीन गद्याचे अभ्यासक

## प्रो. दत्तो वामन पोतदार, पुणेः—

[ विस्तृत अभिप्रायांतील उतारा ]

...रा. वामन नारायण देशपांडे हे महानुभावी वाङमयाचे दृढ अभ्यासक आहेत. 'स्मृतिस्थळ' नांवाचा एक महत्त्वाचा महानुभावी ग्रथ रा. देशपांडे यांनी प्रसिद्ध केला आहे. 'स्मृतिस्थळा'ची ही भर प्रकाशित महानुभावी वाङमयांत फार महत्त्वाची ठरेल, यांत शंका नाहीं. आणि, प्राचीन मराठी वाङमयाचे सर्व अभ्यासक या ग्रथाचें कौतुकानें स्वागत करितील...

...रा. देशपांडे यांचें पुनः एकवार मनापासून अभिनंदन करितों आणि इच्छितों कीं, त्यांना अवश्य तें प्रोत्साहन जनता, विद्वन्मंडळें, संशोधक व विशेषतः विद्यापीठें यांचेकडून मिळावें, आणि त्यांचे हातून प्राचीन मराठी वाङमयाची अधिकाधिक भरदार सेवा व उपासना त्यांनीं करून घ्यावी.

---

### महानुभाव पंथाचे सुप्रसिद्ध वयोवृद्ध आचार्य

## महंत गोपीराजबुवा, रितपुरः—

...या ग्रंथाचें वाङमयभक्तांना व अभ्यासकांना महत्त्व वाटल्याखेरीज रहाणार नाहीं.

---

# अनुक्रमणिका


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | ... | ... | १--२८ |
| १. स्मृतिस्थळ | ... | ... | १ |
| २. परिशिष्ट १ लें--<br>'अज्ञात स्मृती'तील अधिक मजकूर | | ... | ९४ |
| ३. परिशिष्ट २ रें--<br>'स्मृतिसमुच्चयां'तील अधिक मजकूर | | ... | १०८ |
| ४. परिशिष्ट ३ रें--<br>फरक व अधिक मजकूर | | ... | १२१ |
| ५. टीपा | ... | ... | १२५ |
| ६. शब्दकोश | ... | ... | १३५ |
| ७. व्यक्तिनामांची सूची | ... | ... | १४९ |
| शुद्धिपत्र | ... | ... | १५३ |

# प्रस्तावना

**१ ग्रंथमहत्त्व**—प्राचीन मराठींत पद्य विपुल, पण गद्य अत्यल्प आहे. त्यांतहि नामांकित गद्यकृति "पंचतंत्रा'[१]व्यतिरिक्त अन्य दाखवितां येणार नाहीं. अलीकडे महानुभाव वाङमयाचें दालन खुलें झाल्यापासून मात्र ही वाण अंशतः कमी होत आहे.

प्रस्तुत '**स्मृतिस्थळ**' ग्रंथ प्राचीन मराठी गद्याचा नमुना म्हणून वाङमयांत सदैव स्मरला जाईल. त्यामुळें तत्कालीन परिस्थितीवर थोडाबहुत प्रकाश पडतो, हें त्याचें दुसरें अंगहि उपेक्षणीय नाही. त्याची विशेष अपूर्वाई अशी कीं, विनीच्या महानुभाव ग्रंथकारांची माहिती देणारा प्राचीनतम ग्रंथ हाच होय. याबाबत 'लीलाचरित्र'हि त्याच्या मागेच पडतें !

**२ पाठचर्चा**—'**स्मृ स्थ.**' च्या ('स्मृतिस्थळा'च्या) **क, ख, ग, घ** अशा चार पोथ्या संहिता तयार करतांना मला मिळाल्या. त्या 'सकळ' लिपींत असून त्यावर लेखनकाल नव्हता. कागद, शाई, अक्षर–इ. वरून त्या २५०–३५० वर्षांइतक्या जुन्या खास वाटत होत्या. त्यांतील अतिशय जीर्ण **क** पोथीवरून संहिता बनविली असून इतर पोथ्यांवरून टीपांत महत्त्वाचे पाठभेद दिले आहेत. **न–ण**मधील फरक व संस्कृत श्लोकांचें पाठ न बदलतां केलेलें ढोबळ शुद्धिकरण यांखेरीज मुळांत बदल केला नाही. संस्कृत श्लोकांत पोथीतील ळकार मात्र कायम ठेवला आहे. **क**तील किर-कोळ उणिवा अन्य पोथ्यांवरून ( ) अशा कंसांत पुऱ्या केल्या आहेत.

संहिता छापून झाल्यावर मला आणखी सात पोथ्या मिळाल्या. **म्हणजे**, ग्रंथ छापतांना 'स्मृ. स्थ.' च्या एकूण **अकरा पोथ्या** माझ्या अवलोकनांत आल्या ! नंतर पाहिलेल्या एका पोथीत शके १५२३, प्लव संवत्सर, भाद्रपद व ॥ ४, रविवार–ता. २० सप्टें. १६०१–हा [२]लेखनकाल

---

१ वि. ल. भावे–संपादित; 'महाराष्ट्र काव्यग्रंथ' ११. २ हा लेखनकाल असलेल्या पृष्ठाचें छायाचित्र मी घेतलेलें आहे.

आहे. तेव्हां ही पोथी या शकांत लिहिलेली असेल, किंवा तशा पोथीची नकल असेल. कांही म्हटलें, तरी 'स्मृ. स्थ.' चा माग शके १५२३ पर्यंत लागतो. दुसऱ्या एका पोथीवर शके १६०४ हा लेखनकाल आहे.

या अकरा पोथ्यांवरून 'स्मृ. स्थ.' तील हकीकतीची एकवाक्यता सांगतां येते. कत २६१ स्मृति व २६ वृद्धाचार दिसतात. पण स्मृ. २२२ ख–ग–घमध्यें स्मृ. १८३ त पूर्वीच आलेली [1]असते. २३ नंतरचे वृद्धाचार म्हणजे गुरुशिष्य–परंपरेच्या याद्या असून त्या ख–ग–घ मध्यें क्रमांकविरहित येतात. एवंच, या चारहि पोथ्यांत एकूण मजकूर सारखाच भरतो. मागील शके १५२३ च्या पोथीत कप्रमाणें–संहितेप्रमाणें–२६१ स्मृ. असून अधिक स्मृ. २२२ हीच आहे. घतहि २६१ स्मृ. येतात; पण तींतील जादा स्मृ. भिन्न असून उर्वरित पोथ्यात तिच्यांतील मजकूर आलेलाच [2]असतो. तात्पर्य, २६० व २६१ वैकल्पिक स्मृ. व २३ वृ. अशी 'स्मृ. स्थ.' ची संख्या निश्चित समजण्यास हरकत नाहीं.

३ **स्मृतीचे विविध पाठ**—'स्मृ. स्थ.' हा एकच स्मृतिग्रंथ नव्हे. स्मृतीचे विविध पाठ झाल्याची प्राचीन ग्रंथ साक्ष देतात: (अ) '**नरेंद्रबासीं** '**रुक्मिणीस्वैवर**' केलें : आणि **सातसे स्मृती** जैसीया वर्तल्या **तैस्याचि** लिहील्या : '––पारमांडल्य 'अन्वयस्थळ.' (आ) 'कवि **मालोबास** त्यांही **पांचसें स्मृति** : **सवासे वृधाचारु** अन्वयी लावीली : '––सदर. (इ) 'हें 'अन्वयस्थळ–सुमृति' माहादोबा साळकर तेही केलीया : आणि **दुसरा बंध** ('**अन्वयस्थळ–सुमृती**'चा) **परशरामबासीं** केला :'–साळकर 'अन्वय-स्थळ;' 'इतुके करुनी **सुमृति** केलीया । **परशरामाचीया** पाया वद ॥१६५॥' ––राघवमुनिकृत 'चरित्रअबाब.' (ई) '**सोउबासीं...श्रुति–स्मृति**–लीळा : न्यायें वृधाचारें : शोधूनि तेचि प्रमाणत्वें मानीलें : '–'अन्वय-स्थळाची परी.'

स्मृतिग्रथांत नागदेव व त्याची प्रभावळ यांच्या बारीक–सारीक देखील गोष्टी असल्यानें त्याचा मूळ लेखक समकालीनाखेरीज दुसरा असणें असंभवनीय आहे. तेव्हां मूळ कर्ते म्हणून जेव्हां धाराशिवकर ओंकारबास (५०० स्मृ.), 'नायाबा' ('हेतुस्थळ' कर्ता न्यायव्यास) हीं नांवें पुढें

---

१ पा. ५९ टीप १, पा. ७० टी. ४. २ पा. ७८ टी. १.

येतात, तेव्हां तीं अन्वयकार किंवा संस्करणकार यांचीच मानलीं पाहिजेत. संस्करणकार म्हणून दत्तराज तळेगांवकर (२७५ स्मृ. व ४० वृ.-पारमांडल्य 'अन्वयस्थळ.')-प्रभृतीचीहि नांवें आढळतात. पण ही सर्व आपणास निरुपयोगी असल्याने त्यांच्यासंबंधीच्या अवतरणांनी जागा अडवीत नाही.

उपरोक्त अवतरणांवरून नरेंद्र व परशराम हे स्मृतीचे मूळ लेखक आणि मालोबास व गुर्जर शिवबास हे संस्करणकार वाटतात. पारमांडल्य 'अन्वयस्थळा 'वरून मालोबासाने 'अन्वयी लाविलेला' मूळ पाठ नरेंद्राचा दिसतो. आम्नायाभिमानानें वरील शोधकारांनीहि आपापले स्वतंत्र पाठ बनविले असले पाहिजेत.

नरेंद्राची ७०० ची मूळ स्मृति आणि मालोबास-व ओंकारबास-यांचा ५०० चा पाठ पाहिल्याचें वा उपलब्ध असल्याचें कुणीहि वृद्ध महंत सांगत नाहीत. 'चौपद्यां 'च्या टीपांत एका ५०० च्या पाठाचा उल्लेख येतो, तेव्हां हे पाठ पूर्वी प्रचारांत असावे.

**४ उपलब्ध झालेले पाठ**—'[1]स्मृ. स्थ' खेरीज मला 'अज्ञात स्मृति' व '[2]स्मृतिसमुच्चय' हे आणखी दोन पाठ मिळाले. पूर्वोक्त पाठास त्याच्या अपरिचितपणामुळें व अभिधानाभावामुळे हे तात्पुरतें नांव मी दिलें आहे. पोथीचा शके १५४५, माघ व ॥ ७, रविवार-ता. १ फेब्रु. १६२४-लेखनकाल आहे. तीत २२९ स्मृ. व १७ वृ आहेत.

'स्मृ. स.' च्या ('स्मृतिसमुच्चया 'च्या) तीन पोथ्यांतील एकीवर शके १६६२, आश्विन व ॥ ५, सोमवार--ता. २९ सप्टें. १७४०-हा लेखनकाल आहे. ग्रंथाचें हे नाव पोथीतच सांपडले. 'आद्य मराठी कवयित्री' पुस्तकांत त्याला [3]'नागदेवाचार्यस्मृति' संज्ञेने मी संबोधिलें आहे. सर्व पोथ्यांतील समाप्तीत 'श्रीनागार्जुनविरचित:' असें पद येते,

१ यावर रा. ह. ना. नेने यांचा 'महाराष्ट्र', २५ मार्च १९३४, यांत निबंध आला आहे. २ यावर 'विश्ववाणी', डिसें. १९३३, यांत माझा निबंध आला आहे. यालाच कै. भावे ('महाराष्ट्र-सारस्वत') व रा. य. खु. देशपांडे ('महानुभावीय मराठी वाङ्मय') 'नागदेवाचार्यचरित्र' म्हणतात, व त्याचें कर्तृत्व परशरामाकडे देतात. ३ प्रो. कोलते 'भास्करभट्ट बोरीकर' ग्रंथांत याच पाठास 'स्मृतिस्थळ' म्हणतात, तें बरोबर नाही.

तें बरोबर असल्यास या पाठाचा कर्ता कुणी ‘ नागार्जुन ’ दिसतो. त्याचा पत्ता मला लागला नाही. पंथांत ‘ नागार्जुन ’ शब्दानें नागदेवाशिवाय इतरास सहसा आळवीत नसल्यानें ‘ श्रीनागार्जुनोपदेशे ’ या पदाऐवजीं हें पद कांही तरी गफलतीमुळें पोथ्यांत शिरलें कीं काय, असाहि संशय येतो.

परिशिष्ट १ व २ मध्यें या दोन्ही पाठांतील अधिक मजकूर समाविष्ट केला असल्यानें **या एकाच ग्रंथावरून सदर तिन्ही पाठांचा वाचकांस परिचय** घडणार आहे.

‘ स्मृ. स.’तील संपूर्ण वृद्धाचार [१]‘ महाराष्ट्र–साहित्य-पत्रिकें’त मीं मागें प्रसिद्ध केला होता.

**५ पाठत्रयाची तुलना**—तिन्ही पाठांत पंथामध्यें ‘ स्मृ. स्थ.’ सर्वमान्य आहे. ‘ अ. स्मृ. ’ (‘ अज्ञात स्मृति ’) व ‘ स्मृ. स.’ यांच्याप्रमाणें त्यांत गोविंदप्रभूच्या वेळचा मजकूर जरूरीपलीकडे येत नाहीं. यामुळें [२]माता-पुरगमनासारख्या स्मृति त्यांतून सहजच गळतात. गोविंदप्रभूच्या आज्ञेनें नागदेवप्रभृति मातापुरास गेले होते, म्हणून त्यांचें तेथील गमन पंथदृष्टया आक्षेपार्ह होत नाही म्हणावें, तर [३]‘ सूत्रपाठ,’ आचार २५, येथील चक्र-धरोक्ति (‘ मातापुरा...न वचावें : ॥ ’) त्या गोष्टीस प्रतिकूल ठरल्यावांचून कशी राहील ? ‘ स्मृ. स्थ.’ त ही स्मृति नसल्यानें वादच राहत नाहीं. ‘ अ. स्मृ.’ व ‘ स्मृ. स.’ यांत ती येऊन शिवाय [४]विठोबासंबंधींचीहि एक स्मृति येते. ती सनातनी वर्गातील विठ्ठलभक्तांस बोंचल्यास नवल नाहीं. हीहि स्मृति ‘स्मृ. स्थ.’त नाहीं ‘ स्मृ. स्थ.’ ११३ त दाशरथी रामचंद्रापेक्षां श्रीकृष्णाची पायरी व्यंजनेनें वरची दाखविली आहे (‘ टीपां’तील या स्मृ. वरील टीप पहा), पण ‘ **रामावरी नंबर कृष्ण मागे !!** ’—हा प्रकार सनात-न्यांस अपरिचित नाहीं ! ही स्मृ. ‘अ. स्मृ.’ त नसली, तरी ‘स्मृ. स.’त आहे. तसेंच, ‘ स्मृ. स्थ.’ ११८ त जेथें ‘ सिखासूत्र ’ शब्द येतो, तेथें ‘ अ. स्मृ.’ १०८ व ‘ स्मृ. स.’ २१२ ‘ शिवसूत्र ’ शब्द देतात. सिद्धांते हरिबास व सोंगोबास यांच्या [५]‘ अन्वयस्थळा ’ प्रमाणें ‘ शिवसूत्र ’ म्हणजे शंकराचार्यांचें

---

१ आक्टो. १९३६. २ स्मृ. १८–१९ पा. ९५. ३ नेनेसंपादित ४ स्मृ. १९६ पा. १०५. ५ हा ग्रंथ प्रो. कोलते एकटया सोंगोबासाचा मानतात (‘भा. भ. बो.’ पा. ८१), पण तो या दोघांचा आहे.

'पंचीकरण.' 'स्मृ स्थ.' त भिन्न पाठ असल्यानें शंकराचार्यांचा नामनिर्देश सहजच टळतो ! आतां, यांत अस्सल पाठ कोणता, हें ठरविणें दुर्घट आहे. [1]'अ. स्मृ.' ९५ व 'स्म. स. वृ.' २४ यांतील दिल्लीच्या महंमद सुलतानाची (!) संशयास्पद स्मृतीहि 'स्मृ. स्थ.'त नाहीं.

'स्मृ. स्थ.'त क्वचित् कालानुक्रमानें स्मृति–वृद्धाचार येतात, असें वाटतें; पण तें सर्वत्र खरें नाहीं. एकच उदाहरण द्यावयाचें, तर शके १२१३–१४ त लिहिलेल्या व त्यानंतर लगेच रामदेव यादवाला दाखविण्यांत आलेल्या नरेंद्रकृत 'रुक्मिणीस्वयंवरा'ची हकीकत स्मृ. ११३ त येते; उलटपक्षी स्मृ. ८३ तील दिल्लीकरांची स्वारी शके १२१७ किंवा १२२९ यांतील कोणतीहि घेतली, तरी ती या हकीकतीनंतरची असल्यामुळें कालानुक्रमास ढळ पोंचतोच ! 'अ. स्मृ.' ला 'स्मृ. स्थ'इतपतहि क्रम नाहीं. तीत कित्येकदां 'आदि' नसतात. 'स्मृ. स.'त स्थूलमानानें 'स्मृ. स्थ.'चा क्रम दिसतो. 'स्मृ. स.'त या दोन्ही पाठांतील बहुतेक सर्वच मजकूर आला आहे. शिवाय कांहीं जादा मजकूरहि [2]येतो. वर सांगितल्याप्रमाणें 'स्मृ. स्थ.' ११३–व वृ. २३–'अ. स्मृ.' त नाहींत, पण 'स्मृः स.'त आहेत. 'स्मृ. स.' त प्रायः विस्तार असतो. तिन्ही पाठांत जेथें सदृश मजकूर येतो, तेथें 'स्मृ. स.' 'अ. स्मृ'शीं जास्त मुकाबला ठेवतो. पाठत्रयांत ज्याअर्थी सारखा मजकूर बराच आहे, त्याअर्थी त्या सर्वांचें मूळ एकच असलें पाहिजे. मग तें या तीन पाठांतलें एक असो, कीं बाहेरचें निराळेंच असो. हे सर्व पाठ 'लीलाचरित्र' व 'ऋद्धिपुर-चरित्र' यांचे कमीअधिक प्रमाणांत ऋणी आहेत.

केवळ रचनाशैथिल्य व इतस्ततः उल्लेखिलेला कांहीं तपशील यांवरून 'अ. स्मृ.' पाठ प्राचीनतम वाटेल. पण याला विरुद्ध पुरावेहि आहेत. बहुधा मनुस्मृतींतील '**वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः। एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम्॥**' (२–१२) या श्लोकावरून फेरफारानें बनविलेले महानुभाव वाङ्मयांतील श्रुत्यादि शब्द कालगणनावाचक आहेत : 'गोसावीयांचे श्रीमुखीचे ते **श्रुति** : भटोबासांचे वर्तमान ते **स्मृति** : रामेस्वरबा : प्रसरामबा : हीराइसे : नागाइसे हा **वृधाचार** : धारासीवकर वंकारबासः गुर्जर शिवबासपर्यंत **मार्गरूढीः** (हरिबास–सोंगोबास 'अन्वयस्थळ').'

१ पा. १०४. २ परिशिष्ट २.

मार्गरूढीनंतरचें '**वर्तमान.**' कित्येक ग्रंथांत वृद्धाचार, वर्तमान व मार्गरूढि असाहि क्रम असतो. हल्लीच्या स्वरूपांतलें 'स्मृ. स्थ.' मार्गरूढीमधलें आहे, हें पुढें येईलच. 'अ. स्मृ.'त [१]वृद्धाचारारंभी 'वर्तमान' शब्द आहे, तो मार्गरूढीऐवजीं त्याच अर्थानें आला आहे. त्याचप्रमाणें, [२]'अ. स्मृ.' २४ तील 'तीन्हि आधिष्ठानें' 'शब्दप्रयोगाचा 'वृद्धाचारादि क्रमें-करूनि तीनि आधिष्ठानें जाणावीं :' (स्मृ. स. ३५१) यावरून वृद्धाचार, मार्गरूढि व वर्तमान असा पहिल्या क्रमानुसार अर्थ होतो. पं. [३]मरलीधर-शास्त्री यांचा केशोव्रास इ. व्यक्तिपर अर्थ चुकीचा आहे. अर्थात् 'अ. स्मृ.' 'स्मृ. स्थ.' पेक्षां प्राचीन नव्हे, अर्वाचीन–किंवा फार तर समकालीन–आहे, हें स्पष्ट आहे.

'स्मृ. स.' तहि [४]मार्गरूढि व [५]वर्तमान शद्व येतात. ते कोणत्याहि अर्थानें घेतले, तरी अर्वाचीनत्व अगर समकालीनत्व सूचवितात. 'स्मृ. स्थ.' व 'अ. स्मृ.' यांपेक्षां 'स्मृ. स.' अर्वाचीन वाटण्याचे कांहीं अतर्गत पुरावे परिशिष्ट ३ मध्यें आले आहेत. आणखी थोडे देतों:(१) '[६]अ. स्मृ.' ३७ मधील वृत्तांत संभाव्य आहे. 'स्मृ. स.' १८ त तो असंभाव्य बनवून टाकला आहे! दुकानदाराच्या आठवणीप्रमाणें त्याजकडे 'नाथपर' कापूर गेलीं बारा वर्षे नव्हता. पण तो त्याच्या पेटीत असल्याचें गोविंदप्रभूनें नागदेवास आधीच सांगितलें, व तें खरेंहि ठरलें, अशी 'स्मृ. स.'ची नवलकथा आहे! ती निःसंशय मागाहूनची वाटते. (२) 'अ. स्मृ.' १५८ त नागदेवाच्या तोंडीं 'गोवळी, मोसारी' या शिव्या घातल्या आहेत. 'स्मृ. स.' १९६ नें त्यांत आणखी एका अभद्र शिवीची भर घालून पुढील स्वतंत्र स्मृतींत त्यांचें समर्थनहि केलें आहे! तें इतकें पोरकटपणाचें आहे कीं, कुणासहि बनावटच वाटावें! 'स्मृ. स्थ.' १६१ त फक्त 'सिवीया' असा मोघम शद्व आहे. (३) 'स्मृ. स्थ.' ८६ व 'अ. स्मृ.' ९८ यांत मुसलमानांनीं राजा रामदेव यादवाच्या राण्या भ्रष्टविल्याबद्दल अवाक्षर देखील नाही. बरें, तसें असतें, तर या पाठद्वयास मौन धरण्याचें बिलकूल प्रयोजन नव्हतें. सबब 'स्मृ. स.'

१ पा. १०६. २ पा. ९६–९७. ३ 'विविधज्ञानविस्तार' आक्टो. १९३७. ४ स्मृ. २४७. ५ पा. ११८. ६ पा. ९९.

९७ त 'राणीया वीटंबीलीया' असें जें म्हटलें आहे, तें प्रक्षिप्त–अतएव अर्वाचीनत्वसूचक–समजलें पाहिजे.

६ **'स्मृतिस्थळा'चा कर्ता व कालनिर्णय**–सध्यांचें 'स्मृ. स्थ.' कुणाहि एका लेखकाचें नसून त्यांत अनेकांच्या पाठांतील कमीअधिक मजकूर मिसळला गेला असावा, असें माझें मत झालें आहे. मात्र हल्लींच्या संस्करणाचा कालनिर्णय करतां येणारीं साधनें उपलब्ध आहेत, हें त्यांतल्या-त्यांत सुदैव होय.

'स्मृ. स्थ.'तील पुढील स्थळीं त्याचा संस्करणकार आपल्याशीं बोलत आहे, असें दिसून येईल: (१) ठिकठिकाणचे 'शोध' शद्ब. (२) ठिकठिकाणचे 'कविबासवासना' उल्लेख. (३) 'हें यथाप्रतिः' स्मृ. २४०, २४७. (४) 'हे स्मृति उत्तरार्धीचि ('लीलाचरित्रा'च्या उत्तरार्धातील) शोधूनि येथ घातलि असेः' स्मृ. २३. (५) 'हे स्मृति **मलेकोयाबा सांघतिः** आणि धर्मवार्ता करीति :' स्मृ. १०६. (६) 'यैसी **मार्गरूढि :**' स्मृ. २२१, वृ. १६. (७) 'हे स्मृति श्रीप्रभुगोसावी (गोविंदप्रभु) असतां ऋद्धिपुरीं जाणावीः चरीत्रीं ('ऋद्धिपुरचरित्रां'त) मांडीतां न येः म्हणौनि '**निंबा** घातली :' स्मृ. २४७. यांतील ५ व ६ निर्देश सर्वांत महत्त्वाचे आहेत. त्यांवरून हा संस्करणकार मार्गरूढींतला असून मलेकोयाबाचा समकालीन व ऋणानुबंधी असल्याचें स्वच्छ दिसतें. मलेकोयाबा हा उपाध्य आम्नायांतील असून नागदेव > कमळाइसा > हिराइसा > पाटकुळें मालोबास > आबाइसे > मलेकोयाबा अशी त्याची परंपरा आहे ('अन्वयस्थळाची परी'). पितापुत्राप्रमाणें गुरुशिष्याची २० वर्षांची पिढी धरल्यास नागदेवानंतर (शके १२३४ नंतर) मलेकोयाबा १२० वर्षांनीं (शके १३५४ च्या सुमारास) येतो. तेव्हां **शालिवाहनाचें चौदावें शतक** हा त्याचा, सदर संस्करणकाराचा व **'स्मृ. स्थ.'चा काल** ठरणें क्रमप्राप्त आहे मार्गरूढींतील व्यक्तीनें मार्गरूढीचा उल्लेख करणें दुष्कर नाहीं. स्मृति व वृद्धाचार यांत होऊन गेलला गोपाळपंडित

१ या शद्बावरून 'ऋद्धिपुरचरित्र,' 'मातापुरचरित्र,' 'बेलोपुरचरित्र' यांच्याप्रमाणें '**निंबचरित्र**' असें गांवावरून 'स्मृ. स्थ.'ला नांव देण्याचें त्याच्या संस्करणकाराच्या मनांत असल्याची शक्यता वाटते.

'लक्षणरत्नाकरां'त 'श्रुति-स्मृति-वृद्धाचारनिर्णयाख्यम् ।' असा त्या दोहोंचा उल्लेख करतोच कीं नाहीं? वरीलपैकीं इतर निर्देश या कालनिर्णयास बाध आणीत नाहींत.

हा संस्करणकार चौदाव्या शतकांतला असून नरेंद्र व परशराम हे स्मृतिकार आणि नायाबा, कवि मालोबास व धाराशिवकर ओंकारबास हे शोधकार त्याच्या पूर्वीचे असल्यामुळें त्यानें त्यांच्या कृतीचा अवश्य उपयोग केला असला पाहिजे. तो कुणाचा, कुठें व किती केला असेल, हें सहसा कळण्याजोगें नसल्यामुळें 'स्मृ. स्थ.'चा कर्ता एक नसावा, असें मीं परिच्छेदारंभीं म्हटलें आहे. यांपैकी एका शोधकाराचा उपयोग करण्यांत आल्याचें नक्कीच दाखवितां येतें: 'स्मृ. स्थ.'त ज्या 'कवि-बासा'च्या '[1]वासना' (येथें भिन्न मत, अभिप्राय) येतात, तो कवि मालोवास होय. स्मृ. १४७ तील 'हे आदि कविबास: याचि स्मृति न येचि:' या निर्वाळ्यावरून तर मालोबासाबद्दल शकाच राहत नाहीं. 'स्मृ. स्थ.' व 'स्मृ. स.' यांच्या कित्येक पोथ्यांत 'कविबास' ऐवजीं '[2]कवीश्वरबास' हा पाठभेद येत असला, तथापि या दोन शब्दांच्या सादृशामुळें ही पोथीलेखकांची फसगत झाली आहे, असें मानणें प्राप्त होतें. एरवीं कवीश्वरबासानें-भास्कर बोरीकरानें-स्मृतीच्या 'आदि' मांडल्या व शोधन केलें, असें म्हणावयाचें कीं काय? खेरीज, 'स्मृ. स्थ.'त हकीकतीमध्यें भास्करास सदैव 'कवीश्वरबास' शब्द लावलेला आहे. मग केवळ वासना देतानाच त्याला 'कविबास' हा वेगळा शब्द लावण्याचें काय कारण आहे? सारांश, कविबास म्हणजे कवि मालोबासच.

---

१ 'स्मृ. स्थ.' २४६ त 'वासना' म्हणजे 'इच्छा, हेतु' हा नित्याचा अर्थ घ्यावयास पाहिजे. या स्मृ. चा संबध मागील स्मृ. २०१ शीं जोडावा लागतो (या दोन स्मृ. मिळूनच 'अ. स्मृ.' १६६ व 'स्मृ. स.' २३८ होतात). केशोबासानें स्मृ. २०१ त पैठणास राहण्याबद्दल नाग-देवापाशीं इच्छा दर्शविली, त्या संदर्भानें स्मृ. २४६ त नागदेव 'वराड माहेर: गंगातिर सासुरें' म्हणतो. म्हणून 'वाहाणा' पाठ तेथें नको ('अ. स्मृ.' १६६ व 'स्मृ. स. २३८ यांत तो नाहींच). २ ग पोथींत बहुतेक सर्वत्र व घत दोनदां हा पाठ येतो.

'स्मृ. स्थ.'त ज्याअर्थी मालोबासाच्या वासना फक्त मधुनमधून येतात, त्याअर्थी तें त्याच्या एकट्याच्या पाठाची संक्षिप्त आवृत्ति नव्हे

'स्मृ. स्थ.'त अनेकांच्या पाठांचें मिश्रण असावें म्हटलें, म्हणजे त्याच्या मूळ कर्त्याचा विचार करण्यांत अर्थ उरत नाहीं. परिच्छेद ३ (इ) मधील अवतरणांत [1]महादोबा साळकर व राघवमुनि स्मृतीचें कर्तृत्व परशरामाकडे देतात. आणि, 'अ. स्मृ.' २२८ त नागदेवनिधनाचें फक्त प्लवंग संवत्सर व 'स्मृ. स' ३५६ त शके १२२४, [2]प्लवंग संवत्सर, भाद्रपद व ॥ ११ ही मिति येते, पण महादोबा व [3]राघवमुनि मात्र 'स्मृ. स्थ.' २६० मधलीच मिति देतात, यावरून या दोघांस परशरामाची स्मृति म्हणजे 'स्मृ. स्थ.'च अभिप्रेत आहे, असा कयास बांधतां येतो. पण त्याला पुष्टि देणारा पुरावा बाहेर यावयास हवा. याशिवाय, (अ) नरेंद्रानें केलेल्या स्मृति दत्तराज तळेगांवकराच्या वेळीं खरोखरच उपलब्ध असल्यास परशरामाच्या वेळीं त्या उपलब्ध नसणें कसें शक्य आहे ? मग त्यानें निराळी स्मृति करण्याचें प्रयोजन काय ? (आ) परशरामानें नरेंद्रस्मृतींत नसलेली हकीकत सम-कालीनत्वामुळें लिहून स्वतंत्र स्मृति निर्माण केली, कीं मालोबासादिकांप्रमाणें नरेंद्रस्मृतीचे केवळ शोधन केलें ?--हेहि प्रश्न उलगडल्याखेरोज निर्णया-त्मक कांहीच सांगतां येत नाहीं.

शेवटीं एक कल्पना मांडून हा मुद्दा संपवूं. 'स्मृ. स्थ.' चा चौदाव्या शतकांतील संस्करणकार **गुर्जर शिवबास** असावा काय, असा विचार मनास स्पर्श करून जातो. परिशिष्ट ३ (ई) वरून त्यानें स्मृति शोधल्याचें कळतें. या परिच्छेदांतील आरंभीं दिलेले साती निर्देश त्याला लागूं पडतात. तो मार्गरूढीमधील असून मलेकोयाबाचा सम-कालीन होता. कृष्णमुनीच्या 'अन्वयमाळिकें' तील **'मल्येकोयाबासीं 'पूजाआवस्वर': केलें पैं सुंदर साट श्लोक ॥ २२३ ॥ आचळबासांहीं रत्न वीकावयाः पाठविलें तया धारासीवा ॥ २२४ ॥**'--या चरणांवरून

---

१ साळकर आम्नाय परशरामाच्या वेळीच झाला असल्यास त्याचा प्रवर्तक महादोबा साळकर म्हणजे हा 'अन्वयस्थळ' कर्ता होऊं शकत नाहीं. कारण त्यांत गुर्जर शिवबासापर्यंतचें ग्रंथकार येतात. २ हें संवत्सर शके १२२९ त येतें. ३ अभंग १२३-२४.

शिवबासाचा गुरु अचळमुरारी याचा मलेकोयाबा विश्वासपात्र दिसतो. तेव्हां 'स्मृ. स्थ.' १०६ तील कथा शिवबासाला मलेकोयाबाकडून कळणें अशक्य नाही. 'स्मृ स्थ.' २४७ ही 'ऋद्धिपुरचरित्रां' त मांडण्या–न–मांडण्याचा प्रश्न एकट्या स्मृतीच्या संस्करणकारापुढें उभा ठाकण्यापेक्षां स्मृतीप्रमाणें 'ऋद्धिपुरचरित्रा'चेंहि ज्यानें शोधन केलें आहे, अशाच संस्करणकारापुढें उभा ठाकणार. 'अन्वयस्थळाच्या परी'-तील '(सीउबासीं) दिढ शत 'ऋद्धिपुर' लावीलें:' या उताऱ्यावरून शिवबासानें 'ऋद्धिपुरचरित्रा'चेंहि अशतः शोधन केलेलें दिसतें. 'स्मृ. स्थ.' २३ मधील 'लीलाचरित्रा'चा उल्लेख इतका सूचक नसला, तरी या अनुरोधानें त्याचाहि शोधनपर अर्थ करतां येतो. शिवबासानें 'लीलाचरित्रा'चें संस्करण केल्याचें परिच्छेद ३ (ई) वरून सिद्धच होतें. कवि मालोबास (गोपाळपंडित > नागनाथ > मालोबास) हा त्याच्या पूर्वीचा असल्यानें मालोबासाचा स्मृतिपाठ त्याच्या अवलोकनांत येणें अगदीं शक्य आहे. सारांश, हा संस्करणकार गुर्जर शिवबास असणें असंभवनीय नाहीं. त्याची नागदेव > भास्कर > परशराम > पेटे हरिबास > अचळमुरारी > शिवबास अशी परंपरा आहे.

**७ प्राचीन मराठी गद्य व 'स्मृतिस्थळ'**—'मरहट्ठे' लोक आणि त्यांची 'दिण्णल्ले' (दिले), 'गहिल्ले' (घेतले) शब्द असलेली 'मरहट्ठ' भाषा यांचा स्पष्ट निर्देश शके ७०० मधील 'कुवलय––कथामाला' या अपभ्रंश काव्यांत पहिल्यानें [1]सांपडतो. परंतु पहिलें मराठी वाक्य शके ९०५ च्या श्रवणबेळगोळच्या शिलालेखांतील असून तें 'श्री चावुण्डराजें करवियलें' असें [2]आहे. मराठी गद्याचा हाच उगम होय. यानंतरच्या शिलालेख––ताम्रपटांत गद्य मजकूर आढळतो; पण तो फार त्रुटित असल्यानें भाषाभ्यासकांची गद्याची भूक त्यानें कशी भागणार ?

प्राचीन काळीं मराठींत गद्यरचना झाली नसेल, असें नव्हे. परंतु त्यांतील महानुभाव वाङमयाबाहेरचा अतिशय थोडा अंश कालौघांतून बचा-

---

१ 'वि. विस्तार' सप्टें. १९२८. २ राजवाडे–लेख–संग्रह भा. ३ पा. १९६,

वला आहे ! आणि जो बचावला, त्यांत 'ग्रंथ' ही पदवी साजणारी एकच कृति आहे, व ती कै. भावे यांचें 'पंचतंत्र' ही होय. कै. राजवाडे यांनीं छापलेल्या श्रीपतिकृत '[1]ज्योतिषरत्नमाला,' '[2]वैद्यक' इ० प्रकरणांना ग्रंथ संज्ञा कोण लावील ? पण गद्याचा जेथें अभावच होता, तेथें अशा नीरस बाडांना देखील मोल चढावें, यांत नवल नाहीं. भाव्यांचें 'पंचतंत्र' रा. [3]पांगारकर म्हणतात, तद्वत्, चौदाव्या शतकांतील असावें. त्याहून प्रो. द. वा. [4]पोतदार यांचीं 'पंचतंत्रा'चीं त्रुटित पानें भाषादृष्टया प्राचीन वाटतात; तथापि त्रुटिततेमुळें त्यांचा विशेष उपयोग होत नाहीं.

अलीकडे जगापुढें आलेल्या महानुभाव गद्यग्रंथांनीं प्राचीन मराठी गद्याची चणचण पुष्कळच कमी केली आहे. नेने–भवाळकरांचें 'श्रुति-वाङ्मय,' रा. ह. ना. नेने यांचें 'लीलाचरित्र' (पूर्वार्ध), 'नित्य-दिनीलीला,' रा. य. ख. देशपांडे यांचें 'चक्रपाणीचरित्र' इ० गद्यग्रंथ अभ्यासकांस आकृष्ट करीत आहेत. प्रो. कोलते यांचें 'ऋद्धिपुरचरित्र' याच सुमारास प्रसिद्ध होणार म्हणून कळतें, व 'स्मृ. स्थ.' आज बाहेर पडत आहे. 'लीलाचरित्रा'चा उत्तरार्ध, 'श्रीकृष्णचरित्र' ऊर्फ 'द्वापरलीला,' 'दत्तात्रेयचरित्र' ऊर्फ 'मातापुरलीला,' कांहीं प्रमुख 'अन्वयस्थळें' व साती टीपग्रंथ मुद्रित झाले, म्हणजे आपणां पंथीयेतरांस महत्त्वपूर्ण वाटणारी बहुतेक महानुभाव गद्यरचना उजेडांत आल्यासारखी होईल.

'स्मृ. स्थ.'त 'लीलाचरित्रां'तील शद्बरूपादिक विपुल सांपडतात. [5]'लीलाचरित्रां'तील चाटे, गजबजौनि, खळीव साउला, पदन, खिरारी, सामान्य स्त्री, कटकटा, मायधुवा, पोफळफोडणा, अवकाश, पडिताळणें, स्याळे, फुटा, राणा, वेढे इ. शद्ब; मी आलां, करूनि (करूं), चाडां (तृतीया), चणेन (तृतीया), दोजे, कीजो इ. रूपें; आणि घेया घेया बापेया, दृष्टीचीए आळीवे, ठावो करणें, बैसों घालणें, बैसों–भुंकों आदरणें, सुरंग मिरविणें, तूपीभातीं जेवणें, सेणें–मातीया अंग माखौनि आड पडणें इ० वाक्प्रचार 'स्म. स्थ.'त येतात. स्थूलतः समकालीन म्हणून 'पंचतंत्रा'प्रमाणें

---

१ भा. इ. सं. मं. द्वितीयसंमेलनवृत्त. २ भा. इ. सं. मं शके १८३३-चा अहवाल. ३ मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, पा. ३९. ४ भा. इ. सं. मं. त्रै. ३–२, ३, ४; व १७–२. ५ पूर्वार्ध, नेने–संपादित.

वेव्हारा, विळचां, डिवणें, भाणवस, पढयंति हे शब्द व दगडवरि (तृतीया-हें रूप राजवाडे--ज्ञानेश्वरीतहि येतें.), नेदखेचि (अकरणरूप), पाळणां (सप्तमि) हीं रूपें 'स्मृ. स्थ.'त दृग्गोचर होतात. 'श्रुतिवाङ्मयां' तील 'सूत्रपाठा'ची 'स्मृ. स्थ.'वर दाट छाया पडली आहे. कांहीं स्थलें पहा:--

| 'स्मृतिस्थळ' | 'सूत्रपाठ' | |
|---|---|---|
| १ 'श्रमनिवृतिचेनि वचनें' स्मृ. २१. | १ आचार | १३० |
| २ 'बोडि...सांघितलें कीं :' स्मृ. २८. | २ ,, | ११५ |
| ३ 'वोळखीचेया...वचावें' स्मृ. ३४. | ३ ,, | ८३. |
| ४ 'विषयांचीये...बसावें :' स्मृ. ३७. | ४ ,, | १४. |
| ५ 'एकु...जाये :' स्मृ. ४५. | ५ आचारमालिका | २६. |
| ६ 'यत्क्रियते तत्कर्म :' स्मृ. ६७. | ६ उद्धरण | ४६. |
| ७ 'जवं...नेणता :, ,, | ७ विचार | १६४. |
| ८ 'तेथ...फेडिजे :' स्मृ. ७३. | ८ आचारमालिका | ७४. |
| ९ 'गीत वीखो' स्मृ. ८९. | ९ ,, | १७१. |
| १० 'खळीयेचें प्रमाण' स्मृ. १०९. | १० ,, | १८८. |
| ११ 'बोधदाता...जीवु :' स्मृ. १११. | ११ ,, | १२१. |
| १२ 'मग...जन्मबीजाल :' स्मृ. १३२. | १२ आचार | २६२. |
| १३ 'परि...जाये' स्मृ. १९५. | १३ आचारमालिका | २१६. |
| १४ 'येइल...किं :' स्मृ. १९८. | १४ विचार | २३८. |
| १५ 'गाउनि...जाइजे :' स्मृ. २१२. | १५ आचारमालिका | ४१. |
| १६ 'ग्रामेक...पंचरात्रं :' स्मृ. २१४ | १६ ,, | १३३. |
| १७ 'आपुलें...असावें :' ,, | १७ ,, | ९. |

याखेरीज स्मृ. ३६, ४१, ६२, ८१, ८३, १००, २१०, २३७ व २५५ यांवर अनुक्रमें आ. मा. २५३, आ. १९५–आ. मा. १०४, आ. मा. १०८, आ. १२५, आ. १, वि. २५७, वि. १०६, आ. १७० व आ. मा. १४३ या सूत्रांच्या शिकवणुकीची छाप पडली आहे, ती निराळीच.

भाषाशैलीच्या दृष्टीनें पाहतां 'लीलाचरित्रा'दि सर्वच चरित्रग्रंथ 'स्मृ. स्थ.' पेक्षां सरस वाटतात. आणि बायबलच्या तोलाचें मराठींत

कोणतें मधुर गद्य असेल, तर तें ‘ नित्यदिनीलीळें ’तील ‘ पूजावसर ’ होय ! ‘ स्मृ. स्थ.’ त हा थाट नाहीं. साधे व मोजके शद्ब आणि वर्णनांतील कमालीचा संयम यांमुळें ‘ लीळाचरित्र ’ व ‘ सूत्रपाठ ’ या दोन ग्रंथांच्या भाषाशैलीच्या दरम्यान ‘ स्मृ. स्थ.’ची भाषाशैली घोंटाळते. तथापि ‘ स्मृ. स्थ.’ तील वेधक भाषाशैलीचे नमुने म्हणून स्मृ. ५८, ६१, ८४, १०२, १०५, १०६, १०७, ११६, १९८ व २०४ आणि वृ. ३, ८ व २१ यांकडे अंगुलिनिर्देश करतां येतो. निदान स्मृ. १०२ मधील अद्भुतमिश्र शांतरस आणि स्मृ. १९८ व वृ. २१ मधील करुणरस वाचकांनीं अवश्य चाखावा.

८ **‘ स्मृतिस्थळा ’चें व्याकरण—**‘ स्मृ. स्थ.’त उकार, सकार व ळकार यांचें बाहुल्य आहे. पहिला प्राचीनत्वद्योतक आहे. तिसरा अर्वाचीनत्वद्योतक मानणाऱ्यांनीं तो पैशाचीद्वारां सध्यांच्या आर्यभारतीय प्रांतभाषांत आला, या प्रो. स्टेन कोनौ यांच्या विधानाकडे लक्ष्य [१]द्यावें. ‘ स्मृ. स्थ.’त संस्कृत श्लोकांत सुद्धां ळकार घुसला आहे ! अनुनासिकेंहि सडकून येतात. ‘ गावं, नावं ’ हीं अनुनासिकें सार्थ असलीं (‘ **मोऽनुनासिको वो वा ।** ’), तरी ‘ जवं, तवं ’ हीं निरर्थक आहेत.

शद्बभांडारांत तत्सम, तद्भव व द्राविड हीं तिन्ही चलनें सांपडतात. जोडशद्ब वापरण्याची लकब विशेष उल्लेखनीय आहे : आइकौनि–परिसौनि १३, मासा-दीसा ५६, निजैले–बैसले ५७, योगिया–जंगमांचें ५९, संता–महंतांचेया ८६, उठि–बैस ९५, बाहीर–बाहीरीं ९७, घे-दे २२८ इ.

‘ स्मृ. स्थ.’तील अभिलाषिणें १०५ (अभिलाषा), पळाणें ११४ (पाळा), प्रतिबंधणें १५० (प्रतिबंध), जिज्ञासिणें २५३ (जिज्ञासा), परिवारणें पा. ९२, कडवें ३ (परिवार)–इ. नामधातूहि असेच उल्लेखनीय आहेत.

यापेक्षांहि ‘ स्मृ. स्थ.’ वाक्प्रचारांत अधिक समृद्ध आहे : बीजें करणें २, वेव्हारू लावणें ११, हात झाडणें १३, वीजन करणें १३, सांडवूं १३–संपादूं २० आदरणें, घेया घेया बाप माझे ४५–५७, राज्य करणें ५३, नेम सारणें ५३, ठावो करणें ५६–१९८, अभ्यागता म्हणणें ७२, सुरंग मिरविणें ९५, वडपिंपळीं लावणें १०८, अभंगु देणें ११३, वोवाळणी घालणें ११३, चंद्रमय होणें १२०, कानाखुरांसकट १८७–इ.

---

१ J. R. A. S. 1902.

यापुढें महत्त्वाच्या विशेषांचें त्रोटक व्याकरण देतों.

(अ) **वर्णप्रक्रिया : १ संयुक्त स्वर**–अक्षे(क्ष)म ३४. **२ स्वरागम**–अस्तीति २६१. **३ ऊष्मे**–सो(शो)धूनि २. **४ महाप्राण**–माह्रो(घ) १. **५ वर्णसंयोग**–संह्रो (ग्रह्रो) ४१. **६ वर्णवियोग**–वरुषें (र्षे) १.

(आ) **नामविभक्तिप्रत्ययः १ प्रथमा**–रामदेवो रावो ८६. **२ द्वितीया**–स्मृति १०६ (अप्रत्यय), घरा ३४ (सप्रत्यय). **३ तृतीया**–महात्मां ३७, चाडां १३८, घरीचां १६७ ('आ प्रत्यय), बोळेवरि २, ब्राम्हणीं १३ (मूळ शद्व 'ब्राम्हणी'), कोथळेनि ४७, नृसिंहकविन ११३. **४ चतुर्थी**–अक्षेमांकारणें ३४, विनयोगां २२३. **५ पंचमी**–गृहस्मरणापसि ३३, येथौनि १३२ (आमच्याकडून), गाउनि २१२. **६ षष्ठी**–पुत्रा ५८, कविबास १४७ (अप्रत्यय), श्रीप्रभूचां १ (च्या, सप्रत्यय). **७ सप्तमि**–गडदे ५२, मळां ७२; [1]**सतिसप्तमि**–मैळलेयां ४७, केलेयां वृ. १३. **८ संबोधन**–पंडितो १४५, केशवद्या ९५.

(इ) **क्रियाप्रत्यय : १ वर्तमानकाळ**–करीतासि ८०, जळताये १९९. **२ भूतकाळ**–गेलां १०६, बोलीलेति १९८, त्राहाटीलीया वृ. ३. **३ भविष्य-काळ**–जाइजैल ९, देउनि १०७ (देऊ), जन्मवीजाल १३२. **४ अकरण-रूप**–नेदावी ४९, नेघीजे ११६. **५ कर्मणी**–कीजे, होइजे. **६ तुमन्त**–धों २१, घेवों ८२. **७ ल्यबन्त**–वाउनि २, गजबजौनि १०७.

(ई) **निपात : १ पादपूरक**–पां, मा, ना, नाना. **२ क्रियाविशेषण**–वायें–यां वायें–यां ३४–४२, सांपे. **३ उद्गारवाचक**–हां गा, हां वो, रे, आहा बा, कटकटा ९३.

उभयान्वयी–शद्वयोगी अव्ययें सर्वसाधारण.

'स्मृ. स्थ.'त वाक्यरचनेचे विविध प्रकार आढळांत येतात. स्थला-भावास्तव चार–दोन दिग्दर्शित करतोंः (१) **विध्यर्थ**–'जेथ शास्त्राचें मुख तेथ अभ्यासीजेः' १०७; **संकेतार्थ**–'मी पापीया बोलतां कां तरि यांतें गोसावियांचीया लीळा पुसतां :' १३९. (२) **तरतमभाव**–'गृहस्मरणापसि झाडातळीं मनोरथ आठविसि तें निकें :' ३३. (३) **अपरिचित क्रियापदें**

---

१ यांवरील रा. गो. कृ. मोडक व रा. नेने यांचा उद्बोधक वाद अवश्य वाचावा (भा. इ. सं. मं. त्रै.).

'जाये त्यातें घेउनि ये मग **पाळूनि** : (पाळूं)' १५१; 'एकवेळ मी वीळीचां निद्रास्थाना एका देऊळा **गेलां** (गेलों) :' १०६. (४) **कांहीं शब्द वाक्याबाहेर ठेवण्याची लकब**–'(लक्ष्मीधरभटीं) 'प्रकरणिची लक्षणें' केलीं : **भटोबासां पुसपुसों** :' ११, 'तें उबरवटाची पातुलि चक्रपाणिवासासि दीधली : **कवीस्वरीं भिक्षासमें** :' वृ. २. (५) **पल्लेदार व शिथिल रचना**– 'हां गा **जे** आउ पुढां पळे : आणि गोसावी (जे) बुझावया पाठीं लागति : (जे) आउवेचें अन्न स्वीकरल्यावीन आरोगण न करीति : यैसी (जे) लाळीली : ताळीली : **ते** आउवेचे नेविजे' १९६, '**जोयें** वाक्यें कवीस्वरबासीं उधा[द्धा]रीलिं : **तेचि** हेतु : **तियेंचि** वाक्यें : **तेचि** मांडणि : **सारीखीचि** वीताति : परि **तेथ** प्रत्या नयेचि : आणि **येथ** आनोबासांचेनि आलें :' वृ. १६. (६) **म्हणीवजा**–'जिये चुलीची खीर खादली : तिये चुलीची काइ राख खाल :' ५८, 'सुवर्णाचीया पाइरीया जालीया तरि काइ डोइये चालों ए(येइ)ल :' वृ. १७.

९ '**स्मृतिस्थळां**'**तील ग्रंथकार**—'स्मृ. स्थ.'ला भाषिक महत्त्वाप्रमाणेंच वाङ्मयीन महत्त्वहि आहे. तें येण्याचें कारण हें की, त्यांत ब्रिनीच्या महानुभाव ग्रंथकारांची माहिती आलेली आहे. किंबहुना, या वैशिष्टचामुळेंच तें 'संदर्भ ग्रथ' म्हणून मराठींत कायमचें ओळखलें जाईल. त्यांतील ठळक ग्रथकारांचा थोडक्यांत परामर्ष घेऊं : (१) **महादाइसा**—हिच्या माहितीसाठीं माझें 'आद्य म. कवयित्री' पुस्तक पहावें. हिची '**अमरगण गगनीं पाहाति आनंदें** :' ही आरती मला अलीकडे एका पोथींत उपलब्ध झाली. (२) **म्हाइभट**—'लीलाचरित्र या अमर ग्रथाचा कर्ता (१४१). आठवणीरूपानें चरित्र लिहिण्याची यानें मराठीत नवीनच प्रथा पाडली. इतर चरित्रग्रंथहि याचेच समजले जातात. यांची '**आजिचा दिन आम्हा सोनियाचा** :' ही आरती मला वरील पोथींत सांपडली. हा स्वभावानें भोळा (१९२) व भाविक (१९८, २४७) होता. (३) **बाइदेव**—अमृतमधुर 'पूजावसरा'चा कर्ता. पंथाचा हा द्वितीयाचार्य होता, असें [1]'इतिहास' प्रकरणाधारें प्रो. वि. भि. [2]कोलते म्हणतात, तें मला मान्य आहे. या विधानास साळकर 'अन्वयास्थळा'मध्यें मला स्वतंत्रपणें आधार सांपडला : 'तैं

---

१ भा. इ. सं. मं. त्रै. १३–२. २ 'भा. भ. बोरीकर' पा. २५.

**बाइदेवोबा आचार्य होते :**' असें हें 'अन्वयस्थळ' स्वच्छच म्हणतें 'स्मृ. स्थ.'तील एतद्विषयक मुग्धता कवीश्वर आम्नायाच्या–भास्करभट्टाच्या–पक्षपाताची द्योतक असावी 'स्मृ स्थ.' पाठ साधारणपणें कवीश्वर आम्नायाचा दिसतो. बाइदेव निस्सीम चक्रधरभक्त (६) व वीतरागी (वृ. ७) होता. (४) **गोपाळपंडित ऊर्फ आनोबास**—याच्या बापाचें नाव सारंगपाणी व आजाचें अनंत कोचा (=किल्ली, कोशाध्यक्ष १८७). रामदेव यादवाची राणी कामाइसा हिचा हा कारभारी व पुराणिक होता (१४५). यानें 'अंताक्षरी' (वृ. ९९), 'लक्षणरत्नाकर' इ. ग्रंथ केले आहेत. हा पट्टीचा विद्वान् व वादपटु होता (वृ. १६). यानें नागदेवामागें (२३४) बाइदेवाकडून दीक्षा घेतली (साळकर 'अन्वयस्थळ'). पारमांडल्य आम्नायाचा हाच प्रवर्तक होय. (५) **केशोबास**—हा पापदंड रामपुरीचा. 'अ. स्मृ.' १९० व 'स्मृ. स.' ४१ यांत याला गोपाळपंडिताचा भाऊ म्हटलें आहे, पण हें नातें 'स्मृ. स्थ.'स विदित वा मान्य नाहीं. 'स्मृ. स्थ.' १३ तील केशोबासाचा भाऊ **गोपाळदेव** असून **गोपाळपंडित** नाहीं. हा 'सूत्रपाठ' (१७) व 'रत्नमाळा' (१३) याचा कर्ता आहे. याच्या नांवावर मोडणारें 'मूर्तिप्रकाश' काव्य भास्कराचा पूर्वील गुरु केशवाचार्य (११६) याचेहि मानतात (हरिबास–सोंगोबास 'अन्वयस्थळ'). महानुभाव पंथाला शास्त्राधिष्ठान यानेंच मिळवून दिलें (२२५). हा कडकडीत विरक्त होता (१३, १०५). (६) **दामोदरपंडित**—'स्मृ. स्थ.'प्रमाणें यानें 'वत्सहरण' काव्य केशोबासाच्या हयातीत त्याचें नांव घालून लिहिलें (वृ. ४). परंतु तें त्यानें केशोबास मरण पावल्यावर त्याच्या स्मृत्यर्थ त्याच्या नांवानें लिहिलें, असें हरिबास–सोंगोबासाच्या 'अन्वयस्थळांत'त सांगितलें आहे. चौपद्या, पदें, धांवा इ० यानें केली आहेत. याची रचना याच्या कित्येक समकालीनांइतकी हृद्य नाहीं. हा 'लाजीवैरागडा' कडे वारला ('स्मृ. स. वृ.' ३५). याची पत्नी हिराई फार विरक्त होती. (७) **भास्करभट्ट**–हा नागदेवाचा 'भाटो' म्हणजे मेव्हणा (५५, २३८). 'शिशुपाळवध' हें याचें काव्य संस्कृत पंचमहाकाव्यांच्या धर्तीचें असून प्राचीन मराठींत तशी दुसरी कृति नाहीं. 'ज्ञानेश्वरी'शीं तुलना करण्यासारखें प्राचीन मराठीतलें हेंच एक काव्य होय. 'स्मृ. स्थ.' प्रमाणें हें काव्य व

'एकादशस्कंद' त्यानें नागदेवाच्या पश्चात् लिहिलें (वृ ७). त्याची आणखीहि रचना आहे. हा महानुभाव पंथाचा तृतीयाचार्य व कवीश्वर आम्नायाचा प्रवर्तक. याच्या जास्त माहितीसाठीं प्रो. कोलते यांचें 'भास्करभट्ट बोरीकर' पुस्तक पहा. (८) नरेंद्र–'स्मृ. स्थ.' ६४ त याचा एकदां उल्लेख असून ११३ ही एकच स्वतंत्र स्मृति याजविषयीं आलेली आहे. आद्य स्मृतिकर्ता म्हणून समजण्यांत येणाऱ्या नरेंद्राबद्दल या व इतरहि पाठांत इतकी थोडी हकीकत यावी, हें आश्चर्य होय ! याच्या 'रुक्मिणीस्वयंवर' काव्याचेच (११३) 'नरींद्र' हेंहि ग्रंथनाम आढळतें (हरिबास–सोंगोबास 'अन्वयस्थळ'). स्मृ ११३ त १८०० ओंव्यांचा निर्देश आहे, म्हणून या काव्यांतील उरलेला सर्वच भाग प्रक्षिप्त मानण्याचें प्रयोजन नाहीं. स्वतः नरेंद्रानें त्यांत नंतर भर घातली असेल. शिवाय कांही ठिकाणी थोडाफार प्रक्षिप्त मजकूरहि असेल, नाहीं असें नाहीं. यानें ७०० स्मृति केल्याचें मागें अनेकदां येऊन गेलेंच आहे. (९) **हरगर्व**–हा राक्षसभुवनचा असून (वृ. १६) यानें पैठणला 'श्लोकबंध गद्य' म्हणजे 'गद्यराज' नामक निर्यमक श्लोकबद्ध काव्य केलें. निर्यमक रचनेस सरळ-सरळ 'गद्य' म्हणणें ही केवढी यमकासक्ति म्हणावी ! १० **परशराम**–याच्या बापाचें नांव [1]खेइदेपंडित. खेइदे चक्रधरप्रसादानें [1]जन्मला. परशराम हा भास्कराचा शिष्य असून पंथाचा चौथा आचार्य होय. याच्याच वेळीं तेरा आम्नाय निर्माण झाले, असें [1]म्हणतात. यानें 'निर्वचन' इ० विविध कृति (वृ. २३) व 'लीलाचरित्रा'चा 'सिद्धिपाठ' केला (साळकर 'अन्वयस्थळ'). स्मृतिकार म्हणून नरेंद्रापेक्षां याचीच जास्त कीर्ति आहे.

यांखेरीज 'आचार–विचार–लक्षणें' वगैरे करणारा [2]राजौरकर लक्ष्मीद्रभट (१०), 'ज्ञानभास्कर'कार विरहे ऊर्फ वाडेगांवकर (हरिबास–सोंगोबास 'अन्वयस्थळ') लक्ष्मींद्रभट (१८), '**अपरा परू सकळ वीस्वाचा दातारू:**' या मला उपलब्ध झालेल्या आरतीचा कर्ता मेइदेव ऊर्फ कोथळा (४७, १७८, १९३, १९५), सालकवि व नृसिंहकवि (११३), काळे कृष्णभट (३०, ११४), नामदेव शिंपी (२४४), विनायकदाए (११२, वृ.

१ 'लीलाचरित्र–'नेनें भा. ४ पा. ३१. २ 'म. म. वाङ्मय' पा. ३२, 'भा. भ. बोरीकर' पा. ४३.

२३) हे कवि आणि साकाई (३३), नाईकबाई (१६५) या कवयित्री यांची 'स्मृ. स्थ.' अल्पस्वल्प हकीकत देतें. नामदेव शिंपी हा जसा प्रख्यात अभंगकार नामदेव नव्हे, तसाच विष्णुदास नामाहि नव्हे. कारण विष्णुदास नामा हा शके १५१७ त जिवत होता, असें कै. [1]राजवाडे सांगतात.

'स्मृ. स्थ.'नें अकाली गत झालेल्या एका तत्कालीन कवीचा अवांतर वृत्तांत देऊन त्याचा कवित्वगुण मात्र 'अनुल्लेखानें मारला' आहे! हा कवि आकाईचा रामदेव होय (५६-६१). हरिदास-सोंगोबास 'अन्वयस्थळां'त ''उधाति परिमळ' हे आरती आकाइसाचेया रामदेवाचीः' असें नमूद केलेलें आहे. 'अ. स्मृ.' २७ व 'स्मृ. स.' १०८ यांत 'रामासि मऱ्हाटी सरळि :' असें नागदेव म्हणतो, तें बहुधा त्याच्या कवित्वामुळेंच. 'स्मृ. स्थ.' ८८ त हा निर्देश नाही. रामदेव नागदेवावर बिथरला, म्हणून 'स्मृ. स्थ.'ची त्याजवर ही वक्रदृष्टि दिसते!

**१० 'स्मृतिस्थळ'कालीन परिस्थिति**–'स्मृ. स्थ.'चें तिसरें महत्व ऐतिहासिक असल्यानें त्यावरून तत्कालीन परिस्थितीवर काय प्रकाश पडतो, हें आतां बघावयाचें आहे.

(१) [2]**राजकीय**–यादव राज्यावर दिल्लीच्या सुलतानाचें परचक्र चालून आलें (८३). 'तुरुक' सर्वत्र पसरून कहर करूं लागले (८४-८५). त्यांनीं रामदेव यादव धरला, पण तो पुढें सुटला (८६). शके १२१७ तील अल्लाउद्दीनची व शके १२२९ तील मलीक काफूरची यांपैकी ही कोणती स्वारी आहे, हें साधनाभावीं ठरवितां येत नाहीं. मात्र रामदेवाच्या धरण्या-सुटण्यावरून ही शके १२२९ तील स्वारी असावी, एवढाच तर्क बांधतां येतो. रामदेव साधुसंतांचा छळ करणारा असून (८६) त्याला ग्रंथकार म्हणवून घेण्याची हांव होती (११३). त्याची राणी कामाइसा नागदेवाची शिष्या होती (१४५-४६). रामदेव मृत्यु पावल्यावर

---

१ भा. इ. सं. मं. शके १८३३ चा अहवाल पा. १२२. २ रा. य. खु. देशपांडे यांच्या 'महानुभावीय वाङमयांतील यादवकालीन ऐतिहासिक उल्लेख' (भा. इ. सं. मं. त्र. १०-२) या लेखांतील उतारे 'स्मृ. स.'तील दिसतात. पण त्यांत पोथ्यांतून न आढळणारा पुष्कळच भाग दिसतो!

कामाइसेला जबरदस्तीनें सती जावें लागलें (१४९–५०). 'अ. स्मृ.' व 'स्म. स.' ही जबरदस्ती तिचा सावत्र मुलगा सिगण यानें केली, असें सांगतात (परिशिष्ट ३, १४९). याच पाठद्वयात कामाइसेच्या पित्याचें 'मांदळीया माहादरणा' असें नांव दिले आहे.

(२) सामाजिक–'स्मृ स्थ.' त दुष्काळाचे तीनदां स्वतत्र उल्लेख आले आहेत (२७, १०७, वृ. २१). दुष्काळांत श्रीमंत लोक अन्नछत्र घालीत (वृ-२१). कांही कुटुंबांत स्त्रीपुत्रास अन्नवस्त्राचीहि ददात पडे (११२). चोरांचा उपद्रव बराच असून (वृ. १४) कित्येकदां चोर म्हणून भलतेच लोक धरले जात (२०, ३०). प्रवास करणें निर्भय नसून प्रसंगोपात्त प्रवासांत वाटमाऱ्यांकडून प्राणांसहि मुकावें लागे (१) !

खाद्य पदार्थांत रोटया–भरीत (४१, ७२), 'सेवैया–सरवळीया' (४१), हुरडा–साखर (८१), पोळी–वरण–कढी–भात–भाजी (१०७), मांडे–पुऱ्या (११०), लाडू–खीर (१४२), कांदे (१६०) हे नित्याचे पदार्थ होतेच, पण कुहिरीच्या शेंगा खाण्याचा विशेष प्रघात होता (१०१). आजाऱ्याला दूध, भात व साखर खावयास देत (वृ. ९). सुपारी (१५७–५८), विडा (७८) ही मुखशुद्धि भोजनोत्तर असेच !

'आसु' नामक नाणी प्रचारांत होती (११३). स्वयंपाकिणीला एका वेळच्या स्वयंपाकास प्रसंगीं चार रुक्यांपर्यंत मोबदला द्यावा लागे (११०). म्हातारपणासाठीं पैसा काढून ठेवीत (१०७). क्वचित् द्रव्याची ठेव सांपडे (२२३). संन्याशाचें धन गृहस्थास मिळत नसे (११, वृ. १). गुजराथ प्रांताशी व्यापार चालत होता (वृ. ३).

स्त्रियांना संस्कृतचें ज्ञान नव्हतें (१५), पण कविता करण्याइतकें चातुर्य मात्र खचित होतें (३३, १२३, १६५). वैवाहिक जीवनांत पति पत्नीच्या इच्छेकडे लक्ष्य देत नसे (१९). समाजांत तरुण विधवा बऱ्याच असून उरलेलें आयुष्य सन्मार्गांत जाण्यासाठी त्यांना सत्पुरुषसहवास घडण्यास उत्तेजन देण्यांत येत असे (१, १८३). सधवा स्त्रियाहि प्रपंच सोडून परमार्थसाधन करीत (५४, ९७). स्त्रियांत क्वचित् व्यभिचार-प्रवृत्ति दिसून येई (१०५). त्यांना कित्येकदां संपत्तीचा वाटा मिळे (११, ९९).

समाजांत विद्वान्वर्ग असून त्याचे आपापसांत वादविवाद होत (११६, २०२, २०४). पुराण सांगण्याचा प्रघात होता (१२०–२१). ही पंडित-मंडळी सुद्धां स्वप्न, वास्तुदेवता–वगैरेवर विश्वास ठेवण्याच्या लोकभ्रमापासून मुक्त नव्हती (२५६)!

राजाशिवाय कोषाध्यक्ष (१३९), गांवचा अधिकारी (१५१; 'पाटील'–'अ. स्मृ.' १४३) या अधिकाऱ्यांचा निर्देश येतो. न्यायनिवाडा देण्याचें काम संन्याशी, महाजन यांच्याकडे असे (वृ १). देऊळवाडा (११), रायेर–नांदेड, नाशीक–त्र्यंबक (वृ. १) येथें हें काम होई.

किरकोळांत 'पाटाउं पासवडी' (४०), 'साउला' (२५६) हे वस्त्र-विशेष, 'पाग' (९७) हें शिरोभूषण, करडेल (९३), वाहाणा (१७९, २१८), पालखी (वृ. ८), तोतया (१९२), चांभार (१३८), वैद्य (वृ ९), वेश्या (२१०) यांचा उल्लेख करतां येईल.

धार्मिक—समाजांत अंधश्रद्धा वास करीत होती. शूद्रांचा विटाळ मानला जाई (१९३). पुनर्जन्मावर लोकांचा विश्वास असून (वृ. ३) मूर्तिपूजा जारी होती (२३). देवळांचें वैपुल्य होतें. क्वचित् देवळावर नरक वगैरे चितारलेले असत (२२०). देवळांचा प्रसंगी दुरुपयोगहि करण्यांत येई (१०५–१०६)! संसार करण्यापेक्षां सोडण्याकडेच अधिक प्रवृत्ति असे. केवळ विंचू चावल्यावरून प्रपंच सुटे (२५)!! गुरूचें मोठेंच बंड होतें. त्याजशी तात्त्विक वाद करणेंहि उद्धटपणाचें समजलें जाई (२३७). त्याला ईश्वरावतार समजून त्याची पीक चाटण्यापर्यंत मजल जात असे (६)! नाथ (१२३, १९२), महानुभाव इ. पंथ प्रचलित होते. 'चोळीका' (९९) हाहि एक पंथ असून तो वाममार्गी असावा, असें हरिबास–सोंगोबास 'अन्वयस्थळां'तील 'चोळका पंथ मद्यमांसभक्षक : व्यभीचार : घटपूजन : यंत्रपूजा'...या अवतरणावरून दिसेल.

(४) भौगोलिक—'स्मृ. स्थ.'त देवगिरी–वरंगळपासून तों उज्जनी–काशीपर्यंत आणि बेलापुर–डोंबेग्रामापासून तों तळेगांवदशासर–ऋद्धि-पुरापर्यंत अनेक गांवांचीं नांवें येतात. वृधा (वर्धा), गंगा (गोदावरी) वगैरे नदीनामें आणि वऱ्हाड वगैरे प्रांतनामेंहि त्यांत आलीं आहेत. तीं सर्व तत्कालीन भौगोलिक परिस्थिति दर्शवितात.

११ ‘स्मृतिस्थळां’तील महानुभाव पंथ—‘स्म. स्थ.’तील पंथीय थोर व्यक्ति व खुद्द पंथ यांचा स्वतंत्रपणेंच विचार करणें बरें, म्हणून तसें करीत आहें.

(१) गोंविदप्रभु—हा [1]‘पंचकृष्णां’पैकीं एक असून चक्रधराचा गुरु होय. ‘गुंडम’ हें त्याचें मूळचें नांव. त्यानें परमेश्वरपुर ऊर्फ ऋद्धिपुर (हल्लीचें रितपुर, जि. उमरावती, वऱ्हाड) येथें आयुष्य व्यतीत केलें. ‘बालोन्मत्तपिशाच्चवत्’ अशी त्याची वृत्ति होती. चक्रधरानें सांगितलें, म्हणूनच नागदेवप्रभृतींनीं त्याची सेवा केली (२१०). ‘अवो मेला, अवो मेली’ ही त्याची आवडती शिवी होती (२, ४)! त्याच्या निधनोत्तर नागदेव अनुयायांसह कायमचा वऱ्हाड सोडून गोदाकांठीं राहण्यास गेला. ‘ऋद्धिपुरचरित्रां’त गोंविदप्रभूचें जीवनवृत्त आलें आहे.

(२) चक्रधर—हाहि [1]‘पंचकृष्णां’पैकीं एक असून महानुभाव-पंथ-संस्थापक होय. आपण मूळ द्वारकेचा चांगदेव (‘पंचकृष्णां’पैकीं तिसरा) नांवाचा योगी असून भडोचच्या हरिपाळदेव या प्रधानपुत्राच्या मृत शरीरांत योगबलानें प्रवेश केला, व तोच आपला हल्लींचा देह होय, असें हा महादाइसेला [2]सांगतो. ‘स्मृ. स्थ.’ ४ त त्याला याच संदर्भानें ‘श्रीचांगदेओराऊळ’ म्हटलें आहे. पुढें त्यानें वऱ्हाड, पैठणप्रांत वगैरे ठिकाणीं संचार केला.

महानुभावांत चक्रधराला केवळ पंथसंस्थापकच नव्हे, तर साक्षात् ईश्वरावतार मानतात (३५, १७५, २५४ इ.). त्याचें चिंतन करणें (२५७), त्याच्या लीला आठवणें (६१), त्याच्या शिकवणुकीप्रमाणें आचरण ठेवणें (५९), त्याचा संबंध आलेल्या वस्तूंना पवित्र लेखणें (८, ६९) व तो राहिलेल्या स्थलांची यात्रा करणें (३९, ११५)—यांतच पंथाचें सारसर्वस्व सामावलें आहे.

स्मृ. १ ते ४ आणि ६ व ९ यांवरून चक्रधरास लौकिक मृत्यु आला की काय, असें वाटतें. पण स्मृ. २३२ त तो उज्जनीस असल्याची किंवदन्ति येते. स्मृ. १९२ तील तोतया तो विद्यमान असल्याचीच खूण सांगतो.

---

१ ‘सूत्रपाठ’—नेने पा. १. २ ‘लीलाचरित्र’—नेने भा. १ पा. २-३.

'लीलाचरित्रा'च्या सर्व पाठांत चक्रधर अखेरीस 'उत्तरा पंथें' गेल्याचा वृत्तांत आला आहे. मात्र कांहीं पाठांत रामदेव यादवानें बेलापुर (जि. अहमदनगर) येथून चक्रधरास नेऊन देवगिरीत ठार केलें, पण तो लगेच जिवंत झाला (मीं पाहिलेली एक पोथी, उत्तरार्ध लीला ५९५), व 'उत्तरा पंथें' गेला (ली. ५९७), अशी यापूर्वीची अद्भुत हकीकत आली आहे. शेवटच्या ली ६०२ मध्यें चक्रधर उज्जनीस असल्याची अफवा नमूद केलेली आहे. ही लीला म्हणजेच 'स्मृ. स्थ.' २३२ होय.

'लीलाचरित्रा'च्या दोन पाठांतील या भिन्न–व एकांतील असंभवनीय–वृत्तांताची चिकित्सा करण्याचें हें स्थल नव्हे. दोन्ही पाठांत चक्रधर शेवटीं 'उत्तरा पंथें' गेल्याची हकीकत आलेली असल्यामुळें 'स्मृ. स्थ.'त तिचा प्रतिध्वनि उमटावा, हें अगदीं साहजिक आहे, इतकेंच मला तूर्त दाखवावयाचें आहे. 'स्मृ. स्थ.'च्या मूळ कर्त्यानें अगर संस्करणकारानें हा भाग 'स्मृ. स्थ.'त स्वतःच दडपून दिलेला नाही, एवढी वाचकाची खात्री पटली, म्हणजे पुरें.

चक्रधराचा 'प्रवृत्यतर'–शक ११९४ आहे (१). तो खरा–खोटा ठरविण्यापूर्वीं पुष्कळच साधनें उजेडांत आली पाहिजेत. 'लीलाचरित्रा'-तील मुख्यतः वर्षगणनेवरून ठरविलेला प्रो. [1]कोलते यांचा शके ११९८ हा कालनिर्णय मान्य करतां येत नाही. प. [2]बाळकृष्णशास्त्री यांच्या ११९७ शकाबद्दलहि असेंच म्हणतां येईल.

(३) **नागदेव**—'स्मृ. स्थ.'तील स्मृतिविभागाचा हा चरित्रनायक असून पथाचा आद्याचार्य होय. नागदेवाच्या बापाचें नांव महादेवभट व आईचें आबाईसें (१). त्याची पत्नी गंगाइसा ('लीलाचरित्र') व पुत्र महेश्वर (वृ. १). नागदेव तारुण्यांत अनेक 'ढांढाळांचा' [3]होता. पुढें रामदेव ऊर्फ दादोस (१, २२१) याच्यामुळे तो [4]निवळला व त्याच्याचमुळें त्याची श्रीनगर ऊर्फ सिन्नर (१) येथें चक्रधराशी [5]प्रथम भेट होऊन त्याचा तो पट्टशिष्ट बनला. चक्रधरापासून नागदेवानें संन्यासदीक्षा घेतली होती.

१ 'भा. भ. बोरीकर' पा. ७७. २ 'महाराष्ट्र.' ३ 'लीलाचरित्र–नेने भा. ३ पा. १०८; उत्तरार्ध १. ४ कित्ता भा. २ पा. ५०. ५ कित्ता पा. ५१.

चक्रधराच्या पश्चात् नागदेवानें ऋद्धिपुरास गोविंदप्रभूची सेवा केली. [1]शके १२०८ त गोविंदप्रभु वारल्यावर तो निंब (जि. परभणी, मोंगलाई) येथें राहूं लागला.

उर्वरित आयुष्यांत नागदेवानें चक्रधराच्या आदेशानुसार पंथप्रसार केला (१११). 'स्मृ. स्थ.'त त्याच्या 'पाचास्यां गुरुकुळा'चा उल्लेख येतो (१११, २५९). तो स्वतः विद्वान् नव्हता ('ली. च.' व 'स्मृ. स्थ.'). परंतु म्हाइंभट, गोपाळपंडित, केशोबास, दामोदरपंडित, भास्करभट्ट-असे थोर थोर विद्वान् त्यानें आकर्षित केले, यावरून त्याच्या 'वेधवंती' (३०, २१९) पदवीची यथार्थता पटेल. विद्वत्ता नसली, तरी संस्कृत भाषेचें त्याला कळण्यापुरतें ज्ञान होतें (१४). मराठी भाषेचें त्याचें प्रेम उत्कट होतें (६६). त्याच्यांत रसिकता (११४) व विनोदबुद्धीहि (१५३) वसत होती. शिष्यांबद्दल त्याला आपुलकी (१०७) असून सुद्धां त्यांवर तो करडी नजर ठेवी (१२४, १६१, २१३). त्याची लीनता उल्लेखनीय आहे (४०). शिष्यांना स्वतःच्या पायांवर मस्तक ठेवून नमस्कार न करूं देणें (१२८, १३०), आपलें पादतीर्थ घेण्यास मनाई करणें (१२७), स्वतःस नुसतें 'भटो' म्हणविणें (१२६), मृत्युसमयीं हात जोडून सर्व शिष्यांची क्षमा मागणें (२५९)—वगैरे गोष्टी त्याच्याबद्दल मनांत आदर उत्पन्न करतात. त्याची चक्रधरभक्ति 'स्मृ. स्थ.'च्या पानापानांतून ठिबकत आहे. 'हां गा : श्रीचक्रधराचेनि प्रसादें इतुलें(ही) नेणें :' (३६, ७२ इ.) असें तो स्वतःबद्दल नेहमीं म्हणतो, तें जितकें मौजेचें तितकेंच चक्रधरभक्तिसूचक आहे. चक्रधरानें ज्याप्रमाणें खुद्द नागदेवाला [2]'वानर' (१११ २५७) हें टोपणनांव व इतर शिष्यांना दुसरीं टोपणनांवें ठेवलीं, त्याप्रमाणें नागदेव देखील आपल्या शिष्यांना टोपणनांवें ठेवी (५५, १३७). चक्रधराला 'रवळा' नामक कुंभारानें आपलें एक पद्य दाखविलें असतां त्यानें, 'तुझा निर्वंशू होए ऐसा (गीत) जाला :' असे उद्गार [3]काढले ! त्याच धर्तीवर एका ब्राम्हणाला त्याच्या पद्यावरून नागदेव 'जेणे केला तयासि नरक होति :' असें म्हणतो (२१५) !

१ 'आ. म. कवयित्री' प्रस्तावना पान. १२. २ 'लीलाचरित्र'—नेने भा. ३ पा. ८७. ३ कित्ता भा. २ पा. १०.

तात्पर्य, चक्रधराच्या किरकोळ लकबी आत्मसात् करण्यापर्यंत नागदेव तद्रूप झाला होता !

याप्रमाणें पंथप्रसार करून नागदेवानें देह ठेवला. त्याचा १२२४ हा सांप्रदायिक निधनशक आहे (२६०). पण अंतःप्रमाणांवरून तो मान्य करतां येत नाहीं. शके १२३१ त रामदेव यादवाच्या निधनप्रसंगी नागदेव हयात होता ('स्मृ. स्थ.' १४९, 'अ. स्मृ.' १४१, 'स्मृ. स.' १७३). त्याच्या तोंडीं 'ना मी वर्तें तवं मऱ्हाटें (यादवांचें राज्य) वर्तेल :'–अशी भविष्य-वाणी घालण्यांत आली आहे ('स्मृ स्थ.' ८६, 'अ स्मृ.' ९८, 'स्मृ. स.' ९७), तेव्हां शके १२३४ त यादवराज्य बुडण्यापूर्वीं केव्हां तरी नागदेव वारला, हें निर्विवाद आहे. स्मृतीच्या उपलब्ध तिन्ही पाठांत हे निर्देश असल्यानें अंतर्गत पुरावा म्हणून ते स्वीकारल्यावांचून उपाय नाहीं. अर्थात् शके १२३१ ते १२३४ च्या दरम्यान नागदेव मरण पावला असला पाहिजे. [1]'आद्य म. कवयित्री' पुस्तकांत मीं हाच काल ठरविला आहे. 'लीला-चरित्रा'दि ग्रंथांतील वर्षगणना (अशी वर्षगणना 'स्मृ. स्थ.' २६० मध्येहि आली आहे!) प्रमाणभूत समजून प्रो. [2]कोलते वरील अंतर्गत पुरावा त्याज्य मानतात, हें आश्चर्य होय. कालनिर्णयांत वर्षगणना व अंतःप्रमाणें यांत विरोध आला असतां कशाला महत्त्व द्यावयाचें, याबद्दल–मला वाटतें–मतभेद होऊं नये.

(४) **महानुभाव पंथ—(अ) तत्त्वज्ञान—**'स्मृ. स्थ.'त महानुभावीय [3]तत्त्वज्ञानाचें सुसूत्र विवेचन येण्याचें प्रयोजन नसल्यानें तें तसें आलेलें नाहीं. तथापि त्यांतील कांहीं छटा इतस्ततः विखुरलेल्या आहेत, त्याच येथें संकलित करून मांडतों.

महानुभावांचा ईश्वर जीवोद्धरणासाठीं वेळोवेळीं अवतार घेतो. 'सूत्रपाठा'तील कृष्ण, दत्तात्रय, द्वारकेचा चांगदेव, गोविंदप्रभु व चक्रधर हे 'पंचकृष्ण' असेच ईश्वरावतार होत. स्मृ. ३२ त या पंचकृष्णांचा उल्लेख

---

१ प्रस्ता. पा. ९. २. 'भा. भ. बोरीकर' पा. ३५–३७. ३ महानुभावीय तत्त्वज्ञानाच्या जास्त माहितीसाठीं 'महानुभावांचा वेद' ('विविधज्ञान-विस्तार' नोव्हें. व डिसें. १९२७) हा माझा विस्तृत प्रबंध पहावा.

आहे. चक्रधर हा त्यांतील सर्वांत अलीकडील अवतार होय.

देवता या ईश्वराच्या अपेक्षेनें कनिष्ठ आहेत. देवतांत 'चैतन्यमाया' ('चैतन्य' ५७) ही मुख्य आहे (१७०). या देवता आपल्या भक्तांना जास्तीत जास्त स्वतःचें पद देऊं शकतात. पण तें पद शाश्वत नसून अशाश्वत असल्यानें साधकानें त्यांच्या उपासनेंत गुरफटावयाचें नसतें. देवतांना याच कारणानें 'वैरी' म्हटलेलें आहे (१०४). महादाइसेला आपलोचें देवतापूजन न रुचण्याचेंहि हेंच कारण होय (२३). मात्र देवता गौण असल्या, तरी त्यांना 'खेद' देणें देखील निषिद्ध ठरविलें आहे ('चौथा निषेध तो देवतेचा क्षेदुः' २३३).

देवतांच्या या गौणत्वामुळें जीवानें ईश्वरभक्तींत गुंग झालें पाहिजे. सृष्टिसंहारापर्यंत कुणी ना कुणी ईश्वरावतार जीवाला आत्मपद—मोक्ष—देण्याचें कार्य अविरत करीत राहणार आहे. मोक्षप्राप्तीपूर्वी जीवाला देहधारी होऊन ज्ञान मिळविलें पाहिजे. जीव हा अनादिकालापासून अविद्यायुक्त असून 'अव्यक्तीं व्यापारु नाहीं' ('सूत्रपाठ,' वि. मा. १६) असा पंथसिद्धांत असल्यानें त्याला देहधारणा अपरिहार्य आहे. देहधारणे-नंतरची दुसरी पायरी ज्ञानप्राप्तीची. हें ज्ञान त्याला पूर्वकर्मानुसार खुद्द ईश्वरावतार स्वमुखानें देईल, किंवा आचार्यमुखानें तें त्यास प्राप्त होईल ('श्रीमुखें दीधलें : अधिकारद्वारें दीधलें :' १३२; 'स्वयं परमेश्वरु ब्रम्हविद्या देति : कां अधिकरणातें अधिकरूनि देति :' २०७). ज्ञानप्राप्ती-नंतर जीवानें शास्त्राज्ञेप्रमाणें आचरण ठेवावयाचें असतें. हा आचारधर्म पाळीत असतांना तो देहधारी जीव सृष्टिक्रमानुसार केव्हां तरी मरतो. पण त्याला लगेच मोक्ष न देतां ईश्वरावतार 'सुखीया श्रीमंतांचां घरी' (१३२; 'ते पुरुषु होउनि जन्मती :' ७५, 'तरि पुत्र होउनि जन्मति :' १५०; '**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥**–' गीता ६–४१.) जन्म घ्यावयास लावतो. जन्मानंतर बारा वर्षांनीं ईश्वरावतार त्याला प्रत्यक्ष भेटतो ('मग बारां वरीखां तुम्हां नवेन भेटि दीजैल :' १३२; 'आतां नवेयां संबंधु ॥'–'सूत्रपाठ,' आचार १३९). लोकांत बभ्रा न व्हावा, म्हणून ईश्वरावतार 'विज्ञानशक्ती'नें त्याचा एक पुतळा निर्माण करून त्याच्या घरीं ठेवतो, व त्याला आपल्याबरोबर घेऊन जातो. मग त्याला

क्रमाक्रमानें 'अपरोक्ष,' 'सामान्य' व 'विशेष' ज्ञान देऊन ('मग ईश्वर ज्ञान देईल : ' १५०) त्याचा अविद्यालोप करतो, आणि शेवटीं शाश्वत ईश्वरपद–मोक्ष–देतो.

वृ. ३ मध्यें 'गुजरातें खांबाइतीं' नागदेवाला जो पुनर्जन्म प्राप्त झाला, तो याच प्रकारचा होता. बारा वर्षांनीं ईश्वरावतार चक्रधर त्याला भेटून मोक्ष देईल, असें गृहीत धरावयाचें आहे ! रामदेव यादवाची राणी कामाइसा हिलाहि असा पुनर्जन्म लाभण्याची एक शक्यता स्मृ. १५० त नमूद केलेली आहे.

(आ) **आचार**––'स्मृ. स्थ.'त '**भटमार्ग**' असा महानुभाव पंथाचा निर्देश केलेला आढळतो (५३, २१८). क्वचित् 'परमार्ग' हाहि शब्द येतो. पंथीयांस प्रायः 'महात्मा' शब्द लावलेला आहे. पंथीयांस 'स्मृ. स्थ.'मध्यें 'महानुभाव' हा शब्द अत्यल्प स्थलीं (५३, २३३) लावलेला आहे. 'अ. स्मृ.' व 'स्मृ. स.' या उभयतांत मात्र तो बऱ्याच स्थलीं सांपडतो. असो. पंथाचा संबध फक्त ईश्वराशीं, म्हणून 'अच्युत' हें त्याचें 'गोत्र' (१११; 'सूत्रपाठ,' आ. १३६). हा पंथ संन्यासमार्गी आहे. 'अनुकूळ' (११२), 'वासनिक' (२४, २६ इ.) हे पंथाचे गृहस्थाश्रमी अनुयायी असले, तथापि सर्व भर संन्यासावर आहे. संन्यास वृद्धपणीं (१००) किंवा मरतां मरतां (२४) न घेतां शक्य तेवढ्या उमेदींत घ्यावा. शूद्र (५३) व सधवा स्त्रिया (२५, ४९, ५४, ९७) यांनाहि संन्यास देत, असें या सर्व ठिकाणच्या 'भिक्षा करणें' या प्रयोगावरून म्हणावें लागतें. स्मृ. ११८ त नागदेव ब्राम्हणी गृहस्थाश्रमाला उद्देशून 'जळो जळो तुझें सिखासूत्र : ' असें म्हणतो, तें हा पंथ संन्यासमार्गी असल्यामुळेंच.

संन्यासामुळें निवृत्ताचा सर्व आचार आलाच : फाटकें वस्त्र व भिक्षान्न हीं 'अवीट' आहेत (२३१). कसल्याहि वस्तूंचा संग्रह करूं नये (४१). मीठ (३६) व गीत (८९) हीं देखील वर्ज्य आहेत. विजनीं (३३, १०१) किंवा एकांतीं (१९५) वास करावा. विजन-वासानें बुद्धीस उजळा येतो (७६, वृ. ११).

पंथाची विशिष्ट बाब म्हणजे पोषाख होय (३०). पण चक्रधराच्या सन्निधानींचा वेष कसा होता, व असन्निधानींचा वेष चक्रधराच्या सांगण्या-

प्रमाणें नागदेवानें कसा ठरविला, हें या स्मृ. त स्पष्ट नाहीं. परिशिष्ट ३, (३०) वरून असन्निधानीचा वेष भगवा असावा, असा बोध होतो.

पंथाची दुसरी विशिष्ट बाब दोन पंथीय भेटले असतां त्यांनीं करावयाच्या विधीची आहे. स्मृ. १७७ प्रमाणें त्यांनीं एकत्र खानपान व वस्त्रांची अदलाबदल करावयाची असते. 'अवघो क्रीया जाली:' हा स्मृ. १६९ तील निर्देश याच बाबीचा आहे. 'सूत्रपाठां'तील आचार १२९–१३४ या चक्रधरोक्तीचेंच हें आचरण होय.

पंथाचीं स्वतंत्र देवळें निर्माण करण्याचें तत्कालीन पंथधुरीणांनीं टाळलेलें आहे (वृ. ५).

१२ उपसंहार—येथपर्यंत 'स्मृतिस्थळा'चें यथामति विवेचन केलें. त्यायोगें या ग्रंथाचें महत्त्व पटण्यास व अध्ययन करण्यास कांहींशी मदत झाली, तर माझे परिश्रम सार्थकीं लागल्यासारखे होतील. टीपा, शद्वकोश व सूची देऊन त्याहि दृष्टींनीं ग्रंथ उपयुक्त करण्याचा यत्न केलेला आहे.

महानुभाव वाङमयाकडे तिरस्कारानें–निदानपक्षीं उपेक्षेनें–पाहण्याची प्रवृत्ति अजूनहि दृष्टोत्पत्तीस येते. महानुभाव पंथांत इतरांस न रुचतील, अशा कांहीं बाबी अवश्य असतील–नव्हे, आहेत. पण तेवढ्यासाठीं त्या पंथाचें वाङमय एकजात त्याज्य मानण्याइतकी संकुचित बुद्धि दर्शविणें कितपत इष्ट आहे? महानुभाव वाङमयाचें इतर ऋण कुणी कितीही नाकारलें, तथापि त्याचें गद्य–ग्रंथ–विषयक ऋण सहजासहजीं नाकारतां येण्यासारखें खचित नाहीं. बृहन्महाराष्ट्रांत वाङमयसंशोधनास अजून पुष्कळ वांव आहे, हें खरें आहे. आणि न जाणों, पुढें–मागें पंथाबाहेरचें प्राचीन मराठी गद्य विपुल प्रमाणांत उपलब्ध होईलहि! परंतु तसें जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत सध्यां उजेडांत आलेल्या महानुभावीय गद्य ग्रंथांची योग्य बूज करण्यास काय हरकत आहे? बरें, पुढें–मागें पंथाबाहेरचें प्राचीन गद्य उपलब्ध झालें, तरी देखील महानुभावीय गद्य ग्रंथांचें महत्त्व—या–ना–त्या बाबतींत—नेहमींच कायम राहणार आहे. तेव्हां हें सर्व ध्यानांत घेऊन निःपक्षपात बुद्धीच्या भाषाभ्यासकांनीं 'स्मृतिस्थळा'-सारख्या गद्यरचनेचा यथोचित परामर्ष घ्यावा, एवढीच नम्र प्रार्थना आहे.

शेवटीं माहूरचे म. दत्तराजबुवा व त्यांचे पट्टशिष्य पं. बाळकृष्ण-शास्त्री आणि रितपुरचे म. गोपीराजबुवा, म. यक्षदेवबुवा व म. कृष्णराजबुवा लासूरकर यांनीं पोथ्या देणें, चर्चा करणें इ. अनेक प्रकारें मला केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानणें अगत्याचें आहे. विशेषतः पं. बाळकृष्णशास्त्री व म. गोपीराजबुवा यांनीं पुष्कळच त्रास घेतला, याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. तथापि या ग्रंथांतील मतांची व उण्याअधिकाची जबाबदारी सर्वस्वीं मजकडेच आहे, हें सांगणें जरूर आहे. तसेंच, मूळ पोथी स्वतः पाहिल्याखेरीज कुठलेंहि अवतरण वा आधार दिलेला नाहीं, हेंहि मुद्दाम नमूद करून ठेवतों.

# स्मृतिस्थळ

[1]श्रीपरेसाएन्मः॥०॥ सन्निधानीं गोसावियांचा त्रीवीध परीवार: एक अनुसरले :१: एक बोधवंत :२: एक दर्शनीए :३: तरि [2]दर्सनीए ते कवण: रामदेव विद्यावंतु :१: सारगपंडीत :२: इंद्रभट :३: संतोषु :४: अवड(ळ)भट :५: अवधुत :६: मार्तंड :७: परसनाएक :८: प्रज्ञासागर :९: हरीमाइता :१०: घुइनाएक :११: रेइनाएक :१२: गदोनायक :१३: पद्मनाभि :१४: नागदेओ उपाध्ये :१५: रांकें लक्ष्मीधरभट :१६: काकोस :१७: अन्नो :१८: रवळो :१९: गोंदो :२०: जपीय वीस्नुभट :२१: भ्रींगी :२२: वैजोबा :२३: काळीदासभट :२४: वामन :२५: मतीवीळास :२६: नागनायक डोंबेग्राम :२७: भाइदेव :२८: उपासनीये :२९: काळबोटे :३०: साइंदेव :३१: कान्हो उपाध्ये:३२: काळे वासनाएक :३३: गोरे जानोपाध्ये :३४: एकाइसें दोनि :३५: देमाइसें :३६: लखुबाइसें :३७: सोभागें :३८: यल्हाइसें :३९: भूतानंद :४०: सामकोसें :४१: ळळीताइसें ४२ एकवीराबाइसें :४३: द्रवीळासबाइसें :४४: रत्नमाणीकें :४५: आबयो :४६: माळी

---

खुलासा—संहितेंत ( ) अशा कंसांत घातलेलें अक्षर, शद्ब, वाक्यार्ध वा वाक्य मूळ पोथीलेखकाकडून अनवधानामुळें सुटलेलें, पण अन्य पोथ्यांत आढळणारें असें आहे, असें समजावें. सर्वच अन्य पोथ्यांत तें असल्यास तसा उल्लेख कंसांत—वा पादटीपेंतहि—केलेला नाहीं. मात्र एखाद-दुसऱ्याच पोथींत तें असल्यास तसा निर्देश कंसांत केला आहे. तसेंच, [ ] अशा कंसांतील मजकूर स्पष्टीकरणार्थ दिलेला आहे, असें समजावें.

[1]येथून क्रमांक ६ मधील "भटोबासीं म्हणितलें: नको गा बाइदेया–" येथपर्यंतचा मजकूर क पोथींत नसल्यानें ख वरून घेतलेला आहे. उरलेली सर्व संहिता क पोथीप्रमाणें कायम ठेविली आहे. [2]ग, घ मध्यें व्यक्तिनामांचा अनुक्रम क्वचित् निराळा येतो.

:४७: डांगरेसु :४८: कमळनाएक :४९: राणाइसें रामदेवाची माता :५०: तथा सीष्ये राणाइसें :५१: [१]वामदेव :५२: बोनेबाइया :५३: तथा मेघंकर बोनेबाइया :५४: प्रपंच–विस्मृति घाटे हरीभट :५५: तीवाडी :५६: तथा भार्या :५७: ग्रहे सारंगपाणि :५८: तथा माता :५९: माहादेवो पाठकु :६०: तथा रावंसगांवकर :६१: तिक(व)नाएक हीवरळीकर :६२: वाएनाएक :६३: राहीया :६४: गोविंदस्वामि :६५: सारस्वतिभट :६६: काणसेचा ब्राह्मण :६७: सेंदुरजणीचा ब्राह्मण :६८: मासोपवासीनि :६९: राघवदेव :७०: कुंडी कान्हरदेव :७१: माहादेवो :७२: पाल्हाडांगीया :७३: कास्त हरीदेवोपंडीत :७४: गोपाळपंडीत पारवि नीरूपणीचे :७५: साळीवाहान :७६: राऊत दोघ :७७: मातांग :७८: देइभट तांबोळग्रहीणीचे :७९: भोगनाराएण मायधुवा :८०: तथा मायधुवा :८१ दांको :८२: गणपति आपयो :८३: सुयराची बाइ :८४: गोवारीया :८५: पंचगंगाचा ब्राह्मण :८६: सुकीये जोगनाएक :८७: पाठक :८८: यंत्राकार वासुनाएक :८९: तथा भाऊ तीकवनायक :९०: गुर्जर दोन्ही :९१: नागाराउळ :९२: मुंजिया बहीनी :९३: छाया गोपाळिची स्त्री :९४: मार्तंड वीहीरीचा ब्राह्मण :९५: पाठक देगाउवाइ :९६: तथा हंसुबाइ :९७: तथा घोगरगांवबाइ :९८: तथा धानाइ अळजपुर :९९: रामदरणयाची माता :१००: तथा मुक्ताबाइ :१०१: रायेरिचा ब्राम्हण :१०२: तथा [२]भोगनारायन ब्राम्हण :१०३: [३]तथा ठाकुरभार्या :१०४: तथा माल जोगवटयाचा :१०५: तथा जोगवटा दत ब्राम्हण :१०६ तथा सांप्रदाएक :१०७: तथा नारोबा :१०८: गोरक्षणाचा ब्राम्हणु :१०९: तथा हेडाउ :११०: एवमादीक हे दर्शणीये जानावे:।। **आतां बोधवंत:।:** देमाइसें :१ [४]दाइंबा :२ **आता अनुसरलीं:** संनिधानीं तथा असन्निधानीं: भट :१: बाइसें :२: सांतीबाइसें :३: माहादाइसें :४: म्हाइंभट :५: साधें :६: आउसें :७: आबाइसें :८: नाथोबा :९: श्रीप्रभूचें लक्षमींधरबा :१०: तथा

---

[१]घ मध्यें हेंच नांव. ग मध्यें वामनदेव. [२]भोगरामीचा ग, घ [३]यापूर्वीचें एक जास्त नांव—'तथा राणा' ग, घ. [४]बायांबा ग.

कोथळोबा :११: तथा पोमाइसें :१२: तथा वैराग्यदेव :१३: [1]खेइवाइसें :१४: गोइबाइसें :१५: एं सन्निधानिची :ı: आता असन्निधानी: भटांची बहीणि उमाइसें :१: तथा भाउ माहादेउबा :२: तथा रामदेउ :३: चांगदेउभट :४: पैठण उमाइसें :५: तथा धाणाइसें :६: जाणो उपाध्ये :७: कान्होपाध्ये :८: गौराइसें :९: यें गोसावियांमागां अनुसरलीं: ऐसा त्रीवीध परीवारू गोसावीयांचा: तयांत प्रवृत्तीचा विशेषु तो भटांचां ठाइं: का जें मुळीहूनि घडीले: मढीले: सन्निधाना योग्य केले: तो आता सवीवरु सांगतां असीजेती।।०।।

**भटोबासांचे पीते ते माहादेवभट:** ते पुरीचे: भटोबासां चौघे भावंडे: वडील सारंगपाणीभट: वैजोबा: उमाइसे: उमाइसें तीयें हातरीतीं जालीं: सारंगपाणीभट ते वाटे मारले: माता आबाइसें तेही रांवसगावीं सीधनाथी तेणें दुःख गुंफा केली: तेथ होतीं: तवं दादोस आले: तयांपासौनि कांहीं अवघेयां गोमटें जालें: तेहीं गोसावियांचेही गुण सांघीतले: मग दादोस गोसावियांचेया दर्शनासि नीगाले: सरीसीं आबाइसें: उमाइसें: भटोबास: माहादाइसें: ऐसीं श्रीनगरां आलीं: गोसावियांसीं दर्शन जालें: तेथ अधीकचि वेधु संक्रमला: याउपरी भटोबासां आणिक सा भेटी जालीया: साहावीए बोधु जाला: सातवीएं अनुसरण जालें: बतीसां वरुषां अनुसरले: च्यारि वरुषें सन्निधान जालें: त्यांतु सा मास श्रीप्रभूचां सन्निधानी गेले: आउठ वरुषें आमचया गोसावीयांचां सन्निधानी भरलीं: योग्य जाले: घडिले: मढिले: आचार्य करूनि माहादाइसें नीरोवीलीं: मग गोसावीयांसीं प्रवृत्यंतर जालें।। शके ११९४ वें श्रीमुख संवत्सरी माहो मासीं शुध चतुर्थी सोमवारीं ।।१।।

**भटोबासां ईश्वरवियोगें** अवस्था:।। गोसावी बीजें केलेयांउपरि भटोबास वीरहे नीगोनि गेले: अवस्था प्रकटलीया ते कव्हनाहीं चोजवती ना: मग माहादाइसें शोधीति शोधीति गंगातीरीहूनि परेश्वरपुरा गेलीं: श्रीप्रभुगोसावियांसी दर्शन जालें: मग दुख करूनि पुसिले: जी जी: श्रीचक्रधरें सांडिलें आणि नागदेवही दीसेना जी: गोसावीं वीनती स्वीकरीली: श्रीप्रभुगोसावीं म्हणितलें: अवो मेली भानखेडयासि जाय म्हणे: आणि

[1]खेमाइसें ग, घ.

माहादाइसीं म्हणितलें: जी जीः आणि तैसीचि नीगालें: श्रीचरणीं लागलीं: भानखेडयासी गेलीं: तंवं कांहीं देखति नाः मग राणे डोंगर शोधीति गोपाळातें पुसिलें: तेहीं सांघितलें: होये देखिला होताः आम्ही तयाचां तोंडी कुरंधने पीळूं: मग माहादाइसीं सोधूनि काढीले: सावधु केले: ओळंबे झाडीले: पांगुरवीले: पाटकुळीए वाउनि गावांजवळि आनीले: मग एकी ठाइ बैसउनि आपण गावांतु गेलीं: दूध आणिलें: बोळेवरि पाजीलें: येतुलेनि मागीलापसि सावध जाले:॥२॥

**माहादाइसें श्रीप्रभु–अवतार–प्रकासीं माझा श्रीचक्रधरू म्हणणे:॥** मग माहादाइसीं म्हणितलें: नागदेयाः गोसावियांपासि चाला जावोः भटोबासीं म्हणितलें: कें असति गोसावीः माहादाइसीं म्हणितलें: हे नव्हेति रुधिपुरीं: श्रीप्रभुगोसावीं बोलाउं पाठवीलें असे: भटोबासीं म्हणितलें: (नेणों मा तुझा श्रीप्रभु ) माझा देवो तो श्रीचक्रधरु ओः तवं माहादाइसीं म्हणितलें: नागदेया तूतें गोसावीं श्रीप्रभसि नीरोविले असे कीं: आणि मज तुज नीरोवीलें असे कीं: चाल: म्हणौनि पाटकुळीए वाउनि नीगालीं ॥३॥

**श्रीप्रभुसन्निधाना गमन:॥** मग तेथौनि नीगाले: एकी वासना :ः इळुहळू चालूं लागले:॥ मार्गी चालतां लोकु वोळखतिः मग म्हणतीः हा तो नव्हे: श्रीचक्रधर द्या ओः म्हणोनि हातीं भीक्षा मागे: तवं माहादाइसें म्हणतिः बा देवेंवीण पीसा जाला बाः यापरि रुधिपुरासि आलीं: तवं श्रीप्रभुगोसावीं पांच पिंपळीयांकडे सकाळीचि बजें केलें: तेथ खेळत होते: तवं माहादाइसें भटोबासाते घेउनि आलीं: श्रीप्रभु देखौनि म्हणितलें: आवो मेली जाए: यें त्यें नव्हेति: श्रीचांगदेओराउळांचीं: भटोबासां: माहादाइसां थोर दुख जालें: श्रीप्रभुगोसावीं आस्वासिलें: मेला जाए: अस अस म्हणे: मग श्रीप्रभुगोसावियांचां सन्निधानीं चौदा वरुषें राहीले: म्हाइंभटही आले: अवधींचि भक्तिजनें आलीं: सन्निधानीं होतीं: दास्य करूं लागलीं:॥४॥

**श्रीप्रभुप्रवृत्यंतरें भटोबास गंगातीरागमनि तीर नमस्करणे:॥** ऐसां बहुतेकां दीसां व्यंय संवत्सरीं माघ मासीं वधि चवथीचां दिसीं श्रीप्रभु-

गोसावींहीं प्रवृत्यंतर केलेंः भटोबासांः भक्तिजनां थोर दुख जालेंः मग तेणेंचि दुखें भटोबास गंगातीरासि आलेः सरीसे लक्ष्मीधरबाः बाइदेवोबाः माहादाइसेंः कोथळोबाः पोमाइसेंः सार्ङे-मुख्य आणीकेंहींः ऐसे रावसगावापासौनि डोंबेग्रामवेऱ्ही थडी नमस्करील : प्रतीष्ठानीं पंचरात्री घातलीः आवघें नगर सव्य घालौनि नमस्करीलेंः मग वृधासंगमा-जोगेस्वरीहूनि खडकाळीए आलेः मग पेहरासंगमा-[१]नेऊर गावींहूनि छिन्नपापासि आलेः छिन्नस्थळी-मुख्य सकळ स्थानें नमस्करीलीं: छिन्नस्थळीएसि नावेक बैसलेः मग नीगालेः।।५।।

**बाइदेवोबा प्रसाद-ग्रहणीं अती दुख नीराकरणें:।।** मग भटोबास समस्तां सीष्यांसहीत डोंबेग्रामांतु आलेः जगतीचा दारवठां दंडवत घातलेंः तैसेंचि पूर्वाभिमुख मठां आलेः तवं तेथ पूर्वी गोसावीं भितभंगीचेया चीरेयावरि पीक घातली होती ते भटोबासीं देखिलीः आन थोर दुख जालेः ते(थ) मुख लावीलेंः प्रसाद घेतलाः तवं बाइदेओबास आलेः हे कैं भटोबासांपासि अनुसरले होते तें नेणिजेः भटोबासीं तया पीकीचें ज्ञान केलेंः हे घेया गा बाइदेया गोसावियांचेया प्रसादाची पीकः ते देखौनि बाइदेवोबासीं भूमीवरी आपणयांतें घातलेंः आवघेंयां अधीक दुख जालेंः तेंविचि बाइदेवोबा प्रसाद घेतिः मुख सोललेंः भटोबासीं वारीलेंः संबोखीलेंः भटोबासीं म्हणितलेंः नको गा बाइदेयाः दुखे अंतःकरण जाइलः म्हणौनि हातीं धरूनि उठवीलेः मग दोन्हीं मढ नमस्करीलेः।।६।।

**राजमठीं सप्तरात्र घालणें:।।:** मग समस्तांसहित छीन्नस्थळिये विजन करीतिः बादाटानि देगांवीं भिक्षा करीतिः विळचां राजमठीं निद्रा करीतिः ऐसे सप्तरात्र घातलेंः।।७।।

**उंबरवट काढूनि तिर्थत्रय करणें:।।:** मग एक दींः भटोबासीं सुतार बोलाविलाः आणिक उंबरवट घडविलाः तो मठु अवघाचि काष्ठाचाः उंबरवटु तोही काष्टाचाचि होताः तो भटोबासीं काढीलाः तेथ आणिकु घातलाः मध्यें जयावरि श्रीचरणु ठेवीतिः तयाचें थोरलें पात्र केलेंः दोंही

---

[१]नेर ग

सेवटांचिया धाकुटीया दोनि पातृलिया केलीयाः उरला तयाचे मणि करूनि समस्तां नमस्करावेया दीधलेः आणि मोठें पात्र तें आपण अगीकरीलेंः तयांतु प्रसादाचा फुटाः वांकिः सांकळें: कांबिः दोन्ही जाडीचे विशेषः श्रीप्रभु-गोसावियांचि प्रसादवस्त्रें: कापुराचि सेंदः यैसें आवघें घालीतिः तें देहपर्यंत नमस्करीलें:।ः शोधुः : एकि पातृली ते चक्रपाणिबासि मागां भटोबासांचेनि नांवें भीक्षा केली तै तयासि कविस्वरबासि दीधली:।ः एकि कवणाजवळि आली ते नेनिजेः।ः तथा मोधु:।ः येचि काळीं भटोबासीं छीन्नस्थळी काढीलीं: घेतलीः आणि खांबः द्वारसंकाः कवाडें कवणीए वेळें काढिलीं हेंने णिजेः।।८।।

**बाइदेवोबा–दुखातिस(श)यो–दर्शनें बेलोपुरा न वचणें:।ः** मग एक दीं भटोबासीं निगतां म्हणितलेः आतां बेलोपुरा जाइजैल तरि बाइदेयाचें देह जाइल।ः। एकी वासनाः पिकेवरूनि म्हणितलें:।ः म्हणौनि न वचतिचिः तेथूनिचि मुरडलेः।।९।।

**शोधः।। राजौर लक्ष्मीधरभटां श्रवणानुसरणः।।ः** एक दीं राजौर लक्ष्मीधरभटांसि भटोबासांचें दर्शन झालें: कवणिपरी हें नेणिजेः तयासि श्रवण जालेः भीक्षा केलीः मग तया राजौरकर लक्ष्मीधरबा यैसे म्हणतिः मग तेही भटोबासांविद्यमान पुढां '**आचार–विचार–लक्षणें**' केलीः '**प्रकरणिचीं लक्षणें**' केलीं भटोबासां पुसपुसोंः।।१०।।

**म्हाइभटां भेटिः।।ः** शोधः।ः भटोबास गंगातीरां निगतांसमै ईश्वरनायेकें वेव्हारु लाविलाः तयाचिया कन्या अपुला विवाहो करू नाहीं दीधलाः तेणें कारणें म्हाइभट मागां राहीलेः देऊळवाडां वेवाहार सांधितलाः ईश्वरनायेक निरोतर केलेः (।।शोधुः।।) गोसावियांची प्रवृत्ति काइ कध्हणा जाणितली जात असेः।। एकी वासनाः।ः वाटां दीधलाः।। मग म्हाइभट मागौनि गंगातिरा आलेः आउसे तेयचि राहीलीः मग म्हाइभटां भटोबासां गंगातिरीं भेटि जालीः।।११।।

**केसोबासां भेटिः अनुसरणः।।** केसोबास ते कवणिये गाविचें हें नेणिजेः।। एकी वासनाः पापदंडी रामपुरीचेः।ः ते विद्वांस व्याख्यातेः एक दीं ते भटोवासांपासि आलेः भीक्षा केलेः भटोबासां थोर पढियेतिः भटोबासांचां सन्निधानि राहीलेः।।१२।।

**तथा संबंधी-संबंधु-प्रदानि माझा केसव सुकयोगिंद्र म्हणणें:॥** मग एक दीं केसोबासांचि संबंधियें आइकोनि नेयावया आलीं: भाउ गोपाळदेव: आणि सासुरे यैसें प्रतिकूळत्वें नेवों आलें: केसोबासातें नेलें: भिक्षा सांडवं आदरिली: तवं ते कांहीं केलेयांही न संडीतिचि: मग तेहीं असिकें विद्वांस बोलाविलें: चर्चा करवीलि: तेंही ते निरोत्तर केले: मग विद्वांसिहीं हात झाडीले: तेहीं म्हणितलें: हे आम्हां जिनवति न: आतां यांची ब्राम्हणि यांतें जिणैल: तरि: जिकनी: आतां यें दोघें येका घरांत कोंडावि: मग कोंडीली: तेथ तीयें बाजेवरि निजति तरि ते खालि निजति: (तियें खालि निजनि) तरि आपण बाजेवरि निजनि: यापरी रात्रि जाये: दिवसा गंगेकडे जाति: तेथ दृष्टीचीं राखणें घालीति: केसाबास गंगे विजन करीति: तेथ '**रत्नमाळा**' स्तोत्रें करीति: मग गावांतु आणिति: यापरि सातपांच दिवस जाले: मग ब्राम्हणीं म्हणितलें: आतां यांसि जावों द्या: आतां हे योगीये जाले: यांचे मज पाप लागत असे: मग अवघां केसोबासां अनुज्ञा दीधलि: निगाले: भटोबासांसीं भेटि जाली: मागील सांघितले: तें आइकौनि-परीसौनि भटोबासीं म्हणितलें: माझा केशव शुकयोगींद्र किं गा: म्हणौनि थोरचि प्रसंसीले:॥१३॥

**तथा 'रत्नमाळा' स्तोत्र-दर्शणि ईश्वरार्चनप्रसंसा:॥** मग केसोबासिं '**रत्नमाळा**' केलीया: तिया भटोबासांपासि वाचिलीया: तवं तेथ एकि ठाइं देऊक्षवाडेयाचेनि भावें हनुमंतवाडा घातला होता: तो आइकौनि भटोबासीं म्हणितले: तो हनुमंत नव्हे किं गा: तो देउळवाडा: भलें केलें केसवदया: गोसावियांचीया अमोघ लीळा बांधलीया: तुवां वाक्पुश्पीं ईश्वरार्चन केलें:॥१४॥

**तथा 'उद्धरणस्तोत्र'बंध निष्करणें:॥** मग '**रत्नमाळा**'चि पोथी वाचूनि केशोबासिं भटोबासांते पुसिलें: हां भटो यैसेचि '**उद्धरण**' बांधों: तवं भटोबासीं म्हणितलें: नको गा केशवदया: येणें माझीया म्हांतारीया नागवतिल: मग केशोबास संस्कृतबंधु न करीतीचि:॥१५॥

**तथा 'शास्त्रप्रकरणान्वया'नुज्ञा:॥** मग मागौतें केसोबासिं पुसिलें: भटो तरि शास्त्र-प्रकरणान्वयो लावूं: तें भटोबासिं मानिलें: मग म्हणितलें: तरि

जें जेथचें तें तेथीचें माझेनि विचारें लावावें गाः मग केसोबासि भटोबासांतें पुसपुसों अनुक्रमें '**प्रकरणान्वयो**' लाविलाः जें जयाचें नाम तें तया ठेविलेंः॥१६॥

**तथा 'दृष्टान्तप्रकरणान्वया'नुज्ञा**ः॥ मग केसोबासि अवघें अन्वयो लावूनि माघौतें भटोबासातें पुसिलेंः भटो तरि '**दृष्टांतां**' अन्वयो लावूं भटोबासीं मानिलेंः मग केसोबासि भटोबासांतें पुसपुसों '**दृष्टांत–प्रकरणां**'ही अन्वयो लाविलाः दृष्टांतीं दृष्टांतिक केलेंः अवघेया दृष्टांता लापिका लाविलीयाः यातें '**वहावें प्रकरण**' म्हणतिः॥ शोधः॥ः तैसेचि भटोबासांतें पुसपुसों तीं स[श]तां '**आचारा**' आणि तीं सतां '**विचारा**'ही अन्वयो लाविलाः॥ लापिका संबंधेंः॥ तथा शोधः॥ मग येथ राजौरकर लक्ष्मीधरबायें केसोवासांचा वचनक्रम घेउनि लक्षणें केलींः यैसा शास्त्रा संबंधु लाविलाः॥१७॥

**विरहें लक्ष्मीधरभटीं ईश्वरविरहें 'ज्ञानभास्कर' प्रसंसा**ः॥ एक वेळ विरहें लक्ष्मीधरबा अटना गेलेः अटनि थोर विरहो भरलाः ते यैसे हींडत हींडत पाथरीसमीप बाबूळगावां आलेः तेथ विहीरीचिये रवणियेवरि देउळी (होती) तिये देउळीयेआंतु बैसोनि '**ज्ञानभास्कर**' केलेंः करीतां येकाधिये वेळे दुखें मूर्च्छांप्रपन्न होतिः मग माघौते सावध होतिः भिक्षे जातिः येकाधां दीसि तैसेचि पडीले असेतिः मग तेथचा राणा येः तो तयांतें उठविः सावधां करीः यापरी स्तोत्र जालेंः मग भटोबासांचिये भेटी आलेः पोथी भटोबासांचां हातिं दीधलीः भटोबांसीं पाहीलीः वाचीलीः आणि थोर मानवलेः तोखलेः ते शद्ब न येतिचिः॥१८॥

**लक्ष्मीधरबा–म्हाइंभटां संवादीं योगभ्रष्ट निर्वचनें**ः॥ एक दीं लक्ष्मीधरभटों म्हाइभटाते पुसिलेंः योगभ्रष्ट तो कवणिये दशेचाः म्हाइंभटीं म्हणितलेंः आमचीये तुमचीये दसेचाः तें आइकौनि भटोबासीं म्हणितलेंः आतां तवं माझीये दसेचा नव्हेः मां तुमचीयें दसेचा काइ होइलः मग तेही म्हणितलेंः तरि भटो तो कवणिये दसेचाः भटोबासीं म्हणितलेः चीमुटीलेयां दुखवेती ना तिये दसेचाः आणि ते बुझौनि गेलेः॥१९॥

**म्हाइंभटां तस्करबंधनिमितें मौन निषेधु:॥** एकवेळ म्हाइंभट लक्षमीधरभट भटोबासांतें पुसौनि अटना गेलेः तवं एकी ठाइ चोर म्हणौनि धरीलेः कांहीं वोखटी क्रीया संपादू आदरीलीः तवं लक्षमीधरबायें म्हाइंभटाची वास पाहीलीः आणि म्हाइंभटीं म्हणितलेंः ज्वरो वा शस्त्रो वा:।: आणि तेही म्हणितलेः आरे हे विद्वांसः मग सोडीलेः मग भटोबासांपासि आलेः तवं एकि भटोबासांपुढां सांघितलें होतेंः मग भटोबासीं म्हणितलेंः हां गा हा ठावो वेन्ही मौन्यचि:॥ शोधु:॥ जो परीहारु देउं आला तो द्यावा किं गा:॥२०॥

**कृष्णभटां प्रश्नें श्रम-निवृत्ति-वाक्य-निरूपण :॥** शोधु :। येकवेळ भटोबास शिष्यांसहीत इंद्रभटांचेया गावां आलेः इंद्रभटीं अवघेयांचे पाये धुतलेः॥ मग काळया कृष्णभटांचे पाये धू गेलेः तवं तेहीं म्हणितलेंः तुम्ही कैसे पाये धों आलेतिः तवं इंद्रभटिं म्हणितलेंः धों येतिः पुसा भटांतेंः मग तेहीं भटोबासांतें पुसिलेंः भटो गुरूसि सिष्याचे पाये धों येतिः भटोबासीं म्हणितलेंः येतिः कृष्णभटिं म्हणितलेंः कैसे येतिः भटोबासीं म्हणितलेंः श्रमनिवृतिचेनि वचनें येतिः तेव्हेळीं तेही धों दीधलेः॥२१॥

**भटोबासा क्षतबंधनि माहादाइसें सेवा-वचन-स्वीकारू:॥** एकवेळ भटोबासांचां पाइं केंसतोडु निगालाः माहादाइसें म्हणितलेंः नागदेया केसतोडु बांधावाः तव भटोबासीं म्हणितलेंः कांडसेनि बांधोंः तेव्हेळीं माहादाइसां प्रसादाचे वस्त्र फाडूनी [1]पानकापड करूनि बांधलाः तव भटोबासीं म्हणितलेंः हें काइ रूपैः प्रसादाचे वस्त्र कैसे फाडीलेंः बाधलेः तवं माहादाइसीं म्हणितलें: नागदेया प्रसादें प्रसाद बांधीजतायेः आणि भटोबास उगेचि राहीलेः॥२२॥

[2]**आपलो भेटि अनुसरण:॥** आपलो ते माहादाइसांचे भाउः तयासी गोसावियांचे सन्निधान जाले हातेः मग गोसावी बाजें केलेयावरि [3]ते राहाणे घालीतिः देव्हारे [3]करीतिः एक दीं माहादाइसें अटनविशेषें तयातें पडीताळावेया गेलीं: घरांतु रीगों बैसलीः तव समोर देवतें देखिलीः

१ पाणिकापड ख, घ. २ घ पोथींत ही स्मृति २४ वी आहे. ३ देऊळें करीतिः देव्हारे प्रतीष्टितिः राहाणे घालीति ख, ग, घ.

आणि [1]श्रीचक्रधरू म्हणौनि निगालीं: हे नाम तयांचां कानि पडीलें: आणि तैसेचि ते गेलेः अवघीं देवतें पाटिये घातलीं: पाणियांतु घालूनि आलेः मग माहादाइसें तयाते घेउनि भटोबासांपासि आलीं: तयासि भटोबासांपासौनि बोध जालाः मग अनुसरलेः सेवटवरी सन्निधीसि होतेः [2]माहादाइसां थोर सुख जालें:।। तयांसि पूर्वी खडकाळियें गोसावी वरु दीधला होताः जे सेवटि होइलः ते साच जाले:।। हे (स्मृति ख,घ) उत्तरार्धीचि शोधूनि येथ घातलि [3]असे:।।२३।।

**वासनिका देहांतीं झोळी–अर्धोदककथन**:।। एकवेळ भटोबासीं प्रस्तावेयाअनुरूप चांगदेवभटांते म्हणितलें: देहांती झोळी घेइजेः ते येथचे अर्धोदक बोलिजे गाः।।२४।।

**वृश्चिकदुखदर्शने देवतासंबंधी माहादेवोबानुसरणि वरप्रदान**:।। एकवेळ देवतासंबंधी माहादेवोबा आपुलां घरी जेवित होतेः तयांकारणें तयाचि ब्राह्मणि मिठ आणू गेलीः तवं तेथ ते बिंचुवें खादलीः आणि माहादेवोबायें म्हणितलें: हेचि जरि सर्प खाता तरि कवणि मायेचां पोटीं रीगतां: मग माता आकाइसें माहादेवोबा आणि तयांचि ब्राह्मणि यैसीं तिघे भटोबासापासि आलीं: भिक्षा केलीः भटोबासि म्हणितलें: तुझी भिक्षा सिधी जाइलः मग गुरुकुळ तयांतें '**देवतासंबंधी माहादेवोबा**' यैसे म्हणतिः तयासि दीढ वेढा श्रीप्रभूचा संबंध होता म्हणौनिः हे आकाइसाचे पुत्रः भटोबासाचे माउस भाउः यांतेचि '**गोरीचा गोरा**' म्हणणें:।।२५।।

**चांगदेवभट प्रीतिविधानश्रवणि सूचिकानुवादु**:।। एकवेळ चांगदेवभट साता वासनिकांचे जेविलेः मग भिक्षा करूनि गंगे जेवीलेः ते एकीं भटोबासांपुढां सांघितलें: भटोबासि आइकौनि म्हणितलें: तो सूचकु चांगदेवो किं गा:।। एकी वासना :।: तो तोष्यु चांगदेवो किं गा:।।२६।।

**आवडी आवांका निराकरणें**:।। एकवेळ दुर्भीक्ष पडलें होतेः भटोबास अटना गेले होतेः एकी ठाइ काला केलाः जेउ बैसलेः जेवितां भटोबासांचि दृष्टि चुकवूनि एकीं आपुला काला जेवित जेवितां भटोबासांचां पात्रीं घातलाः तवं तें आणिकिं देखिलेः मग म्हणितलें: हे काइ भटासि उसीटें

---

१ हें नाम उच्चारिलें ख, ग, घ. २ खडकाळीए सेवटीं होईल तें जालें: हे स्मृति उतरार्धाची सोधीचीः ख, घ (अखेरचें वाक्य तेवढें ग मध्यें नाहीं.)

अन्न कैसे घातलें: यावरि भटोबासीं म्हणितलें: सौजन्यें दोष नाहीं: कां ना गोसावी म्हणितलें असे: आवडी आवांका नाहीः आणि ते उगेचि राहीलेः भटोबास तें जेविलें:।।२७।।

**माहात्मा–उदक–प्रदानिं बोडि : गंगा–विभेद–निरूपण :।।** एक दीं भटोबासांसि तृषा लागलिः एकांते उदक मागीतलें: तवं तेहीं थीलरीचे उदक गाळूनि आणिलें: भटोबासां संपादीलें: भटोबासीं घेतलें: मग म्हणितलें: मज पाजिलें यैसें आणिकासी न पाजावें होः तवं तेहीं म्हणितलें: भटोः बोडि गंगा समान सांघितलें किं: भटोबासीं म्हणितलें: तें आपणयासिः पुढीलासि संपादितां बोडि ते बोडिचिः गंगा ते गंगाचि : ऐसी बुद्धी होआवी किं: भावें हीन तें दैवें हीनः।।२८।।

**माहात्मेयां चातुर्मासि व्यवस्थाकथनः।।:** एकवेळ भटोबासीं म्हणितलें: आठ मास हींडावें: मग चातुर्मासीकारणें एकी प्रदेशी दोनि च्यारि गांवं पाहावें: येरे ठाइं न पळे तरि येरि ठाइं राहावें:।।२९।।

**काळेयां कृष्णभटां जनविरोधप्रदानिं मौन्यनिषेधुः।।:** काळे कृष्णभट अटनि चोर म्हणौनि धरीलें: फोकवरि मारीलें: काही सरीर संपादिलें: तवं एकिं म्हणितलें: हे वेधवंती नागदेवभटांचे नव्हेतिः म्हणौनि सोडीलें: तें भटोबासीं आइकिलें: मग म्हणितलें: यैसें काइ केलें कृष्णयें: येवंपर्यंत मौन्यचिः मग भटोबासीं गोसावी सांघितला तो असन्निधान माहात्मवेषु रचिलाः येरव्ही सन्निधानवेषु होतेः।।३०।।

**रजतम–निर्वचन–पूर्वक सत्वस्थपरी सांघणें: ।** एक दीं भटीं म्हणितलें: श्रीचक्रधराचा परिवारु राजस तामस असे: परि सत्वस्थ उठीति–बैसति तैसेयाचि बैसावें–उठावें:।।३१।।

**पंचनामपूर्वक क्षेपणें प्रसंसाः।।:** एक दीं भटोबासीं म्हणितलें: आळुमाळु विधिनिषेधाचें ज्ञान जालेयां येहीं पांचैं नामिं जो झाडातळि जन्म क्षेपीः तो जरि वायां जाये तरि मियां धाडिला होयेः।।३२।।

**साकाइसा गृहस्मरणनिषेधें विजनप्रकाशीं कवणाचा गोल्हो म्हणणें :।।:** साकाइसें तियें वासनिकें: हातरितीं: भटोबासांची सिष्येंः भटोबास तयांचेया गांवा गेले होतेः गोल्हो तो तयांचें नातोंडुः एक दीं: साकाइसातें भटोबासीं

म्हणितलें: साकाइ तूं विजना कां न वचसि: तिहीं म्हणितलें: भटो मी घरीं गोल्होतें जवं जवं खेळवि: तवं तवं देवो आठवतो: भटोबासीं म्हणितलें: गहस्मरणापसि झाडातळीं मनोरथ आठविसि तें निकें: मनोरथापसि तेथ निद्रा कीजे: ते निकें:।।: यावरि भटोबासीं म्हणितलें कीं आणिकाळीं म्हणितलें हें नेणिजे:।।: कवणाचा गोल्हो: कवणाची सिती: तू आपुलें चिती वो साकुबाइ यैसें म्हणितलें: आणि हास्य केलें: सिती तेही तयांची नातिः।।: मग एकु दिसु तेही आपुलेया पुत्रावरूनि भटोबासांपुढां दोनि वोविया म्हणितीलीया: **गोविंदु नाहीं जयांचां वंशीं: ते पाथर कुसीं: निफजले :।।१।। विउनिया वांझ जालियें वो माये: पुत्र न धरीचि पाये: गोविंदाचे:।।२।।** या भटोबासीं आइकिलीया:।।३३।।

**महात्मेयां विधिव्यतिरिक्त ग्राम–गमन–निषेधु:।।** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: भीक्षाअवसरावांचौनि महात्मां गांवांतु न वचावें गा: आणि बारसीचां दीसी वासनिकाचेया घरां[1] भिक्षे[1] जावें: आणि अभ्यागतां: असक्तां: अक्षेमांकारणें तरि भलतेधवांचि जावें:।।: शोधु:।।: वाचौनि वायें वायें वोळखीचेया घरा न वचावें: यैसें सांघितलें: यांतु बहुत असे:।।३४।।

**अवतारु विशेषें उद्धरण प्रसंसा :।।:** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: यें सृष्टीमध्यें येणें अवतारें श्रीचक्रधरें जो नुधरें तो कहींचि नुधरे मा नुधरे: मा कहींचि नुधरे:।।३५।।

**रूपदेवोबा मिठाची पिसवी निषेधु:।।:** एक दीसु भटोबासी म्हणितलें: अळुमाळु तऱ्हीं रूपदेया विरक्त: परि मिठाची पीसवी वाहातो गा: तव येरीं म्हणितलें: भटो केवि जाणा: हां गा: श्रीचक्रधराचेनि प्रसादें इतुलें-(ही) नेणें:।।३६।।

**अनुसरलेया वासनिका परस्परें पात्रीं भोजननिषेधु:।।** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: महात्मा वासनिकाचां ताटी न जेवावें: आणि वासनिकिं महात्मेयाचां पात्री न जेवावें: आपुलेनि दोषें तया धर्महानि: तयाचेनि आपणयां: कां पां: विषयांचीये येकासनि न बैसावें: म्हणितलें म्हणौनि:।।३७।।

**भोजनाअवस्वरीं स्वयदास्यपूर्वक करवतिस्वीकारु:।।** एकु दीसु भटोबासांपुढां पांतीसि सांघातीं करवती ठेवूं विसरलेः ते भटोबास जेवित जेवितां

---

१ भिक्षे न वचावें: घ.

उठलेः येरां यैसे जालेंः काइ वमन करूं गेलेः तवं भटोबास आपुली करवती घेउनि आलेः उदक घेतलेंः येरां दैन्य जालेंः मग सांगाती सावध वर्ततिः।।३८।।

**संबंधस्थान–नमस्कारणि लीळास्मरणानुवादः।।** एकु दीसु भटोबासी म्हणितलेंः जया तीर्थी जाइजे तेथचीया लीळा आठविजतिः तेथ तें स्मरणः।।३९।।

**वासनिक–पूजा–स्वीकारीं अनुतप्तांतःकरणें 'असतीपरी' प्रकाशणें।।**: भटोबासांसि एकिं वासनिकों सुवर्णपुष्पीं पूजा केलीः पाटावुं पासवडी वाईलीः मोतीयांचा चौक भरीलाः मग धूप–आर्ति मंगळ–आर्ति करूं आदरीलीः येतुलेनि भटोबासी वारीलेंः डोळां आस्व [अश्रु] पात आणिले वासनिकिं म्हणितलेंः भटोः दुख कां करीताः भटोबासीं म्हणितलेंः हां गा **'असतीपरि'** ते काइ माझेया बापासि विहीलीः आणि ते उगेचि राहीलेः।।४०।।

**चुली–भानवसी निषेधपूर्वक भोक्षुत्व–ज्ञान** [१]करणें।। एकु दीसु भटोबासीं म्हणितलेंः महात्मां चुली भानवसी न घलावियाः प्रस्तावा पडैल तरि इटोला मांडावाः अभ्यागतें येतील तरि रोटीया भरीत करावेंः सेवैया सरवळीयां काळु जावों नेदावाः वाया वाया सीवणें न करावेंः काळु वृथा न धाडावाः सुइ–संघरो [संग्रहो] न व्हावाः काटेनि सिवावेंः नख न फेडावेंः हातीं पैका न घेवाः यैसे नीरूपीलेंः।।४१।।

**पूर्वग्रामे अशनदर्शनें ब्राम्हणा शूद्राचारप्रकाशीं भिक्षा देणें।।**: एकवेळ भटोबास मार्गे जाता सकाळिचि जविलेः तें येकें ब्राम्हणें देखीलेः मग म्हणितलेंः हें काइ येवढेयाचि वेळा कैसेंः तवं भटोबासीं म्हणितलेंः **स्वग्रामे सकळाचारं चान्यग्रामे तदर्धकम् । नगरे पादमेकं च पथि शूद्रवदाचरेत्।।१।।** मग तेणें भीक्षा केलीः।।४२।।

**रुसला महात्मा पचनक्रिये चुकला म्हणणें।।**: एकवेळ भटोबासांतें एकीं वासनिकि समस्तांसहीत जेवावेया नेलेंः एक महात्मे रुसूनि न जेवितिचिः तें कोन्हा न मनेचिः मग भटोबासीं म्हणितलेंः रुसौनि तऱ्हीं पचनक्रीये चूको कां गाः आणि ते उगेचि राहीलेः।।४३।।

---

१ मूळांत हस्तदोषानें 'केलें' शब्द पडला आहे.

**तथा कीर्तिपर वैराग्य तऱ्ही निकें म्हणणें:।** एकु दीसु भटोबासीं: म्हणितलें: कीर्तिचें तऱ्ही वैराग्य करों कां गा: परी पाये न पसरों:।।४४।।

**अनुचरोदक–स्वीकारीं उपाहासश्रवणें माहात्मा निभर्षणें:।।** एकु दीसु अवघेयांसमवेत भटोबासांसि येकिं अभ्यागत केलें: तेथ भटोबास समस्तां भिक्षुकांसहीत गेले: एकु वीतरागु–वैराग्याचेनि भरलेपणे राहीला: भटोबास-मुख्य समस्त जेउनि आले: मग कोण्ही पाणि पीत होते: तवं तेहीं राभस्यें म्हणितलें: घेया घेया बाप माझे ढमढसां: तें भटोबांसीं आइकिलें आणि कोपले: भटोबासीं म्हणितलें: येतासि कां गा: मां वाटीभरि तुपा जेवितासि तरि प्रीतीचे प्रमाण राखतें: आतां तुझा कोण राखील: गोसावीं म्हणितलें: एकु सेवित जाये एकु न सेवित जाये:।।१।। मग ते अनुतापले।।४५।।

**नित्य नैमित्यकु विधिप्रकासीं सेनपुंजी–दृष्टांत–कथन:।।** एकु दीसु भटोबासी निरूपण केलें: राजसां: तामसां: अटनचि प्रधान: आणि सत्वस्थां सुश्रसा प्रधान: नित्य विधि माहेर: नैमित्य विधि सासुरें: जासलवटस्थानी व्हावे: सेनपुंजी असे ते येकु पो पाये माझा म्हणे: एकु हातें माझा म्हणे: एकु शद्वें माझा म्हणे: एकु दृष्टी माझा म्हणे: यैसें दास्य करावें गा:।।४६।।

**तथा निमीत्यक करणीये प्रसंसा:** एकु।। दीसु भटोबासीं म्हणितलें: निमित विधि करावा गा: मज आउठां वरीषां निमित विधि करीतां जे गोसावी सांघितलें तें सोळा वरीखां भांडारेकारां न संगतीचि: म्हणौनि नित्य विधी मैळलेयां: नैमित्य विधी आचारे उजळीजे:।। आणि नवेयासि सांघातु: आणि अशक्ताची सुश्रुषा यें दोन्ही अवघडें: गोमटेया कारण: तैसेंचि वोखटेयांहीं:। म्हणौनि चांग प्रयत्नें अशक्ता–अक्षमाचें करावें: जैसें कोथळेनि केलें श्रीप्रभूचें:।। अधीकरणाजवळीके असीजे तवं जिज्ञासा कीजे: शास्त्र अभ्यासीजे: कां विदेशीं अटन कीजे: मध्यें वृथा काळ वायां जावों नेदीजे:।।४७।।

**अधिकरणा ज्ञानदानी गंधर्व–उपपति कथन:।।** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: परमेश्वर आपुली ब्रम्हविद्या देउनी अधिकरण करीति: मग आपुलें ज्ञान आपणचि आइकेति: एदर्थी उपपति गंधर्वाची: गंधर्व आपुली

गंधर्वकळा देउनि आपणचि आइकतिः तैसें ईश्वर आइकतिः आणि गोसावीं गंधर्वकळा पाठीचेया वांसाची उपपति दीधलीः॥४८॥

**सभर्तृका स्त्रीयें काळसंख्या ज्ञानें अनुसरण सांधणें:॥** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: वरैताचिया बाइला आणि लेंकुरवाळिया मी भीक्षा देउं भीत असेः परि वरैताचिये बाइलें दोनि मास का तीनि भीक्षा नेदावीः॥४९॥

**आचार्य-पदार्थ-निर्वडी सुश्रुषितानुज्ञाः॥** एक दीसु भटोबासीं म्हणितलें: आचार्याचें कवडा पोफळ तें सुश्रुषितेंचि ठेवावें: तापसाचा हातु विटाळू नेंदावाः॥५०॥

**उचितानुचित स्थानें निर्वचुः॥** एकु दीसु भटोबासीं म्हणितलें: लज्जाहरण वस्त्र नाहीं: क्षुधाहरण अन्न नाहीं: तया गांवातें 'सीडी' म्हणिजेः।: यें दोन्हीं असति तयांतें 'गडी' म्हणिजेः।: चालतीं घरें: चालतीं उखळें: चालतीया चुलीः तयातें 'पाळी' बोलीजेः।: जेवावेया तळी नाहीं: वाढावेया पळी नाहीं: तयांतें 'हाळी' बोलीजेः।: तैसेंचि विकार विकल्पु संपूर्ण असेः तया गांवातें 'पुर' बोलीजेः।: विकारमिश्रितु विकल्प तयातें 'पाटन' बोलीजेः।: सांत हाटवटी नाहीं यातें 'गव्हान' बोलीजेः।: हें असे तो 'गाव' बोलीजेः॥५१॥

**माहात्मा-स्तवन-श्रवणें आयुष्यांतु अप्राप्यानुवादुः॥** एकु दीसु एका माहात्मेयाचा आचारु देखौनि समस्त वानूं निघाले:[1] तवं भटोबासीं म्हणितलें: हां गा वाणितां काइ गउदे पडीलाः याबरि भटोबासीं छद्रोबासांची गोष्टी सांघितलीः॥५२॥

**अनुसरण-दृढत्व-श्रवणें अदृष्टार्थीये प्रसंसाः॥** भटोबासांपासि एकीं सूद्रीं भीक्षा केलीः तयाचि स्त्री एकीं गावि दीधली होतीः ते अटनें अचवटे तया गावां गेलेः भीक्षा[2] करूं आले[2]: तवं ते बाइ भीक्षा घेउनि आलीः तीया वोळखीलें: आणि भीयालिः घरांतु जाउं बैसलीः तवं तेहीं महात्मा म्हणितलें: हां हां भीवों नकाः आम्ही भटमार्गीचे महात्मे जालोंः तुम्ही सुखें राज्य कराः

---

१ रीगाले: ख, ग, घ. २ भीक्षा करीतां तया घरां गेलेः ख, ग, घ.

मग तेहीं महानुभावीं गाउं[वु] सांडीलाः आणिके गांवि नेमु सारीलाः मग तयाचां सांगातीं भटोबासांपुढें सांघितलेंः भटोबासीं तोखोनि म्हणितलेंः अदृष्टार्थीये जे असति तयांचि करणें तियें ऐसीचि किं:।।५३।।

**हीराइसां अनुसरणः।।** हीराइसे तें पंडीतबासांची स्त्रीः तयां दोघां भटोबासांपासौनि श्रवण: एकु दीसु हीराइसीं पंडीतांते म्हणितलेंः पंडितो: तुम्ही भीक्षा करा: कां मज करूं देयांः तिहीं म्हणितलेंः तुम्हीं करा: मी पुत्राचा विवाहो करीन: मग भीक्षा करीन: तुम्ही जाः मग हीराइसें भटोबासांपासि आलीः भीक्षा केलीः भटोबासांचां सन्निधानि राहीलीः।।५४।।

**बोरीकरां भानुभटां अनुसरणः।।** एकवेळ बोरीकरां भानुभटां भटोबासांचे दर्शन जालेंः कवणिपरी जालें तें नेणिजेः भटोबासांपासौनि श्रवण जालेंः भीक्षा केलीः भटोबासां थोर पढीयेतिः तयांचे आधील गुरु तयां नावं केसवाचार्यैः मग प्रकरणानुरूप भटोबासीं भानुभटांचें नावं '**कविस्वर**' ठेविलेंः तैसेचि प्रकरणानुरूप '**भटो(भाटो, घ)**' ऐसें म्हणतिः।।५५।।

**रामदेवां परीछेदें आकाइ–हेतु–पाळणि परतारकु–आचार्यानुवादुः।।** **यें** कवणें आकाइसें आणि रामदेव हें नेणिजेः रामदेव ते धाकुटियेचि दसेचेः आकाइसांचे पुत्रः तेही भटोबासांपासि भीक्षा केलीः आकाइसें तियें वासनिकेंः **रामदेवां** विराम प्रधानः तेहीं अती[त्य]तु परीछेदु केलाः ते जाणौनि माता आकाइसें तेहीं भटोबासांते प्रार्थीलेंः भटोः तुम्ही माझें मासा दोसा जेवावेंः भटोबासीं तयाचा हेतु जाणौनि मानिलेंः मग तेंही बरवी अन्नें निफजवीलीं: भटोबासांसि ताट केलेंः पांती रामदेवासी वाढिलेः तवं ते नेघतिः मग दुसरा दीसी ते वेळ चुकउनि गगे जाउनि जेविलेः मग भटोबासीं जेवुनि म्हणितलेंः (आकाइः) येवढें माझें उसीटें रामाकारणें ठेविः तवं रामदेव आलेः आकाइसि म्हणितलेंः हें घे रामाः भटोबासां जेविता उरलें तें तुज ठेविलें: तेही घेतलें परी जेवितीचिनाः मग तिसरां दीसी भोजनापूर्वि भटोबासीं म्हणितलेंः रामा आजि तूं मि एकवट जेउंः मजकारणें इतुके ऐसें आइकः घेइः तऱ्ही ते नेघतीचिः मग भटोबास जेविलेः मग चवथा दीसीं म्हणितलेंः रामाः आजि मज इतुके आगळें जालेंः तरि माझा इतुका ऐसा

उसींटा घांसु घे : म्हणौनि भटोबास जेविता उठिले : तयांते ऐसे धरीता एक सित खालि पडलें : तें रामदेवीं तोंडों घातलें : मग भटोबासांतें म्हणितलें : आतां नेघें भटो : आतां घें तरी भटांचिचि आन : मग भटोबास बैसले : मग केशोबासि म्हणितलें : हें काइ जालें या रामासि : तरि भटांचा हातु कसा लोटिला : आणि भटो : यांते कांहीं म्हणाना : तवं भटोबासीं म्हणितलें : हां गा हा जेहीं पाउलीं उठिला आहे तें मीं याचे पाये काइसेया मोडीनः मीं काइ एकाधा परतारकु : मग आंचवूनि बैसले : आणि म्हणितलें : हां गा या आका(इ)या मज प्रार्थूनि म्हणितलें : ते कां ना : रामु काहीं नेघे तरी माझे पांती तऱ्ही घेइल : तवं हा नेघे : तऱ्ही उसोटे तऱ्ही घेइल : हा तेंहीं नेघेचि : तऱ्ही याचें हे कां मीं भंगीन : येंतुलेनि केशोबास उगेचि राहिले :।। शोधु।। भटोबासही नेघतीचि।।५६।।

**तथा निरूपणि साध्यप्रसंसा** :।। एकु दीसु भटोबास रामदेवांसि निरूपण करीत होते : तवं रामदेविं म्हणितलें : भटो : नको नको : गोसावियांचे निजैले-बैसले ठाये कां दाखवाल : काइ आम्हा अनुष्ठता ये : भटोबासीं म्हणितलें : हां गा जरि ननुष्ठे तरि गोसावियांचा दारवठा कां उघडता : घेया घेया बाप माझे पाउले दोनि माट झाडि : मग पुढां साम्राज्य कीं :। पांगुळ तो अंधाचां पाइ : ईश्वरप्राप्तीसि जाये : अंधु तो पांगुळांचां पाइ चैतन्यप्राप्तीसि जाये : यैसें निरूपीलें :।।५७।।

**पंडितां अनुसरण** :।.: पडितबासि पूर्वी हीराइसांतें म्हणितिलें होतें : जें : तुम्ही अनुसरा : मि पुत्राचा विवाहो करीन : मग येऊन : मग हीराइसें आलीं : अनुसरली : तिहीं मागां पुत्रा वीवाहो केला : आणि माघौते घरीं राहीलेचि होतेः मग येकवेळ हीराइसि पंडितासि सांघोनि पाठवीलें : जें पंडितातें यैसें म्हणावेंः जिये चुलीची खीर खादली : तिये चुलीची काइ राख खाल : मग निगाले : तेहीं जाउनि तैसेंचि सांघितलें : पंडितबासि म्हणितलें : आतां कोपलीं : आतां निगावे लागैल : मग निगाले : तवं येरीकडे भटोबासीं म्हणितिले : आजि कोण्ही विजना जाउं नको गा : आजि पंडीतां सामोरें जावें लागैल : मग भटोबास भीक्षुकांसहीत सामोरें गेले : तवं पैलाकडूनि पंडित आले : भेटि जाली : बीढारा आले : भोजनसमैं भटोबासी म्हाणितिलें : पंडितो : या सांघातें

जेउं : तिहीं म्हणितलें : निवृतां सांघातें प्रवृतां जेउं नये : भटोबासीं म्हणितलें : तुम्ही म्हणत असा तें तैसेंचि परि जें म्हणौनि आलेति ते नेंये : पंडितबासीं म्हणितलें : तें होइलः तेव्हेळी भटोबासीं म्हणितलें : तें जालेंचि बोलीजे : मग एकत्र जेवीले : तियेचि दीसिं तिसरां प्रहरीं भीक्षा केली :॥५८॥

**रामदेवां अटनि निर्गमणि शारीरोष्णतानुवादु :॥** मग एकु दीसीं रामदेवीं भटोबासांते म्हणितलें : भटो मीं अटनासि जाइन : भटोबासीं म्हणितले : हो कां जाये : मग ते निगाले : भटोबासीं निगतां क्षेम दीधलें : तवं तयांचें आग[१] [आंग] उन लागलें : भटोबासीं म्हणितलें : रामा : तुझें आंग उन्ह आहे गा : हो भटो : म्हणौनीचि जातों : भटोबासीं म्हणितलें : रामा : जोगीया-जंगमाचें मरे तें तेंचि काढीति : तैसें मुंगीयांचे मढें तें मुंगांचि काढावे कीं गा : तव रामदेवि म्हणितलें : भटो तुम्ही म्हणता तें करूं कीं गोसावी म्हणितलें असे तें करूं : भटोबासीं म्हणितलें : गोसावी म्हणितलें तेचि करी : तेणें मातें उद्धरीसि : येतुलेनि रामदेव निगाले :॥५९॥

**पंडित : केशोबासांतें सवें पाठवणें :॥** रामदेव निगाले तेव्हेळि तयासि ज्वरू आला होता : भटोबासीं केशोबासांपंडितबासांतें म्हणितलें : तुम्ही यातें दृष्टीचीये आळविं राखा : आणि बुद्धिचि पथ्य कराः तिहीं म्हणितलें : हो काः मग मागीलाकडौनि तेहीं निगाले : ते रामदेवातें टाकूनि आले : केशोबास रामदेवांपुढें कांहीं श्लोकु वाखाणिति : पंडितबास काहीं धुवा वोवि चौपदी म्हणति : तें रामदेवां काहींचि चित्तीं न लगे : मग भीक्षे जाति : मागौनि पंडित केशोबासही जाती : तयातें दृष्टी सूनि भीक्षा करीति : कव्हणि सोपस्कर भीक्षा घेउनि ये तेथ म्हणति : हे भीक्षा एकला माहात्मा येइल तयांचां पात्रीं घालावी : यापरी कां अपजौनि निरोप देती : तवं रामदेव तेथ येति : तेथ उष्ण भात घालीति : येरी दीसी रामदेव तो गावं सांडीति : आणिका गावां जाति : तेथही पंडित केशोबास पथ्याचा उपावो करीति : ते अटन भंगु नेदीति :॥६०॥

**तथा केशव-मयंकाद्यागमनि काहाळेकांड-पतनानुवादु :॥** मग यैसा

---

१ अंगीं-उपं[पां]गीं घ

एकु दीसु अमृते मायांबा तयांसीं भेटि जाली : तिहीं गोसावियांचीया अमोघा अमृतश्राविया लीळा सांघितलीया : तेणें रामदेवाचें अंतर्बाह्य निवालें : येतुलेनि रामदेवीं तोखौनि म्हणितलें : भलें केलें माइदेवा : तुवां गोसावियांचीया अमोघा (अमृतश्राविया) लीळा सांघितलीया : मीं बैसे तेथ एकु रूं रूं करी : एकु ठकठक[1] करी : तुवां मातें निवविलें : येतुलेनि तेणेंचि काळें कीं एका दो दीसा हे नेणिजे : रामदेवां देहावसान मांडलें : देहावसानसमइं केशोबांसीं '**महावाक्य**'व्याख्यान सांघितलें : येतुलेनि देहावसान जालें : तिघीं निक्षेपु केला : मग तिघै भटोबासांपासि आले : येतां देखौनि भटोबासीं म्हणितलें : माइदेवो : केसवदेवो : पंडितु आले : पंडिताचें पाउल हारीं न पडे : रामाचें काहाळेकांड पडलें : तव ते आले : भटोबासां भेटि जाली : पंडितबासि केशोबासि क्षेमवार्ता सांघितली : रामदेवाचें अवघेचि बोल सांघीतलें : माइदेवा : तू आलासि मातें तुवां निववीलें: भटोबासीं अवघे आइकौनि म्हणितलें : जैसें आपणयातें धिक्करीजे तैसेचि पुढीलातें धिक्करीजे : हें सौजन्याचें कार्ये कीं गा : ॥६१॥

**'श्रीचक्रधरु' उच्चारश्रवणें महादाइ अपत्यालिंगन देणें** :॥: एकु दीसु: महादाइसा भीक्षा करीतें असति : सरींसि एकें आइसें असति : तवं एकें लेंकरुवें 'श्रीचक्रधरु' ऐसें उच्चारीलें : तें आइकौनि महादाइसां थोर सुख जालें : तयातें झाडूनि पुसौनि कडिये घेउनि आळंगीलें : सरिसिं आइसें होतीं : तेहीं म्हणितलें : हां आइ ऐसें काइ केलें : महादाइसीं म्हणितलें : सृष्टीमध्यें देवो दुर्लभ : कां देवातें आठवी तो दुर्लभु :॥: शोधु :।: मग तयातें खालि ठेउनि भिक्षा मागीतली :॥६२॥

**रामदरां पंडित : केशवदेव आपोसनें : भटोबास सिष्यां कोपणें** :॥: कवीबास[2]:।: एक वेळ भटोबास आवघेयांसमवेत रामदरेयासि गेले : रामदरा नमस्करीला : मग तेथचि खडकावरि भोजना बैसले : तवं भटोबासांचा सिष्यीं एकीं अवघेयांसि वाढीलें : पंडित : केशोबासांसि वाढूं विसरले : अवघां घांस घेतलें : पंडित : केशोबास उगेचि[3]: तें भटोबासीं देखीलें : भटोबासीं म्हणितलें : तुम्हीं कां गा आपोसन घरीलें :

---

१ ठसठस ख; टूं टूं घ. २ कवेश्वरबास ग. ३ खत या पुढें 'होते' शब्द जास्त.

तवं एकीं म्हणितलें : भटो येथ वाढिलें नाहीं : मग भटोबास वाढीत होते तयांवरि कोपले : सेवटीं म्हणितलें : जैसा तैसा क्रियेचा विनयोग नसतां बोलीलि क्रीया समयोचित काइसेनि आठवैल :।: शोधु :।: मग तयांसि वाढीलें: मग तेही जेउं लागले :॥६३॥

**वासनिकां बुझावणी करणें** :।: डींडौरी गोविंदपंडित : आणि अपर रामदेव यांसि भटोबासापामौनि श्रवण : ते रावसगांवि होते : एकमेकां नावेक विरोध होता : एक वेळ तेथ भटोबास गेले : उभे वर्ग भेटले : गोविंद-पंडितीं भटोबासांसि अभ्यागता म्हणितलें : आणि अपर रामदेवांही निमंत्रण दीधलें : तिहीं भटोबासां नुपलखत उगेंचि अंगीकरीलें : मग अवघी आइत जाली : पांती जालीया : अपर रामदेवांतेंहीं बोलाविलें : भटोबासांचीये पांतीं जेवीलें : मग येरी दीसीं अपर रामदेविहीं भटोबासासि अभ्यागत केलें : तेहीं गोविंदपंडितांसि निमंत्रीलें : तेही आले : भटोबासांचीये पांतीं जेवीले : परि उपलक्षु[1] नाहीं दीधलें : मग भटोबास प्रतीष्ठाना आले : मग केतुलेयां एकां दीसां अपर रामदेवांचां घरीं काहीं काज मांडलें : आधीला दीं रामदेव गोविंदपंडितासि क्षेणु द्यो[देवों]आले : तवं क्षेणु ते न घेतिचि : गोविंदपंडितीं म्हणितलें : तुम्हां आम्हां विसंवादु असे : आम्हीं तुमचा क्षेणु नेघों : रामदेवीं म्हणितलें : तुम्हीं आमचां घरीं जेवीलेति कीं : गोविंदपंडीतीं म्हणितलें : आम्हीं तुमचां घरीं नाहीं जेविलों : तें आम्हीं भटांचिय पांती जेविलों : विसंवाद तो उरला आहे : मग रामदेवीं आपुलें कार्य केलें : मग केतुलेनि काळें अपर रामदेव आणि डींडोरी गोविंदपंडित यैसें भटोबासांचीये भेटिसि आले : सरिसे नरेन्द्रकविही होते : भेटि जालीया :॥शोध:॥ मग कव्हणीं भटोबासांपासिं सांघितलें : एक म्हणति आधींचि आइकिलें होतें : ॥ मग भटोबासीं निरूपण केलें : एकमेकांचा विरोध फेडीला : बुझावणी जाली : मग ते गेले : ॥६४॥

**साधां अक्षमत्वगमनि निंबां वास करणें** :।: साधें बहुतें अक्षमें जालीं : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : साधें अक्षमें जालीं : आतां मढी करावी लागैल : ना तरि संग्रहो भंगैल : तेव्हेळीं निंबा मढि बांधिली : तेथ साधे असति : भटोबासहीं राहावा करीति :॥६५॥

---

१ उपलखों ख, ग. घ.

**केशव-पंडितां प्रश्नें अस्मात्कस्मान्निराकरणें** :॥: एकु दीसु भटोबासांसि पंडित : केशोबासि संस्कृतभाषा प्रश्न केला : त्यावरि भटोबासीं म्हणितलें : पंडिताः केशवदेया : तुमचा '**अस्मात्-कस्मात्**' मीं नेणें गा : मज श्रीचक्रधरें निरूपिली मऱ्हाटीं : तियाचि पुसा : मग तिहीं मानिलें :॥६६॥:

**पंडिता अभ्यासि उमटु-प्रसंसा** :॥: एक वेळ भटोबास पंडिबासांसि '**उद्धरण**' घोकवीत होते : तवं एक वाक्य पंडितबास विसरलें : तें वाटे जातां पंडितबासीं भटोबासातें म्हणितलें : भटो हें वचन कैसें : भटोबासीं म्हणितलें : बैसों मग सांघों : तवं गंगे ब्राम्हण बैसले होते तेहीं म्हणितलें : यत्क्रियते तत्कर्म : यैसें अवघें उच्चारीलें : तवं भटोबासीं म्हणितलें : पंडिता तं पुसित होतासीं तें हें गा : तेहीं म्हणितलें : भटो तें हें नव्हे कीं : तुम्ही परावाचा बोलाल तें होये : याउपरि भटोबासीं म्हणितलें : पंडितासि ये मार्गीचा उमटुं जाला गा : पडितबासीं म्हणितलें : भटो मज इतुकें दीवस यैसें होते जें मीं तुमचीये मार्गीचें अवघेचि जाणे : परी आतां यैसें जालें जें ये मार्गीचें काहींचि नेणें : यैसें जाणितलें भटो : तवं भटोबासीं म्हणितलें : पंडिता जाणितलें तें आताचि गा : कां ना गोसावी म्हणितलें : जवं जवं जाणता तवं तवं नेणता :॥ शोधु :। मग भटोबासीं आपुलेनि मुखें सांघितलें : तें तेही घोकीलें :॥६७॥

**म्हाइंभट-लक्ष्मीधरबा-व्यावृत्ति केशवपंडित--प्रसंसा** :॥ एक वेळ पंडितबास केशवबास भटोबासांसि चर्चा करीत होते : भटोबासीं तोखौनि म्हणितलें : माझें शास्त्र म्हाइंभटा-लक्ष्मीधरभटाचेनि तुजळेचिः तें पंडिता-केशोदेयांसि चर्चा करीता उजळले : यैसें तोखलें :॥६८॥

**इंद्रभट फुटा न प्रदायेनीं मार्गहेतु प्रकासपूर्वक फुटा मागणे** :॥ एक वेळ म्हाइंभट हेतु धरूनि इंद्रभटां भेटावेया सुरे गावां गेलेः इंद्रभटांसि भेटि जाली :॥ शोधु : तेहीं अतीत केलेंः तें अंगीकरीलें :॥ मग इंद्रभटातें म्हणितलें : इंद्रभटो तुम्हा गोसावीं प्रसन्न होउनि फुटा दीधला असेः तो तुम्ही प्रसन्न होउनि गुरुकुळासि द्यावाः इंद्रभटीं म्हणितलें : हा मज गोसावीं प्रसन्न होउनि दीधला असेः मीं नेदींः म्हाइंभटीं म्हणितलेंः ना द्यावा : तिहीं म्हणितलें : आम्हीं नेदूंचि : मग म्हाइंभट भटोबासांपासीं

आले: क्षेमवार्ता सांघितली : अवघे आइकौनि भटोबासीं म्हणितलें : फुटा काइ त्याचेया बापाचा : तो गोसावीं असेखा गुरुकुळाचेया हेतु दीधला असे: म्हाइंभटासारीखें पात्र मागे आणि नेदीजे : मग भटोबासचि आले : बळेंचि असिका मागौनि घेतला : मग भटोबासीं अर्धु फाडूनि वेगळा केला तो इंद्रभटांसि दीधला : आणि अर्ध तोही इंद्रभटांचां हातीं दीधला : आणि म्हणितलें : इद्रेया आतां हा अर्धु तूं प्रसन्न होउनि आम्हा मार्गासि दे : इतुलेनि इंद्रभटांसि सुख जाले : मग इंद्रभटीं साष्टांग दंडवत घालौनि अर्ध फुटा भटोबासांसि दीधला : मग भटोबासीं समस्तांसि वीभागूनि दीधला :। शोधुः मग भटोबास निबेया आले :। तथा शोधु। मग इंद्रभटां मागां तोही अर्धु मार्गांतु आला :। एक म्हणति कविश्वरीं आणिला :।६९।।

**माहात्मेया सप्रसादें अटन निराकरणें** :। एक वेळ एक माहात्मे अटना निगाले :। शोधु :। इंद्रभट गावां निगाले ।। तयांपासि गोसावियांचा फुटा होता: तवं भटोबासीं म्हणितलें : तुम्हां एकलेयां अटन करावेया अनुज्ञा नाहीं :। शोधु :। इंद्रभटो तुम्ही एकलेयां न वचावे :। तुम्हापासि गोसावियांचा फुटा असे : म्हणौनि वारीलें : ते राहीले : एकले न वचेतिचि :।७०।।

**प्रज्ञा-प्रकाश-प्रश्ने केशोबासां विधि-निरूपण** :। एकवेळ केशोबासांसि अनुस्फूर्ति ऐसी वाटली : कांहीं काळीचें काळों आठवे ना : मग एकु दीसु भटोबासांतें पुसिलें : भटो सांपें कीं मज स्फूर्ति नाहीं : काहीं वेळेचें आठवे ना : मग भटोबासीं म्हणितलें : तुवां मासादीसा अटन करावे : झोळीये पात्र न घलावें : तीन पाहार विजन करावे : तिसरां पाहारीं भीक्षा : नदीं भोजन करावें : खांड देउळीये कां वृक्षमुळी निद्रा कीजे : मग तुमचा अविधि परीहरैल : मग मागौती स्फूर्ति होईल : मग तेंहीं तैसेंचि केलें : आणि उजळता आली : स्फूर्ति जाली :।७१।।

**वाळुके रामदेवां रसुनिराकरणिं अनुचितप्रकाशपूर्वक शिक्षापण** :। एकवेळ वाळुके रामदेव अटना गेले : आणि एकी गावि मळां रोग्गीया केलीया : सद्यस्त तूप भरीत यैसें जेविले : मग केतुलेनि काळें भटोबासां भेटावेया आले : भेटले : अभ्यागता म्हणितलें : मग पांती तूप वाढितां

नेघतिचि : भटोबासीं म्हणितलें : घेया ना भटो : नको : न साहे : मग भटोबांसीं म्हणितलें : हां गा रामा : आपुलीया वासना मळां तूप रोटिया भरित जेउं ये : आणि माझें घेवू नये : यैसा कवण बुझ : येरीं म्हणितलें : भटो केवि जाणा : हां गा श्रीचक्रधराचेनि प्रसादे मी येतुलेंही नेणे : मग तेहीं अनुतापु केला : मग अवघे जेवीले :॥७२॥

**तथा वस्त्रक्षाळणि दास्यत्व निरूपण :॥** एकु दिसु तेचि अभ्यागतांचीं वस्त्रें धूत होते : तैसीयेचि परीचि तेथ भटोबास आले : मग म्हणितलें : रामा आपुलें धुइजे : तेथ मळघाणि फेडिजे :॥ आणि पुढीलांचें वोपवावें : तपवावें : तें सौजन्यपर दास्यत्व : यैसें निरूपण केलें : मग तेहीं बरवीं धुतलीं :॥७३॥

**कविश्वरीं विजन-प्रत्यागीं उचितप्रसंसा :॥** एकु दिसु कविश्वरबास विजना गेले : तवं जेथ बैसावें तेथ मुंगीयाची हारि आली : मग आणिका ठाया गेले : तवं तेथ गोरूं चरूं आली : आणिका ठाया गेले : तेथ सत्वा नैएचि : मग वीजन न पळे : म्हणौनि बीढारा आले : तवं अभ्यागत आले असति : मग भटोबासांपुढां मागील सांघीतलें : भटोबासीं आइकीलें : मग म्हणितलें : आलेति : हें उचित स्फुरलें :॥७४॥

**अनंतदेव-देहत्याग-श्रवणी प्राप्त्यंतर[प्रवृत्त्यंतर]निरूपण :॥** अनंतदेव कवणिये गावींचे हें नेणिजे : परि भटोबासांपासौनि तयांसि श्रवण होतें : निंबेया प्रांतीं समीपचि तयांचा गावं : ते धाकुटेचि परायेचे : पिता संवर्तमान नव्हता : माता होती : ऐसा एकु दीसु ते भटोबासांचिये भेटिसि आले : आणि भीक्षा केली : तें आइकौनि तयांची माता नेयावेया आली : ते न वचतीचि : मग माता भटोबासांतें म्हणितलें : भटो यातें धाडा : ना तरि मीं तुम्हावरि वीष खाइन : भटोबासीं म्हणितलें : अनंता मजकारणें जाए गा : गेले : तवं तयां ज्वरुं आला : माता म्हणितलें : बा अनंता वांचसि : तेहीं म्हणितलें : जैसें भटोबासांतें म्हणितलें : धाडा : नातरि मीं वीष खाइन : तैसेंचि काळासि म्हणसिल तरि वांचैन : तैसेंचि तेहीं देह ठेवीले: तें भटोबासीं आइकिलें : मग म्हणितलें : अनंतासारीखा सिष्य जाये : आणिक गुरु तरि पोटीं सुरी सोये : माझेनि निमित्तें गेला :। तवं एकिं

भटोबासांतें पुसिलें : तयांसि काइ होइल : भटोबासीं म्हणितलें : ते पुरुषु होउनि जन्मतीः मग दर्शन होईल : यैसें निर्वचीलें :॥७५॥

**गौराइसां निरूपणि कोथळोबा झाड कथन** :॥ एकु दीसु भटोबास उंबरीं गौराइसांसि 'आचारस्थळ' घोकवीत होते : परि तयांसि नयेः नुमटे : मग भटोबासीं म्हणितलें : गौराइ तुज तरि ये ना : तूं जाये : मां तुजसीं झाडचि बोलैल : मग तीयें अटना गेलीं : तवं अटनि कोथळोबास भेटले : तेहीं तयांप्रति 'असतीपरी' वाखाणिली : तें भटोबासीं आइकौनि म्हणितलें : कोथळा काइ बोलता : तें झाडचि बोलिलें किं :॥७६॥

**तथा अटनि साहाये–अनुवादुः**॥ उबरीं गौराइसां अटन करीतां एकु दीसु एका गावां जातां मार्गी कांटा मोडला : तेणें चालोंचि नये यैसें जालें : तियें पाय धरुनि वाटे बैसलीं असति : सरीसीं एकें आइसें असति : तवं जयां गावां जात होती : तियेचि वाटेंपुढौनि घोडेनिसि एकु आला : तयांतें बैसलेयां देखौनि म्हणितलें : आइ कवणा गावां जाता : बा पैला गावां जात असो : तवं पाइ कांटा मोडला : तेणें चालों न ये : म्हणौनि बैसलीयें : तवं तेणें म्हणितलें : आइ तया गावां धाडि आली : तेथ जाउं नका : आतां या मागिलाचि गावां जावों : म्हणौनि घोडयाखालि उतरला : तयांतें विनवूनि बैसवीलें : आणि घोडेया वावूनि मागीला गावांचेया आखरा आणीलें : तेथ उतरीलि : आणि आपण निगाला : मग हें केतुलेनि काळें भटोबासीं आइकिलें :॥ शोधु :। आणि म्हणितलें : गौराइसां थोर साह्य जालें गाः॥७७॥

**दीवसाचां भोजनि संग्रहें तांबुळ नेघणें** :॥ भटोबास दीवसा भोजन करीति : परी तांबुळ नेघति : संन्यास संग्रहो भंगैल म्हणौनि :॥७८।

**हीराइसां दृढत्वानुवादु** :॥ एकु दीसु भटोबासीं दृढत्वावरि हे गोष्टि सांघितली : भटोबासीं म्हणितलें : आम्ही हीराइयेसीं भेटों गेलों : तवं तयांची लेंकी अस[श]क्ति होती : आम्ही आलों संभ्रमु केला : येथोचित अभ्यागत केलें : आम्ही जेवूं बैसलों (तंव) ते सरली : ते कोण्हा नेणतां तैसीचि गुंडूनि ठेविली : अवघीं जेवीलीं : मग मागिलाकडूनि हीराइ जेविली :। कवीबास[1]:॥ आपणेयां सांगातें जेववीलीं :॥ मग आताचि होती

१ कवीश्वरबास ग, घ.

वो म्हणौनि संग्रहेंचि रडीनली : यैसी गोष्टि भटोबासीं सांघीतली :॥७९॥

**विरूपाख्य महादेवोबा पगती बैसका–ज्ञान करणें :॥** एक वेळ भटोबास अवघेयांसमवेत पांतीं जेउं बैसले असति : तवं रूपदेवोबावरुतें पांतीं विरूपाख्य महादेवोबा बैसले होते : तयांतें देखौनि केशोबासीं म्हणितलें : तुम्ही येथौनि उठा : पैन्हा बैसा : आणि ते उठिले : परि नावेक अन्याकार जाले : मुख विवर्ण केलें : ते देखौनि भटोबासीं म्हणितलें : यैसें हीमट तोंड करीतासि तरि आधीं कां भीक्षा न करीसीचि : वृद्धानुक्रमें वर्तावे : आणि तयांचें फीटलें : अनुतापलें :॥८०॥

**माहात्मेया प्रश्नें पदार्थीं वासनादि भावो निषेध :॥** एकु दीसु एकीं वासनिकीं वाणिचा हुरडा आणि साकर आणीली : तो भटोबासीं अवघेयांसि वांटवीला : तवं एकी माहात्मां पुसिलें : भटो यैसें खावों ये : भटोबासीं म्हणितलें आधीं खाये : मग पूस : तेंहीं खादला : मग पुसिलें : भटोबासीं म्हणितलें : आपुलेया वासना मिठ वीखो : मग तयांसि निरूपण केलें :॥८१॥

**माहात्मा–नामपूर्वक घृतयाचनिं गौराइ–सिक्षापण :॥** एकु दीसु भटोबासीं गौराइसाकरवि तूप वीकत घेववीलें : तेहीं घेतलें : मग जयांचें तूप तयांचा भांडां : दोनी पळीया तूप उरलें : तें गौराइसी मागीतलें : हें आम्हा माहात्मेयांसि द्या : तेंहीं दीधलें : आणिलें : तें भटोबासीं सांडवीलें : हें तूप नको घेवों : हें माहात्मेपण विकणे म्हणा : म्हणौनि सिक्षापाली : मग तेहीं तें सांडीलें :॥८२॥

**राजोक–उपद्रवें आबैसां–वैजोबा भुवनिं राहवणें :॥** एकवेळ दीलीचा सुलतान चालीला : अवघें मंडळ हालवलें : भटोबासीं आबाइसांतें म्हणितलें : आवै तुम्ही वैजोबाचां गांवि राहा : तिहीं म्हणितलें : ना नागदेया : गोसावीं संबंधु वारीला असे कीं : भटोबासीं म्हणितलें : तुम्हासि दोहीं देवांचा संबंधु : तेथचें सन्निधानदास्य : आणि मजसारीखा पुत्रु : आणि संबधु तो कोणासि : तो बेंबीळासि कीं : ॥ शोधु :। आणि हे एकी अडणि :॥ मग आबाइसीं मानिलें : वैजोबाचां गांवीं राहीलीं : भटोबासीं म्हणितलें : देसु[शु] उचलला होईल : आणि तुम्ही गुढयासरीसें यावें :

मजपासि धाकुनलीया बाइया असति : तरि मीं पुढां घाटावरि जाइन : म्हणौनि भटोबास निगाले :॥८३॥

**परकीये साधांतें राहवणें :॥** भटोबास घाटावरि जातां परळी पातले : तवं मागीलाची दाटि जाली : मग भटोबासीं साधांतें म्हणितलें : येल्हो तूं येथ राहे : तुज गोसावी वरद असति : साधीं मानिलें : मग अक्षमें तेतुकीं साधापासि राहीलीं : भटोबास दुरांतरें निगाले : साधे वैजनाथाचां देउळीं राहीलीं : अक्षमें तेतुलीं आंतु घातलीं : साधे द्वारेंसि काठी टेकूनि बैसली : तवं ते तुरुक आले : ते म्हणति : येथ कोण आहाति : साधें म्हणति : येथ मीं श्रीचक्रधररायाची दासी येल्हो असे : यैसें म्हणति : आणि ते देखतिः जाति : यापरी जेतुकीं होतीं तेतुकीं अन्येंहीं आदिकरूनि साधाचेनि वांचलीं :॥८४॥

**शकट-भंगानुवादें आवैसें धरीतां चुकली म्हणणें :॥** भटोबासां गेलेयां मागां असीका देसु उचलला : गुढेयासरिसें वैजोबा गाडेनिसि निगाले : सरीसीं आबाइसें : महेश्वरपंडीत असति : वाटे पळतां गाडा मोडला : ते तेथचि राहीले : तव मागौनि तुरुक आले : ते म्हणति : यें पुढीलांचीं : पुढील म्हणति :यें मागीलांचीं : यापरी वाचलीं : तवं भटोबासी म्हणितलें : वैजोबाचा गाडा मोडला गा : परि तियें धरीता चुकलीं : तें कां ना माझीया स्मरणा खंडना नव्हेचि : तेणें वांचलीं : तवं एकीं म्हणितलें : भटो तुम्ही केवि जाणा : भटोबासीं म्हणितलें : हां गा श्रीचक्रधराचेनि प्रसादे मीं इतुकेंहीं नेणें :॥ तया आश्चर्य जाले :॥८५॥

**राजाभविष्यानुवादु :॥** भटोबासीं दुरि प्रदेशांतर केलें:॥ एक म्हणति निलंगेयासि गेले :॥ येरीकडे रामदेवो रावो तेहीं धरीला : तें आइकौनि भटोबासीं अनुवादु केला : भटोबासीं म्हणितलें : रामदेवो धरीला : परि सुटैल : जवळिलीं म्हणितलें : तें कां भटो : भटोबासीं म्हणितलें : ना मीं वर्तें तवं मऱ्हाटें वर्तैल : यावरि भटोबासीं हा श्लोकु म्हणितला : **यस्मिन् देशे वसेत् ज्ञानी योगी स्वाध्यात्मचेतस :। तन्मंडळं पवित्रं च प्रयाति निमिषार्द्धकं :॥१॥** आणि धरीला तो संता-महंतांचेया वोखटेया प्रवर्तला म्हणौनि : परि हे हातवणी : जेवण तें पुढां उरलेंचि असे :॥८६॥

**राज्यांतरशमनीं पुनः निंबा वासु करणें :॥:** शोधु :।: मग केतुलेया

एका काळा निर्भय जालेयानंतरें मग (भटोबास) गंगातिरासि आले : साधांसि भेटि जाली : कवणी स्थानी तें नेणिजे : मग साधांसहित माघौते नींबेयासि आले : तेथ राहिले :।।८७।।

**केशव : पंडित–बोलना–भाषाभेद–कथन** :।।: एकु दीसु प्रस्तावेया-अनुरूप भटोबासीं म्हणितलें : केशवदेयासि संस्कृती सरळि : आणि पंडीतासि संस्कृति मऱ्हाटिया सरळि : यैसा अनुवादु केला :।।८८।।

**विजनि पडितां गितगायेनि निषेधु** :।।: पंडितबासीं गितमातुचां[1] ठाइं बहुत भरु धरीला : विजनि बैसति : आणि धुवा[2] : वोवी : चौपदी : गीतु : यैसें आवडे तें म्हणति : एकु दिसु विजनि बैसोनि गात असति : तवं भटोबास विजनें पडताळीत आले : तवं तयांतें गातां आइकिलें : भटोबासीं म्हणितलें : पंडिता आजिलागौनि तू गीत गावों नको गा : गोसावीं वारीलें असे : गीत विखो म्हणौनि :।।१।। मग तेंलागौनि पंडितबास न गाति : यैसा नेमु केला : ।।८९।।

**तथा गीतगायनानुज्ञा** :।। एकु दीसु पंडितबास विजनि बैसले असति : तवं भटोबास विजनें पडताळीत पडताळीत तेथ आले : तयाचि दृष्टी चुकवूनि मागां उभे ठाकले : तव पंडितबासासि थोर दुख भरलें असे : दुख करीताति : आणि तेविचि हा गीतु म्हणताति :।। **आणिका बोलना : लो[3] न लागो श्रवणा : रूप तरि नयेना : आवडो तुझें** ।।१।। धृवपद : **तूं पर दैवं : इतुलें जाणें : बहुतें विघ्नें : जाकलोति** :।। **जिवें मीं कहों : न विसबे तुज : हेंचि द्यावें मज : गोंविंदराजा** :।।२।। **निरंतर करी : मीं तुमचें स्मरण : ऐसेंचि यो कां माझेया मना : गोंविंदराजा** :।।३।। **आणिकीं बुझावितां : डिंभ न बुझावें : मायेलागी रोवें : तें काइ अपराधी** :।।४।। **माझी सें न संडी : आर्तीदानीं : नागदेवा स्वामी : श्रीचक्रपाणि** :।।५।। यैसा गीतु निर्वेदपूर्वक गाइला : तो भटोबासी उभेयां ठाकनि अवघाचि आइकिला : मग यैसें पुढां येउनि म्हणितलें : पडिता आजिलागौनि तुज गीत गावेया अनुज्ञा गा : गोसावीं म्हणितलें असे : ये भीती विकारु होआवा तरि देमतीये गीत गातां (विकारु) होआवा : यैसी श्रुति उच्चारूनि भटोबासी अनुज्ञा दीधली :।।९०।।

---

१ मातांचां ग, घ. २ धावा ग, घ. ३ ख, घ मध्यें हा शद्ब नाहीं; ग त आहे.

**तथा गायेनश्रवणें ब्राम्हणा–अनुसरणि हाकारा म्हणणें :** एकु दीसु पंडितबास धृवा म्हणत होते : तो आइकौनि एकें ब्राम्हणें भीक्षा केली : भटोबासांपासि घेउनि आले : अवघि व्यवस्था सांघीतली : तें आइकौनि भटोबासीं म्हणितलें : पंडीताचे गीत ते माझे हाकारे गा :॥९१॥

**नाथोबा–आव्हानि कटकदेमाइसांचिये भेटि जाणें :॥:** एक वेळ नाथोबा हींडित हींडित कटक देवगीरीसि गेले : तेथ कटककारां देमाइसां आणि वंकीसि श्रवण केलें : तेहीं काहीं संपादू आदरीलें : तवं ते नाथोबा नेघतिचि : मग तेंहीं आग्रहो केला : मग नाथोबायें म्हणितलें : द्या : मा मीं हें भटोबासांसि देइन : म्हणौनि घेतलें : तवं देमाइसीं म्हणितलें : हां बा : भटोबास ते कवण : ना ते आमचे वडिल : तेहीं म्हणितलें : तरि ते आम्हां भेटवावे : नाथोबायें मानिलें : मग तेथौनि भटोबासांपासि निंबेयासि आले : भटोबासांसि भेटले : मागील वृतान्त सांघीतले : मग भटोबासांतें प्रार्थिलें : भटोबासीं मानिलें : मग भटोबासांसि घेउनि कटकासि आले : देमाइसासि भटोबासांची भेटि जाली :॥९२॥

**तथान्यरसाशनीं : नीरसास्वादन–परीहारु सुचणें :॥:** मग देमाइसीं समस्तां भिक्षुकांसहीत : भटोबासांतें अभ्यागतां प्रार्थिलें : भटोबासीं मानिलें : मग देमाइसीं अवघि आइती केली : पांती जालीया : अवघेयां वाढिलें : भटोबासांसि ताट केलें : देमाइसीं विसरूनि भटोबासांचा ताटीं तूप म्हणौनि करडेल वाढीलें : मग दंडवत घातलें : देमाइसें भटोबासाचेया ताटापासि बैसली : भटोबास जेविताति : तवं देमाइसांसि करडेलाची घाणि आली : तिये यैसी पाहाति : तवं ते करडेल जेवित असति : आणि तिये पोळलीं : आहा बा सांघाचि ना कैसे : मीयां वीसरौनि तूप म्हणौनि वाढीलें : म्हणौनि बहुत दुख करूं लागलीं : आहा ऐसें म्यां काइ केलें : तेविचि तूप वाढीलें : भटोबास जेवित असति : मागौतें तियें तैसेंचि म्हणति : कटकटा भटो : सांघतेति कां : मग भटोबासीं परीहारू दीधला : भटोबासीं म्हणितलें : करडेल यैसा काहीं मीं स्वादु जाणें तरि रूपैची आन : मग अवघेयां भोजनें जालीं : मग कटक देमाइसें आणि वंकी : यैसिं उभये वर्गे भटोबासांचीं सिष्यें जालीं : नाथोबायें निरोविलीं : यावरि भटोबासीं समस्तांतें म्हणितलें : मज गोसावीं अधिकरण केलें असे : म्हणौनिचि मी अवघेयांचा गुरु : येन्हवि

अवघिया श्रीचक्रधराचीया धुरा : आणि माझे हाकारे : आतां या नाथोसि कव्हणि हांसो नको गा : यैसें भटोबासीं म्हणितलें :।। तयाचिपरी उपाध्यें : कान्होपाध्ये : यांसि कोण्ही काहीं पुसति : त्यातें भटोबासांपासि घेउनि येति : तयांतेंही भटोबास हाकारे म्हणति :।।ःशोधुः।ः मग मागौतें भटोबास निबयासि आले :।।९३।।

**केशव : पंडित–येकवळा करणि अभिमानु–स्वीकारू** :।। भटोबासांपासि एकीं दंपतीं भीक्षा केली : तें वीकारवंतें होतीं : तयांची उठि-बैसि वीलक्षण देखौनि केशोबासीं : पंडितबासीं भटोबासांतें म्हणितलें : भटो यें दवडावीं : यें सदोषें असति : तियें बहुतांमध्यें भटोबासांसि कळों नैयेति : भटोबासीं म्हणितलें : हळहळु गुणा येतिल : ना तरि आपुला अवगुणि जातील : तुम्हीं आदि नको हो गा : तव केसोबासीं : पंडितबासीं म्हणितलें. भटो हें दवडा : कां आम्हीं समस्तें जावूनि : भटोबासीं आवेशूनि म्हणितलें : जा : मग उभयवर्गीं समस्तांसि आन घालौनि म्हणितलें : आगा एथौनि निगे ना तयासि भटोबासांचीचि आनः म्हणौनि अवघेचि निगाले :।।९४।।

**तथा केशवादीकागमनिं केशव–पंडित–स्वनेत्रानुवादु** :।ः मग अवघीं गेलेयां तियेंचि उरलीं : येतुलेनि तयांची उठि-बैस बाहिरी पडलीं : एकमेकांतें देखौनि सुरंगु मीरवीति : घोळीति : येतुलेनि भटोबासीं म्हणितलें : हें माझेयां कंथडीकारां मुळवणि कीं :।। फुका माझीं निगाली : तयांतें म्हणितलें : बापें हो आतां तुम्हीं जाः मीयां तुम्हांकारणें बहुता तुटि केली : मग तियें निगालीं :।ः तें आइकौनि केसोबास पंडितबास समस्त आले : भटोबासांतें म्हणितलें : भटो आम्हीं पापीयें : तुमतें सांडूनि गेलों : म्हणौनि दंडवतें घातलीं : अनुताप करूं लागले : मग भटोबासीं उठउनि संभाषूनि म्हणितलें : पंडिता : केशवद्या : सर्वांगी काइ देखणें असे : देखणें तें डोळेनिचि की : तैसे तुम्हीं माझे डोळे कीं गा पंडिता : केशवद्या :।।९५।।

**धर्मबळवतरें वडिल–धाकुटा निराकरणें** :।ः मग यावरि भटोबासीं म्हणितलें : धर्में एकमुखता होआवी : धर्मु सिप्यु नव्हे : धर्मु तोचि गुरु : म्हणौति धर्में वडिलेंहीं धाकुटेयाचें म्हणितलें करावें : यैसे भटोबासीं

निरूपण केलें ॥९६॥

**लुखाइ अनुसरण–दृढत्वी परीहारार्थ संबंधा पाठवणें** :॥: लुखाइसें तियें बाबुळगांवकरें : भटोबासांपासौनि (तयां घ) श्रवण जालें होतें : तियें सकळ भोगापासौनि विरमली : उदासीनता असति : ताक भात जेवीति : संग्रहें तोडगळसुरीवांचौनि अवघचि ते[त्य]जिलें : भातारु वर्जिला : गंगे जाति : स्नान करीति : नावेक बैसति : अनुष्ठान करीति : यापरी असेति : आपणचि जाउनि भातारासि वरवी उपवर नोवरी पाहीली : भाताराचा वीवाहो केला : मग एकु दीसु गंगे आंघोळिसि म्हणौनि आलीं : तैसींचि बाहीर–वाहीरीं भटोबासांपासि निंबेयासि आली : भटोबासांसि भेटलीं : भीक्षा केली : भीक्षा देता भटोबासी शोधनी करवीली : तेहीं मागील व्रत–नेमु सांघितला : मग बाइसांचेनि संगातें परमेश्वरपुरा पाठवीलीं : सवेंचि मागीलाकडौनि धावणें आलें : भटोबासांतें म्हणितलें : भटो येथ लुखाइ आली : ते आम्हासि भेटवा : भटोबासों म्हणितलें : येथ नाहीं : पाहा पां : म्हणौनि परीहार दीधला : आणि ते निगाले : आपुलेया गावां गेले : लुखाइसें ॠद्धिपुरासि गेलीं : ॠद्धिपुर नमस्करीलें : वरिष–दीस उत्कर्षें वैराग्य केलें : देह थोर तुटलें : मग वरीखा एका भटोबासांचिये भेटीसि आलीं : भेटि जालीं : मग एकु दीसु तयांचें अती दृढत्व जाणौनि भटोबासीं म्हणितलें : लुखाइसें आतां यैसींचि तुम्ही बाबुळगावां जा : तेथ भीक्षा करा आणि या : मग लुखाइसें बाबुळगावां गेलीं : भीक्षाअवसरीं तयाचि घरा गेलीं : तवं तो दारीं बैसला होता : तेणें नोळखोनि म्हणितलें : आइ दंडवत : लुखाइसीं म्हणितलें : आमतें वोळखता : आणि तेणें ऐसें वोळखोनि म्हणितलें : होय वोळखतों : आता दुसरें दंडवत : म्हणौनि साउमा आला : माथाची पाग फेडीली : आणि लुखाइसांचीया पायांवरि भावपूर्वक डोइ ठेवीली : बैसों घातलें : ताटीं पाये धुतले : पाप्रेवणि भीतरि घेतलें : कपाळीं लावीलें : मग लुखाइसीं माघौतें येउनि भटोबासांपुढा सांघीतलें : भटोबासां थोर सुख जालें :॥९७॥

**खेइभटां प्रश्नें द्रावकानुवादु** :॥ एकु दीसु सेगांवकरां खेइभटां भटोबासांचे दर्शन जालें : तेहीं भटोबासांसि पुसिलें : लोहोबंध गाडा जडीला असे : तो उजडे ऐसें काहीं असे : भटोबासीं म्हणितलें : असे :

द्रावक भेटे तरि लोहासि झरा फुटे : यैसी भेटोबासीं उपपति दीधली : ते खेइभटांचां मनि टिक यैसी बैसली : आपुलां मनिं म्हणितलें : आतां गावां जावों : व्येवस्था करूं : मग भटोबासापासि जाउं[1]: मग भटोबासांची आज्ञा घेउनि कुटंबें घेउनि गावांसि गेले :॥९८॥

**तथा अनुसरण :॥** मग गावां जाउनि खेइभटीं द्रव्याचे सरीसें तीन वांटे केले: एकु पुत्रासि दीधलाः एकु ब्राह्मणीसि दीधला: आपुला आपण घेउनि तयांते पुसीलें : मीं भटोबासांपासीं जात असें : तुम्ही माझी अवसरि न करावि : यैसें म्हणौनि भटोबासांपासि आले : मागील अवघें सांघितलें : तें द्रव्य भटोबासांपुढा ठेविलें : तवं भटोबासीं तें यैसें पाये लोटूनि म्हणितलें : मी काइ येकाधा पोळीका माहात्मा : मां हें आणिलें : तें खेइभटासि अवघड वाटलें : भटोबासांतें म्हणितलें : तरी हें मी काइ करूं : येतुक्या दुरूनि माघौता कैसा जावों : काकुलती करूं लागले : मग भटोबासीं म्हणितलें : तरि जाये घालि पैला मढांतु : मां मढूचि खाइल : मग तें नेउन मढांतु एकी कोनटां ठेवीलें : मग बरवी यथोचीत क्रीया केलि : बरवी भटोबासांसहीत वस्त्रपूजा केली : बरवे पदार्थ अभ्यागत केले : मग खेडभटांसि भीक्षा दीधली : श्रवण तियेचि काळीं जालें कीं मागां कहीं जालें होतें हें नेणिजे :।९९॥

**तथाधिकारु–प्रसंसा :** । मग खेइभटासि भटोबासीं कांहीं शास्त्र श्रवण केलें : ते दशा वृद्ध होते : ते देखौनि एकु दीसु भटोबासीं म्हणितलें : साटी वरीखाचीये दशेचेया पुरुषासि अनुसरणि अधिकारु नाहीं : परि नेणिजे ईश्वरीची प्रवृत्ति : जैसे कीटकीये कोरीतां काष्ठीं ॐ पडे : तरी : [2]पडे : ॥१००॥

**तथा कुहीरीसाधन निभर्षणपूर्वक पुरुषाचारु निरूपणें :** ॥ एकु दीसु भटोबासातें पुसौनि वाळुके रामदेव अटनासि नीगाले : तयांसरीसे भटोबासीं खेइभटातें पाठवीलें : गेलें : एकु दीसु तयां भीक्षाअवसरीं कुहीरी भीक्षे आली : भोजन करीतां ते वाळके रामदेवीं टाकीली : मग दोघै जेवीले : मग खेइभटीं उठौनि ते वाळुवटीं पुरीली : तेथ दीवस एक दोनि होते : मग दिसवडी जेवितां म्हणति : कां न गीळेसि : सांघों कुहीरी ये पुढां :

---

१ एवों ख, ग, घ. २ घडे ख, घ.

खेइभट ते [1]माहासुरत्राडाचे : मग किति एकां दिसां भटोबासांचीये भेटिसि आले : मग रामदेवीं भटोबासांपुढां सांघितलें : भटोबासीं आइकौनि म्हणितलें : रामा वोखटें केलें : हां गा अष्टदश पक्वांनि जो जेवि तो जरि एके साधनें सीधी (द्धी ग) ने तरी तोचि भला किं गा : ।। एकी वासना :।: तयासि कुहीरी कैसी वीखो :।।: वीखो तो कोणा : जयासि घाटेयावरि मीठ नाहीं तयासीचि कीं : यावरि भटोबासीं निरोपण केलें : भटोबासीं म्हणितलें : अधीकारा अनधीकारा अनुरूप पुरुषें देहदमन इंद्रियेदमन : मनोदमन करावें : तयातें त्रीदंडी (पुरुष) यैसें म्हणितलें : जयापासौनि दातृत्व संभावना तया पुरुषाची नामना सारावी : येर धर्मद्वारार्थी उपकारक मानावें : ।।१०१।।

**ब्राम्हणा प्रश्ने अंतर–प्रकाशानुवादु** :।। एकु दीसु ब्राम्हणें एकें भटोबासातें पुसिलें : भटो तुमचि मूर्ति झळझळित दीसे : तरि काइ तुम्हीं त्रीकाळ स्नान करीता : तवं भटोबासीं म्हणितलें : गगनि तारांगणे झळकताति : तें काइः त्याचे मंदिर झळकत दीसते : किं आंतु(ल) आहे तें झळकताये : ना भटो आंतु आहे ते झळकताहे : भटोबासीं म्हणितलें : तैसे माझेया मंदिरांतु वस्तु आहे ते झळकताये :।। शोधुः। येतुलेनि तेहीं भीक्षा केली :।।१०२।।

**वृषभावरूनि गोपाळपंडितां रक्षणप्रसंसा** :।। एकवेळ गोपाळपंडित भटोबासांचीये भेटिसि आले होते : एकु दीसु भटोबास भीक्षा करूं गेले : ।।शोधु :। बारसिचां दीसीं ।। सरोसें अन्नीबास वारूनिकचिपरी झोळी धरीली असे : तवं एकी घरीं महा प्रचंडु वसो तो भटोबासांसि डिवुं आला : तो येतांचि गोपाळपंडीतीं यैसा सींगीं धरीला : भटोबास ऐलाकडौनि निगाले : मग तेहीं यैसा ढकलूनि सोडीला : मग भटोबासांतें टाकूनि आले : मग भटोबास बीढारा आले : ते गोष्टी सांघौनि मग म्हणितलें : यैसें आजि गोपाळातें माझेनि अभीमानियें राखिले गा : ।।शोधुः। अवघेयां आश्चर्य जालें :।।१०३।।

**निद्राप्रसंगें माहादाइसीं केशोबासां सिक्षापणें** : ।। एकु दीसु केशोबासीं दिवसा[2] निद्रा केली होती : ।। शोधु : । तवं कांहीं काळातिक्रमु जाला :।।

१ बहुता **ख**, ग, घ. २ दीवा **ख**.

तें देखौनि माहादाइसीं म्हणितलें : हां गा केशवदेया जया एकु वैरी तो देहां निद्रा न करी : मां तुम्हा तवं चौदा वैरी असति :॥ शोधु :। कविबास। अशेष देवताचक्र वैरी असतां कैसें निजता : यैसें माहादाइसे कोपलीं : तें केशोबासां थोर सुख जालें ।।१०४।।

**अनिष्टत्यागीं केशवुमार्गरक्षणानुवादु** :॥ एकवेळ केशोबास अटना एकलेचि गेले होते : तव अवकाळ पाणि लागलें : एका गावां भीक्षे गेले : तवं एकी घरी व्येव्हारेयाची कन्या तिया देखीलें : केशोबास रूपें सुंदर होतें : देहयुक्त होतें : तिया मनिं अभिळासीलें : आपणचि भीक्षा घातली : आणि पुसिलें : कोठें असणें : तिहीं यैसा माथेयाचा अनुकारु केला : आणि उदासीनताचि चालिले : तिया वीळवेन्हीं दृष्टीचें राखण घातलें : तवं वीळचां प्रजन्य आला : गावांतु वेसेसि लिंगाचे देउळ होतें तेथ वीळचां निद्रास्थाना आले : सरीसा इउला यैसा फुटा होता : तो पुढां ठेउनी एकी कोणि बैसले : गुरवु रात्रीं घरा गेला : तेणें देखीलें होतें : परी उगाचि नीगाला : तवं केतुकेया एका काळा ते बाइ कांबळयाची बुंथि घालूनि देउळांतु आली : यैसें पाहीलें : तव केशोबासांतें देखीलें : आणि जानुवरि बैसली : केशोबासीं म्हणितलें : उठा : तुम्ही म्हणाल तें [१]आइकों : म्हणौनि खालि बैसवीलि : आणि तिये बाइयेतें म्हणितलें : मीं उवायां[२] जातों : तुम्ही येथ यैसीं बैसा : म्हणौनि फुटा : कांहीं परीग्रहो होता तो तैसाचि ठेवीला : तियेसि विस्वासु वाटला : ऐसे देउळाबाहीरी निगाले आणि तैसेचि 'श्रीचक्रधरु' म्हणौनि चालीले : तिया बाइया यैसी नावेक वाट पाहीली : नैयेती यैसें मान जालें : आणि भीयाली : ते आपुलेया घरा गेली : तिये दासी केशोबासीं राणि पाठीं घातली : आणि येरी दीसेंचि[३] भटोबासांचीये भेटि निगाले : तव सकाळि भटोबास तथा समस्त मार्गु आस्थानि जाली असे : धर्मवार्ता होति असे : येतुलां काळीं भटोबासी म्हणितलें : केशवद्या येतु असे : फुटा देउळीं सांडिला असे : तव समस्तीं म्हणितले : भटो केवि जाणितलें : भटोबासीं म्हणितलें : मी श्रीचक्रधराचेनि प्रसादे जाणे गा : तव केशाबास आले : भेटि जालीया : पुढां बैसों घातलें : मग भटोबासीं म्हणितलें : केशव(देव)हो : तुम्ही कैसीयापरी आलेति तें

१ आइकोनि घ. २ उ(वु ग)वावेया घ. ३ दीसीं सवेंचि घ.

आम्हा सांघा : मग केशोबासीं अवघें वृतांत सांघितलें : येतुलेनि भटोबासीं म्हणितलें : एकें अनिष्ट आलेयां आपणयांतें राखीलें : एकें एकांतें राखीलें : केशवदेनि मार्गातें राखीले गा : यैसें भटोबासीं प्रसंसीलें : ॥१०५॥

**तथा पुनरागमनि जोगीणि : पोतें अनुवादु** :॥ मग भटोबासीं केशोबासातें म्हणितलें : आतां तूं माघौता तेथ जाये : केशोबासि मानिलें : केशोबासि आपुला मनि म्हणितलें : हें देह येतुलेयासि कारण : मग माघौते गेले : अटनाचेनि क्रमे : देह तुटलें : अत्यंत अप्रास्य केले : मग तयाचि गावां तिये बाइचेया घरा भीक्षे गेले : तवं समैचि ते उभी असे : केशोबासांतें देखीलें : आणि यैसी पचकरूनि थुंकली : भनं[ णं ]ग म्हणौनि स्वभावीकचि : आणि घरांतु गेली : येतुलेनि केशोबासीं बाहे आफळीली : हा नव्हे मी श्रीचक्रधराचा केशवद्या : म्हणौनि नावं सारीलें :॥शोध॥ तैसेचि तया गुरवाचेया ठाया गेले : तेथ (तेणें) फुटामुल्य (करूनि) अवघेचि दीधलें : गुरवें ठेविलें होतें:॥ मग केतुलेनि काळें भटोबासांचीये भेटी आले : तवं आधीचि भटोबासी म्हणितलें : केशोद्या येतु असे गा : काळातें पाठिमोरें करूनि : मग येउनि माघौतें सांघितलें : भटोबासां थोर सुख जालें : मग यावरूनि कितीएक अटना गेले : कितिएकीं चर्या केलीया :॥ हे स्मृति मलेकोयाबा सांघति : आणि धर्मवार्ता करीति :॥ शोध :। यावरी भटोबासीं जोगणि : पोतेयाची गोष्टि सांघितली :॥ यावरि भटोबासीं म्हणितलें : एकलेया अटन न करावें गा : एकवेळ मी अटनि वीळीचां निद्रास्थाना एका देउळा गेलां : तव तेथ जोगिणि एकि आली : तिया म्हणितलें : या : पिंडें पिंड खेळों : तवं मीयां म्हणितलें : जाये परतें : आणि तेथौनि निगालां : त्या म्हणितलें : पळतां काइ तुमचें पोतें जाइल : मीयां म्हणितलें : पोतें जाइल तें माझेचि कि : तुज असावें : मां जावें : यैसें म्हणौनि आणिका निद्रास्थाना गेलां : म्हणौनि अनुभवीचि गोष्टि सांगीतली : म्हणौनि एकलेया अटन न करावें गा : मग दोघदोघीं दादां : आणि चौघचौघी बाइ : यैसी व्येवस्था केली :॥१०६॥

**म्हातारदामपूर्वक भटोबासीं मार्गा प्रार्थणें** :॥ एक वेळ देसीं दुभीक्ष [दुर्भिक्ष] पडलें : भिक्षुकासि भीक्षा नाहीं : भिक्षुकें भीक्षे जाति : झोळीये दोनि चारि कोरके येती : भटोबास भीक्षा थोडी देखतिल : आणि पचन

घालीतील म्हणौनि भिक्षूकें झोळीयेतळीं चिंधिया घालीति : वरी भीक्षा ठेवीति : मग भटोबासां झोळिया दृष्टिपूत करीति : आणि गंगे भोजन करावेया जाति : यैसा एकीं दोसीं भटोबासीं एकाचिये झोळीयेसि तळो हातु घालौनि भिक्षा उचलोली : तवं हळु लागली : काइ पां : हळु झोळी कां : म्हणौनि भितरील अन्न यैसें केलें : तवं तळीं चिंधिया देखिलीया : मग उगेचि यैसें राहीले : दृभक्ष पडीलें असे यैसें कळलें : मग वीळचां निद्रास्थानि अवघे बैसले होते : आणि भटोबास आपुला स्थानिहूनि उठिले : उभेयां ठाकौनि हात जोडूनि प्रार्थिलें : तुम्ही अवघिया श्रीचक्रधराचीया घुरा असाः तरि मीं मागैन ते मज द्यावे : यैसें म्हणौनि अवघेयां दंडवत घातलें : तवं अवघे गजबजौनि उभे ठाकले : अवघां म्हणितलें : उठा उठा भटो : मागाल तें देउनि : भटोबासीं म्हणितलें : मज म्हातारदाम आला असे तो विनयोगावा : आजिलागौनि माझी एकि भिक्षा घेयावी : मग अवघां मानिलें : मग भटोबास रंधन करवीति : भिक्षुकें भिक्षा-नेमु सारीति : मग भटोबासांची एकि भिक्षा घेति : एकि पोळी : वरण : कढीः भातु : काहीं पत्रशाक : यैसी आपुलाली भिक्षा घेउनि गंगे जेवावेया जाति :॥ शोधु। यापरी भटोबासांचे द्रव्य उपयोगा गेलें : तवं सुकाळ जाला : मग नेघति :॥ १०७॥

**साकाइ-पिते-मृतानुवादीं दशक्रीया निराकरणें** :॥: साकाइसें तियें वासनिकें : भटोबासाची सिष्यें : तयाचे पीते सरले : तिये तयांचा नेमु सारूनि भटोबासांपासि आलीं : येतांचि भटोबासीं म्हणितलें : काइ करूनि आलीति साकाये : तिही म्हणितलें : बा आलीयें वडपींपळीं लावूनि : मग भटोबासांसि दंडवत घातलें : भेटि जाली : सरीसें काहीं द्रव्य आणिलें होतें : भटोबासांते पुसिलें : भटो काहीं आणिलें असे : तरि जेवण करूं : भटोबासीं म्हणितलें : तो वासनिक नव्हे : तयाचें अन्न कोण घेइल : कोन्ही नेघति :॥ शोधु :ः आपुलें म्हणौनि करीसील तरि दीस-संख्या लोटलेयां घेतिल :॥ मग तियें उगीचि राहीलीं : ते दीस लोटलेयां भटोबासांतें मागुतें प्रार्थिलें : भटोबासीं मानिलें : मग तेहीं भटोबासांसि अवघेयांसहित अभ्यागत केलें : तें अवघां घेतलें : ॥ १०८॥

**महात्मेयां विजन-निरोधानुवादु** :॥ कव्हणी एकीं भटोबासांपासि

भिक्षा केली : तयांसि विजनाची आवडि नाही : भिक्षु तयांतें बोलावूं बोलावूं विजना नेति : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : विजना जातां या यैसें होताये : म्हणौनि खळीयेचें प्रमाण उच्चारीलें :।।१०९।।

**रांधवनकारी अन्नप्रदानि : गौराइसां सिक्षापण** :।।: एकवेळ बहुत समुचयो जाला : तें अन्न निफजावेया एकि ब्राह्मणी बोलाविली : तियेसि भटोबासीं च्यारि रुके देउं केले : रंधन जालें : तियेसि च्यारि रुके देववीले : आज्ञा दीधली : मग पांति जालिया : अवघीं जेविलीं : तवं गौराइसीं तियेतें बोलावूनि आणिलें : आणि तिचीये वोटिये दोनि वेंठ मांडे पुरीया घातले : तें भटोबासीं देखीलें : तियेसि जावीं दीधलें : मग भटोबासीं पुसिलें : गौराइये हें इयेचीये वोंटीये काइ घातलें : ना हे मांडे : भटोबासीं म्हणितलें : इयेसि तरि मीयां च्यारि रुके देवविले : तुवां मांडे कां घातले : हेचि माझे महात्मे खाते तरि देवातें आठवावेया दक्ष होते : ।।शोधु:।: मग तैलागौनि काहीं न पुसत न घलीति :।।११०।।

**केशोबा-प्रश्नें आन[ण]-निर्वचु करणें** :।। भटोबास प्रस्तावेयावरि[1] माहादाइसाची आन वाति : कां पाचास्यां गुरुकुळाची वाति : मग यैसा एकु दीसु केशोबासीं पुसिलें : तुम्ही रूपैचि आन : (आणि) पांचास्या गुरुकुळाची आन कां वां : यावरि भटोबासीं म्हणितलें : एकवेळ गोसावीं मातें म्हणितलें : येथौनि वानरेसांतें अधिकरण किजैल : सातां-पाचां बोध दीजैल : येथौनि एकां-दोघां : वानरेयापासौनि सातां-पाचां : तव मीयां म्हणितलें : हे काइ जी : गोसावियांपासौनि एकां-दोघां आणि मजपासौनि सातां-पाचां : तवं गोसावीं म्हणितलें : बोधदाता काइ तूं : बोधदाता परमेश्वर : अक्षरदाता जीवु : तरि हें अच्युताचें गोत्र : म्हणौनि गुरुकुळाची आन वायें :।। आणि रूपैया भानखेडांहूनि आणिलें : कडिये खांदीये घेउनि श्रीप्रभूचेया दर्शना नेले : नेसवीलें : पांगुरविलें : येसणें सायास केले :।। शोधु :। इयेतें गोसावीं मज निरोवीलें :।। म्हणौनि मीं रूपैयेची आन वायें : येतुलेनी केशोबास उगेचि राहीले :।।१११।।

**अटनि वीनायेकबासि अनुकूळीं संभाषण करणें** :।। विनायेकदाए ते भटोबासांचे सिष्य : तयाचां ठाइं अत्यंत वैराग्यनिष्ठता विरामु होता : एकु

---

१ प्रस्तावेयाअनुरूप घ.

दीसु ते भटोबासां [1]पुसौनि अटनासि निगाले : तवं अटनवीशेषें एका मार्गीचेया अनुकुळांचेया घरा भिक्षे गेले : तयांतें पडिताळीलें : तवं तो गावीं नाहीं : तयांची स्त्री घरीं होती : तिएसि नेसावेया नाहीं : पाळणा लेंकरु ते उखरडि निजविन्हें होतें : तेहीं रडत होतें : काइसेनिही बुझावेना : तवं तिया वीनायेकबासातें देखीलें : आणि तैंमीचि फाटकेंनि वस्त्रेंसि दंडवत केलें : वीनायेकबासीं तया अनुकुळातें पुसीलें : तिया गावां गेला म्हणौनि सांघीतलें : हें लेंकरु कां रडतें : तिया म्हणितलें : बा उखरडि पाळणा असे म्हणौनि रडतें : मग वीनायेकबासीं तियेसि झोळियेचें अन्न दीधलें : आणि आपणेयांपासौनि एक वस्त्र तयां लेंकरुवाखाली[2] घालवीलें[2] : आणि तें रडत राहीलें : आणि ते निगाले : उरली भीक्षा केली : गंगे जेवीले : तें भटोबासीं आइकिलें : अवघां गुरुभावंडीं आइकिलें : अवघेयां आश्चर्य जालें : भटोबास तोखले :॥११२॥

**नरींद्रबासां भेटि : अनुसरण** :॥ नरेंद्र कवि : सालकवि : नृसिंह कवि : हे तिघे भाउ : नृसिंह कविन '**नलोपाख्यान**' केले : सालकविन '**रामायण**' केलें : तें आपुलालें रामदेवरायापुढां म्हणितलें : तेथ नरेंद्रकवि बैसले होते : तयांसि भटोबासांपासौनि श्रवण होतें : अवघें आइकौनि म्हणितलें : यैसा द्वारकेचा रामहारु वर्णितेति तरि तुमचेया पापा पुरश्चरण होतें : यैसें रायादेखतां निर्भषिलें : तवं तेहीं म्हणितलें : तुम्ही एक कवीत्व करा: मां तुमचि यक्ति पाहों : मग नरेंद्रबासीं तेणें सळें अटरासतें '**रुक्मिणीसैंवर**' ग्रंथु केला : करूनि तयांदेखतां रायापुढां म्हणितला : वाचितां ये वोवीपासि आले :॥ **देवाचेया दादुलेपनाचा उबारा : न साहावेचि सातांहीं सागरां : भेण वोसरोनि राजभरा : दीधली द्वारावती :॥१॥** यावरि रायें म्हणितलें : या ग्रंथाचा अभंगु मज द्यावा : मी जेतुकीया वोवीया तेतुके सोनटके आणि चौथरीया आसु वोवाळणि घालीन : नरेंद्रबासीं म्हणितलें : ना राजेहो आमचेया कवीकुळा बोलु लागैल : मग तयाचे गर्व हरले : रायासी थोर चमत्कारु जाला : मग तें '**रुक्मिणीसैंवर**' नरेंद्र कवि भटोबासांपासि घेउनि आले : भटोबासांसि भेटि जाली :

---

१ मळांत 'पासौनि'. पण **ख, ग, घ** पोथ्या व संदर्भ यांवरून तो हस्तदोष वाटतो. २ लेंकुरुवा पालवीलें **घ.**

तैसीचि तेहीं भीक्षा केली : मग तैहूनि 'रुक्मिणीसैंवर' ग्रंथ मार्गासि आला : भटोबासां मागा केतुलेया एका काळा अनोबासांचां हरगर्वीं भिक्षा केलेयां हे अवघे आइकौनि म्हणितलें : सकळां कवीपरीस हा कवि चतुर : मग आपणही श्लोकबंध गद्य केलें :॥११३॥

**काळे कृष्णभट गीतगायेनि प्रसंसणें** :॥ एक वेळ काळे कृष्णभटि दसांके उद्धवदेवा गोकुळ पडिताळणेयाचीं पदें केली : तें भटोबापासि म्हणितलीं : तिये पदें ऐसि :॥ **पळांति**[1] **जवं नारी : श्रीउद्धवदेव पसाइता : क्षेणु एकु संभ्रमीता : आंगसीकें देखौनि :॥ कोमाइलीं मुखकमळें : अती वियोगदुखानळें : कृष्णालागी उताविळें : गोपिवृंदें बोलतीं :॥१ । ध्रुवपद॥ काहृचा त्येजियेलें : कृष्णें प्रियोतमें म्हणति बाळा : आतां काइसा पडीताळा : कृष्णा मेळवी उद्धवा :॥ नित्य स्मरों (हें) गोकुळ-: बंध संवगडे खिरारी : आम्ही देवी[व]किया कींकरी : कहीं न वीसरों गोविंदा :॥ सकळकळांविदा सुंदरी : रायां रायांच्या कुमरीं : आमुतें सांडौनि मुरारी : त्या प्रणील गोपाळ :॥२॥ वदन आणि हा चंद्र : निन्हां तावो कृष्णेवीन : जव जव देखो वृंदावन : तवं तवं अधीका आठवे :॥ कृपादृष्टीचीं अवलोकनें : दुखिस्त जीवाकारणें : तया प्रियाचें गान्हाणें : आम्ही कवणा सांघावें :॥३॥ जयाचेनि बळे त्यजौनि कर्मे : रास खेळों वृंदावनि : ते रात्री आठवीता काइ साघों व्येथा : हरैल**[2] **कृष्णदर्शनि :॥ जीवीचे आरत : कवणा सांधों दातारा : काइ तूं नेणसि : सर्वज्ञ आर्तादानि उदारा :॥४॥ तो देवो कइ मिळैल आम्हा : म्हणौनि थोरी अवस्था : हें आणिकां नेये पैं सांघतां : तुज भक्तावाचौनि :॥ मना वाचे सर्व तो होआवा : नित्य वेधलें** [3]**माझें मन : ठेवि ठेवि हे ब्रम्हज्ञान : काइ सांघसी मुनिवर्या :॥५॥ अनिमीत बंधु आर्तादानि कृष्णु : जीवाचें जीवन : विनती करावो यादवराया : आम्हा द्यावें सन्निधान :॥ हे आणवी गोपाळा : जवं ये मागौता पडिताळा : त्या आशावांचौनि जीविता : ना तरि त्यजौनि प्राणातें :॥६॥ यैसी आइकौनिया विनती : उद्धव निगे वेगवतरें : कृष्णावियोगे तातलीं : देखौनि सकळां कळेवरें :॥ म्हणे सभाग्यया बाळा : दैवें सकळां कैसा वेधु लागला : अनुमोदित त्याचा भावो जीवीं धरुनिया देवो : मथुरापुरी पातला :॥७॥ देखावेया कृष्णनाथा : तयाही थोरी अवस्था :**

---

१ पाळांती ग, घ. २ हरीता घ. ३ आमचे ख, ग, घ.

**निमिष न वचे तयाविन : परी हे आज्ञा समर्था :॥ देवा भक्ता होता मीळणि : सकळ सुखे ठेंगणी : अंतरीचें प्रणये अलोकिक : माये तें मी कैसें वाखाणि :॥८॥ दर्शनोत्कंठित चरणि अनुरक्त : उद्धवु जवळि पातला : सामर्थ्याचा रासी आनंदे पूर्ण : (कृष्ण) डोळां देखीला :॥ नागदेवाचा दातारू : आंळिगौनि सर्वेश्वरू : परमानंदे तो किंकरू : आपणपें विसरला** :॥९॥ यें पदें गाइलीं : यावरि भटोबासी म्हणितलें : कृष्णा तेव्हेळीं काइ तूं तेथचि होतासि : म्हणौनि तोखले :॥११४॥

**स्थाननिर्देशें बाइदेवोबासां अटन सांघणें** :॥ एकवेळ बाइदेवोबास अटना निगाले : तेव्हेळी भटोबासीं म्हणितलें : बाइदेया तुवा स्थाननिर्देशें अटन करावें : सकळ स्थानें नमस्करावीं : म्हणौनि विधि विहीलाः मग बाइदेवोबा स्थाने नमस्करीतचि अटना निगाले :॥११५॥

**केशवाचार्य उद्ग्रहणिकें कवीस्वरीं पराजयो करणें** :॥ एकु दीसु कवीस्वरबास गंगेकडे गेले : तवं तयांचे आधिल गुरु केशवाचार्यें मार्गी भेटले : वोळखि जाली : उभया ठाकौनि कटाक्षें कवीस्वरांतें म्हणितलें : तूं येसना विद्वांस आणि आमतें सांडूनि नागदेवभटांपासि आलासि : तरि आतां काइ तृतीय सींग निगालें : कवीस्वरबासी म्हणितलें : मां तृतीय सींग निगालें कीं नाहा निगालें : ऐसे पहा ना कां : केशवाचार्यें म्हणितलें : तरि कैसें निगालें : यावरि उघाणि प्रवर्तली : केशवाचार्यें निरुतर केले : तयाचें अवघेंचि खंडिलें : मग सेवटिं कवीस्वरबासीं शीघ्रचि वाक्य करूनि भक्तिप्रतिष्टा केली : कवीस्वरबासीं म्हणितलें : **चेतश्चिन्तय चित्परं चितिहरं चिच्चेतनं चिन्मयम् । मोहं मुञ्च मनो मनोभवमहाकूपारपारंतरम् ॥ अत :-कोशमकोशकोशनिकरं सन्मूलमुन्मूलिनम्। जीवं जीवयते जगज्जनिकरं चक्रेश्वरं तं परम् ॥१॥** हें आइकौनि–परिसौनि केशवाचार्यें म्हणितलें : ह्मये तृतीय सिग निगालें : आतां चला नागदेवोभटांपासि : त्यांतें विनवा : मां मीही भिक्षा करीन : ते कवीस्वरबासीं मानिलें : दोघै निघाले : ॥११६॥

**तथा विज्ञापणि भटोबासी भिक्षा देणें** :॥ मग कवीस्वरबासिं तयांतें भटोबासांपासि आणिलें : मागील अवघे सांघितले : तयांकरवि भटोबासां दंडवत घालवीलें : मग कवीस्वरबासिं भटोबासांतें प्रार्थिलें : भटो केशवाचार्य म्हणताति : मी भिक्षा करीन : तरी यांसि भिक्षा द्यावी :

भटोबासीं म्हणितलें : भ[1](भा घ)टो हा नको गा : हा अना[न]धिकार्या-[रिया] असे : कवीस्वरबासि म्हणितलें : भटो मज कारणें : मग भटोबासीं तयातें श्रवण केलें : भिक्षा दीधली :॥११७॥

**तथा परधर्म हरणें** :॥ मग भटोबासीं केशवाचार्यासि कांहीं नमस्करावेया दीधलें : एकु दीसु तयातें महावाक्य घोकवीत होते : तवं तेहीं म्हणितलें : भटो विचारूनि पाहातां हें आमुचेया सिखासूत्रा मिळत असे : तव भटोबासीं म्हणितलें : जळो जळो तुझें सिखासूत्र : घालि पाणियांतु : आतां तू जाए : माझें आहे तें दे : मग कांही नमस्करावेया दीधलें होतें : तें घेतलें : मग आज्ञा केली : गेले : जातां केशवाचार्यें म्हणितलें : भटो हें तुम्ही घेतलें : आतां माझां हृदइ असे तें काइसेनि घेयाल :॥ भटोबासीं म्हणितलें : तें माझें अभिमानियें घेइल : मग गेले :॥ शोधु :॥ मग तया तैसेंचि जालें :॥११८॥

**विद्वांस उद्ग्रहणिकें बोरीकर भानु प्रकासणें** : ॥ एकु दीसु भटोबास बैसले असति : तवं एक विद्वांस आले : ते भटोबासांसीं चर्चा करूं लागले : चर्चा करीतां तेणें भटोबासातें म्हणितलें : हें ऐसें नव्हे किं : न घडे किं : तेव्हेळीं कवीस्वरबास इतुकेया दुरि ऐसें आपुलें अंगवस्त्र सिवीत होते : तयासि तयांवरि लक्षचि नाहीं : तेथौनि कवीस्वरबासि म्हणितलें : हे कैसे न घडे : विद्वांसें ऐसें पाहूनि म्हणितलें : मां यांतु तुम्ही काइ जाणा : तवं भटोबासीं म्हणितलें : हा कैसा नेणें : हा बोरीकर भानु नव्हे : यासि बोला : मग तो कवीस्वरबासांसि चर्चा करूं लागला : तवं कवीस्वर-बासी निरुतर करूनि [2]अडिला :॥ शोधु ॥ मग तया आश्चर्य जालें : ॥११९॥

**अन्यत्र कथारसा: तारणनिषेधीं कवीस्वर भागवत-व्याख्या सन्निधी नेंमु करणें** : ॥ एकु दीसु गंगेकडे समीपचि कवीस्वरबास बैसले होते :॥ शोधु :॥ काहीं वाचीत होते : कवणाप्रति तें नेणिजे : परि संस्कृत व्याख्या करीत होते : तवं तेथ एकेएकु लोकु वेधला :॥ थोर रसु अवतरविला : आवघें नगर आकर्षीलें : तवं कोण्ही एकी येउनि भटोबासांपासि सांघितलें : भटोबासीं म्हणितलें : हें काइं जालें या भ(भा–ग, घ)टोसी : जा गा बोलावा : म्हणौनि बोलावूं पाठवीले : मग तेहीं ते आकर्षिलें : आले :

---

१ भानभटो ख. २ झाडीला ख; खंडिला घ.

मग भटोबासीं म्हणितलें : भ(भा–ग, घ)टो : तुज जरि ऐसें व्येसन तरि मजपुढां श्रीभागवतःगीता म्हणा : कवीस्वरीं मानिलें : मग तैलागौनि कवीस्वरबासीं भटोबासांपुढां श्रीभागवतरसवृती वाखाणूं आदरीलें : तेणें भटोबासांचें अंतःकरण द्रवे : आणि अवघे चंद्रमये होयें :।।१२०।।

**तथा गीताव्याख्यानी हरीभटां आज्ञा देणें** :।। कवीस्वरबासां श्रीभागवत वाखाणूं सरले : मग भटोबासांतें म्हणितलें : भटो आतां गीता–व्याख्यान म्हणों : तव भटोबासीं म्हणितलें : भ(भा ग,घ)टो : तूं आतां नको म्हणों : तूं म्हणतासि आणि माझे अंतःकरण अवघे चंद्रमये होताये : तव कवीश्वरबासीं म्हणितलें : तरि या हरीकरवि म्हणवूं : भटोबासीं मानिलें : मग कवीस्वरबासीं वांकलेया हरीभटांतें म्हणितलें : हरी आतां गीता तूं वाखाणि : मग वांकले हरीवासीं गीता वाखाणिली : तेही विद्वांस होते : त्यांचा शब्द नावेक ठसु : रसवृति तोकडि : आइकावेया तैसें गुरुकुल न बैसें :।।१२१।।

**कविस्वरां सौकूर्यत्वदर्शनें प्रावर्णविधि सांघणें** :।।: कविस्वरबास रूपें सुंदर होते : ते संग्रहें मीवणि आंतु घालूनि परा[प्रा]वर्ण पांगुरति : तवं सावेया बरवे दीसति : ते देखौनि एकु दीसु भटोबांसीं म्हणितलें : भ(भ–ग, घ)टो : तूं वस्त्र–दसीयांचांचि वाइ पांघुर : सौकर्यत्वें दीसतोसि : मग कवीस्वरबास सिवणि बाहीरि घालौनि थीगळाचें वस्त्र पांघरति : अंतरीं थोर मानलें : सुख जालें :।।१२२।।

**माहादाइ–वोवीया–गायेन–श्रवणि रूपैंची सीध[द्ध]वाणि म्हणणें** :।।: एकु दीसु महादाइसी काइसेया प्रकरणावरूनि वोविया गाइलीया : ते नेणीजे :।: महादाइसीं म्हणितलें : **नागदेवाचेया खांदावरि करु : राजा चक्रधरु : बीजें करी :।।१। सोनेसळा सेला : नेसला मालगंठीं : म्हाइया आला भेटी : प्रभूचीये :।।२।।** तवं भटोबासी आइकीलें : आणि म्हणितलें : नाथाची नाथवाणि : आणि रूपैंची सिद्धवाणि : यैसे भटोबासीं प्रसंसीले :।।१२३।।

**बीजनि काळव्यतिरेकें चर्चाकरणीं केशव : पंडितां सिक्षापण** :।।: एकु दीसु केशव : पंडित–मुख्य विजनि बैसले असति : तेथ कोण कैसें अनुष्ठानि बैसलें आहे : म्हणौनि भटोबास विजनें पडिताळीत आले : तवं पंडित :

केशोबास विजनि बैसौनि सकाळिचि घे-दे म्हणौनि थोरे जिज्ञासा करीत होते : भटोबासांतें आलेयांहीं न देखति : यैसें रसीं पडिले असति : तें देखौनि भटोबासां न मनेचि : भटोबासीं म्हणितलें : हां गा तुम्हीं सर्वकाळ एकमेकां कैसा वादुविवादुचि करीता : हां गा सर्वकाळ जरि चर्चाचि करावी : तरि देवातें केधवां स्मराल : यैसें सिक्षापण केलें :॥शोधु :॥: मग निरूपण केलें : आणि जे काळीचें ते काळीं : (ऐसें) अनुष्ठान सांघितलें : ॥१२४॥

**भिक्षुपात्रीं सीतभजनें मेरुभजनानुवादु :** एकु दिसु कवणा प्रकरणावरूनि तें नेणिजे :॥: भटोबासीं म्हणितलें : ये मार्गीं केली क्रीया काइ वायां जाइल : एकां भक्तीसी कारण [1]होइल : एकां ज्ञाना कारण [1]होइल : एकां वैराग्या कारण [1]होईल : तें कां ना : या भीक्षकाचां पात्रीं एक सीत संपादीलेयां मेरु संपादीलेयाचें गोमटें होये : ते केवि ना : गोसावीं दाइंबाप्रति म्हणितलें : भोजेया : तुमचां पात्रीं अवज्ञापूर्वक यैसीं च्यारि सीतें टाकूनि घालीति : त्याची थोरी येथौनि सांघों नेणिजे गा : यातवं : यैसें मार्गमाहात्म्य : भजनमाहात्म्य निरूपीलें :॥१२५॥

**भट-नाम-श्रवणें ब्राम्हणा अज्ञाननिवृति करणें** :॥ एकु दिसु भटोबास बसले असति : जवळि एक ब्राम्हण बैसले असति : तव कव्हणि भटोबासांतें म्हणितलें : भटो हें कैसें : भटो तें कैसे : भटो हें करूं : हें न करू : ऐसें जयां जें प्रयोजन तें भटोबासांतें पुसपुसों करीति : तें आइकौनि ब्राम्हणें म्हणितलें : हां जी तुमचे सिष्यवर्ग तुमतें भटो ऐसें म्हणताति : तें हां जी भटो ऐसें कां न म्हणति : तवं भटोबासीं म्हणितलें : ना हें यांकरवि आम्हींचि म्हणवीतों : तें कां ना : जी जी वचनें ईश्वरींचि म्हणिजति : जीवातें म्हणों न येति : आणि तें उगेचि राहीले :॥१२६॥

**पायेवणि-निराकरणि वासनिक-प्रत्योतर-स्वीकार** :॥ एकु दीसु येकें वासनिकें भटोबासांचे पाये धुतले : आणि पायेवणि घेतलें : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : पायेवणि तें देवाचें घेइजे कि गा : आणि उचीष्ट प्रसादु तोहि देवाचाचि घेइजे कि गा : तेहीं म्हणितलें : होये भटो देवाचेंचि म्हणौनि घेइजत असिजे : भटोबास उगेचि राहीले :॥१२७॥

---

१ होए ख.

**यीसीष्ट नमस्कारीं आपणयांतें धिष्करणें** :॥: भटोबास आपणेयांसि साष्टांग दडवत आणि पायांवरि डोइ ठेउनि दंडवत करूं नेदीति : (मार्गु करी : परि नीरोध मानीति आणि म्हणति : हां गा ऐसीं दंडवतें गोसावी-यांचेया श्रीचरणा कीजेति :) मज यैसें न करावें गा : यैसें आपणयांते धीष्करीति :॥१२८॥

**अन्य प्रश्नें स्वनिष्टीं भक्तानुवादु** :॥: एकी दीसीं भटोबास बैसले असति : तवं कव्हणि एक इतर दर्शना आले होते : तेहीं भटोबासांतें पुसिलें : भटो तुम्हीं काइ ईश्वर : भटोबासीं म्हणितलें : ना आम्हीं ईश्वराचे भक्त : इतुकेनि ते उगेचि राहीले :॥१२९॥

**आकाइ-नमस्कार-तिरस्कारी पंडितप्रश्नें वाक्य-विरोध-स्वीकार** :॥: एकु दीसु भटोबास बैसले असति : तव आकाइसे आलीं : दंडवतें घातलीं : आणि दुश्चितपणेचि भटोबासाचेया पायांवरि माथा ठेवूनि यैसें भावपूर्वक दंडवत केलें : तव भटोबासी म्हणितलें : आकाये मज यैसी दडवतें नको करूं : म्हणौनि म्यां तुज येक वेळ वारीलें : दोनि वेळ वारीलें : आणि तूं करीतचि अससि : म्हणौनि कोपले : बाहीर घातलीं : येरी दीसीं माघौतिं आलीं : दंड-वतें घातलीं : आणि पंडितबासांपाशि जाउनि बैसलि : हळूचि पडितबासांतें म्हणितलें : पंडितो धर्म तरि दैवगति : आणि भटां तरि नमस्कारें ये खंति : वीधि करीतां घडत असे अवीधि : तेणें वोखटें जडत असे : तरि पुसा पां भटांतें : श्रीचक्रधरारायाचा संबंधु नमस्करूं ये कि नैये : मग पंडितबासीं भटोबासांतें म्हणितलें : भटो आकाइसें यैसें म्हणत असति : धर्म तरि दैवगति : आणि भटां तरि नमस्कारें ये खति : वीधि करीतां :॥: तरि आम्हां श्रीचक्रधरारायाचा संबंधु नमस्करूं ये :॥: यैसे पुसताति : मग भटोबासीं म्हणितलें : या : मग आली : भटोबासांसि दंडवत केलें :॥१३०॥

**कटक देमाइसें भेटि-वोधानि केशोबासीं वंकीं इष्टि योजणें** :॥: एकवेळ केशोबास कटक देमाइसांसि भेटावेया गेले : भेटि जाली : कटक देमाइसिं केशोबासांसि अभ्यागता म्हणितलें : आणि केशोबासांविरहीत वकीतेंही म्हणितलें : ते देमाइसांचे गुरुभाउ : पूर्वि नाथोबापासौनि दोघां श्रवण : मग भटोबास आलेयावरि दोघीं भटोबासांसि दंडवतें घातली :

परि वंकी ते अनेकां [1]व्येसनांचें : राभस्य राहाटीचें : तयांतें गुरुकुळ न भेटे : परि देमाइसें झळंबति : म्हणौनि चोरूनि तयांहीं निमत्रण दीधलें : मग भोजनाचां अवस्वरीं देमाइसीं केशोबासांतें पुसिलें : वा केशोबा वंकींतें पांति बोलावूं : केशोबासी म्हणितलें : नको : तो अनेका व्येसनांचा : देमाइसें उगीच राहीलीं : मग केशोबासांसी भितरि ताट केलें : केशोबास बैसले : आणि वंकीतेंही बोलाउनि बाहीरि वांसरुवांचें कोटियेतु ठावो करूनि वाढिलें : देमाइसीं भितरि केशोबासां दंडवत घातलें : आणि बाहेरि येउनि वकीसीही अनुज्ञा दीधलि : आणि आपण लवलवौनि भितरि आलीं : तवं घासु घेतांसमे वंकीन 'श्रीचक्रधरु' (ऐसें) उचारीलें : ते केशोबासि आइकीलें : आणि म्हणितलें : येथ गोसावियांचें नाम कोणे उचारीलें : देमाइसीं म्हणितलें : बा निर्भयें द्याल तरि सांघेन : ना सांघा : बा भटोबासीं म्हणितलें : सृष्टीमध्यें ईश्वरु दुर्लभु : कां ईश्वरातें चिंती तो दुर्लभु : म्हणौनि बा मीयां तुम्हा वारीत वंकीतें बोलावीलें : मग केशाबासी म्हणितलें : भलें केलें हो देमाईसें : आतां जा : तयातें बोलावा : गेली : बोलावीलें : वकीं सेणेमातिया आंग माखौनि केशोबासां आड पडले : बा माझें सकळ (अपराध) उपसाहावें : केशाबासीं म्हणितलें : उपसाहिलें : आतां येथोनि पुढीलावी रेघ आणि मागीलाचा अनुतापु : परद्वारियांचां सप्तव्येसनियांचा संसर्गु न करावा : त्यांपासि उभें न ठकावें : हो कां बा म्हणौनि वंकीं मानिलें : मागीतें दंडवत घातलें : तेव्हेळी केशोबासीं पांति दीधलि : देमाइसा सुख जालें : मग तेलागौनि वंकीन अवघीं डांढाळें त्येजिलीं : ॥ शोध ॥ मग तें येउनि केशोबासीं अवघें भटोबासांपुढां सांघितलें : ॥ मग एकां दिसां वंकींही आले : भटोबासांपासि भिक्षा केली : अनुसरले : ॥१३१॥

**उज[ज्ज]नि–निषेधपूर्वकानुसरण–निर्वंचीं देमाइसां पुनसंबंधानुवादु : ॥**

एकवेळ उजनियेहूनि बंदीजन कटकदेवगिरीसि आले : ते कटक देमाइसांसि भेटले : तेहीं देमाइसांपुढें सांगीतलें : गोसावियाचें नाम उचारूनि म्हणितलें : गोसावी उजनिये असति : मग देमाइसीं मनि म्हणितलें : आतां जाइन : भटोबासांपुढां सांघेन : भिक्षा करीन : आणि उजनियेसि जाइन : म्हणौनि अवघी निर्वंडि करून भटोबासांपासि आलीं : भेटि जाली : येतांचि सांघितलें :

[1] धांडाळांचे घ.

तरि भटो तेथ मीं जाइन : यावरि भटोबासीं म्हणितलें : जाउनि काइ कराल : तिहीं म्हणितलें : कां भटो : भटोबासीं म्हणितलें : ना भेटि नाहीं : गोसावी असतां रूपैया गोसावियांतें पुसिलें : हां जी गोसावी बीजें करिताति : तरि माघौति कितां दिसां भेटि दीजैल जी : तवं गोसावीं म्हणितलें : बाइ आतां येणें भेटि नाहीं : आतां पुम्हां नवेयासि भेटि : रूपैया म्हणितलें : तें कैसें जी : गोसावीं म्हणितलें : येथौनि म्हणितलें : तें कराल : मग सुखीयां श्रीमंतांचां घरीं पुरुषु होउनि जन्म वीजाल : मग बारां वरीखां तुम्हां नवेन भेटि दीजैल : यैंमें गोसावीं निर्वचीलें असे : तरि तयांसि जें म्हणितलें : तेंचि आतां असन्निधानिचेयांसि म्हणितले : श्रीमुखें दीधलें : अथवा अधिकारद्वारें दीधले : मग तेहीं क्षेपावें : मग त्या नवेन भेटि : येतुकेनि देमाइसीं मानिलें : दंडवत केलें : ॥१३२॥

**तथा अनुसरण॥** मग देमाइसी भटोबासांतें प्रार्थीलें : भटो आतां मज भिक्षा द्यावी : भटोबासीं मानिलें : मग देमाइसें अनुसरलीं : भिक्षा केली : तापसें जालीं :॥शोधु :। अनुसरलीं : आलीं तियेचि काळि किं आणिका काळीं हें नेणिजे : मग गुरुकुळ तयातें **'कटककारें देमाइसें'** यैसें म्हणति : ॥१३३॥

**तथा उपालंब–परीहारार्थ कटका पाठवणें :॥** देमाइसीं भिक्षा केलेयावरि तयांचां गांवीं (तयांची) थोरि निंदा प्रवंतली : तें आइकौनि एक दिसिं भटोबासीं म्हणितलें : देमाये तूं गावां जाउनि आपणयांतें दावि : जाये : तुझी सबंधीयें निंदा बोलताति : तेहीं मानिलें : मग तियें कटका गेली : अवघेयापुढें आपणयांतें दाखवीलें : मग तयांची आचारनिष्टा देखौनि त्यांसि थोर बुद्धि शुद्धा बुद्धि उपनली :॥शोधु :। यैसें परीहारपावेतों तेथ होतीं : मग भटोबासांपासि आलीं : भटोबासां सुख जालें : ॥१३४॥

**तथा भ[भो]जनिं आग्रहें कोमळा रसु निराकरणें** :॥शोधु :। एके दिसीं देमाइसीं भिक्षुकांसि अभ्यागत केलें : अवघें वाढीलें ॥ मग प्रबळ तूप वाढीलें : नेघेति तयां आग्रहो करीति : यैसे भलतेधवां : मग एकु दिसीं भटोबासीं म्हणितलें : देमाइये तुवा ऐसें आग्रहें भलतया तूप वाढावें : एकाधेया कोमळा न खावेया : न पीयावेयाची वासना : तो परतौनि वास पाहील : तेव्हेळीं कोणे मायेचां पोटि रीगसील : आणि तियें भीयालीं :॥शोधु :। यैसें

भटोबासीं भजनक्रियेचां ठाइ प्रवेसनि जरठ कोमळ पुरुषाचें तारतम्य सांधितलें : मग तियें तैसें न करीति : ।। १३५।।

**तथा भिक्षान्नदर्शनि उष्ण-सीळे म्हणणें** :।। एकु दिसु देमाइसें भीक्षा करूनि आलीं : झोळी भटोबासांतें दृष्टपूत केली : भटोबासीं झोळी यैसी पाहीली : तवं अर्ध उन : अर्ध सीळें : यैसी भीक्षा आली असे : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : देमाये उन वेचि : सीळें ठेवि : सीळे तें आतां सीळें : तैसें उद्यां सीळे : ।।शोधु :। ति तैसेचि केलें : तियें नावेक सोपस्करें होतीं : रीगेना तें जाणौनि म्हणितलें : ।।१३६।।

**रेमाइसां अनुसरणि 'कुमरें' नाव ठेवणें** :।। रेमाइसें तियें भटोबासांचो सीष्यें : त्यांचि माहेरीचि रामपुरीएसि होतीं : आणि सासुरीचि खेडीचि होती : एकु दीसु तियें भ्रतारें मारीली : तयांचेया भ्रतारा नृसिंहाची भक्ती : तव तियेचि दि तो रात्री स्वप्ना आला : तेणें म्हणितलें : हां रे तुवां यांतें कैसें मारीलें : ये राजकुमरें कि रे : आतां तूं एक संवत्सरु जीसील : मां यें महात्मी होतील : मग उदयाचि उठोनि तेणें आपलेयां मायबापांपुढां सांगितलें : मग तो एकचि वरीष ज्या(जिया)ला : मग रेमाइसें रामपुरीयेसि आलीं : तेथौनि भटोबासांपासि आली : भिक्षा केली : मग स्वप्नपर्यंत अवघें सांघीतलें : तें आइकौनि भटोबासीं अवघेयांतें म्हणितलें : यांतें '**कुमरें रेमाइसें**' म्हणा गा : मग तैंलागौनि त्यांतें **कुमरें रेमाइसें**' यैसें म्हणति :।।१३७ ।।

**तथा उद्ग्रहणिकापूर्वक वांकुडे दाइंभट योग्य करूनि भटोबासीं भिक्षा देणें** : ।। एकु दिसु कुमरें रेमाइसें तडसमुखासि भिक्षे गेलीं : तवं भिक्षा करीतां वीद्वांसां वांकुडे दाइंभटाचेया घरा गेलीं : तेथ चाटे पढत होते : तेहीं रेमाइसांतें म्हणितलें : माहात्मेहो हे पेंडि वांसुरुवांसि घाला : मग आम्ही तुम्हांसि भिक्षा घालूनि : एरवीं आम्हा घालूं नैये : तिहीं म्हणितलें : कां घालूं नैये : चाटां म्हणितलें : ना आमचा उपदेशु तुम्हां नाहीं : तवं रेमाइसीं म्हणितलें : सिवणियांसि पाणि घालीतां त्यासि काइ तुमचा उपदेशु असे : तवं तेहीं म्हणितलें : यैसीं तुम्ही तरि आमुचेया द्वारां कां येतां : रेमाइसी म्हणितलें : जया देवाचा हा मार्गु तेणें देवें म्हणितलें : अन्नाचीयां चाडां तरि ब्राम्हणाचीया घरा जावें : वाहानाचीया

चाडा (तरि) चर्मकारांचीया जावें : येतुलेनि ते उगेचि राहीले : [1]तेथ वांकुडे दाइंबास बैसले होते : तेहीं अवघे आइकीलें : मग रेमाइसें भिक्षा करूनि गंगेसि आलीं : अवघा विधि सारीला : तवं इतुका [2]मार्गि वांकुडे दाइंभट आले : बैसले : रेमाइसासि पुसिलें : हां आइ हा मार्गु कवणा देवाचा : रेमाइसीं म्हणितलें : गा [3]परु परमेश्वरु तया देवाचा : तवं वाकुडीं म्हणितलें : तो नित्य : नैमित्यक कर्म करीतां काइ न पविजे : रेमाइसीं म्हणितलें : नित्य : नैमित्यकें : काम्यें : निषेधें : यैसें चतुर्विध कर्म : त्यांतु नित्य : नैमित्यकें कर्मे तियें प्रतिदिनीचेया प्रतिवाया परीहारार्था गेलीं : एकें काम्यें तियें फळासि गेली : निषेधें तियें निरयासि गेलीं : तरि ईश्वरीं कवण कर्म अर्पिलें हें सांगा : आणि ते उगेचि राहीले : मग म्हणितलें : साच : ईश्वरी अर्पे ऐसें कर्म न देखों : यैसें प्रत्यया आलें : मग रेमाइसांतें म्हणितलें : तरि आइ (तो) काइसेनि पावीजे : तें तुम्ही मज सांघावें : तवं रेमाइसीं म्हणितलें : तें आम्ही नेणों : तें भटोबास जाणेति : तिं म्हणितलें : ते कें असति : ना ते निंबा असति : तरि आतां कणव करूनि तुम्हीच सांघा : म्हणौनि दंडवत करूनि घरा घेउनि गेले : मग तयां निर्धारु देखौनि दिसां चौं रेमाइसीं त्यांसि धर्मु सांघीतला : मग भटोबासांपासि घेउनि आलीं : भेटि जाली : अवघे मागील सांघितलें : मग तेहीं भीक्षा केली : ॥१३८॥

**अटनि गदोनायेक–दर्शनाप्रकासीं म्हाइंभटीं अपरीतोषु करणें :॥** एकु दीसु म्हाइंभट अटना गेले होते : ते एकी ठाइं विजनि बैसले असति : तवं मार्गी जातां गदोनायकीं दुरूनि देखीलें : आणि घोडेयावरूनि उतरले : म्हाइंभटांसि साष्टांग दंडवत घातलें : पुसीलें : तुम्ही कोण महात्मे : तवं म्हाइंभट मौन्य न भंगीतीचि : आणि गदोनायेक दंडवत करूनि निगाले : म्हाइंभट गदोनायकातें नोळखतिचि : तवं मागीलाकडूनि तयांचा बडुवा येतु देखीला : मग साउमे जाउनि तयांतें पुसीलें : हां हा हे कोण : तेणें म्हणितलें : हे गदो भांडारी : इतुलेनि म्हाइंभटासि अपरीतोषु वाटला : मग म्हणों लागले : आहा कटकटा : मी पापीया बोलता कां तरि यांतें

---

१ हस्तदोषानें 'तेधवां' शद्ब पडला आहे. ख, ग, घ. यांत 'तेथ' शद्बच येतो. २ समै घ. ३ ख मध्यें "सकळां" शद्ब यापूर्वी जास्तीचा.

गोसावियांचीया लीळा पुसतां : यावरि म्हाइंभटीं [1]प्रस्तावीक वाक्य म्हणितलें : **अपरीक्ष्य न कर्तव्यं कर्तव्यं सुपरीक्षितम् ॥ पश्चाद्भवति संतापो ब्राह्मणी नकुलो यथा** ॥१॥ यैसें म्हणौनि राहीले : ॥१३९॥

**तथा ईश्वर-लीळा-श्रवणें प्रसादोदकपूर्वक खेइभट-भ[भो]जन-स्वीकारु :** ॥ तैसेचि म्हाइभट अटनवीशेषें खेइभटांचेया गावां गेले : तेथ तयांसि भेटि जाली : [2]म्हाइभटां हेतु : जे गोसावियाचीया लीळा शोधावीया : तवं खेइभट कृषी करावेया जाति : त्यांसरीसे म्हाइंभटही जाति : खेइभट कृषीकर्म करीति : आणि म्हाइभट तयां मागां मागां गोसावियाचीया लीळा पुसति : खेइभट सांघति : त्या म्हाइभट नमस्करूनि घेति : मग भिक्षा करूनि जेवीति : त्यांचें काहीं नेघेति : एकु दीसि म्हाइंभटी म्हणितलें : खेइभटो तुम्हापासि प्रसादाचि रोटी असे ते (मज) धूनि पाणि पाजा : तवं तेहीं म्हणितलें : आमचें कांहीं घेयाल तरि पाजूनि : मग (म्हाइभटी) म्हणितलें : घेइन : मग ती प्रसादाचि रोटी धूनि म्हाइभटा उदक पाजीलें : मग म्हाइभटीं तयांचें कांहीं अंगीकरीलें : मग निगाले : भटोबासांपासि आले : ॥१४०॥

**म्हाइंभटां लीळाश्रवणें भटीं लीळाशोधनानुज्ञा :** ॥ मग म्हाइभटीं भटोबासांपुढां अवघें सांघीतलें : गोसावियांचीया लीळा शोधूनि आणिल्लीया : तिया संवादिलीया : होये तें भटोबास मानिति : नव्हें तेथ म्हणति : हे श्रीमुखीचे सब्द नव्हेति : हे होति : मग म्हाइंभटांतें म्हणितलें : उपाध्यांचिये अनुभवीचीया त्या उपाध्यांतें पुसावीया : नाथोचीये अनुभवीचीया तिया नाथोतें पुसावीया : साधांचीये अनुभवीचीया तिया साधांतें पुसावीया : यैसीयाचिपरी ज्याचीये अनुभवीचीया त्या त्यातेंचि पुसावीया : यैसें भटोबासीं म्हाइंभटातें विहीलें : मग म्हाइंभटबासी तैसेंचि करूनि मागीलाचिपरी भटोबासीं संवादिलीया : मग उतरार्ध-पूर्वार्ध दोनि विभाग केले : ॥१४१॥

**तथा सारंगपंडित-क्षीरभोजन-परीत्यजनि अनुचितानुवादु :** ॥ : एक वेळ म्हाइंभट लीळा शोधीत प्रतिष्ठानासि गेले : सारंगपंडितांसि भेटले : तेहीं अभ्यागता प्रार्थूं आदरीलें : तवं म्हाइभटीं म्हणितलें : आधीं मज गोसावियांची लीळा सांघा : मग घेइन : तिं आधीं गोसावियांचिया लीळा सांघितलीया : तवं उमाइसीं क्षीरप्राधान्य अवघें निफजवीलें : म्हाइंभटासि

१ प्रस्तावा घ. २ म्हाइंभटाचा ख, ग, घ.

ताट केलें : अनुज्ञासमें म्हाइंभटीं म्हणितलें : गोसावियांचेया प्रसादाचा लाडु घालाल तरि जेवीन : मग उमाइसी प्रसादाचा लाडु चूर करूनि क्षीरीवरि घातला : मग म्हाइंभटी लाडुवाचिया सेवा वेचू वेचू खादलीया : वरील [1]क्षीर घांस दोनि जेवीले : आणि वमनाचेनि मींसें उठीले : भिक्षा करूनि गगेसि जेवीले : मग भटोबासांसि भेटावेयासि आले : अवघे सांघितलें : मग भटोबासीं म्हणितलें : आहा म्हाइंभटो अनुचीत केलें : ॥१४२॥

**म्हाइंभट अद्वैतसमर्थनप्रश्नें देवाद्य–व्यापारु-कथन :॥१४३॥**

**तथा वीपरीतानुष्ठानव्याख्यानकरणि भटीं गोसावियांतें पुसों विसरलां म्हणणें** :॥: या दोन्ही स्मृतीं [2]कवीबासांचीया वासना :॥१४४॥

**भद्रकार कामाइसां भेटि : श्रवण करणें** :॥: भद्रकारें कामाइसें तियें रामदे(वो)रायाची राणि : त्यांचा व्यापारु अनोबासासि होता : तियें [3]सदा पुराण आइकनि : आनोबास पुराणिकासि आक्षेपु लावीति : तैं आनोबा वासनिक : तैं त्यां नावं गोपाळपडित : त्यांचे आक्षेप पुराणिकासि न लोटेति : आणि तयां चमत्कारु होयें : मग गोपाळपंडितातें पुसति : हें कैसें पंडितो : मग आनोबास आक्षेपु फेडूनि सांघेति : तें कामाइसाचीया प्रत्या[त्यया] येः आणि म्हणति : पंडितो हें तुम्ही केवि जाणा : ते म्हणेति : ना आम्हां गुरुमुख असे : मग एक दि पुसीलें : तुमचे गुरु कवणे ठाइं असति : तिं म्हणितलें : ना ते [4]मुदगलापासी निंबा असति : मग एकु दिसु कामाइसीं रायातें पुसीलें : मुदगल वांझांसि पुत्र दे : तरि तेथ मों [5]जाउ : रायें म्हणितलें : जा : मग कामाइसीं आइत करूनि गोपाळपंडितातें म्हणितलें : पंडितो तुम्हीं भटोबासांसि माझीये निरउणकेचें एक लिखितु द्या : मग गोपाळपंडिती भावपूर्वक पत्र दिधलें : मग तियें निंबेयासि आलीं : लोखीत भटोबासांचां हातीं दिधलें : भटोबासीं पाहीलें : मग कामाइसां श्रवण केलें : दिवस दोनि–च्यारि होतीं : मग निगालीं : निगतां म्हणितलें : भटो मी मागौती येइन : भटोबासीं म्हणितलें : न पुसत नको या : रावो पाठवील तरि या : येऱ्हवीं आम्हां–तुम्हां लीखीतें भेटिः इतुलेनि तियें निगालीं :॥१४५॥

---

१ क्षीरीचे **ख.** २ कवीश्वरबासाचिया ग. ३ दीसवडि **घ.** ४ मुदगलापासीला **ख, घ.** ५ जावों **ख, ग, घ.**

**तथा आगमनीं विरोदी प्रकासणें** :।। रामदेव तो एके मार्गीचा उपदेशीया जाला : त्याउपरि कामाइसीं रायातें म्हणितलें : तरि आम्हीं वेधवंती नागदेवभट गुरु करूं : रायें म्हणितलें : करा : तेव्हेळीं मागौतीं निंोयासि आलीं : तवं भटोबास मढीं नव्हते : विजना गेले होते : तैसीचि तेथ आलीं : भटोबासांसि भेटि जाली : बैसली : तवं पाइं सोनेयांचि वीरोधी होती ते वाटे पडली : पुढां बैसलीं : तवं आंगोळीये वीरोधी न देखतीचि : आणि तेचि आंगोळी हाती धरीली : ते भटोबासीं देखीलें : आणि म्हणितलें : काइ वीरोधी [1]पाडिली : तेहीं म्हणितलें : होय जावों द्या : भटोबासीं म्हणितलें : जावी कां : जा गणेसापासि गाडेयाचीये चाकारीयेआंतु पडिली असे : आपुला विस्वासि पाठवा : घेउनि येइल : तेंही आपला विस्वासि पाठवीला : तवं ते सांघीतलीं ते ठाइ तैसीचि होती : कामाइसीं म्हणितलें : भटो : तुम्ही केवि जाणा : भटोबासीं म्हणितलें : मी श्रीचक्रधराचेनि प्रसादें जाणें : कामाइसां थोर आश्चर्य जालें : मग तयांसहीत भटोबास बिढारासि आले : ।।१४६।।

**तथा स्मरणप्रश्नें प्रतिष्टान-नाम-स्मरणिये निरूपण** : ।। हे आदि [2]कवीबास : याचि स्मृति न येचि :।।१४७।।

**तथा भिक्षा-निराकरण** :।।: एकु दिसु कामाइसीं भटोबासांतें पुसिलें : भटो मी भिक्षा करूं : भटोबासीं म्हणितलें : तुम्हां भिक्षा करूं नये : तें कां ना : गोसावीं आम्हां जेतुका देसु वीहीला तेतुका रायाचा :आणि अविहीता देशा तरि आम्हां जावों नये : म्हणौनि तुम्हांकरवि भीक्षा करउं नैये : कामाइसें [3]उगींचि राहीली :।।१४८।।

**तथा अग्निप्रवेसि आदिभावो-निराकरण** : ।। याउपरि मागौतें कामाइसीं म्हणितलें : भटो रावो मरैल : आणि मातें आगीआंतु घालीतोल : भटोबासीं म्हणितलें : तरि तुम्ही आपुला आदिभावो [4]चुकवा : मग ते बळाधिकारें घालीतील : तरि तुम्हां आत्महत्येचें नरक नाहीं : इतुलेनि ते [3]उगीचि राहिलीं : मग काहीं पदार्थ आणिला होता : तो भटोबासांसि संपादिला : मग आज्ञा घेउनि गावां गेलीं : ।। मग कितीका दिसां रावो निवर्तला :

---

१ पडीली **ख, ग, घ.** २ कवीबासांची **ख**; कवीश्वरबास **ग, घ.** ३ उगलीचि **घ.** ४ चकवावा **ख. घ.**

मग तेही तैसेंचि केलें : बहुतापरी (आपुला ख, घ) आदिभावो चुकवीला : परी येरीं बळाधिकारुचि केला : ॥१४९॥

**तथा अग्नी[ग्नी]प्रवेसु-श्रवणें ईश्वरदान-निर्वचु** : ॥ मग तें अवघें भटोबासीं आइकलें : ॥ शोधु : । पांचांस्या गुरुकुळासि थोर दुख जालें : ॥ तयांतु एकीं भटोबासातें पुसिलें : हां भटो : कामाइसें यैसीं तळमळीतें सरलीं : तरि तयांसि काइ[१] जालें : यावरि भटोबासीं धर्मवार्ता केली : भटोबासीं म्हणितलें : वेधु आणि बोधु : अनुसरणाची तळमळ : ऐसें असैल तरि देहविद्या होइल : ॥ शोधु : । अडनि अनुसरण प्रतीबंधलें तरि ईश्वरु होइल : ॥ ना वेद[ध] : बोधु आहे : आणि अनुसरणाची तळमळ नाहीं : तरि त्या सृष्टी सून्य जाइल : ॥ शोधु : । परि बोधाचें साध्य होइल : आणि बोधु राखीला तयाचा तोखु उरैल : ॥ बोध नाहीं आणि अनुसरणाची तळमळ असे : तरि पुत्र होउनि जन्मति : मग ईश्वर ज्ञान देइल : ॥ शोधु : । तरि थोरें साह्यें उद्धरीति : ॥ येसें भटोबासीं कामाइसावरूनि निर्वचीलें : ॥१५०॥

**पाठकसुतागमनीं पाठक ज्ञान करणें** :॥ एकु वेळ सेइगावीचां पाठकीं भटांपासि भिक्षा केली : मग विदेशा अटना गेले : यैसे मेघकर प्रांता[२] येउतें : तव सेगावींचां अधिकारी आइकीलें : जें पाठकीं भिक्षा केली : तयावरि तयांचेया पुत्रासि तयांची वृति न पाळीतीचि : तेहीं त्यातें म्हणितलें : जाये त्यातें घेउनि ये : मग पाळूनिः ते हो कां म्हणोनि निंबेयासि आले : अवघी व्येवस्था भटोबासांपासीं सांघितली : तरि भटो तयांतें पाठवावें : भटोबासीं म्हणितलें : जा ते लोणारीं अनुष्ठान करीत असति : तैसेंचि ते लोणारा आले : भेटि जाली : अवघें सांघितलें : तरि पाठको तो ठाववेऱ्हीं चला : तवं पाठको म्हणितलें : ते तुम्हां पाळितु अथवा न पाळितु : परि आम्हा संबंधा येउं नये : जा : मग तो गावां गेला : अवघें अधिकार्यापुढें सांघितलें : ते न येतिचि : मग अधिकारी म्हणितलें : होति निर्धाराचे : ते येते तरि तुम्हां वृति न पाळितों : आतां वीशेषें पाळूनि : मग त्यांची वृति तेहीं पाळीली : ॥१५१॥

**अनुचित द्रव्य-स्वीकारें दींडोरी गोंदोबा-सिक्षापण** : ॥ मग केतुलेनि एकें काळें दींडोरी गोंदोबायें भटोबापासि भिक्षा केलीं : यैसां एकु दीसु तयांचि

---

१ होइल ख, घ. २ यापुढें 'गेले' शद्ब ज्यास्त ग, घ.

मातापीता सरलीं : यैसे तेहीं आइकीलें : आणि बाहीर–वाहीरेचि गोंदोबा स्वग्रामा गेले : तेथ भावापासौनि आपुला वांटां द्रव्य घेतलें : आणि भटोबासांचीये भेटि आले : ॥ शोधु : । भटोबास क्षेम नेदीतीचि : भटोबासीं म्हणितलें : हां गा वो[व]मना कैसा हात वोडवीला : ॥ शोधु : ॥ मळवत् सांडीलें : आणि मागौतें तेंचि हातीं घेतलें : ( म्हणौनि भटोबासीं सिक्षापण केलें : ) गरुभांवडींहीं अवघां सिक्षापण केलें : ॥ शोधु : ॥ मग तीं तें मागुतें जाउनि सांडिलें : मग स्वीकरिलें : ॥१५२॥

**ब्राह्मणा प्रश्नें सितोदकानुवादु :** ॥ एकुदिसु सियाळिये रि[ऋ]तु भटोबासांसि सकाळीचि भोजन जालें : बैसले असति : भटोबासांपुढां सगडी असे : यैसे हात सेकीत असेति : भटोबासांचीये हाती [1]संबंधाचि मुदी होती : तिये मदीयेसि एक सीत लागलें होतें : तवं ब्राह्मण एकु दर्शनासि आला : भटोबासां नमस्कारु करूनि बैसला : तवं तेणें तें सीत देखीलें : आणि म्हणितलें : भटो हें काइ सीत : भटोबासीं म्हणितलें : होये : सीत लागे तेव्हेळीं सीत : उदक लागे तेव्हेळीं उदक : मग हातावरि उदक घेतलें : तो उगाचि राहीला : ॥१५३॥

**सृष्टि–निर्वचीं शास्त्र–अभ्यासु–कथन** :॥ कव्हणि एकीं नेणतां भटोबासांसि प्रश्नु केला : भटो हे सृष्टि नित्य कीं अनित्य : भटोबासीं म्हणितलें : अनित्य : येतुलेनि ते उगेचि राहीले : यावरि भटोबासीं म्हणितलें : आत्महीताकारणें हे शास्त्र अभ्यासीति ना : तरि हे सृष्टि कैसी रचली आहे : यैसे जाणावेयाकारणें तऱ्ही अभ्यासित कां : ॥ शोधु : । परि तेहीं नाहीं : ॥१५४॥

**कटककारा भानुभटां अनुसरण :** ॥ भानुभट ते कटकदेवगीरीचे : तयांसि भटोबासांपासौनि श्रवण : धाकुटीयेचि दशेचे होते : ते एकु दीं भटोबासांपासि आले : भिक्षा केली : भटोबासांपासि असति : सेवा-दास्य करीति : भटोबास थोर स्नेहो करीति : तयांते '**भानु**' यैसें म्हणति : ॥१५५॥

**तथा प्रसाव–ग्रंथिका–करणि व्यक्तिभंगा–भावो–कथन :** ॥ एकु दिसु भानुभटीं जुनेया माच्यांचीया दोनि गांठिया केलीया : ॥ शोधु : । एकि पिंपळीयांचीये आकृतीची : एकि वाटोळेयां मणियांचि : यैसीया दोनि : ॥ आणि

---

१ संबंधाचीये धातूची **ख, ग, घ.**

दोनि बरवे वेढे केले : त्यासि सोनयांचीया कडीया घातलीया : मग आणूनि भटोबासांचां हातीं दीधलीया : भटोबासीं नमस्करीलीया : आणि म्हणितलें : भानु गांठीया बरवीया जालीया : परि व्यक्तिभंगाचें काइ होइल तें मी नेणें : यावरि भटोबासीं प्रसादमहीमा निरूपिला : भटोबासीं म्हणितलें : प्रसादु जेणें जो दीधला : तो तैसाचि नमस्करीजे : तो प्रसाद उकलीजे तरि प्रसन्नता जाये : प्रसादत्व जाये : मग संबंधु उरे : यैसें व्यक्तिभंगाचें दूषण दाउनि भटोबासीं निरूपण केलें : भानुभटीं नमस्करूनि घेतलें : मग भानुभटीं पींप-ळीयाची गांठी भटोबासांचां गळा घातली : वेढे भटोबासांचां कानीं घातले : दुसरी गांठी ते साधाचां गळां घातली : आणि दंडवत घातलें : ॥१५६॥

**तथा पोफळ फोड(य)णें :॥** एक वेळ भटोबास निंबाहूनि कवणा गावां गेले होते : ते नेणिजे : मार्गी जातां एकि ठाइ जेवीले : सरीसे भानु-भट असति : भटोबासीं म्हणितलें : भानु हें पोफळ फोडि : तिहीं घेतलें : पाहातात तवं दगड नाहीं : भानुभटीं म्हणितलें : भटो दगडु नाहीं : काइसेन फोडूं : भटोबासीं म्हणितलें : दांतें फोडि : भटो दांतें कैसें फोडूं : उसीटें होइल : भटोबासीं म्हणितलें : ॥ शोधु : । सेवेसि उसीटा भावो नाहीं : ॥ मग तिं फोडीलें : भटोबासीं मुखसुधि घेतली : ॥१५७॥

**तथा बुझावणिये 'पोफळ–फोडणा' म्हणणें : ॥** एक वेळ भटोबास भानुभटावरि कोपले : तयांतें म्हणितलें : भानु तूं जाये : तव तिहीं म्हणि-तलें : माझे सोनेयाचे वेढे द्या : मां जाइन : तवं भटोबासीं म्हणितलें : घे : म्हणौनि कानु वोढविला : तिहीं काढीले : घेतले : मग गावां कटकदेवगीरीसि गेले : तेथ होते : एकु दीसु भटोबास तेथ गेले : भटोबासीं भानुभटातें कव-ळीये धरीलें : आणि म्हणितलें : भानु तू माझा 'पोफळ–फोडणा' कीं गा : यैसें बुझाउनि घेउनि आले : परि ते न ऱ्हांतिचि : मागौते गेले : ॥१५८॥

**झोळीये भोजन–दर्शनीं केशोबासि माहात्मा सिक्षापणें :॥** गंगे एक माहात्मे झोळिये भोजन करीत होते : तिकडे केशोबास आले होते : तेहीं देखीलें : आणि केशोबास बीढारा आले : तवं मागीलाकडूनि तेही आलें : मग भटोबासां देखताचि केशोबासीं म्हणितलें : हां हो तुम्ही झोळियेसि कैसे जेविलेति : तवं तीं म्हणितलें : मज काइ कोण्ही देखीलें : तवं केशोबासीं म्हणितलें : म्यां कैसें देखीलें : यैसेंचि आणिक देखतील : तेव्हेळि मार्गा दूषण

ठेवीतील : आजिलागौनि झोळिये कोण्हीं जेवी तयासि भटोबासांची आन : यैसें केशोबास कोपले : यावरि भटोबासीं म्हणितलें : अवघें अन्न पात्रीं घालूनि भोजन करावें गा : परि झोळिये ना : मग कोण्हीं न जेवीति : ॥१५९॥

**तथा कंदर्प-शाक-निषेधीं भटोबासांची आन घालणें :॥** एकु दिसु गौराइसीं बरवे कांदे रांधीले : मग भटोबासांचीये पांति अवघेयां वाढिले : केशव : पंडित-मुख्य अवघे बैसले : तवं केशोबासी यैसें पाहूनि म्हणितलें : हे काइ रांधोलें : गौराइसीं म्हणितलें : हे कांदे : केशोबासी म्हणितलें : हें न रांधावें : आजिलागौनि राधा तरि भटोबासांची आन : यैसे केशोबासीं भटोबासांदेखत वारीलें : मग तैंलागौनि न रांधीति :॥१६०॥

**अन्य वार्ताश्रवणें रंभायो दवडणें :॥** एकु दिसु भटोबास बैसले असति : तवं रंभाइसें काइ नेणों : कवणेंसी कटकट करीत होतीं : (तें भटोबासीं आइकीलें : आणि म्हणितलें : हां वो रंभाइ : तू अखड कटकट करीतेंसि :) तू जाये : म्हणौनि दवडीली : सिवीया दीधलीया : यैसे कोपले : मग तियें विजना गेलीं : विजन केलें : माघौतिं वेळेसि आलीं : भटोबासां दंडवत केलें :॥१६१॥

**तथा उचिष्ठाज्ञा–करणि मी तियेचा धर्मु म्हणणें :॥** मग भटोबास जेउं बैसले : पांति जाली : जेवीले : आचवले : जेवीतां उचिष्ट उरलें तें गौराइसांतें म्हणितलें : गौराये धरि : हे इतुकें उचिष्ट रंभायेकारणें ठेवि : गौराइसीं म्हणितलें : भटो : ते तुम्ही दवडीली कीं : भटोबासीं म्हणितलें : तऱ्हीं वोहटळिचि गोटि वोहटळां येईल की वो : जरि मी तीचा धर्मु : तरि माझें मजपासि येईल कीं : तवं तियें विजनिहूनि आलीं : भटोबासांसि दंडवत केलें : भटोबासीं म्हणितलें : रंभे जाये : म्यां उसिटे ठेविलें आहे तें घे : हो कां : मग गेलीं : घेतले : जेवीलीं :॥१६२॥

**नाइकबाइ–आग्रहीं माहादाइसीं श्रवण करणें :॥** एकु दिसु माहादाइसें नौगाबा गेलि : तवं तेथचि अधिकार्ये नाइकबाइ : एकु दिसु तयांसि माहादाइसांचे दर्शन जालें : तिं माहादाइसांतें म्हणितलें : आइ पीपळगावीं [1]श्रीदेवोराउळ राज्य करीत होते : तें म्या गोसावियातें झळकतां देखीलें :

---

१ श्रीचांगदेवोराउळ **ख, घ.**

तरि ते कैसे ईश्वरुः तें मज सांघावें : यैसा आग्रहो घेतला: मग माहादाइसीं तयांसि श्रवण केलें : तयां बोधु जाला :॥१६३॥

**तथा भिक्षा देणें** :॥ मग केतुकेयां एकां दिसां तेहीं भिक्षा केली : माहादाइसांपासि अनुसरली :॥१६४॥

**तथा वियोगपूर्वक पदें महादाइसीं आइकणें** :॥ एकु दिसीं नाइकबाइयः अप्राप्तिपरें पदें केली : आणि महादाइसांपुढां म्हणितलीं : माहादाइसें तोखली :॥ तियें पदें यैसी : **एकी सांघे एकीप्रति : आइक वो कृष्णाचो वेधशक्ती :॥ तया रूपाची झळकली अभीव्यक्ती : त्या मनोवृति : भ्रमत असे :॥ पैं चमत्कारु मज अंतःकरणा : जेहीं अनुभवील कृष्णराणा : त्याते कैसे वाचे प्राण : त्या तत्क्षेणा न निगतीचि : ॥१॥** ध्रुवपद :॥ **विपरीत वेधले माझें मन : सखी ये स्वप्नीचें दर्शन : तंलागौनि दिस–[1]गणना : जन्म मी यैसें गमीत असे :॥ म्हणसी असे [2]दृष्टीची प्रीति : अभिळासीं असे अधिक रती : तरि हा अर्थु न धरी चित्तीं : येणें तो जीवपति न पविजे :॥ म्हणसि पद पढीये निर्वाण : तरि [3]हेंही ना सं[शं]सी तुझीचि [3]आन : परि तुज वेधलें अंतःकरण : हें तुजवीण कवण जाण :॥२॥ नाना तपें–व्रत–दानें : येम–नेम पुण्यसाधनें : वेदा–आगमें श्रुती–पुराणें : तो कृष्ण काइसेनि न पविजे :॥ तयालागीं कवणा रीगों सरण : विनतीये धरूं कवणाचे चरण : कवण राखैल संतप्त हे प्राण : तो कृष्णराणा मेळउनी :॥३॥ विपरीत हें प्रेमाचे पीसें : वेधलीं नेणौनि कैसीं मानसें : दुःप्राप्त जो सीद्धा सायासें : तया मी कैसें देखों इछी[च्छी] :॥ सेवा ना श्रधा भावो ना भक्ति : खांवणि नाहीं चितवृती : आतां तो जीवपति : केवि पावे :॥४॥ यैसें पुण्य न देखों आन : जेणें देखिजति तयाचे चरण : जरि तोचि कृपा करी आपण : तरि दर्शन लाहिजैल :॥ हे [4]कै पुरती मनोरथ : जऱ्ही जालें जीवा थोर आरत : जें रूप अव्यक्त अनंत : (तें) प्रेमहीना मज प्राप्त केवि होये :॥५॥ प्रकृतीं लागलें हें पापीये मन : एकांतीं करूं म्हणे तयाचें ध्यान : तंव हे दाखवी आनेंआन : तेणें माझें मन भ्रमताये :॥ परि दृष्टी दिसताये एकी खूण : जें तोचि हा होये यादवराणा : अति सुजाणा जाणविलें :॥६॥**

१ गमेना घ. २ दृष्टाची **ख, ग**; अदृष्टाची **घ.** ३ हेंही नाहीं मनें–मानसें **घ.** ४ केवि **ख, घ.**

**आतां असो तयें सकळ बोलणि : माझी सखी तेचि निर्वाणी : जिया जाणवीला श्रीचक्रपाणी : तियेवीण आन कव्हणि न देखों वो :॥ आतां नमो त्या यादवतीलका : मी दैवेंहान माजिसकळीकां : परि तुज आठवण जाली ज्या आणिका : त्यांतु घालौनि राखे मज :॥७॥** यैसो पदें गाइली : एकी वासना :॥ श्रवणाउपरि केलीं : मग अनसरलीं : ॥१६५॥

**महादाइसीं भिक्षुकाचारु सोधूनि बाइयां शिक्षापणें :॥** भिक्षुकें विजना जाति : विजनि बैसति : आणि महादाइसें जाउनि अवघेयांचो वोजनें सोधीति : जा दादा जे बाइ जेथ बैसलीं असति : तेथ तेथ तयां चुकि सांधति : सावधां करीति : येकमेकांचे सांघातु सोधिति : यैसें निच करीतां एकु दिं एकि बाइया वीजन करूनि बिढारा आलीया : मागीलाकडूनि महादाइसें तेथ गेली : तवं तेथ कुहीरीयांचीया बीयां आणि चीधीया ऐसें पडीलें असे : तें देखौनि महादाइसांसि न मनेचि : बिढारा आली : आणि भटोबांसादेखत तयां सिक्षापिलें : बाइं दंडवत करूनि मानिलें :॥१६६॥

**तथा 'रुक्मिणिसैंवर'—गायेणीं बाइयां अव्हेरणें :॥:** महादइसें अटणा गेली होती : तयांपुढां एकी बाइया अटणि होतीया : तेहीं रात्रीं वोसरीयेवरि **'रुक्मिणिसैवर'** गाइलें : सकाळि निगालीया : तवं एरी दीं तया निद्रास्थाना महादाइसें आलि : घरींचां म्हणितलें : आइ काही गीत गा कां : तवं महादाइसीं म्हणितलें : आइ आम्ही गीत नेणो : तव तिं म्हणितलें : कालि एकें आइसें आली : तेही कैसे बरवे गीत गाइले : तें महादाइसीं आइकीलें : आणि न मनेचि : मग पुढां त्या महादाइसांसि भेटलीया : तवं महादाइसें संभाषण न करीतिचि : विभागु केला :॥१६७॥

**म्हातारी धर्मरक्षणानुवादें भटीं बाइया सिक्षापणें :॥:** महादाइसें तयां बाइयां न भेटतीचि यैसे भटोबासीं आइकीलें : आणि तोखौनि म्हणितलें : म्हातारी माझेया धर्मासि रक्षण गा : मग केतुलेनि काळें त्या बाइया आलीया : तिया भटोबासी सिक्षापिलीया :॥शोधु :॥: मग तेंलागौनि कव्हणि कोठें काहीं गाति ना :॥१६८॥

**अटनि वीजनप्रसंगें म्हाइंभटा महादाइसीं शिक्षापणें :॥:** महादाइसें अटना गेली होतीं : आणि म्हाइभटही गेले होते : गावां एकि म्हाइंभटातें आइकौनि महादाइसें भेटावेया आलीं : उचितें वीजनें पाहीलीं : तवं तेथ

म्हाइंभट नव्हते : ते एकी मठां होते : तेथ भेटि जाली : अवघी क्रीया जाली : धर्मवार्ताप्रसंगें महादाइसी म्हणितलें : ईश्वरविरत्द्या पुरुषाचीं यें तवं वीजनें नव्हतिः यें सलागां पुरुषांचीं वीजनें : यैसें धर्मद्वारें महादाइसी दाखवालें : तें म्हाइंभटी मानिलें : थोर सुख जालें :॥१६९॥

**गळितफळानुवादु** :॥: एक वेळ कोण्हा एका प्रस्तावेयावरि भटोबासीं म्हणितलें : ब्रह्मविद्येचा उपदेशिया साधन चरितार्थ करी तरि ईश्वरप्राप्ति होये : ना गळीत होये तरि मुख्य देवतेचें फळ होये : यैसें भटोबासीं अनुवादीलें :॥१७०॥

**बाइयां शद्वार्थ घोकवणें** :॥ एकु दिसु भटोबासीं म्हणितलें : बाइयां व्याख्यान न धरे : शद्व शद्वार्थ सवेंचि घोकवा :॥१७१॥

**म्हाइंभटीं ब्राम्हणा प्रत्योतर देणें** :॥: म्हाइंभट एकी ठाइ पोथी वाचीत होते : तव तेथ एक विद्वांस आला : तेणें उभया ठाकौनि एकु दोनि शद्व आइकीले : आणि म्हणितलें : अबद्ध अबद्ध अबद्ध : यैसी त्रीसुधी :॥: म्हाइंभटीं येसें पाहूनि म्हणितलें : तोंड अबद्ध तरि वाचिजाये : पोथी अबद्ध तरि फाडिजाये : आणि तो क्षोभला :॥१७२॥

**तथा शूद्रा 'शुभ नास्ति' श्रवणें : ब्राह्मणाप्रति वाक्य देणें** :॥: गावों एकी म्हाइंभट भिक्षा करूनि नदी उदका गेले : वाळुवंटि विहीरां उदक भरीत होते : तेथ विद्वांस एकु होता : तेणें म्हणितलें : **शूद्रस्य शुभं नास्ति** : म्हाइभटी यैसें पाहूनि म्हणितलें : **ब्राह्मणस्य विशेषत** : । येतुलेनि तो क्षोभला : ॥१७३॥

**म्हाइभटीं 'रुक्मिणीसैवर' करणें** : ॥ : एकु दीसु म्हाइंभटीं : लक्ष्मीधरभटीं महादाइसांतें म्हणितलें : समोरें '**रुक्मिणिसैवर**' कां न करा : महादाइसीं म्हणितलें : मज काइ करवैल : तै गोसावीं वरु दीधला म्हणौनि स्फुरलें : म्हाइंभटीं : लक्ष्मीधरभटीं म्हणितलें : तरि आम्हीं शद्व घडउनि : (आणि) तुम्हीं गा : महादाइसीं मानिलें : (मग तेहीं शद्व घडउं घडउं पदें बांधिलीं : आणि महादाइसीं गाइलीं :) यापरी दुसरी माळ केली : ॥१७४॥

**महादाइसा–प्रश्नें जेचि गति बाइसां तेचि असन्निधानिचेयां म्हणणें**:॥: एकु दीसु महादाइसीं वैराग्यनिष्टता देखौनि भटोबासांतें म्हणितलें :

नागदेया आमतें गोसावीं लाळीलें : ताळीलें : म्हणौनि अनुसरलों : आणि यें न देखतया देवाकारणें अनुसरलीं असति : हळवैलीं : पळवैलीं : तरि यांसि काइ होइल : भटोबासी म्हणितलें : रूपै जेचि गति (सन्निधानिचेया) बाइमांसि होइल : तेचि यांसि होइल : यैसी भटोबासीं थोरी प्रसंसीली :॥१७५॥

**तथा प्रश्नें पर्वागमनिं द्विगुणानुष्ठान-कथन** :॥: एक वेळ पर्वाचां दिसीं महादाइसी भटोबासांतें पुसिलें : हां गा नागदेया : पर्व आलेयां काइ करावें : भटोबासी म्हणितलें : (पर्वाचा दीसीं) दुना जाप्य करावा : दुनि प्रसादसेवा करावी : ईश्वरपरायेणा परमेश्वरस्मरणिं सदा पर्व असे : हा महात्मेयांचा वीधि :॥: आर्तिया अवस्वरू : अभ्यागत : वस्त्रपूजा : हा वासनिकाचा वीधि :॥: शोधु :॥: असतेनि पदार्थे असीकेयाचा वीधि : यैसें भटोबासीं सांघितलें : तें महादाइसीं नमस्करूनि मानिलें :॥१७६॥

**नौगावीं महादाइसां भेटि : दिवस-संख्यावीधांनि कोथळेनसीं वीधान सांघणें** :॥: महादाइसें नौगावीं होतिं : एकु दिसु भटोबास निबाहूनि महादाइसांसि भेटावेया आले : भेटि जाली : (बारा दिवस भेटीचें वीधान जाले : तंव कोथळोवास अभ्यागत आले : भेटि जाली : ) श्रमनिवृति जाली : मग भोजनाचां अवसरीं भटोबासीं म्हणितलें : रूपै माझीये भेटीचे दीवस जाले : आतां तुम्हा कोथळेनिसीं वीधान : तव कोथळोबासी म्हणितले : भटो भेटीचे दीवस कीती : भटोबासीं म्हणितलें : बारा दीवस हा पाठ : अठरा दीवस हा अर्थ :॥ शोधु :। दोष न निफजत : अपूर्वचि साधे तवं असावें हा सिधांत :॥०॥ मग माहादाइसीं कोथळोबासासीं एकत्र खानपान केलें : वस्त्रें पालटीलीं : मग भटोबास निव्रेयासि आले :॥१७७॥

**भिक्षु वराडागमनीं श्रीप्रभुकन्या आउ बळवतरें सांघणें** :॥ भिक्षुकें वराडासि जाति : तयांतें भटोबास म्हणति : आधीं गोसावियांचिये कन्येसि भेटावें : मग ऋद्धिपुरा जावें : ऋद्धिपुरी आधीं आउवेसि भेटावें : मग मढ नमस्करावा : मग प्रदेसीं अटन करावें : यैसें जे जाये तयांतें निरूपीति : मग भिक्षुक तैसेचि करीति ॥१७८॥

**उपानौह सांघणें** :॥ भटोबासांचिया उपानौह सिष्य झाडनि यत्न करीति : कदाचित कोण्हो वीसरति : तरि पडितबास झाडूनि ठेवीति :

एकु दि कवण्हि ठेवीलीया नाहीं : ते एकीं उपानी स्वानें नेली : अवस्वरीं पाहीलोया तवं एकि नाहीं : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : माझिया वाहाना पंडित ठेवी म्हणौनि जतन होति : आनां जा : पैले गारीआंतु सुनेन नेली आहे : ते घेउनि या : एक गेलेः तवं गारीआंतु होति : आणिला : अवघेयांसि आश्चर्य जालें :॥१७९॥

**गौराइ–भिक्षासोधि–कथन** :॥ एकु दिसु इद्रभटांचां गौराइ भिक्षा केली : भटोबासी म्हणितलें : गौराइ तुझी भिक्षा माधि जाइल : तुझा मनोधर्म गोसावीं सांघातला आहे : गौराइसां सुख जालें :॥१८०॥

**लखुदेवोबा झोळीये लग्नानुवादु** :॥ एकु दिसु भटोबासीं लखुदेवोबासांतें म्हणितलें : लखदेया तुज आणि झोळीये लग्न लावीलें आहे :॥१८१॥

**उपाध्यां रावंसगावीं वासु सांघणें** :॥ उपाधीं भटोबासांपासि भिक्षा केली : बहुत अक्षम जाले : मग भटोबासीं म्हणितलें : उपाध्यहो तुम्ही रावंसगावी राहा :। शोधु :। दादो तुम्ही ॥ तुमची निंदा कोण्ही न करी : तुम्हा गोसावीं वरु दीधला असे : मग ते रावसगावी असति :॥१८२॥

**तथा कमळाइसां अनुसरण** :॥ कमळाइसें तियें उपाध्यबासांचा धाडी : तयांचे हातगाते आइकौनि उपाध्यबास तयातें घेउनि आले : मार्गी श्रवण केलें : मग भटोबासांपासि आणिली : निरोवीली : मागौते भटोबासांकरवि श्रवण करवीले : झोळी देववीलीं : श्रवण करीतां भटोबासी म्हणितलें : दादो तुम्हो काइ आणि(क) देवो सांघीतला : आणि मी काइ आणिक देवो सांघैन : ना भटो तुम्हासि गोसावीं अधीकरण केलें असें : तुम्हा देवें देवो साघितला तो साघाल : मग भटोबासीं मागौतें श्रवण देउनि भीक्षा दीधलि : केतुले एक दि भटोबासाचिये सन्निधीसि होति : परि गुरुकुळ तयांतें उपाध्यबासांचोचि सिष्यें म्हणति : मग रावंसगावां गेलीं : तेथ तेहीं उपाध्यबासांची सुश्रुषा [1]केली :॥१८३॥

---

१ यापुढें ख, ग, घ मध्यें पुढील ज्यास्त मजकूर आहे : "तेथ उपाध्यां देहावसान जालें : मग तीयें वालेयां गेलीं : वालां होती : मग तयां देहावसान खळदीं जालें." पण हाच मजकूर–किंचित् फरकानें–पुढें क्रमांक २२२ मध्यें आलेला असल्यामुळें तो संहितेंत () अशा कंसांत नमूद केला नाहीं.

**अभ्यागतागमनिं धर्मवार्ता-भविष्य-कथन** :।। एकु दिसु सकाळिचि भटोबासीं समस्तांतें म्हणितलें : आजि कव्हणि विजना जावों नको गा : आजि अभ्यागत एतील : थोर धर्मवार्ता होईल : यैसें भविष्य सांघितलें : मग कव्हणी विजना न वचेचि : तवं केशोबास आणि गोपाळपंडित यैसें एकत्र मिळौनि आले : भेटी जालीया : संभ्रमु जाला : मग बरवी अपूर्व धर्मवार्ता जालि : अवघेयां मंगळ काळु जाला : आश्चर्य जालें : ।।१८४।।

**रिक्तोदकपानभाषणि अनोबाणित जळु-स्वीकारु** :।। रात्रीं भटोबासांतें तषा लागली : उदकपात्रीं उदक पाहीलें : तव उदक नाहीं : मग रांजना भरूं गेले : तवं तेथही नाहीं : मग म्हणितलें : रांजणि पाणि नाहीं मां : तें आनोबासीं आइकीलें : आणि घागरि घेउनि उदका गेले : गंगे भरूनि घेउनि आले : भटोबासांचे उदकपात्र भरीलें : ।। शोधु : । दंडवत करूनि भटोबासांतें म्हणितलें : भटो हें उदक घेयावें : भटोबासीं घेतलें : ।। मग उरलें तें रांजणि घातलें : आणिकी घागरि भरूनि आणिलें तेंही रांजणि घातलें : आणि भटोबासांची वास पाहीली : तवं भटोबास पुरे न म्हणतिचि : मग आणिकि भरूनि आणिली : तेही रांजणि रीचवीली : माघौति भटोबासांची वास पाहीली : तऱ्ही भटोबास उगेचि : मग गोपाळपंडितीं अवघाचि रांजणु भरीला : ।। शोधु : । वासनिक धर्माचि आंतु ।।१८५।।

**तथा पुनरागमनिं जाया-दुख-निवृति** :। गोपाळपंडित गावां गेले : तवं तयांचि ब्राह्मणी सरली : तयांसि थोर दुख जाले : मग भटोबासांचिये भेटीसि आले : आणि तें दुख निरपौनि काढलें :।। शोधु :। मग भटोबासांपुढें सांघितलें :।।१८६।।

**अनंतकोचा पैकु-अनुसरणानुवादु** :।। एकु दिं भटोबासीं म्हणितलें : हा अनंतकोचा पैकु मज अवघा कानाखुरांसकट अनुसरला गा : यैसें भटोबासीं अनुवादीलें : अनंतकोचे ते आनोबासांचे आजे : आणि सारंगपाणि ते पिते : यां अवघेयां गोसावियांचे दर्शन जालें होतें : ।।१८७।।

**ब्राह्मणा प्रत्युतर-प्रदायेनी भीक्षा देणें** : ।। एकु दिं भटोबास बैसले असति : तवं ब्राह्मणु एकु भटोबासांचेया दर्शना आला : तो नमस्कारु न करीतु उगाचि बैसला : तवं एकीं म्हणितलें : भटो नमस्कारुं : न करा

तेणें म्हणितलें : यांहांसि सीखासूत्र नाहीं : यांहांसि दंडवत न करूं : तवं भटोबासीं म्हणितलें : तुम्ही आपुलेयां मायाबहिणीते दंडवतें करीता : त्यासि काइ सीखासूत्रें असेति : आणि तेणें येउनि दंडवत केलें : भिक्षा केली : अनुसरला : ॥१८८॥

**महात्मेया गौराइ-सदृषाचार-कथन** : ॥ एकु दिसु भटोबासीं एकावरूनि म्हणितलें : यें उंबरी गौराइसें उठीतील–बैसतील तैसेयां उठावें–वैसावें :॥ शोध :॥ यांतु यैसें सांघितलें : आपणयां स्वता आचारु न ये : नमटे : तरि वृधासारीखे वर्तावे :॥१८९॥

**ऋद्धिपुरा प्रयाण** :॥ एकवेळ भटोबास ऋद्धिपुरा निगाले :॥ शोधु :॥ समस्तांसमवेत क्रमोपक्रमें सावळापुरा आले : तें तेथ गोसावियांची लेंकि होतिं किं नव्हति : हें नेणिजे : होति तिया वासना : तियेंसि भेटौनि ऋद्धिपुरासि आले :॥१९०॥

**आउ भेटि : मढु नमस्करणें** :॥ तवं तेथ आउसें होति : आधीं त्यांसि भेटले : मग मढु जगति नमस्करीलि : मग कीती एक दीस राहीले :॥१९१॥

**ईश्वरसदृश पुरुषागमनिं म्हाइंभटांकरविं पूर्वप्रश्न करवणें** :॥ एक वेळ भटोबास यैसें तीर्थवीशेषें अटना गेले होते : समीपचि तळेगावांकड होते : म्हाइंभट–मुख्य अवघेचि मढीं होते : तवं गोसावियांसारीखे पुरुषु एक आले : येउनि [1]आबाइसांचिया ओटेयावरि निवांत बैसले : म्हाइभट-मुख्य अवघींचि हरीखैली : आंपलवले : यैसें प्रत्यया आलें : जें गोसावी होति : मग म्हाइभटीं भटोबासांतें बोलावूं पाठवीलें : भटोबास तेथचि तळेगावांपासि होते : भटोबासांपुढां सांघितलें : भटोबासीं आइकौनि म्हणितलें : जा तेथ म्हाइंभट असति तयांतें यैसें म्हणावे : तुम्हांसि गोसावीं प्रथम भेटिं जो प्रश्नु केला तो तयां करावा : तयासि जरि तेहीं प्रत्योतर दीधलें : तरि मागुतें मातें बोलावूं पाठवावें : मग ते गेले : तैसेंचि म्हाइं-भटांपुढें सांघितलें : तिं म्हणितलें : हो कां : मग म्हाइंभटीं तयासि प्रश्नु केला : म्हाइंभटीं म्हणितलें : संसृती–छेदु होये : यैसी काहीं प्रतीति आति : तवं तेहीं पुरुषीं म्हणितलें : तें नाथ जाणे : म्हणौनि कानावरि हातु ठेविला : मग ते म्हाइभटीं बुधिचि बाहीरी नेले : मग भटोबासांतें सांघौनि पाठवीलें :

---

१ आउसांचेया घ.

भटोबास आले : अवघें सांघितलें : तें आइकौनि भटोबासीं म्हणितलें : हा मढु नागवला होता :॥१९२॥

**कोथळोबा–जळावग्रहणीं उमाइ–कोपीनं म्हाइंभटीं सिक्षापण** :॥ कोथळोबा तान्हेले एकु दि उमाइसांचीये करवतीयेचें पाणि न पुसत प्याले : तवं उमाइसें कोपलीं : तूं शूद्र माझीये करवतीयेचें पाणि कां प्यालासि : तवं तें म्हाइभटीं आइकीलें : मग म्हणितलें : हें यैसें काइ उमाइसें : तुम्हा दोहीं देवांचा संबंधु : आणि आबाइसांसारीखी माता : भटोबासांसारीखे बंधू : आणि तुमचे आझूनि अज्ञान फिटलें नाहीं : आहा ऐसें तुम्हां काइ जालें : कोथळेयासारीखें पात्र जर तुमचीये करवतीयेचें पाणि पी तरि तुझें दैव-भाग्य नव्हे : यैसी सिक्षापीलीं : मग तियें अनुताप्ली : म्हाइभटीं म्हणितलें : घाला कोथळेयांसि दंडवत : हो कां : मग उमाइसीं कोथळो-बासांसी दंडवत घातलें : नेणेंचि बा : चुकलीये पापीणि :॥ शोधु :। मग कोथळोबान तयांतें उठवीलें :॥१९३॥

**तथा म्हाइंभट-विज्ञापणि 'महावाक्य' सांघणें** :॥ म्हाइभटीं तियेचि काळीं भटोबासांसि दंडवत घातलें : आणि म्हणितलें : भटा : तुम्ही उमाइसांसि '**महावाक्य**' सांघावें : भटोबासीं म्हणितलें : तुम्ही कां न सांगा : ति म्हणितलें : तुमते गोसावी अधिकरण केलें असे : तवं भटोबासीं म्हणितलें : म्हाइभटो : गोसावियांपासौनि नव्हेचि तें मजपासौनि कैसें होइल : पूर्वि गोसावी मातें म्हणितलें : येथचें गोमटें तें काइ : तुझेनि भाउपणें होइल : तवं म्हाइभटीं म्हणितलें : गोसावीं बेलोपुरीं यैसें म्हणितलें असे कीं : तुम्हांपासौनि सातां-पाचां होइल :॥ शोधु :। मग भटोबासीं उमाइसां धर्मु घोकविला : मग तैपासौनि उमाइसां मार्गाविरि थोरु बुधि आली : ॥१९४॥

**निरालंबनता–श्रवणें कोथळोबा–निर्गमनिं एकांतस्थान–प्रसंसा** :॥ एकु दिसु भटोबास धर्मवार्ता करीत होते : प्रधानत्वें '**असतीपरि**' : भटोबासीं म्हणितलें : कोण्हांसि प्रसादु आलंबन : कोण्हांसि शास्त्र आलंबन : कोण्हांसि येल्हो आलंबन : कोण्हांसि मी आलंबन : परि यैसा कोण्ही मायेचा पोटी जन्मला नाहीं : जो देसावरि खांडें काढनि जाये : यैसें निरूपण करीताति : तव कोथळोबायें म्हणितलें : नाहीं कैसा : हा नव्हे मी कोथळा : म्हणौनि

बाहे आफळीली : आणि भटोबामासि दंडवत घालूनि नीगाले : भटोबासीं म्हणितलें : कोथळा तेथ जाइल : जेथ पायें हाणीतलेयां सीस नेणिजे :।। शोध :। ऐसें एकांनी–स्थान प्रसंसिलें :।।१९५।।

**आउ–अभ्यागत–निराकरणी म्हाइभटां सीक्षापणें** :।।: एकवेळ आउसि म्हाइभटातें प्रार्थिलें : माझें कांहीं घेयावें : ते म्हाइंभटीं निराकरीलें :।।: शोध ।: भटोबास अटना गेले होते : तेथ तेहीं आइकिलें : जें म्हाइंभट आउवेचें न घेतीचि :।। मग म्हाइंभट अटनि भटोबासातें भेटले : मग भटोबास कोपले : भटोबासी म्हणितलें : हां गा जे आउ पुढां पळे : आणि गोसावी बुझावेया पाठी लागति : आउवेचें अन्न स्वीकरीलेयावीन आरोगण न करीति : यैसी लाळीली : ताळीली : ते आउवेचें नेघीजे : तरि देवाचेंचि नेघीजे म्हणा : यैसी म्हाइभटाप्रति आउसांची प्रसंसा बोलिले :।। १९६।।

**तथा अनुतप्त म्हाइभटीं आउसां भोजन मागणें** :।। शोधु :।: येतुलेनि म्हाइंभट अनुतापले : मग भटोबासातें पुसौनि म्हाइभट मागौतें गेले : आउसांसि साष्टांग दंडवत घातलें : आणि म्हणीतलें : आउवे तुम्हीं मज जेउं घाला : तुम्ही म्हणत होतीति तें मीं जें नेघेचि : तें माझें अनुचीत हो : आतां घाला : आउमीं म्हणितलें : हो कां रे उठि उठि : म्हणौनि उठवीलें : तुम्हीं माझेया चक्रस्वामीचीया धुरा : म्हणौनि आउसी अन्न केलें : मग म्हाइंभटां प्रसादाचां पात्रीं वाढीलें : मग म्हाइंभट तृप्तिपर्यंत जेविले :।। शोधु :।: तें भटोबासीं आइकिलें : मग सुख जालें :।।१९७।।

**म्हाइंभटा देहावसान** :।।: एक वेळ म्हाइंभट अटना गेले होते : तवं अटनि तयांसि असक्ति उपनली :।।: शोधु :।: तेणेंचि प्रांतें उमाइसें आली होति : तवं म्हाइंभटांसि भेटि जाली : तयांतें म्हाइंभटीं म्हणितलें : उमाइ तुम्हीं मज ऋद्धिपुरासि नेयावें : तिहीं म्हणितलें : हो कां म्हाइंभटो : नेइन : मग उमाइसांपासि वांकि सांखळेयाची मुदी होति : ते तिहीं गाहाण घातली : मग मोलें दांडि करूनि रुधिपुरासि आणिलें : (माहाद्वारीं दांडी [1]उतरली : म्हाइंभट आले आइकौनि भटोबास साउमे आले :) माहाद्वारापासि भेटि जाली : भटोबासांतें म्हाइभटीं म्हणितलें : भटो निडळावरि पावो ठेवा : म्हणौनि भटोवासांचा पावो हातीं धरीला : भटोबासी

---

१ उभारली ख.

म्हणितलें : निडळावरि श्रीचरणु तो गोसावियांचा किं : मियां निडळावरि हातु ठेवावा कीं : म्हणौनि हातु ठेविला :॥: शोधु :ः मग जगतीआंतु आणिले : बरवियें ठाइ ठावो केला :॥ मग एकु दीसु म्हाइभटीं भटोबासातें म्हणितलें : भटो मज देवो होइल : तव यैसे येहीं कां म्हणितलें : म्हणौनि भटोबास नावेक उगेचि राहीले : तवं तेणें तयां अधिकचि दुःख वाटलें : म्हाइंभटीं म्हणितलें : मीं पापीया : मज देवो काइ होइल : म्हणौनि दुःख केलें : मग भटोबासीं म्हणितलें : म्हाइंभटो तुम्हासि दोहि देवांचे सन्निधान-दास्य : आणि तुम्ही ऐसें कां बोलीलेति : म्हाइभटीं म्हणितलें : भटो तुमचेनि मुखें अन्यथा न निगे की : भटोबासीं म्हणितलें : जैं गोसावी निवासां राज्य करित होते : [1]तैं तेथ तुम्ही महाजनांसरिसे आले [1]होतेति : आणि गोसावियांचे दर्शन नेघत गेलेति : तेव्हेळी मं यां कटाक्षूनि गोसावियांतें म्हणितलें : जी जी गोसावियांचा म्हांयां आला होता : परि दर्शना न येचि : यावरि गोसावीं म्हणितलें : न यो वां गा : येइल तैं तोचि येउ जाणैल किं : यैसा गोसावीं तुमचा निर्वचु केला : तुम्हां जरि देवो नव्हे : तरि कोण्हाहीं देव नव्हे : म्हणौनि तुम्हां देवो होइल : यैसें भटोबासीं निर्वचीलें : मग म्हाइंभटीं म्हणितलें : माझें काही वोखटें नेघावें : म्हणौनि हात जोडूनि निडळावरि ठेविले : आणि माझा निक्षेपु [2]चणाख्यपासि करावा : येतुलेनि म्हाइंभटांचे देहावसान जालें : मग भटोबासीं तेथ निक्षेपु केला :॥ शोधु :। भटोबास-मुख्य अवघेया थोर दुख जालें : मग तैसेचि भटोबास गंगातीरा निगाले :॥१९८॥

**गंगातीराप्रयाणि आउ चाल म्हणणें** :॥ भटोबास गंगातीरा निगाले : निगतां आउसातें म्हणितलें : आउवे गगातीरा चाल जाउं : तवं आउसीं म्हणितलें : न ये रे बा नागना : चक्रस्वामीविण ते गंगातिर तांबाजाळि जळताये रे : यैसें म्हणितलें : परि न येतिचि : मग भटोबास मढु नमस्करूनि निगाले : ॥१९९॥

**मार्गी परडकर गौराइदत[त्त] डोचें उदक–स्वीकारु** : ॥ परंडकर

---

१ तैं तेथ तुम्हीं माहाजनांतु तुमचा निर्वचु केला : सरीसे आले होते-ति : घ. २ मुळांत व खत 'चरणाख्यपासि' असा अपपाठ आहे. ग, घत शुद्ध पाठ आहे.

गौराइसें ::: [1]कवीबासांचिया वासना पोमाइसें :॥ नियें भटोबासांचीं सिष्यें : तेहीं नारियेळीं पाणि घालूनि मेने[णें] तोंड लिंपौनि परवंटी सा मास वाहीलें : प्रतीदीनिं एक फेडीति : एक भरीति : परि कव्हणिचि नेणति :॥ यैसा एकु दीसीं भटोबास मार्गीं जात असति : तवं तहान लागली : अवघेयांतें पुसीलें : कोण्हाजवळि पाणि आहे गा : आपुलाला उदकपात्रीं पाहीलें : तवं पाणि नाहीं : मग गौराइसांतें पुसीलें : गौराइ तुजपासि पाणि आहे : होय भटो आहे : म्हणौनि परवटीचा डो काढीला : भटोबासातें उदक संपादिलें : भटोबासी उदक घेतलें : आणि तो डो हातीं धरूनि म्हणितलें : हा पाणियें भरला डो : हे सा मास वाहाते गा : तें साही मासांचे स्वीकारांतु पडीले गा: तें अवघेयां आश्चर्य जालें : मग वसतीचेया गावां आले : ॥२००॥

**प्रतिष्टाना येणें** :॥ मग तैसेंचि भटोबास क्रमेंक्रमेंचि प्रतिष्टानासि आले : ॥ शोधु । प्रतिष्टान नमस्करीले : आणि सवेंचि निगों आदरीलें : ॥ तवं केशोबासीं म्हणितलें : भटो येथ राहों : भटोबासीं म्हणितलें : पैठण ऋधिपुरीचे भात मज वेळवति ना गा : येथ मज नमस्कारु घेववेति ना : म्हणौनि येथ मज बहुत दी वास्तव्य होववेना :॥ शोधु । मग एकु दोनी दीस होते : ॥२०१॥

**प्रतिष्टानीं भटाञा भास्करभटीं सन्यासीयां पराजयो करणें** :॥ [2]कवीबास :॥ एकु दासु कवास्वरी म्हणितलें : भटो सन्यासियांसि गोष्टि करूं : भटोबासी म्हणितलें : (भानभटो–ख, घ): तूं म्हणौनि नको करूं : तेचि पदन पाडीति तरि करो : परि तव एकु दीसु कोठें नेणों योग पुरला : कवीस्वरीं निरोतर केलें : सन्यासीया दैन्य जालें : ॥२०२॥

**तथा पींपळेस्वरां न वच म्हणणें** :॥ मग तियेचि काळीं कीं आणिक काळी जालें तें नेणिजे : एकु दिसु भटोबासी कवीस्वरबासातें म्हणितलें : भ(भा–घ)टो : तू पींपळेस्वरा न वच : परो कवीस्वरांसि अंतःकरणें जावें ऐसेंचि होतें : ॥२०३॥

**पींपळेस्वरीं कवीस्वर–चर्चा** :॥ एकु विद्वांस प्रतिष्ठानासि आला : तो सकल विद्वांसांसि तन वोरिलें : ऐसें ब्रीद पढवी : परि त्यासि कोण्ही

---

१ कवीश्वरांची ग. २ कवास्वरवास ग.

पुरे नव्हे : तो पींपळेस्वरीं पुराण सांघों लागला : भटोबासीं कवीस्वरांसि वारीलें होतें : परि कवीस्वरबास कव्हणा न कळत तेथ गेले : तव तो पींपळेस्वरीं पांडित्य करीत असे : सभा घन दाटली असे : कवीस्वरबास द्वारसंकेसि टेकूनि आइको लागले : तव एकि ठाइ (एकि) चूकि देखीली : आणि कवीस्वरीं म्हणितलें : अबध : अबध : अबध : तेणे म्हणितलें : यैसें सामोरे येइजो : कैसें अबध : मग त्यापासि गेले : बैसले : मग जो श्लोक वाखाणित होता तोचि त्याकरवि म्हणविला : मग म्हणितलें : हा पाठचि यैसा नव्हे : मग आपण म्हणितला : तो त्याचा कळांसि बैसला :॥ शोध : । मग म्हणितलें : आतां वाखाणा : मग तेणे वाखाणिला : तो कवीस्वरबासी वीतडीला : ॥ तणें कवीस्वरबासांतें म्हणितलें : आतां तुम्ही वाखाणा : मग कवीस्वरबासीं श्लोक वाखाणिला : तयांतें म्हणितलें : कां हा अर्थु आता जाला : तेणे म्हणितलें : होये जाला : कवीस्वरबासीं म्हणितलें : अर्थ नाहीं जाला : मग तोही अर्थ दूषीला : मग म्हणितलें : अर्थ तो ऐसा कि : म्हणौनि आणिकीपरा वाखाणिला : कां आता अर्थ जाला : ना होये जाला : मागौतें म्हणितलें : नाहीं जाला : यैसा दाहीपरी वाखाणूनि दाखवीला : ॥ शोधु : । येसें तयाचें अतःकरण चद्रमय जालें : सभेसि थोर आश्चर्य जालें : ॥ मग तेण विद्वांसें म्हणितलें : तुम्ही कवण : कवीस्वरबासीं सिघ्र वाक्येचि उत्तर दीधलें : हा श्लोकु म्हणितला : **केचित्खंडनगंडदंडितजगद्धोराधिपस्संस्फुरत् । तर्काखर्वकुगर्वपर्वतसमारूढा विमूढा भृशम् ॥ काव्याळापकळापकेळिकुशळा : श्रृंगारवीरावृता : । केचित्कृष्णकथासु सुंदरमतिस्तद्भास्करोऽहं कवि : ॥१॥** तो मीं कवि भास्करु : ऐसे सांघितलें : मग तेणें विद्वासें म्हणितलें : तुम्हीं मनुष्य नव्हां : तुम्ही येथचो अधिष्ठातो देवता मूर्तिधारी जालीं : माझा गर्व झाडावेया : तवं कवीस्वरबासि म्हणितलें : आम्हीं देवता नव्हों : आम्ही वेधवंती नागदेवभटांचे : यैसा तयांचा गर्व हरीला : मग बीढारा आले : ॥ शोधु : । मग भटोबासांपासि आपण सांघितले कीं नाहीं : हें नेणिजे : परि नगरजना थोर आश्चर्य जालें : ॥२०४॥

**निंबेयागमनि पुडती वास करणें** :॥ शोधु :। मग भटोबास निंबेयासि आले : मागुते निंबां राहीले : हें तिसरेनि येणें : आणि अटनिहूनि जाणें :

येणें : तें बहुत वेळां असे : ॥२०५॥

**विहीटेकारां गौराइसां सबंधूनि बोलावणें** :॥ शोधु :। विहीटेकारीं गौराइसी भटोबासापासि भीक्षा केली : एकु दीसु तियें भटोबासातें पुसौनि अटनासि गेली : अटन करीत करीतां विहीटेयासि गलीं : तेथ सबधियाचां गावि राहीलीं : केतुलेयां एकां दीसां तया साघातें होत। तियें भटोबासासि भेटावेया आलीं : तयांतें भटोबासी म्हणितलें : गौराइ कें वो : तियें म्हणितलें : तियें [1]संबंधियांचां गावि असति : भटोबासीं म्हणितलें : धर्मकारणें माहारवाडा तरि सबधु तो माहारवाडा : आणि तिचा धर्मु तो मी येथ असे : ते तेथ कां गेली : जा बोलावा : मग तियें गलीं : बोलावुनि आणिली : मग भटोबासी निरूपण केलें : प्रधानत्वें सबधाचे :॥ मग तिहीं म्हणितलें : भटो 'सेवट' केतुकियांतें म्हणितलें : भटोबासीं म्हणितलें : आपुलां गावींहूनि सात मंडळें सांडूनी जाइजे : यातें सेवटु म्हणिजे :॥ शोधु :। मडळ प्रदेशु :॥ यैसें भटोबासी निरूपण केलें :॥२०६॥

**काळाक्षरीं वेधु(-बोधु-)निराकरणः**॥ एक वेळ धर्मवार्ता-प्रसगीं भटोबासी म्हणितलें : हें शास्त्र आपुलीया युक्ति न घोकावें : काळाक्षरापासौनि वेधुःबोधु नाहीं : गुरुमुखें शास्त्रश्रवणा सबीजता होये : तें कां ना : स्वयं परमेश्वरु ब्रम्हविद्या देति : कां अधिकरणातें अधिकरूनि देति : म्हणौनि काळाक्षरीं वेधुःबोधु नाहीं :॥ शोधु :॥ एवं आपुलीया युक्तीं शास्त्र न अभ्यासीजे : जेथ शास्त्राचें मुख तेथ अभ्यासीजे : र्चचिजे : यैसें सांघितलें :॥२०७॥

**रजतमाश्रयें धर्महानि-कथन** :॥ एकु दीसु धर्मवार्ताप्रसंगें भटोबानीं म्हणितलें : राजसें : तामसें : जें मनुष्यें : तयांचा संसर्गु न करावा : विषयेरूप मनुष्यें : विषयरूप पदार्थ : यांचा आश्रो धरीलेया तात्काळिकचि धर्महानि होइल :॥ पाठांतर :। राजसां-तामसांचे रजतम : येमनेम शास्त्रें झाडावें : मग तयांचा संसर्गु करावा :॥२०८॥

**नागाइ-शास्त्रसंवाद-शोधनि उभयां लाभानुवादु** :॥ नागाइसें तियें भटोबासांची नाति : महेस्वरपंडिताची कन्या : तयांसि भटोबासांपासौनि श्रवण : अनुसरण : भटोबास सपरिवारीं वीजना जाति : आणि नागाइसांतें

---

१ सबंधियांचां ठाइ विहिटां ख, ग, घ.

बीढार राखावेयां ठेविती : भटोबास कांटियेचेनि भावें एकि रुइ प्रधान करूनि विजन करीनि : कदाचित एकाधीया खडकावरि बैसति : मग तेथ धर्मवार्ता होये : प्रहरा दीढा बिढारा येति : आणि नागाइसें पंडितां : केशोबासां : कवीस्वरबासांतें पुसति : आजि काइ काइ धर्मवार्ता जाली : मग ते जाली असे ते सांघति : तें नागाइसें भटोबासांसी जाउनि सवादनि : एकु दीसीं संवादिता नागाइसीं म्हणितलें : आजि हें पडिती ऐसें म्हणितलें : केशवें ऐसें म्हणितलें : कवीस्वरी ऐसें म्हणितलें : याउपरि भटोबासी म्हणितले : तयांसि म्यां ऐसें ज्ञान केले : आतां हें अपूर्व जालें : येणे उभया लाभु जाला :॥२०९॥

**तिर्यंच–अवतार–कथन** :॥ एकु दीसु भटोबासीं केशोबासां–पंडित-बासांप्रति म्हणितलें : देवगीरीसि सामान्य स्त्रीयेचां घरी रावा असे : तो ईश्वर–अवतारु गा : तवं केशोबासी पंडितबासीं म्हणितलें : भटो पाहों जावों : भटोबासीं म्हणितलें : नको जावों : श्रीप्रभूची सेवा आमुचां गोसावीं विहीली : म्हणौनि आम्ही केली : तो ईश्वर–अवतारु होये : परि विहीत नव्हे : ऐसें भटोबासी निरूपण करुनि निराकरीलें : ॥२१०॥

**अनृत्य[त]–भाषण–निषेधु** :॥ एक वेळ धर्मवार्ता-प्रसंगीं भटोबासीं म्हणितलें : सुहृदेसीं : गोत्रिजेसि : मार्गीचां परीवारीयांआदिकरूनि लटिकें न बोलावें : परि पुढीलाचा मरणप्रवेसीं : अभिळासीया : तामस हे वांचौनि : ऐसें निरूपिले : ॥२११॥

**बाइ–अटन–प्रश्नीं ग्रामेग्रामा–दर्शन–कथन** :॥ एक वेळ एकि बाइया अटना निगालीया : तेव्हेळी तिहीं भटोबासांतें पुसिलें : भटो अटन कैसें कीजे :॥ शोधु :। भटोबासीं म्हणितलें : गाउनि गावां जाइजे :॥ गावं गावांते सांघैल : भिक्षा करीता घर घरांते सांघैल : मग ते अटना निगालीं : ॥२१२॥

**बाइ–प्रत्यजित–शाकावग्रहणि अर्ध सुपीं अर्ध कुपीं म्हणणें** :॥ बाइया भाजीं निसीति : त्या पानें सांडीनि : कोवळे देंठ सांडीति : तवं ते भटोबास देखति : आणि तेथचि बैसौनि वेचीति : आणूनि बाइयांचां हातीं देति : आणि म्हणति : अर्ध कुपीं : अर्ध सुपीं : यैसें कां करीता वो : हेंचि माझे महात्मे खातिल : तरि स्मरणि दक्ष होतील :॥ शोधु :। मग तैंलागूनि

कव्हणि न संडी : सावधेया करीति : ॥२१३॥

**माहात्मेया नित्याटनि अवस्थान-संख्या-कथन** : ॥ एकु दिसु एकीं भटोबासांतें पुसिलें : ॥ शोध् : । भटो अटनि कोणा गावीं केतुका काळ असावें : ॥ भटोबासीं म्हणितलें : ग्रामेक रात्र : नगरे पंचरात्रं : आणि गोसान्नीं म्हणितलें : आपुलें श्रेष्टत्व : नष्टत्व : न प्रकासे तवंपर्यंत असावें : तेंहीं नमस्करूनि घेतलें : ॥२१४।

**ब्राम्हणा गोतु-निर्भर्षणि भिक्षा देणें** : ॥ एकु दिसु भटोबास वेदिकें वीजनि बैसले असति : तवं ब्राम्हणु एकु आला : तेणें आपुलेया कवीत्वाचा गीतु भटोबासांपुढां म्हणितला : मग पुसीलें : भटो गीतु कैसा जाला : भटोबासीं म्हणितलें : जेणें केला तयासि नरक होति : ऐसा जाला : मग तयासि निरूपण केलें : आणि तेणें तैसीचि भिक्षा केली : ॥२१५॥

**सारंगपडित-देहावसानीं उमाइसां भेटि : अनुसरण** : ॥ : प्रतिष्ठानि सारंगपडिताचे देहावसान जालें : मग उमाइसीं अवघि वेवस्था केली : ॥ : शोधु : । : सारंगपंडित असक्त होते : उमाइसें बाहीर गेली व्होतीं : बाहीरूनि आलीं : तवं तयांचें देह गेलें : आणि तैसेंचि चौकिचें कवाड घातलें : ॥ मग प्रमादाचा चौरंगु : आणि धानाइसें घेउनि भटोबासांपासि आलीं : ॥ निगालीं तो काळु सांघितला : ॥ मग भटोबासांपासि दोघीं भीक्षा केली : [1]कविबास : । धानाइसां भीक्षा करीतां भटोबासीं म्हणितलें : धानाये तुवां कांस साच केली : यैसें भटोबास तोखले : ॥२१६॥

**शास्त्राचार निरूपणें** :॥ एकु दीसु धर्मवार्ताप्रसंगें भटोबासीं म्हणितलें : अधिकरणें वरीष-संख्या निरूपीलें : मग पुरुषें विदेसीं आपणयां आपण राहावा करावा : नुमटे तें अधिकरणा येउनि पुसावें : कां आपणयाहूनि वडील असतील तयांतें पुसावें : सांगोपांग क्रिये काळु वाटूनि घालीजे : तें आचारीं विचारीं [2]निलळता नुपजे : यैसें निरूपिलें : ॥२१७॥

**अन्यदूषणश्रवणें केशवदेव-उपानहौ-त्यागीं 'तूंचि माझा महात्मा' म्हणणें** : ॥ : एकवेळ केशोबास : पंडितबास : कवीस्वरबास : हे मुख्य दोघचौघ मार्गीं जात असति : तयांतु केसोबासांचां पाइं वाहाना होतिया : येर अवघे अन्हवानी होते : तवं एकें वाटाउवें देखौनि म्हणितलें : हे अवघे

१ येथें ग मध्यें हाच शब्द—२ निनळता ख, घ.

भटमार्गीचे महात्मे होति : हा एकु नव्हे : याचां पाइ वाहाना आहानि : तें केशोबासीं आइकीलें : यैसा येतीं वाहानि मी भटमार्गीचा महात्मा नव्हे : म्हणौनि तेथचि तोडूनि सांडीलीया : मग येउनि भटोबासांपुढें सांघितलें : तयावरि भटोबासीं म्हणितलें : केशवद्या माझीयें मार्गींचा महात्मा यैसा तूंचि कीं : यैसे तोषले : ॥२१८॥

**भटां भिक्षायाचनि जनां वेधु** :॥: भटोबास भिक्षे जाति : भटोबासांचा भिक्षा शद्ब गुजरध्वनि [1]घोळिला उमटे : शद्ब आइकिलेयां रडतें लेकरुं हावरु सांडि : तोंडिचें स्तन साडूनि भटोबासाकडे पाहों लागे : कव्हणि दुःख भोगीतां आपुलें दुख वीसरे : एकां दर्शनें प्रसस्ती होति : भांडतें असति तयांचे रोख जाति : मग उभये गंगातारें भटोबासातें '**वेधवती नागदेवोभट**' म्हणति : यैसी प्रसीधि : ॥२१९॥

**साधां निरयेज्ञानें पुरुषु ज्ञान करणें** :॥: साधी कळकी नारायेणिचे निरये गोसावीं पाहाविले होते : तेणें तयांसि थोर दुख भरलें : मग गगातिरां आलीं : तें भटोबासांपुढां सांघितलें : यावरूनि भटोबासीं म्हणितलें : कळंक नारायेणि चौऱ्यासि नरकांचे भेद जयाचिपरी ईश्वरें पाहाविले : तयाचिपरी परमनिष्ठा पुरुषातें पाहावें : आइकावें : तेणें विरामु उपजे : अनुरागासि ये : यैसें साधांसि निरूपण केलें : ॥२२०॥

**दादोसां देहावसानि उपाध्यीं नाथोबाये सांभाळणें** :॥: दादोस पिपळगावीं होते : एकु दिसीं तयांसि थोर असक्ति आली : [2]आइकौनि उपाध्यबास : आणि नाथोबास सांभाळू [3]आले : उपाध्ये म्हणितलें : दादो मी कवण : दादोसीं म्हणितलें : तू जानो : उपाध्यबासिं म्हणितलें : दादो गोसावियाचें नाम आठवतें : तव रामदेवी म्हणितलें : नाम नामीयें ते तूं आणि तुझा नागदेवो कीं रे : तव उपाध्यबासीं म्हणितलें : हुं तथास्तु : आणि तैसेचि उठीले : निगाले : मग तयांचें देह गेले :॥ शोधु :॥: सोमनाथापूर्वें वोत तेथ तयांचां निक्षेपु : यैसी मार्गरूढि : ॥२२१॥

[4]**उपाध्यां देहावसान** :॥: एक वेळ उपाध्यांसि अशक्ति आली : तेणें तयांचें देहावसान जालें : कमळाइसीं बग्वा निक्षेपु केला : मग तियें तेथौनि

---

१ आळिला घ. २ अतृप्त घ. ३ ख, घ मध्यें हा मजकूर नाहीं. ४ ख, ग, घमध्यें ही स्मृति नाहीं. मागें क्रमांक १८३ वरील टीप पहा.

निगालीं : ते वालसयामि गेलीं : वालासां राहीलीं : तेथचि तयां देहावसान जालें ।। शोधु ।: हें भटांमागां ।।२२२।।

**नाथोबा लोहेदर्शनें अवकास करणें** ।।: नाथोबा कवणिये गांवि तें नेण्जि : एक वेळ एसे अवकासाकडे गेले होते : तवं तेथें लोहे उघडी पडलि होति : नाथोबाय देखीली : आणि म्हणितलें : आतां काये दीसतीसि : तैं सांपडतीसि तरि गोसावियांचेया विनयोगां नेतां : तैं सातरा पसरीला : तो मी नव्हें नाथो : म्हणौनि निचिवरि अवकास केला।। आणि निगाले ।। शोधु ।: तें भटोबासी आइकिले : तोखले ।।२२३।।

**नाथोबा–देहत्यागु : भुवनी निद्रा-स्वीकारु** ।।: भटोबास राक्षस-भवनासि आले : तवं तेथ नाथोबाचें देह गेलें आइकिलें : मग भटोबासीं म्हणितलें : जेथ नाथोचें देह गेलें : तेथचि माझें [1]आंथरुतें घाला गा : ते भूमिका सत्वस्थ : तेथ गोसावीं बीजें केलें असे : माझेया हृदयासि देवो येइल : घातलें : ।।२२४।।

**केशवदेवोद्यमें मार्गीं उपयोगानुवादु** ।।: (येथौनि पुढील आवघा क्रम् : [2]कविबास : ।।) एकु दीसु भटोबासी म्हणितलें : केशवद्या : माझेनि मुखें जें निरूपण तेथ सशयो नाही : परि मजमागां शास्त्र जाये ना ऐसें तुवा केलें : येणें शास्त्रें पुढां मार्गाचे झगडे तुटतील : ऐसी केशोबासांची (शास्त्र–)उहापोहा देखौनि भटोबासी प्रसंसा केली : ।।२२५।।

**अधिष्ठानसबंधें वडिलु म्हणणें** ।। एकु दीसु भटोबासीं म्हणितलें : मानापमाना पाप चुकवावेयालागिं त-ही आपणयांहूनि एकि चातुर्मासि वडिलु तो वडिलु कीजे : आपण तयां अधिन होइजे : येन्हवि अधिष्ठान–प्रयुक्तीं वडीलु तो वडीलु : आणि ज्ञानवृद्धवचनें सकळांपासौनि वडीलु : ऐसें अनुवादीलें : ।।२२६।।

**वीजन. भिक्षु दर्शनें दंडवत घालणें** : ।। एकु दीसु भटोबास मार्गीं जात होते : तवं एकु भिक्ष वीजनीं बैसला देखीला : आणि म्हणीतलें : आम्ही (देवो ग) देखीला : ।।शोधु : । : म्हणौनि प्रवर्तलों : हा न देखतेया देवाकारणें ।।: शोधु ।: कैसा बैसला असे ।: ऐसा तूं ।: ऐसें म्हणौनि दुरौनि दंडवत घातलें : तोखलें ।।शोधु ।: मग भेटि जाली : ।।२२७।।

---

१ आंथरुण ख, ग, घ. २ कवीश्वरबास ग.

**धर्मवार्ताश्रवणें ब्राम्हणा वेध–सचारु : भिक्षाप्रदान** :॥ एकु दीसु भटोबास मढांतु बैसौनि आपुलेया सिष्यासि धर्मवार्ता करीत होते : थोरी घे–दे होत हीती : तवं वीद्वांसु एकु मढाबाहीरि आइकौनि उभा ठाकला : तो आइके आणि तेविचि म्हणे : भटी यैसें निरूपीले : तरि आतां भटांचे सिष्य कैसें म्हणतील : तवं तयांसि उत्तर देउं सरलें : आणि तो आपणेयां आपण यैसी यैसी मान हालवी : यैसे येरयेराचा बोलना प्रहरु एकुपर्यंत वेधौनि मान हालवीली : तव धर्मवार्ता पुरे जालीं : मग भितरि आला : भटोबासां साष्टांग दंडवत घातलें : सिष्यत्व अंगीकरूनि म्हणितले : भटो तुमची तरि जिज्ञासा : परि आम्हां उपदेश जाला : मग तेहीं तैसीचि भिक्षा केली : ॥२२८॥

**आश्चर्यार्थ तन्हीं अनुसरा म्हणणें** :॥: एकु दीसु धर्मवार्ताप्रसगें अपूर्व सीधांत–प्रतीष्टा बोलीलि : आणि अतिं म्हणितलें : जीवोद्धरण–वेवस्थेची देवाचां आर्ती नन्ुसरवे : तन्ही आत्मदशनार्थ तन्ही सकळ लोक आश्चर्याकारणें अनुसरीजो कां : यैसें म्हणितले : ॥२२९॥

**केली क्रीया वायां न वचे म्हणणें** :॥: एकु दिसीं भटोबासीं म्हणितलें : ये मार्गी केली क्रीया इउलीही वायां न वचे : एकां अनधिकार निवृतीकारण : एकां अधिकारा कारण : एकां आर्ति कारण : एकां सन्निधि कारण होए : ॥२३०॥

**धडवस्त्र–निषेधें भिक्षेचें अन्न–वस्त्र–प्रसंसा** :॥: एकु दीसु भटोबासीं म्हणितलें : धड वस्त्र न पांगुरावें : थिगळांचें प्रावर्ण : भिक्षेचें अन्न : यें दोन्हीं अवीटे गा : येणें बहुत चुके : ॥२३१॥

**उजनिये अवस्थान–श्रवणें : आज्ञा वीशेषु पाळणें** :॥: एकु वेळ एक उजनियेहूनि आले : तेथ गोसावी राज्य करीताति यैसें तेही सांघितलें : तवं एकीं म्हणितलें : भटो तरि तेथ जावों : भटोबासीं म्हणितलें : हां गा पिस्या पिपळगावों काइ दुरि : परि गोसावीं आज्ञा केली असे : ते आज्ञाचि पाळिलेयां तोख आति : मग ते उगेचि राहीले : ॥२३२॥

**लक्ष्मीधरबा–अनुवादें अनिष्टत्यागिं स्वल्पाचारें ईश्वरगति मानणें** :॥: एकु दिसु भटोबास बैसले असति : लक्ष्मीधर–मुख्य अवघेचि माहानुभाव घनदाट आस्थानि बैसली असे : तवं धर्मवार्ता-प्रसगी लक्ष्मीधरबासि बोलिलें :

हे तीन्ही निषेध चुकवनि :॥: एकी वासना : हे च्यान्ही निषेध ज्या न घडेति : ॥ : त्या स्वल्पधर्मानुष्ठानेंही ईश्वर होये : यैसें लक्ष्मीधरबासीं बोलिलें : तें भटोबासी मानिलें :॥ शोध :ः चोथा निषेध तो देवतेचा [1]क्षेदु : ॥२३३॥

**परस्परें सांघातु-निष्ठानुवादु** : ॥ : एक वेळ धर्मवार्ताप्रसगें भटोबासीं म्हणितलें : वडिलें धाकुटेया सांघातु द्यावा : धाकुटेंनि वडिलांचा सांघातु करावा : येर येरां रक्षण : म्हणौनि सांघातु द्यावा–करावा : ॥ हे स्मृति आनोबासि आइकोनि जिवीं धरीलीचि होति : मग इयेचा विनयोग आनोबासीं दाखवीला : जें आइकीलो तें वासनिक होते : मग भटोबासांमागां भिक्षा केलेयां यैसा एक दीं : एके गावीं निद्रासमै आपुलेया सिष्यांतें म्हणितलें : मजभवतें तुम्ही निद्रा करा : मज तुम्हीं रक्षण : मी तुम्हां रक्षण : एकमेकांचेनि सांघातें धर्मु सीधी नैवों : म्हणौनि निद्रा केलीया :॥२३४॥

**उजळनें-मैळनें-अनुवादु** :॥: एकु दीसु धर्मवार्ताप्रसंगें भटोबासीं म्हणितलें : एकांकी पुरुषु आचारु करितां त्रसें मैळे :ः अधिकरणाजवळि उजळे : तैसेंचि बहुतामाजि जीज्ञासीतां उजळे : आणि निलळतेतवं मैळे : तो एकांकी आचारें उजळे : हें जें क्रिया काळपरत्वें वांटली होयें : तें दाहें प्रकारों उजळे : ॥२३५॥

**शास्त्रस्थळनियेमे अर्थनिष्पत्यनुवादु** :॥: तरि प्रकरणावरूनि भटोबासीं म्हणितलें : श्रुतीचा अर्थु श्रुती निर्वचावा : लीळेचा अर्थु लीळे निर्वचावा : दृष्टांतांचा अर्थु तो दृष्टांतें निर्वचावा : गीतेचा अर्थु गीते निर्वचावा : भागवताचा अर्थु भागवतें निर्वचावा : एकु अर्थु तो अवघांचि निर्वचावा :॥: शोधु :ः एव जे स्थळिचें ते स्थळि तया प्रकरणानुरूप निर्वचु : ऐसें सांघितलें :॥२३६॥

**धर्मवार्ताप्रसगीं केशवदेवीं कवीस्वरां कोपणें** :॥: एक वेळ भटोबास धर्मवार्ता करीत असति : तिये धर्मवार्तेसि प्रधानत्वें भटोबास : कवीस्वरबास बोलत असति : आक्षेप-परिहारीं थोरी चर्चा केली : तयावरूनि केशोबासीं कवीस्वरबासांतें म्हणितलें : भटो अधीकरणेंसि इतुकें वाढवीतां दूषण असे :

1 खेदु ख, ग, घ.

अधीष्ठानिंची प्रसन्नता जाये : यैसीयापरी काइ अर्थसीधि होइल : भटोबासांचें बोलणें ईश्वरवाणि कीं : तें आइकीलें तैसें सिरसा नमस्करूनि घेयावें : न परीसवे तरि आपणचि विमर्शावें : मग अनधिकार निवर्तलेयां काळेंकरूनि उमटैल : यैसें कवीस्वरां केशोबास कोपले : ॥२३७॥

**गतिगोंदोबा श्रवण** :॥: गति गोंदोबा ते कवीस्वरबासांचीं नागाइसें तयांचे आजे : ते रामपुरीयेंमि असति : एकु दीसु तयांसि भटोबासांपासौनि श्रवण जालें : एक म्हणति : भीक्षा केली : ॥२३८॥

**वेधाचार्ये-श्रवणें वीद्वांसाउद्ग्रहणिके भिक्षा देणें** : ॥ : वीद्वांसु एकु तेणें म्हणितलें : हे कैसे पां वेधवंती नागदेवोभट : म्हणौनि दर्शना आले : भटोबासीं थोरि चर्चा केली : भटोबासीं निरुत्तर केलें : तेणें म्हणितलें : होति वेधवंती नागदेवोभट : तेव्हेळींसीचि सर्वसंगपरित्यागु करूनि भिक्षा केली : ॥२३९॥

**मात्रा-शद्ब-समर्थन** : । वैयाकरण-निषेधें युक्तित्रयें निराकरणीं चतुर्युक्ति पर्यायें ईश्वरोक्ति '**असतीपरी**'मध्यें मात्रा शद्ब केशवदेवो : पंडितांप्रति समर्थन : ॥ हें यथाप्रती : ॥२४०॥

**हीराइ विरक्तां कसवटी म्हणणें** : ॥ हीराइसें तियें पंडितबासांची : तियें भलतेथ भलतया चुकी सांघति : आचारु सांघति : भलतीये क्रीये थोरि [1]कसकस करीति : तें आइकौनि भटोबासीं म्हणितलें : हीराइये विरक्ताची कसवटी गा : इचां कसीं उतरला तो वीरक्त : ॥२४१॥

**भ(भा-घ)टो श्रृंघारीया कवी-कथन** : ॥ एकु दिसु काइसेयावरूनि तें नेणिजे : भटोबासीं कवीस्वरबासांतें म्हणितलें : भ(भा-घ)टो : तूं श्रृंघारीया कवी : यैसें प्रसंसीलें : ॥२४२॥

**वरवडाची क्रीया भितरा येइल म्हणणें** : ॥ एकु महात्मा तेणें असिका भिक्षु-धर्म सांडिला : वेषु उतरीला होता : तवं एकिं म्हणितलें : हा धर्मापासौनि गेला : भटोबासीं म्हणितलें : निषेधु न सेवितां वेषु असे : तवं नाहीं गेला : वरवडाची क्रीया भितरा येइल : ॥२४३॥

**वीष्णुदास नामदेया पंडितमुखें वेधु-संक्रमण** : ॥ एकु दिसु नामदेव [2]सींपा पंडितबासांसि भेटला : चर्चा केली : पंडितबासीं खंडिला : मग

---

१ कशाकशि घ. २ ख, घ, मध्यें हा शद्ब नाहीं. गत आहे

उपदेसु मागों लागला : परि नेदीतीचि : मग कृष्ण-अवतारावरि बुधि आणिली : मग तेणें '**दिस गेले वायांवीण**' यें पदें केलीं : ।। एकी वासना : कवीस्वरबासीं खंडोला : तैसाचि केमद्या : ।।२४४।।

**मान्यता : संग्रहोया पुरुषा शास्त्र-सवादा बैसों नेदा म्हणणें : ।।** एकु दिसु कवणा प्रकरणावरूनि तें नेणिजे : भटोबासीं केशो-पंडितादिकातें म्हणितलें : मान्यता आणि जाणिवेया संग्रहो : हें जया असे : तो शास्त्र-सवादा बैसों नेदा गा : तें अवघेयां मानलें : ।।२४५।।

**गंगातिर आचारनिष्ठें कन्यासून-दृष्टांतु-कथनीं सासुरें अनुवादु : ।।** शोधु : । हे एकी । : केशोबासांचीया [1]वासनावरूनि : भटोबासीं म्हणितलें : वराड माहेर : गंगातिर सासुरें गा : ।। शोधु : । येणेंकरूनि येथ जैसा धर्मु सीधि जाये : तैसा तेथ न वचे : ऐसें सांघितलें : ।।२४६।।

**म्हाइंभट-दास्या 'होड घाली' म्हणणें : ।।** एकु दिसु भटोबासी म्हणितलें : म्हाइभटातें श्रीप्रभुदास्यावेगळें जो दाखवी : तयांसि मी '**महावाक्य**' वाखाणिन : ।। हें यथाप्रति : ।। हे स्मृति श्रीप्रभुगोसावी असतां ऋद्धिपुरीं जाणावी : चरीत्री मांडीतां न यें : म्हणौनि निंबा घातली : ।।२४७।।

**आचरतेया पुरुशा शाब्दींचि अपरोक्ष म्हणणें :।।** एकु दिसु कवणा प्रकरणावरूनि तें नेणिजे : भटोबासीं म्हणितलें : आचरतया पुरुषा शाद्वीचि अपरोक्ष गा : :।।२४८।।

**वीशेष चरीतार्थी जीवु अवताराचा म्हणणें :।।** एकु दिसु भटोबासीं म्हणितलें : वीशेष चरीतार्थ जालेया मग जीवु अवताराचा : आणि अवतारु जीवाचा गा : ।।२४९।।

**वचनार्थ-अन्यथात्वीं वचन-प्रतीत[ति] म्हणणें :।।** एकु दिसु भटोबासीं एका प्रकरणावरूनी म्हणितलें : वचनरूप परमेश्वर : तें जें वचन अन्यथा वाखाणिजे : तरि तो तया वचनरूपा परमेश्वराचा पतीत बोलिजे : तो ईश्वरु तेणें दुरावीला गा :।।२५०।।

**घटीकेचीया जिज्ञासा अटनचरीत म्हणणें :।।** (एकु दिसु) एक

---

१ मूळांत 'वाहाना' शद्ब आहे, तो संदर्भ व ख, ग, घ मधील पाठ यांवरून चुकीचा दिसतो.

महात्मे अटना निगाले : तय तें भटोबासीं म्हणितलें : राहा : आजि अटना नको जावों : आजि धर्मवार्ता होइल : मग ते राहीले : तवं अपूर्व धर्मवार्ता जाली : मग तयांतें भटोबासीं म्हणितलें : घटिकेचीया जिज्ञासा तुझें अटन अववेंचि [1]चरीत होइल :॥२५१॥

**अनुसरण-निर्धारीं ईश्वरगति-निर्वचु** ॥ एकु दिसु धर्मवार्तामिमै भटोबासीं म्हणितलें : तोंडि तांबुळ माथां फुलें : यैसा उपभोगी अनुसरणा निगे अणि तेधवांचि सरे : तया नाचरतांचि ईश्वरगति गा :॥ शोधु : यावरि सामान्य स्त्रीचा दृष्टांतु वाखाणे :॥२५२॥

**केशवादिकां अनुद्यमीं होड-अनुवादु** :॥ एकु दिसु केशोबास : पंडितबास : राघोभट : शास्त्र संवादत होते : तें देखौनि भटोबासीं म्हणितलें : केशव:पडित : रामातें शास्त्र-संवादेवीण जो उठितां : बैसतां रिकामेया दाखवील : तयासि होड [2]करीन गा : यैसें प्रसंसिलें : आणि एकत्र तीघांतें सारिखेनि वर्तणें : उठितां : बैसतां देखति : तेधवाही ऐसें म्हणति : एकि मूर्ति त्रय भागा : राम : पडित : केशवद्या : (हे इतुकें [3]कविबास) :॥२५३॥

**नौगावीं महादाइसा देहावसान** :॥ महादाइसें नौगावीं होतीं : एकु दिसु तयांसि खांडूकनिमितें अशक्ति उपन्नली : तें आइकौनि भटोबास निबाहूनि सांभाळावेयां आले : भटोबासांसी भेटि जाली : भटोबास काही उपाव करीत होते : तवं महादाइसीं म्हणितलें : नको नागदेया : मी वांचे ना : मग भटोबास न करीतीचि : मग एकु दिसु बहुत राहीलीं : भटोबासीं पुसिलें : रूपै : देवो आठवतो : हो नागदेया : आठवतो : भटोबासीं म्हणितलें : कैसा आठवतो आइ : महादाइसीं म्हणितलें : श्रीमकुटावरि फुटा : वारीतुरंगवज्री घडित असति : म्हणौनि बेलोपुरीचि क्रिडा सांघितली : यावरि भटोबासीं म्हणितलें : रूपै : देहपर्यंत उचीत स्मरण न चुकसीचि : पहीलेया दीसापासौनि सेवटील दीसपर्यंत देवो तो तुवांचि आठवीला : आणि भटोबासांसि दुख उपन्नलें : येनुलेनि महादाइसां देहावसान जालें : नौगावीं निक्षेपु केला : भटोबामीं म्हणितलें : म्हातारी धर्मरक्षक : प्रीतिरक्षक : सुहृदत्वें दुख-निर्वेदु : यैसें अनमोदूनि

१ चरितार्थ ख, ग, घ. २ सारीन ख, घ. ३ कवीश्वरबास ग.

दुख केलें : मग निब्रेयासि आले :॥२५४॥

**हीराइसां–सिक्षार्पणि गौराइसां मार्गाभिमानु–कथन :॥** कवणे हीराइसें तें नेणिजे : परि वामनिकें : एकु दिसु उंबरी गौराइसें अटनवीशेषें तयासि भेटावेया गेलीं : तव आंगणि चणयांचे गनंग वाळों घातले देखिले : मग गौराइसीं (म्हणितलें :) हें यैसें काइ हीराइये : म्हणौनि सिक्षापीली : तें भटोबासीं आइकिलें : आणि म्हणितलें : महादाइसांमागां : गौराइयेसि मार्गाचा अभिमानु असे :॥२५५॥

**भटोबासां ज्वरागमनिं पंडित–सया [शय्या–घ]–स्वीकारु :॥** एक वेळ भटोबासांसी ज्वरु आला : पंडितबास एकि पाट–बाज विकत घेउनि आले : बरवे आंथुरीलें : भटोबासां म्हणितलें : भटो यावरि निद्रा करावी : भटोबास उगेचि निजले : ॥२५६॥

**मार्ग-सिंहावलोकनें ज्वर–निवृति :॥** मग तिसरा दीसीं भटोबासीं म्हणितलें : आजि माझेया ज्वरासि कीती दी : पंडितबासीं म्हणितलें : आजि तीसरा दिसु : भटोबासीं म्हणितलें : मज गोसावीं अधिकरण केलें : तरि जें म्यां पंडित : केशवद्यासि सांघितलें : तेंचि सेवटीये म्हातारीसि सांघितलें : मज ज्वरु कां आला : तें मी नेणें : म्हणौनि सींहावलोकन केलें : केशोबासीं म्हणितलें : भटो काहीं भये नाहीं कि : भटोबासीं म्हणितलें : ना गा पडिता नाहीं : येतुलेनि अवघेयांसि सुख जालें : मग भटोबासीं म्हणितलें : कव्हणि बोलों नको गा : उगेचि असा : मीं गोसावियांची लीळा आठवीन : मग पंडितबासि अवघेयांतें वारीलें : [1]मग कैसें आठवीलें तें नेणिजे : निवांत उगेचि राहीले : आणि म्हणितलें : हा मी श्रीचक्रधराचा वानरा : म्हणौनि आंग मोडूनि '**श्रीचक्रधरु**' म्हणौनि थोरें शद्बें उठौनि बैसले : इतुलेनि [2]निशेष ज्वरनिवृति जाली :॥ शोधु :। केशव : पंडितादिकां थोर सुख जालें : ॥२५७॥

**पंडितीं स्वप्नश्रवण :॥** एकु दिसु पंडितबासीं स्वप्न देखीलें : मढा-बाहीर कोंणि खळीवं (चोळी) साउला : मोकळे केश : यैसी स्त्री एकि मढाबाहीरि : पौळीचां कोंणि : आतां काइ करीन वो : यैसें पुनः पुन शद्बीं रडों लागलीं : ते शद्ब पंडितबासांचां कानि पडति : कैसे काइ पां

१ मां घ. २ विशेष ख, ग, घ.

देखीलें : म्हणौनि गजबजौनि उठीले : बैसले : तवं ते शद्ब कानि पडतचि होते : मग तेथ जाउनि पाहीलें : तवं प्रकासु देखीला : येर कोण्ही नाहीं : मग येउनि बैसले : उदयांसीचि भटोबासांपुढें सांघीतलें : तरि भटो म्यां कैसें काइं देखीलें : यावरि भटोबासीं म्हणितलें : आतां मज गोसावियांचा हाकारा येइल : ते ये स्थळींची देवता : तुम्हां सूचीक दाखवीलें : ॥ शोधु : । तवं अवघेयांसि दुख वाटलें ॥२५८।

**ज्वरागमनि भटिं गुरुकुळीं क्षेमानुवादु** : ॥ एकु दिसु भटोबासीं म्हणितलें : आजि मज गोसावियांचा हाकारा यइल गा : तवं पंडितमुख्य : अवघे गजबजीले : कोण्ही काहीं निरुवणुकेचे पुसे : भटोबासीं म्हणितलें : हें यैसें मज पुसों नको : काहीं मज '**निर्वचन**'–'**महावाक्य**'–'**उधरणी**'चें पुसा : मग पंडित पुसति : भटोबास निरूपिति : मग केतुलेनि काळे म्हणितलें : पंडिता : आतां पुसों नको : आतां अति सम्येक वर्तत असे : आतां तुम्हां पांचांस्या गुरुकुळातें हात जोडूनि म्हणत असें : गोसावियांचा व्यापारु चालवितां कोण्हा माझें वेकाज गेलें असैल : तरि तुम्हीं समस्तीं क्षेमा करावी : यैसें म्हणौनि जये केलें : ॥२५९॥

**भटोबासां ईश्वरदर्शन** :॥ मग भटोबासीं म्हणितलें : आतां कोण्ही बोलों नको : रडों नको : अवसान जालेयां पाहार दीं हात लावूं नको : आतां मी श्रीचक्रधरा बाइसांचेया देवातें आठवीतों : ऐसें म्हणौनि निर्जले : आणि निगाले : ॥ मग वासनिकिं वीमान केलें : विमानिं ताट-तांब्रीये लाविले : वोवाळनियां घातलीया : वाद्यें लावीलीं : यैसे गंगेचिये थडिये आनिले : योगु–संस्कारु केला :॥ [1]शकें ॥१२२४॥ सुभकृत नाम संवत्सरे : ॥ : भाद्रपद वधि द्वादसि : भटोबासांसि ईश्वरदर्शन जालें : बतीसां वर्षीं अनुसरण : च्यारि वर्षें गोसावियांचे सन्निधान : त्यांतु सा मांस श्रीप्रभूचां सन्निधानि। मग गोसावियांमागा श्रीप्रभूचां सन्निधानि वर्षें १४ : मागां वर्षें १६ : येसें सा(स)टि वर्षें राज्य केलें : लीळादानिचें आयुष्य ३४ वर्षें : ॥२६०॥

**भटां वियोगीं पंडितीं धुवा करणें** :॥ मग तेथचि गंगेचिये थडीये किं

---

१ घमध्यें येथून तों 'लीळादानिचें आयुष्य ३४ वर्षें' येथपर्यंत स्वतंत्रच स्मृति धरली आहे.

मढीं येउनि हें नेणिजे : पंडितबासीं वियोगीं धुवा केला :॥ **श्रीप्रभूचे चरण** सेविले : तेणें तनुमन चोखाळलें : त्रिभुवन जेणें केलें : पावन :॥ आइका तयाची संगती : बोध पातले नेणों कीती : सहजानंदें संचरे [1]अस्तीति : तो खेळे [2]खीती अवधूत : ॥१॥ धृ :॥ सांडूनिया मोहजाळ : निजरूप धरूनि निर्मळ : देवरायाचा मर्गळा : तो जाला प्रपंचावेगळा :॥ सारासार जाणितलें : म्हणौनि हेळातें सांडोलें : तारक एकु दृढ धरीलें : मन लया गेलें : तियें स्थानि : इंद्रिया मोहर जाली तेउति : वेगळा होउनि निज प्रकृति : ब्रम्ह-विद्येचीया संगती : कैवल्यपती टाकीयेला :॥२॥ कर्में सांडीयेलीं अशेषें : कृपा केली परम पुरुषें : म्हणौनि न बाधी(जे) भवदुःखें : परम संतोषें भरीतु जाला :॥ रिधि वोळगति जयातें : तो परमयोगी सिध[द्ध] गुप्तें : अधीकरीला आदिनाथें : तो जीवातें निववीत :॥३॥ ध्याइलें रूप जें पर : निर्गुण ब्रम्ह जें अपार : निराकार जालें साकार : जीवोद्धरण–हेतु :॥ आइका तयाचीया सहज दीप्ति : प्रकासली आत्मस्तीती : मग निश्चळ राहूनीयां येती : परम गती टाकीयेली :॥४॥ निरोपीतु (परपथु) : कथा-वेया गुरुसंकेतु : परमार्गु प्रकटितु : तो जीवनमुक्तु होउनीया :॥ श्रीचक्र-धरुरावो वोळगीला : तेणें पुढारु साचु केला : नागार्जुनु आफावीला : जवळां केला : [3]चरणकमळा :॥५॥२६१॥

भटोबासांचे गुरुभाउ आणि पक्षें एकें सिष्य : ते वीरहे लक्ष्मींधरभट १ : कोथळोबा २ : पोमाइसें ३ : वैराग्यदेव ४ : मग केवळ गुरुभावंडें : बाइसें १ : सांतिबाइसें २ : महादाइसें ३ : म्हाइभट ४ : साधें ५ : आउसें ६ : नाथोबा ७ : माता आबाइसें ८ : खेड ९ : गोइ १० : यें सन्निधानीं अनुसरौनि गुरुभावंडें : आतां ननुसरौनि गुरुभावंडें : दाइंबा १ : देमाइसें २ : उपाध्ये ३ : तयांतु दोघीं बोधु हारवीला : उपाध्ये गोसावीयां मागां भटोबासांजवळी अनुसरले : दादोस तरि इतर दर्शनि : येरे अवघीं दर्शनियें : तयांतुही केतुलीं एकें भटोबासांजवळी श्रवण होउनि अनुसरलीं : तियें अवघी आणि आणिकेही अपूर्वें सांघिजति असिजति :॥

---

१ 'अ' निरर्थक; स्तीति ख, ग, घ. २ क्षीती घ. ३ ग्रंथाच्या अगदी अखेरीस पुरवणीवजा आलेलें '**पवीत्रा देशाचां अंतरीं**' हें पद्य गमध्यें यानंतर 'शोधु' असें म्हणून नमूद केलें आहे.

# वृद्धाचार

गोसावीयांची श्रुति : अधीकरणाची ते स्मृति : आरुतें वृधाचारुः तेही आतां सांघीजति : ॥ आतां वृधाचारु : ॥

**भटोबासांचां वीयोगीं महेस्वरपंडिता व्यवहारीं माइदेवपंडितीं जयेपत्र घेणें :॥** भटोबासांचा विभाग आइकौनि भटोबासांचे वडिल पुत्र महेस्वरपंडित आले : तेहीं पंडितबासां–केशोबासांतें म्हणितलें : भटांचें धन असे ते द्यावें : तव पडितबासीं केशोबासीं म्हणितलें : ते महात्मे निवृत्त : त्यांतें कैंचें धन : तव महेस्वरपंडितीं म्हणितलें : नाहीं कैसें : आहे तें मी जाणतु [१]असें : मग केशोबासीं पडितबासीं म्हणितलें : असालें तरि निवृताचेया धना तुम्ही प्रवृत न पवा : तवं महेस्वरपडितीं म्हणितलें : न पवे कैसा : न्याया चला : मां न्यायें होइ(ल) तरि द्या : तवं तेहीं म्हणितलें : न्याया तरि रायेरा–नांदेडा चला : ना यैसें तरि नासिका–त्र्यबका चाला : मग केशोबासीं म्हणितलें : माइभटो तुम्ही यांसि न्यावो सांघो जा : महाजन देतील तें पत्र घेउनि या : हो कां : मग माइभट महेस्वरपंडित न्याव सांघावेया निगाले : मग वाटे जातां जेथ राहाति तेथ माइभट महेस्वरपडिताची श्रमनिवृति करीति : पाये धूति : भिक्षा करुनि बरवें जेउ घालीति : महेस्वरपंडित म्हणति : तुम्ही ऐसें काइं करीता : मज बळवंडें पाप घडवीता : तवं माइदेवभट म्हणति : तुम्ही गोसावीयांचेया संबधाचे : आम्ही आपुली प्रसादसेवा करीतों : तुम्हां पाप काइसे : यैसीयापरी पेणि दोनि : च्यारि गेले : मग महेस्वरपंडितीं म्हणितलें : मी पापीया : तुम्हां वीष होउनि प्रवतला : आणि तुम्ही अमृत होउनि प्रवर्तलेति : आतां म्यां हारवीले : तुम्ही जीतीलें : आतां तुम्हीं गावां जा : तव माइभटीं म्हणितलें : मज पत्रेंवाण जावों नए : मग एकी गावीं संन्यासी महाजन बैसोनि महेस्वरपडितीं जैतपत्र दीधलें : मग महेस्वरपंडित माइदेव-

१ यापुढील काही वाक्यं क पोथीत मागें–पुढें झालीं आहेत. ख' ग, घ वरून त्यांचा योग्य क्रम कायम केला आहे.

भट उभेवर्ग पंडितबासां-केशोबासांपासि आले : मग महेस्वरपंडितीं म्हणितलें : मी चुकलां : तरि तुम्हीं माझेया अपराधां क्षेमा करावी : म्हणौनि समस्तांसि साष्टांग दंडवत घातलें : आणि माइदेवभट मज अमृत होउनि प्रवर्तले : तरि तुम्हीं समस्तीं आजिलागौनि यांतें **'अमृते माइभट'** यैसें म्हणावें : तेलागौनि **'अमृते मायांबा'** यैसें म्हणति ::।।१।।

**तथा महेस्वरसुतां अनुसरण** : ।। महेस्वरपंडितांचे पुत्र : धनेस्वरभट : चक्रपाणिभट : लखुदेवभट : जाइदेवभट : यैसे चौघे : तयांतु लखुदेवोभट जाइदेवभट हे जावळाचे : पंडितबासीं यांसि **'नारद-तुंबरु'** यैसें नांव ठेवीलें : मग येही चौघीं भिक्षा केली : भटोबासांचेनि नावें : तें उबरवटाची पातूली चक्रपाणिवासांसि दीधली : कवीस्वरी भिक्षासमै : ।।२।।

**भटोबासां जन्मप्रदायेनीं पडितीं देमाइसां स्वप्नप्रतिभिज्ञा करणें** :।। कटक देमाइसीं स्वप्न देखीलें : जें गुजरातें खांबाइतीं भटोबासांसि जन्म जालें : सोनया-मोतीयांचा पाउस पडिला : गगनीं दुंदुभी वाजिनलीया : देवीं पुस्पवर्षावो केला : यैसें स्वप्न देखीलें : मग उदेक देमाइसीं पडितबासां-केशोबासांपुढां सांघितलें : मग पंडितबास केशोबास विजना निगाले : तवं वोरंगळीचे व्यवहारे खांबाइता जात होते : त्यांतें केशोबासीं पुसीलें : तुम्हीं कवणा ठाया जाता : तवं तेही म्हणितलें : आम्हीं खांबाइतां जातों : तेथ आमचेया सोइरेयांसि पुत्रु जाला : त्यांचेया बारसयाकारणें जातों : काइ सांघों तया बालकाचें आश्चर्य : नव मास तिये मातेसि निरोध नाही : प्रसूतसमै उपद्रो नाही : जन्मला तेव्हळि मोतीया-सुवर्णाचा पाउस वरीखला : देवीं पुस्पवर्षावो केला : गगनीं दुंदुभीं व्राहाटोलीया : यसी गोष्टि आइकौनि पंडितबास केशोबास बिढारा आले : आणि म्हणितलें : देमाइये देमाइये : तुझें स्वप्न साच जालें : मग केशोबांही म्हणितलें : **यस्मिन् देशे वसेत् ज्ञानी योगी स्वाध्यात्मचेतस: । तन्मंडळं पवित्रं च 'प्रयाति निमिषाद्-'ध्रुवम्** ।।१।। तवं देमाइसें म्हणों लागली : तरि मी तेथ जाइन : पंडितबासीं म्हणितलें : तुम्हां तेथ जावों नये : तेथ रिगावा कोठें : भेटि कोठें : ऐसें

१ सर्वोपद्रववर्जितम् ।। **घ.** हाच श्लोक मागें स्मृति ८७ मध्यें आला असतां **घ** पोथींत हा पाठभेद येत नाहीं. **ख, ग** मध्यें या ठिकाणीं हा श्लोक पहिल्या दोन-तीन अक्षरांपुरतांच दिला आहे.

बहुत दूषण दावूनि वारिलें : ॥३॥

**पडितीं 'वत्साहरण' करणें** : ॥ पडितबासीं 'वत्साहरण' केलें : तेथ अभंगीं सौजन्यें केशोबासातें घातलें : तयापुढें म्हणितलें : तेहीं थोर प्रसंसिलें : ॥४॥

**भटोबास–निक्षेपस्थानीं गोपाळपंडितीं प्रसादकरणीं कविस्वरीं निराकरण** : ॥ एकु दीसु गोपाळपंडितीं म्हणितलें : कवीस्वरहो : भटोबासांचिया निक्षेपावरि देउळ करूं : कविस्वरबासी म्हणितलें : नको पंडितो करूं नये : म्हणौनि बहुत दूषणें दाविली : तें गोपाळपंडितीं मानिलें : मग न करीतीचि : ॥५॥

**मार्गी आनोबासीं उदक आणणें** :॥ एक वेळ कवीस्वरबास : (गोपाळपंडित : रामेस्वरबा :) परसरामबास : यैसे चौघे वाटा जात होते : तवं एकी ठाइ साउलीये बैसले : आणि आनोबासीं लक्षीलें : जवळि उदक नाहीं : आतां बैसलेयां उदक तवं लागैल : म्हणौनि आपण न बैसतीचि : अवघेयांचीं उदकपात्रें घेउनि उदका गेले : तवं हे अवघेचि तान्हैले : तवं तेहीं उदक आणिलें : अवघां उदक घेतलें : ऐसें उचित स्फुरलें : ॥६॥

**बाइदेवोबायें 'सुसु(शिशु)पाळ' निषेधीं कविस्वरीं 'एकादश करणें** :॥ एक वेळ कवीस्वरबासीं 'सुसुपाळवधु' केला : मग बाइदेवोबासांपासि म्हणितला : परिसौनि बाइदेवोबासिं म्हणितलें : कवीस्वरहो : ग्रंथु निका जाला : परि निवृतांजोगा नव्हेचि : मग कविस्वरबासीं '**येकादसकंदु**' केला : मग तोही येउनि बाइदेवोबासांपासि म्हणितला : तो परिसौनि बाइदेवोबासिं म्हणितलें : आतां होये कवीस्वरहो : हा निवृतांजोगा जाला : म्हणौनि थोर तोखले :॥७॥

**रुजायुक्त कवीस्वरां दंतिगोपाळबायें साडेगांवीं तीर्थवीधि करणें** :॥ एक वेळ कवीस्वरबास दंतिगोपाळबास अटना गेले होते : तवं अटनिं कवीस्वरबासां अशक्ति आली : दंतिगोपाळबासीं तयांसी दांडी केली : मग कवणा गावां नेत होते हें नेणिजे : परि साडेगावीं देउळा पूर्वे पाइरियांपासि दांडी उतरीली : अवघां देउळ नमस्करीलें : कवीस्वरबासीं दांडीयेवरूनि निडळ खालि करूनि दोहीं हातीं तेथौनीचि अवघें देउळ नमस्करीलें : गोपाळबासीं म्हणितलें : कवीस्वरहो : यैसें खालि उतरौनि एकि पाइरी

नमस्करीतां येइल : कवीस्वरबासीं म्हणितलें : हो (ये)इल : आणि हळचि (दांडीये)खालि उतरले : पहीली पाइरी नमस्करीली : आणि अवघीयाचि नमस्करीलीया : मग चौकहो नमस्करीला : बैसले : मग म्हणितलें : भलें केलें गोपाळदेया : तुवां माझें अव्हेरण चुकवीलें म्हणौनि : दोही हातीं तयांहीं दंडवत केलें : तोखले : ॥८॥

**कवीस्वरां उपचारी दंतिगोपाळबाये ईश्वरहेतु प्रकाशणें : ॥**

एक वेळ कवीस्वरबास आणि दंतिगोपाळबास अटणा गेले : कवीस्वरबासांचें देह थोर तुटलें : मग गोपाळबातें म्हणितलें : गोपाळा आतां फांकणि करूं गा : तीं मानिलें : मग फांकले : तव केतुलेनि काळें कवीस्वरबासांची गति कुंठली : एकीं कांटीतळीं राहीले : तवं हींडत हींडत गोपाळबास तया गावासि आले : भिक्षा करूनि विजना तेचि कांटीयेपासि गेले : तवं तेथ कवीस्वरबासांतें देखीलें : चिन्ह पालटीलें होतें : जवळि जाउनि पाहीलें : तवं वीस्मृति प्रवर्तली देखीली : ऐसा उदकाचा बोळा मुखीं पीळीला : तो स्वीकरीला : आणि नावेक सावध जाले : पुडती सावध केले : मग यैसी वास पाहीली : तवं गोपाळबासांतें वोळखीलें : डोळे आस्वपातीं भरीले : आहा गोपाळा : ऐसें कां केलें : तिहीं म्हणितलें : गोसावीयां प्रवृत्ति नाहीं ऐसे तुम्ही जाणा : ऐसाचि काळीं मजसी भेटि केली : तुम्हीं बहुतांसि धर्मरक्षेण : म्हणौनि उपगळीये धरूनि उठवीलें : मग गावांत घेउनि गेले : एकी ठाइ ठावो पाहोनि आंथरण घालौनि निजवीलें : एकातें पुसीलें : येथ कोण्ही वैद्य असे : एकी म्हणितलें : पैल घोडेया बैसोनि जातु असे : तैसेचि गोपाळबास वाहें तयापासि आले : पुढां उभेया ठाकौनि म्हणितलें : आहो दुष्टें गांजीलें ते रायापुढें सांघीजे : आणि रोगें अडी(लें) : तरि वैद्यांपुढें सांघीजे : म्हणौनि मागील सांगीतले : तेणें म्हणितलें : ते कोणे ठाइ असति : मग तो आला : कवीस्वरबासांचा हातु पाहीला : आणि म्हणितलें : यांसि रोग नाहीं : धातुसाम्य असे : येहीं सोखन केलें असे : कवणा कारणें तें हेचि जाणति : आतां यांसि अन्न द्या : म्हणौनि तांदुळाचा भातु (आणि) दूध पथ्य सांघितलें : गोपाळबासीं म्हणितलें : तेंही तुम्हीचि जाणा : मग वैद्यें दूध : भात : साकर ऐसें तिन दीं पथ्य सूदलें : कवीस्वरबास सावध जाले : मग गोपाळबासीं म्हणितलें : म्यां

तुमची जाणिव यांपुढें सांघितली असे : तरि यांहांसी कांहीं बोलावें : मग कवीस्वरबासीं कांहीं गीतावाक्य वाखाणीलें : येतुलेनि तेणें आपुलीयें मार्गीचा उपदेशु द्यावा : म्हणौनि साष्टांग दंडवत घातले : तव कवीस्वरबासीं म्हणितलें : उठा : आम्हीं आतांचि काइ जात असों : म्हणौनि उठवीलें : मग येरी दि सकाळि न पुसतचि निगाले : ॥९॥

**कवीस्वरां वासुदेवभटीं प्रश्न करणें** :॥ एक वेळ कवीस्वरबास ऐसें सांगातियेसि अटना गेले होते : अटन करीता आनोबासांचिये भेटि गेले : भेटि जाली : श्रमनिवृति जाली : अनोबास कवीस्वरबासांचे पाय धों रीगाले : तयांतें कवीस्वरबासी म्हणितले : तुम्हीं कैसे पाये धुवाल : आनोबासीं म्हणितलें : तें कां : ना तुम्ही येथ उपाधिमंत : तव आनोबासीं म्हणितलें : मां तुम्ही काइ उपाधिमंत न व्हा : तवं कवीस्वरबासीं म्हणितलें : आम्हां आणिकीं ठाइ उपाधि : तुम्हा येथ उपाधि : यैसें कवतुक केलें : मग आनोबासीं म्हणितलें : भलें केलें : मग पाये धुतले : नावेक भरले : आणि वासुदेवबासीं कवीस्वरबासां प्रश्नु केला : कवीस्वरहो : आचरतया पुरुषा सत्वभंग नव्हतां : देवतेस विघ्न संपादणें आति कि नास्ति : तवं कवीस्वरबासीं म्हणितलें : भटो : हे काइ आणिकी ठाइं असे : हे आनोबास बोलति : तें जाणिजे की : कवीस्वरबासीं मागीला गाउनि भिक्षा मागूनि आणिली होती : ते संपादीली : मग सपांती जेवणें जालीं ॥१०॥

**आनोबासीं वासुदेवभटां झाडातळि पाटा फुटला म्हणणें** :॥ एक वेळ आनोबास वासुदेवभटांसि घोकवीत होते : तव त्यांसि तें न बैसेचि : मग आनोबासीं म्हणितलें : वासुदेया तूं झाडाखालि जाये : मग तुज झाडचि बोलैल : मग वासुदेवबास अटणा निगाले : तेथ झाडातळि त्यांसि स्फूर्ति जाली : मग साटि प्रश्न करूनि आनोबासांसि भेटावेया आले : आनोबासि प्रश्नु केला : मग आनोबासीं म्हणितलें : वासुदेया झाडातळि पाटा फुटला गा : ॥११॥

**ब्राम्हणा स्वप्नश्रवणीं कवीस्वरीं सहश्र भोजन चुकवणें** :॥ कवीस्वरबास : रामोपाध्ये : कान्होपाध्ये : परसरामबास हे चौघे पेहेरासंगमा आले : तवं तेथ व्यवहारा एकु सहश्र भोजन करावेया आला होता : तेणें रात्रीं स्वप्न देखीलें : जें भटमार्गीचेया एका महात्मेयां जेवूं घातलेया सहश्र भोजन

होये : म्हणौनि म्हांळसां स्वप्न दाखवीलें : तवं उदयांचि तेणें कवीस्वरबातें देखीलें : साउमा येउनि दंडवत करूनि स्वप्न सांघीतलें : तरि महात्मेहो : तुम्ही मान्यें कांहीं घेया : कवीस्वरबासीं म्हणितलें : घेतों : परि आमुचे गुरु पुढें गेले असति : म्हणौनि निराकरीलें : निगालें : ॥१२॥

**कुमरें रेमाइसें दंडवत वांछिति संन्यासी खंडणें :॥** एक वेळ कुमरें रेमाइसातें एकीं सन्यासी म्हणितलें : तुम्ही आम्हांसि दडवत न करा तें काइ : रेमाइसीं म्हणितलें : प्रसादहो : तुम्ही साध्यस्त आहां कीं साधनवंत आहां : तेहीं म्हणितलें : तें कां पुसतां : रेमाइसीं म्हणितलें : साधनवंत जरि होआल तरि दंडवत केलेयां तुमचें साधन काइ चरितार्थ होइल : ना साध्यस्त जरि असाल : तरि तो आक्रोध : त्यासि दंडवताची चाड नाही : मां दडवत कवणासि करावें : पतितासि लोकमान्यता देखैल : तरि घांसु एकु अन्ना घालील : येरें म्हणितलें : भटोबासांची म्हातारी आळउं नये : ॥१३॥

**तस्करोपद्रव–निराकरणी हिराइसुता अनुसरण :॥** हिराइसांचे पुत्र कवणि ठाइ गेले होते तें नेणिजे : येतां वाटे ([1]तयां) चोर उठिले : मग तेहीं म्हणितलें : येवेळचा जरि मीं वांचलां : तरि भिक्षा करीन : तेव्हेळि वांचले : भिक्षा केली : कवणाजवळि ते नेणिजे : ॥१४॥

**राघवभटीं 'द्वादशश्लोक पूजावसर' करणें :॥** एक वेळ राघवभट आंवाकेनि तिहीं पूजावसरांचें स्मरण होआवें म्हणौनि समुच[च्च]याकारणें द्वादशश्लोकीं तीन्ही 'पूजावसर' बांधले : आणि प्रसादसेवेपुढां म्हणति : ॥१५॥

**कवीस्वरां [2]हरगर्वभटां उद्ग्रहणिकें कवीस्वरीं आनोबास प्रकाशणें :॥** हरगर्व ते विद्वांस : एक म्हणति राजसभुवनिचे : एकु दिस ते कविस्वरासि भेटले : थोरि उघानि केली : परि बोधुभेद अवभेदा नयेचि : ते वाराणसि जात होते : हरगर्वीं म्हणितलें : आताचि येवेळे चर्चा असों देवों : वाराणसीहूनि येउनि : मग मागुतें तुमचें दर्शन घेउनि : कवीस्वरबासीं म्हणितलें : हो कां जाल तरि पारिसनाथाचेया [3]श्रीपुरावरूनि जा : तेथ आमुचे गुरुभाउ आनोबा असति : तयांसि भेटावें : मग सामोरें जावें : तेव्हेळि ते श्रीपुरासि

१ तयांवरि घ. २ हयगवभट घ. ३ सिरपुरावरौनि ग, घ.

आले : आनोबासीं भेटि जाली : भेटिसरीसिचि उघानि प्रवर्तली : जीयें वाक्यें कवीस्वरबासीं उधा[द्ध]रीलिं : तेचि हेतु : तियेंचि वाक्यें : तेचि मांडणि : सारीखीचि वीत्पति[व्युत्पत्ति] : परि तेथ प्रत्या नयेचि : आणि येथ आनोबासांचेनि प्रत्या आलें : जीवेस्वरु-विभेदु मानिला : मग वाराणसीं जातां राहीले : येतुलेनि आनोबातें म्हणितलें : आतां तुम्हीं आपुला धर्मं सांघावा : आनोबासीं म्हणितलें : तुम्हासि जे प्रथम भेटलें : ते आमचे वडिल गुरुबंधु : तयांपासि चला : मां तयांकरवि सांघउनि : म्हणौनि आनोबास हरगर्व-पंडितातें आसटी[ष्टी]ये घेउनि आले : भेटि जाली : कवीस्वरबासांतें म्हणितलें : यांसि धर्म सांघावा : म्हणौनि मागील सांघीतलें : कवीस्वरबासीं म्हणितलें : यांसि तुमचेनि मखें होआवें : हे तुमचेचि अधीकार्ये : जेहींचि युक्ति तुम्हीं बोलीलेति : तियाचि युक्तीं आम[म्हां]सीं उघानि जाली : परि आमचेंनि यांचेया प्रत्या नयेचि : आणि तुमचेनि आलें : म्हणौनि हे तुमचेच अधीकारी : यैसें तयांचेया प्रत्या आणिलें : मग आनोबासीं तयांसि धर्मश्रवण केलें : तेंचि भिक्षा केली : मग तया नाव '**हरबा**' यैसें म्हणति : हे वासुदेवभटाहूनि धाकुटे : मग येहीं प्रतिष्टानिं राहूनि भोगनारायेंणि **गद्यें** केली : ॥ तेथचि प्रतिष्टानिं देहावसान जालें : आठ वरीखें प्रतिष्टानिं होते : यैसि मार्गरूढि : ॥१६॥

**पश्रा[रश]मबासां आनोबासां भेटि-विधानीं बाइदेवोबायें बोधानज्ञान करणें** : ॥ एक वेळ बाइदेवबास : परसरामबास : आनोबासासि अभ्यागत आले : आनोबासीं वीधान केलें : विधान करीता आनोबासीं बाइदेवोबासांचे पाए धृतले : परसरामबास कांहीं केलेंयाही धू नेदीति : परसरामबासीं म्हणितलें : तुम्हीं आम्हां गुरुस्थान : तुम्हां धों न एति : आनोबासीं म्हणितलें : सुवर्णाचीया पाइरीया जालीया तरि काइ डोइये चालों ए(येइ)ल : तरि पायेंचि चालावें की : यावरि बाइदेवोबा म्हणति तें करूं : तवं बाइदेवबायें म्हणितलें : भेटिकालिं येकमेकांचें करवीलें असे कीं : येर आधी बोधा अधिष्टान : प्रयुक्तीचा बुझु तो तुमचा तुम्हांसीचि : हें परसरामबासातें म्हणितलें : आणि याचां अति : भिक्षा जायासि ये प्रयुक्तीचा बुझु तो यांचा यांसि : हें आनोबासांतें म्हणितलें : ॥ परि भेटिकाळीं दोहीतें व्यापीलें ॥ मग तेहीं पाये घृतले ॥ परसरामबासांची भिक्षा ते

आनोबासांआधीं : आन आनोबासांचें धर्मश्रवण तें तयांहीं आधीं : म्हणौनि परसरामबासी आनोबासातें गुरुस्थान म्हणितलें : ॥१७॥

**परसरामबासा धर्मवार्ताकरणि आनोबासीं गगना गवसणी अनुवादु** :॥ एक वेळ परसरामबासी धर्मवार्ता केली : ते अवघी परिसौनी आनोबासीं म्हणितलें : परसरामाचें बोलणें गगना गवसणि : म्हणौनि थोर तोखले : ॥१८॥

**आनोबासीं 'अंताक्षरी' करणें** : एक वेळ आनोबासीं 'अंताक्षरी' केली : अतीं जें अक्षर तें पुढीला वाक्याचां आदीं : यैसीं बतीस वाक्यें केलीं : ॥१९॥

**सर्पदष्ट महादेवोबा प्रसाद-ग्रंथिका कंठा अवग्रहणि वीषोतार** :॥ दाइंबाचें पुत्र महादेवोबा : तेहीं कवणापासि भिक्षा केली तें नेणिजे : एक वेळ ते अटणा निगाले : सवें प्रसादाचिया गांठीया होतिया : एकु दीसी भिक्षेसि गेले : भिक्षा करूनि गंगे जेवावेया गेले : तवं सर्पे खादलें : आणि तेही जवळि प्रसादाचिया गांठीया होतिया : तियां गळां घातलिया : आणि वीष उतरलें : मग भोजन करूनि निद्रास्थाना गेले : ॥२०॥

**दतीगोपाळबासां देहावसान** :॥ एक वेळ दुकळु पडिला : कवीस्वरबास अवघेयां भिक्षुकासहीत यैसे पुरंधराकडे आले : दंतीगोपाळबासांचें देह थोर तुटलें होतें : मग गोपाळबायें म्हणितलें : कवीस्वरहो : आतां मज फांकावेया अनोज्ञा द्यावी : कवीस्वरबासीं म्हणितलें : साहच नाहीं : तिहीं म्हणितलें : ना द्यावीचि : मग दीधली : ते अटण करीत करीत चदनवंदना गेले : तेथ रायें छत्र घातलें होतें : तेथ भिक्षे जाति : ते म्हणति : येथचि बैसोनि जेवाल : तरि घालूनि : गोपाळबासी म्हणितलें : आम्हीं गंगे जेउनि : तिं म्हणितलें : आम्हीं तुम्हां उदकही देउनि : गोपाळबासि म्हणितले : तऱ्ही येथ न जेउं : यैसें क्षेणाचें मान होये : आणि जाति : ऐसें देहशेष राहीलें : मग एकु दिसु नगरावरुतें यैलीकडीलां डोंगरीं अधोपरीं यैसे दोही धोंडेयांचीये संदीं देह ठेवीलें : छीन्नस्थळि धोंडेयाखालि घातली : आणि धोंडयासि खडेनि लीहीले : येथ छीन्नस्थळि असे : तवं तिये नगरावा अधीकार्या दुर्गीतु उपरियेवरि रात्रीं उभा होता : तवं तेणें तेथ डोंगरातळीं देह जातांसमै प्रकासु देखीला : आणि आपणाचि दीवी लाउनि पाहावेया आला : जवं जवं

साउमा ये : तवं तवं प्रकाशु उणा होए : ऐसा जवळि आला : तवं तयांचें देह गेलें देखीलें : तेणें म्हणि-लें : हे तवं अन्नेवीण गेले : तरि मीयां (येथ) अन्नछत्र घातलें असे की : मग रायें छत्रीचे लोकु पाचारीले : तयां पुसीलें : हे छत्रा आले होते : तेहीं पाहीलें : वोळखीलें : ना होए : आले होते : तरि यांहांसि तुम्ही अन्न घाला : ति म्हणितलें : हे म्हणति : आमचां पालवीं घाला : मां आम्ही गंगे जेउनि : आम्हीं म्हणों येथचि जेवाल : तरि घालूनि : आणि हे निगौनि जाति : यैसीयापरी येथ बहुत दीस देखत होतों : मग रायें म्हणितलें : आहा पापियेहो : वोखटें केलें : जया पात्राकारणें मीयां छत्र घातलें : तें पात्र चुकलें : आतां येणें छत्रें काइ काज : म्हणौनि तें छत्रचि मोडीलें : मग केतुलेनि काळें कवीस्वरबास सोधीत आले : तवं तें आइकीलें : मग तो ठावो पाहीला : तवं छीन्नस्थळि लीहीली होती : ते घेतली : आणि निगाले : ॥२१॥

**[1]सत्रसींगीं नागाइ–देहावसान : शोधूनि कवीस्वरीं वाक्य करणें :** ॥ नाति नागाइसें ते महेस्वरपंडितांची कन्या : तेहीं भटोबासामागां सत्रसींगीं थोर वैराग्य केलें : तें तेथ देवता : यात्रा नाहीं : भिक्षा करितां लोकांसि पुरुषु कि स्त्री यैसें कळों आलेंचि नाहीं : यैसें केतुलेया एका काळा तयांची गति कुंठली : एका धोंडां छीन्नस्थळि खालि घालूनि लीहीलें : एथ छिन्नस्थळि असे : मग देह ठेवीलें : मग केतुलेया एका दीसां कवीस्वरबास आइकोनि तेथ गेले : एका गुरुवातें पुसीलें : तेणें म्हणितलें : एथ एकु होता : येतां–जातां देखों : परि दादुला की बाइल हें नेणों : कवीस्वरबासीं सोधीलें : तवं तें लीहीलें देखीलें : मग छिन्नस्थळी काढीली : आणि कवीस्वरबासां थोर दुख भरलें : मग तेथ तयावरि एक वाक्य केलें : **क्रांते श्रीमत्सुदेशे सतशिखरगिरावुत्तरोत्तुंगश्रृंगे । निष्ठावत्यानुगत्या निजजन-सखिनां यान्त पंथानमेकम् ॥ आग्रेयं नागदेवं निजजनपरमानंदमार्गं जगाम । स्मृत्वा श्रीचक्रपाणि निजहृदि दधती ब्रम्ह नागांबिका या ॥१॥** हें वाक्य म्हणितलें : आणि निगाले : ॥२२॥

**परसरामबास–देहावसानीं विनाएकबासीं धांवा करणें :** ॥ रामेश्वर-बास : परसरामबास : हे कवीस्वरबासांचे शिष्य जवळि[के]चे : ॥

---

१ छत्रसीगीं ग, घ.

कविश्वरबासांमागां परसरामबासांचें आचारी[र्यं]त्व : परसरामबासीं 'निर्वचन' : 'निर्वचना'ची 'असतिपरी' केली : दोहीं स्थळिचेयां पुढील 'प्रमाणा' अन्वयो लावीला : आदी वेगळीया टांचीलीया : 'चैतन्यमूतिका :। 'उद्धरण' बोलिजेलें : 'दृष्टांतप्रमेयें' बोलीलीं : यैसा सास्त्रा अन्वयो लाविला : मग केतुलेनि एकें काळें देहावसान जालें : तेव्हळि वीनायेकबासीं धुवा केला : ।। तुवां प्रकटीला परपथु : जीव उद्धरावेया हेतु : आचारें बीवेकें सहीतु : आला कविसुतचि वेन्ही :।। तो धर्मावा पाळकु : तया काइ बाखाणि मसकु : तेणेंवीण भवदोष झळंबतु असे स्वामिया : ।।१।। धृपद :।। बाळारथी जो धर्मावा : रक्षकु वैराग्याचा : उदधि प्रमेयांचा : तो आमचा कां नेला :।। ज्ञानप्रकाश बहळ : भानुरस्मि–बंबाळ : मालवलेया जगबोळ : जाला सकळ पंथांसि :।। नाना वासना तनकट : तेणें लोपली धर्मवाट : सगर फांकलें अकाट : शो[स्वो]स्तोचें स्वामिया :।।२।। क्रिया मनाधर्मा जाणूं : तुझां वे[व्य]सनिं निपुणु : जीव दोषीं सकळीं हीनु : गुण वाखाणूं नेणिजे स्वामिया :।। भवनि म्हाळीं गहनु : विस्तारला छायाघनु : परमार्गीयां सतानु : तो विश्रामु मोडला :।।३।। सौजन्याचा गुणरासि : प्रीति नियत मानसीं : चित्त संतत परेसीं : श्रीचरणी स्वामिया :।। मुखचंद्र कैसा भाउ : ज्ञानसुधेसि उगउ : परमार्गी(यां) सांताउ : तेणेंवीण गति ठेली :।।४।। कविभास्करा सुतु : उदार्यावरि हातु : आचार्यांमाजि विख्यातु : परसराममुनि देखा :।। करूनि प्रपंचावेगळा : नित्य स्वरूप केवळ : परसुखाचें वेलाउळ : तेथ जी तुवां वासोया केला :।।५।। (एसीं पांच पदें म्हणितली :) ।।२३।।

आतां भटोबासांचे सोष्य : बाइदेवास १ : उपाधिबास २ : अमृते माग्यांवास ३ : केशोबास ४ : पडितबास ५ : राजुरकर लक्ष्मींधरबास ६ : कविस्वरबास ७ : आनाबास ८ : राघवभट ९ : अनत १० : आकाइचे रामदेव ११ : परसरामदेव १२ : डोडारी गोंदोबा १३ : देवतासंबंधी महादेवबा १४ : विरक्त रूपदेवोबा १५ : विरुपाख्य महादेवोबा १६ : जनकीदासदेवभट १७ : वांकी वीष्णुभट १८ : सेइगाव खेइभट १९ :

१ खमध्यें या चरणानंतर 'ऐसीं पांच पदें म्हणितलीं :' असा उल्लेख करून हें पद्य येथेंच संपविलें आहे. फाटलें घ.

सेइगाव [1]कृस्णभट २० : वाळुके रामदेव २१ : नरेंद्रबास २२ : विनायेकबास २३ : सोमणबास २४ : काळे कृस्णभट २५ : गोरे कृष्णभट २६ : सुचंच चांगदेवभट २७ : वासुदेवभट २८ : वांकुडे हरिभट २९ : वांकुडे डाइंभट ३० : कटककार केशवनायेक कटक देमा(इ)चे संबंधीये : ३१ पोकळे वाल्हनाइक ३२ : चक्रपाणिबास ३३ : घनेस्वरभट ३४ : लुखभट ३५ : जायभट ३६ : कान्होपाध्ये ३७ : येवते रामदेवपडित ३८ . गोरे राजोपाध्ये ३९ : भाउ लखदेवोबा ४० : गुर्जर हरिभट ४१ : पिंपळे रामदेव ४२ : मधुर गोवीदभट ४३ : दडमाणिकभट ४४ : काळीचे जनकभट ४५ : पुरीचे चांगदेवभट ४६ : धर्महळीसाइदेव ४७ : अवीद्यात्मक सूण्ठपाणिभट ४८ : मु(स)ळें साइंदेव ४९ : धुपे साइंदमुनि ५० : वट(क)कार वंकी ५१ : आपलो ५२ : ॥

हीराइसें १: आकाइसें २ : भाउजइ हीराइसें ३ : बहीण उमाइसें ४ : कुमरें रेमाइसें ५ : बाबुळगांव लखाइसें ६ : साकाइसें ७ : उबरी गोराइसें ८ : कटककारें देमाइसें ९ : उंवरी महादाइसें १० : नाति नागाइसें ११ : सून नागाइसें १२ : पाळेकरें गौराइसें १३ : रंभाइसें १४ : पैठण उमाइसें १५ : लेंकि धानाइसें १६ : खेडले नागाइसें १७ : पैठण नागाइसें १८ : पैठण कमळाइसें १९ : एवतेकारें जसमाइसें २० : सिताइसें २१ : इंद्रभटांची गौराइसें २२ : परंडकरें गौराइसें : एकी वासना पोमाइसें २३ : केशोबासांची बहीण कामाइसे २४: पोकळी भागाइसें २५ : भद्रकारें कामाइसें २६ : एवंआदीकें यैसीं पांच सतें सिष्यें : भटोबासांचो : ॥

**मग यांपासौनि तेरा अम्नाये जाले** : एकु कवीस्वरअम्नाय १ : एकु उपाध्य अमनाय २ : एकु पारमांडल्य अम्नाय ३ : एकु कुमरअम्नाय ४ : एकु साळकर महादेव अम्नाय ५ : एकु मदळसा अम्नाय ६ : एकु चक्रपाणिबासांचा अम्नाय ७ : एकु जायाबाअम्नाय ८ : एकु जाखोबा अम्नाय ९ : ([2]एकु हरीभटांचा अम्नाय १० : एकु दायेंबा अम्नाये ११ : एकु देइभटांचा अम्नाय १२ : एकाचें नांव नेणिजे : तो अम्नाय १३ : ग) : यैसे हे मार्गाचार्ये : भटोबासां यैसे प्रमाण जाणावे : ॥ २४ ॥

---

१ विष्णुभट घ. २ क प्रमाणें घतहि नऊच अम्नायांचीं नांवें आहेत. ख मध्यें बारा अम्नायांची नांवें आहेत.

**आतां कवीस्वर अम्नाय :।:** परसरामबास १ : रामेस्वरबास २ : धाडी नागाइसें ३ : ।।

**आतां पारमांडल्या आम्नायाची वृत्ति सांघतां असीजे :।:** आनोबासांचे वासुदेवभट १ : वामनबास २ : तीकोवास ३ : देमनबास ४ : सोमणवास ५ : हरगर्वबास ६ हरिपाळ हरिभट ७ : सिवन नागदेवोभट ८ : मुनि कृष्णबा ९ : तथा कृष्णभट १० : नागनाथबास ११ : कमळभट १२ : मुनि मेइदेवोबा १३ : कांकरे महादेवोबा १४ : वांकी येल्होबा १५ : मथन येल्होबा १६ : रामनाथभट १७ : वाल्हंभट १८ : रोपे रामदेवो १९ : गणेशभट २० : गोपीनाथभट २१ : साळिवेमुरारीभट २२ : नेइभट २३ : जोइसीभट २४ : चांगदेवभट २५ : आपदेवाभट २६ : कांइदेवोपंडित २७ : हरीदासभट २८ : दुरडाभट २९ : कळके केइभट ३० : ।। **आतां आइया :** बेलौरे रेमाइसें ३१ : साळिवें गौराइसे ३२ : माल्हाइसें ३३ : गोणाइसें ३४ : खांदार जानाइसें ३५ : सेगाइसें ३६ : पद्माइसें ३७ : कास्ते जेमाइसें ३८ : गोंदो आकाइसें ३९ : गोरी गोराइसें ४० : काळी गौराइसें ४१ : यें इतुकी गुरुभावडें : आनोबासां [१]सिष्यें : ।।२५।।

**आतां उपाध्यआम्नायीं उपाध्याचीं सिष्यें :** कमळाइसें तियें उपाधिबासांची धाडी : तेंहीं भटोबासांपासि भिक्षा केली : परि गुरुकुळ त्यांचिचि सिष्यें म्हणति : सेवटी वाऱ्यां राहिलीं म्हणौनि वालेकरें म्हणति : ।। त्यांचे सिष्य सतोबास १ : नरहरिबास २ : वि(र)क्त बैंजोबास ३ : सडे हरिभट ४ : भिंगार हीराइसाचे गुरु भायाबास ५ : साइंभट सातभाउ ६ : पुरुखोबास ७ : गांगोबास ८ : जोगोबास ९ : जनकोबास १० : येल्होबास ११ : दाइ भागवत १२ : धानोबास १३ : हरिदेवोबास १४ : कमळदेवमुनि १५ : मुनि तिकोबा १६ : मुनि लुइबा १७ : आराधीये केशोबास १८ : नरसोबा १९ : हरिभागवत आइसांचे आजे २० : विंचर धानाइसें २१ : येसाइसें २२ : पिलाइसें २३ : भागाइसें २४ : चांगाइसें २५ : चौडांइसें २६ : बालाइसें २७ : पोमाइसे २८ : भाउजे पोमाइसें २९ : हीराइसें ३० : धानोबाची माता मेगाइसें ३१ : बहोणि मागाइसें ३२ : विझाइसें ३३ : [२]धाडी रामाइसें ३४ : गगाइसें ३५ : रेमाइसें ३६ :

---

१ गमध्यें 'स्मृतिस्थळ' येथेंच समाप्त होतें. २ भरूसडी ख; भरडीं घ.

गौराइसें ३७ : [1]बरदुधी खेमाइसें ३८ : वांकी धानाइसे ३९ : निकोणि देमाइसें ४० : कामाइसें ४१ : वील्हाइसें ४२ : कोमाइसे ४३ : ।।२६।।

[2]एवं ' स्मृतिस्थळ ' समाप्तमगमत :।।

पवीत्रा देशाचां अंतरीं : पूर्ण अधीकारें पुरी : जन्म लाधला उत्तमापरी : श्रीमत प्रज्ञा अति सुंदरी श्रीनागदेवो :।। जो उपक्रमात आवडे चक्रधरा : मूर्तिवेधु देउनि परा : लोळा आणूनि (प्र)वृत्त्यांतरा : पुढोला दाना पात्र केला : ।।१।। धृवपद :।। तो आजि न देखों नयेंनि : टाकूनि गेला चक्रपाणि : जिवां अधिकरणां सिरोमणि श्रीनागदेवा :।। देउनि संयोगसबधु : दुजा चतुर्विध बाधु : चरित करूनि सन्निधानि शुधु : मग आचार्ये पद(दीं) स्थापियेलें :।। दाउनि वीयोगधर्माचा गति : तया निरोविले नेणों किती : मग नवेयां जीवां धरूनि चित्तीं : तया ये क्षिती निर्मियेलें :।।२।। वर्तन आइकतां श्रवणि : जयाचेनि होये पापा धुनि : पवीत्र केलें मगळा वाणि : बाइसां स्वामि वरेंकरूनि : शुध मान सयागोयांचे :।। सदा साहृचे परीवारला : दैवें कृपा वाढवीला : बहुतां जीवां जीवाळा जाला : तेणें आजी अबोला धरीयेला : ।।३।। सन्निधी पाखवा देउनि : जेवि आपत्यां वाढवी जननी : तैसें केलें आम्हांलागोनि : सर्वस्वें वेठौनि वाढवीलें :।। किं एक(स)रें निराधार : कांहीं न बोलतां उत(त्त)र : आम्हां सांडूनि पैलपार : उतरौनि सर्वेश्वरु पधरोलें : ।।४।। काइ सांघो तयाची वेधशक्ती : दुराचारीं सांडिल्या क्रु[क्रू]रा मती : सामग्रिया सकळ [3]संपती : तेजौनि सर्वेशभक्तीं लावियेलें :।। तो आजी कवीजनादि सकळां : सांडूनि प्रपंचा समूळा : जिणौनि संसारा दुरळा : नागदेवो जवळा [4]दैवें

---

१ बुरदंती घ. २ घ.मध्यें येथें ' स्मृतिस्थळा ' ऐवजीं ' वृद्धाचारा 'चा निर्देश असून त्याची समाप्ति नमूद केली आहे, ' आणि त्यानंतर पवीत्रा देशाचां अंतरीं ' हें पद्य दिलें आहे. या पद्यानंतर लगेच पुनः कांहीं पंथीयांचीं नांवें येतात, व त्यांच्या शेवटीं ' एवं ' सुमूर्ती[स्मृति]स्थळ ' सायंकाळीं संपूर्ण :।। शोधकाराच्या :।।' अशी अंतिम ग्रंथसमाप्ति दिलेली आहे. ३ संतती ग. ४ देवें ख, घ.

ेआफाविला : ।।५।।

---

१ घ मध्यें यानंतर पुढील मजकूर ज्यास्त आहे : **उपाध्यांची** कमळाइसें १ : त्यांचो हीराइसें २ : धानाइसें ३ : पोमाइसें ४ : हर्द्दमुनिबास ५ : भायाबास ६ : हे पांचै आचार्य : ।। **होराइसांचे** मालोबास १ : चाहचाबास २ : कामाइसें ३ : रवळोबास ४ : ।। **मालोबासांचीं** माल्हाइसें १ : कमळाइसें २ : नागाइसें ३ : जानाइसें ४ : हीराइसें ५ : बाल्हाइसें ६ : तुकाइसें ७ : पद्माइसें ८ : म्हाळाइसें ९ : एकाइसें १० : महानुभाव परसोबास ११ : येल्होबास १२ : चाहचाबास १३ : त्रिपुरारिबास १४ : चक्रे येल्होबास १५ : लवडे हरिबास १६ : ।। **माल्हाइसांचे** चाहचाबास १ : म्येगोबा वैद्य २ : ।। **तुकाइसांचे** नागोबास १ : विनोबास २ : जानाइसें ३ : मालोबास ४ : देमाइसें ५ : ।। **परसोबासांचे** शिष्ये दाउवास १ : मुधोबास २ : सतोबास ३ : आबाइ गालफाडी ४ : ।। **चहचाबासांचे** शिष्य राघोबास १ : मुधोबास २ : गोंदोबास कपाळे ३ : कृष्णा बाहुलवळे ४ : येल्होबा ५ : जानोबा ६ : गोळगुंडाबा ७ : खाडे गोंदोबा ८ : रत्नाइ ९ : कमळाइ १० : हीराइ ११ : ।। **मुधोबासांचे** परसोबास १ : हीराइसांचे त्रिपुरारिबास २ : माणकाइ ३ : त्रिपुरारिबासाचे लखापती मुधोबास ४ : गोपाळ ठाकुर ५ : भटांचे जायाबास ६ : त्यांचीं माणकाई ७ : त्यांची कोंबाइ ८ : सेंदूले गागाइ ९ : ।। **हर्द्दमुनिबासांचे** ओंकारबास १ : त्यांचे सीधां[द्धां]ते हरिबास २ : महादेवोबा ३ : मालोबा ४ : सोंगोबा ५ : पेल्हाइ ६ : येल्हाइ ७ : सोनाइ ८ : हरिबा ९ : गुंडोबा १० : ।। **गोंदोबासांचे** मालोबास १ : सोनाइसांचे संतोबास २ : ।। **मायाबासांचे** दायांबा १ : दायांबाची येल्हाइ २ : त्यांचे रेयाबा ३ : ।। **पोमाइसांचे** नायाबा १ : त्यांचे म्येंगोबा २ : त्यांचे सोंगोबा : ३ : त्यांचे सालोबा ४ : ।। एवं **सुमूर्तीस्थळ सायंकाळीं संपूर्ण** : ।। **शोधकाराच्या** : ।।

---

# परिशिष्ट १ लें

## ' अज्ञात स्मृतीं 'तील अधिक स्मृति

[ ' स्मृतिस्थळां 'त न आलेल्या अशा ' अज्ञात स्मृतीं 'तील जास्तीच्या स्मृति येथें दिल्या आहेत. पोथी फारच शैथिल्यानें लिहिलेला आहे. तींतील अखेरच्या स्मृतीचा २४६ हा क्रमांक आहे. पण एकच आंकडा दोनदां येणें, क्वचित् आंकडे सुटणें, एकाच स्मृतींत अन्य स्मृतीतील वृत्तांत येणें इ० प्रकार तींत आढळतात. याच पाठाची दुसरी पोथी मिळाल्याखेरीज क्रमांक निश्चित करणें दुष्कर आहे. म्हणून येथें मुळांतीलच आंकडे कायम ठेविले आहेत.

टीपांत ' स्मृतिसमुच्चयां 'तील सदृश स्मृतींचे क्रमांक दिले आहेत. क्वचित् त्यावरून ( ) या कक्षांत न्यूनपूर्तीहि केली आहे.

२४६ व्या स्मृतीनंतर राहिलेल्या स्मृतींचे एकूण ४६ मथळे आणि चक्रधर, नागदेव व गोपाळपंडित यांच्या शिष्यांचीं नांवें येतात. हा मजकूर येथें वगळला आहे. ]

[1]**श्रीकृष्णनमोस्तु** :॥ श्रीपरेशायन्मा :॥ श्रीचक्रपाणियन्म :॥ बाइसें तीयें **प्रतेस्थानीचीं** : तयांसी नावं नागाइसें : तीयें धाकुटेपणीचि हातरीती जाली : तीयें कर्मरतें : मग कीती एक वेळ वाराणसीसि गेली : आवंसे पुनीवे एक उपवास : संक्रांती वर्ते [ व्रतें ] करीति : पंचपूर्वीया करीति : कृषा चंद्राएणें वर्ते करीति : वीधि वीतपात करीति : ऐसीं बाइसें कर्मरतें होती : मग बाइसें पयोवर्तीएं सुमुर्ताबाइसें गरू केलीं : तयापासि पयोवर्त मार्ग—उपदेसु घेतला : मग बाइसें सुमुर्नाबाइसांमि त्रीकाळ धूपार्तिया करीति : मग कीती एकां दीसां सुमृताबाइसें काळधर्मा गेली : मग तेचि त्रीकाळ धूपार्ती हसराजबाइसांमि करीति : मग गोसावीं बोणेबाइयासहीत प्रतेस्थानासि बीजें केलें : बाइसांमि दर्शन जालें : मग बाइसें गोसावीयांसि आनुसरलीं : मग तिए देउनि बाइसें गोसावीयांची त्रीकाळ धूपार्तिया करीति : पूजाआवस्वर करीति ॥१॥

---

१ स्मृतिसमुच्चय १.

[१] **लक्षमीद्रभट देउळवाडां पुराणश्रवणीं भट-नीमीत्यें द्वारें परमेश्वर-ज्ञान ।।** एकु दीसु भटोबास गोसावीयांचीया दास्याकारणें देउळवाडेयासि गेले होते : तवं तेथ नरेसीहाचां मंडपीं चौकीं आवघे माहाजन सभा घनदाट बैसली असे : मध्यें लक्षमीधरभट पुराण म्हणत होते : पुराण म्हणत म्हणतां लक्षमीधरभटांसि रसु अभिनवला : आणि लक्षमीधरभटीं आवेसूनि म्हणि० देवो असे : परि जीउ नाहीं : लक्षमीधरभटीं म्हणि० हा नव्हे जीउ : म्हणौनिया आपुलेया वक्षेस्थळावरि हातु ठेविला : भटोबासीं म्हणि० हा नव्हे देवो रीधपुरीं राज्य करितु असति : म्हणौनि रीधपुराकडे हातु उभिला : आणि तैसेंचि लक्षमीधरभट उठिले : मग भटोबासांसरिसे रीधपुरासि आले : तेथ श्रीप्रभुगोसावीयांचे सन्निधानीं आनुसरले : ।।१६।।

[२] **श्रीप्रभुगोसावीं मातापुरासि भटातें श्रीदत्तात्रएप्रभूचीया दर्सनासि पाठवणें : ।।** माहादाइआइसी भटोबासांतें श्रीप्रभूचीया दर्सना आणिलें : तया दीसालागौनि श्रीप्रभुगोसावीयांचें सन्नेधान वरुषें १४ : मग श्रीप्रभुगोसावीयांसि बीजें करावयाची प्रवृति जाली : तेव्हळि भटोबासीं वीनवीलें : जी : श्रीचक्रधरें राये राउळांसि नीरोवीलें : आणि आतां राउळीं कोणासि नीरोवीलें जी : म्हणौनि भटोबास दुख करूं लागले : तेव्हळि श्रीप्रभुगोसावी म्हणि० आवो मेला जाए : **मातापुरासि जाए म्हणे** : ऐसें भटोबासांतें म्हणि० मग गोसावीं वए सवंत्सरी माघ वदीं चौथीचां दीसीं बीजें केलें : आकाइसें-मुक्ष(ख्य)करूनि समस्तांची दुखनीवृति करितां तीनि आहोरात्रें लागलीं : मग मातापुरासि नीगाले : ।।१८।।

[३] **लेणां वास्तव्य करणें : पर्वत नमस्करूनि प्रदक्षणा करणें : ।।** भटोबास मातापुरासि गेले : तेथ लेणां वास्तव्य केलें : हाळिया भीक्षा करीति : मग आणीक पक्ष वीचारूनि पर्वतावरि न वचतीचि : मग पर्वत सव्ये घालूनि प्रदक्षणा करूनि गंगातीरासि गेले : ।।१९।।

[४] **ईस्वरनाएक पांच सतें संन्यासी न्यायेंभारथी भाग मागौनि म्हाइभटीं नीरोत्र करणें : ।।** मग भटोबास मातापुरासि नीगालेयानंतरें ईस्वरनाएक म्हाइभटांसि भाग मागों लागले : तवं म्हाइभटीं म्हणि० चाला चौत्रा

---

१ स्मृ. स. ११. २ स्मृ. स. २३. ३ स्मृ. स. २४. ४ स्मृ. स. २५.

माहाजनापासि : तथा संन्यासियांपासि : न्यावो सांघों : मग न्यायें देववीती : तरि देउनि : आणि काइ : म्हणौनि म्हाइभट ईस्वरनाएक ऐसे उभेवर्ग देउळवाडेयासि नीगाले : तेथ माहाजन सन्यासी पांच सतें सभा जाली : उभेवर्गी वेव्हारस्थळ सांघितलें : संन्यासीं माहाजनीं न्यावो नीर्धारीला : काइ ईस्वरनाएक लाभेति : कीं न लभति : ऐसें नीवचीलें : मग संन्यासीं आणि माहाजनी ईस्वरनाएकातें म्हणि० आहो : नीवताचेया धना प्रवृत वांटा न लभति : जे सर्वसंगप्रत्यागु करूनि गाउळांसि आनसरति : तेचि लाभेति : एर न लभति : एसे नीबधपत्र म्हाइभटांसि दीधलें : ॥२०॥

[1]**संबंधगमनी वडपींपळ न लभौनि उरला असे म्हणणें** : ॥ क्व्हणी एक माहानभावो : तयाचा संबंध एळापुरा होता : ते तेथ गेले : संबधीं राहीले : तेथौनि आणीक एक आले : तेयांतें भटोबासी पुसिलें : तेहीं सांघितलें : तो सेवाळया [ = शिवालया **स्मृ. स** ] जातु असे हो : वडापीपळा भोंवता भोंवत असे हो : ना न भवे : भटोबासीं म्हणि० न भवें तरि उरला असे गा : मग ते गेले : ॥२१॥

[2]**पापदंड–रामपुरीए पोफळमठीं वास्तव्य : ब्राम्हणा प्रस्नुकरणि गंगा प्रदक्षणें एणें : आश्चर्य** : ॥ एकु दीसु पापदंडरामपुरीएसि रानमळा भटोबास वीजनी बैसले असति : तवं तेथ एक ब्राम्हण आले : तेहीं म्हणि० भटो एथ बैसलेति : ते गंगे उदकाजवळि कां न बैसा : तवं भटोबासीं म्हणि० गंगा यैसी आसैल तरि तेचि आमचेया दर्सना एइल : तुम्ही परते सरा गा : गगा आमचेया दर्सना एति असे : ब्राम्हण यंसे परते सरले : तवं पैलीकडौनि गगेचा वोघु भरला आला : भटांसि सव्य घालूनि प्रदक्षणा करूनि मागौतां नीगाला : आणि ब्राम्हणासि आश्चर्य जालें : ॥२२॥

[3]**देमाइसें–स्वप्न–व्याख्यानें त्रयें परपरा–मार्ग–कथन** ॥ एकु दीसु देमाइसीं स्वप्न देखीलें : मग तेही भटोबासांसि सांघितलें : भटो आजि मीयां रात्रीं स्वप्न देखीलें : कीं चौघजणु रांजणु नेताति : तवं मीयां तयातें

---

**१ स्मृ स २३९ २ स्मृ. स. २४४ ३ स्मृ. स. ३५१. ' अज्ञात स्मृतीं 'त ही स्मृति पुन्हां क्र. २२६ या स्थळीं आली आहे.**

म्हणि० कासेया नेता गा बा : म्हणौनि तो रांजण पोटेंसि धरी : तवं त्यांतु एकें म्हणि० आगा इरचीए आजुळीए तीन रत्ने घाला : ऐसें देमाइसीं भटोबासाप्रति स्वप्न सांघितलें : मग भटोबासी म्हणि० आतां मज गोसावीयांचा हाकारा एइल गा : रांजण तो मा : रत्नें तीये गोसावीयाचें शास्त्र : तीनि आंजुळि तीय तीन्हि आधिष्टानें : मग मजमागें हा मार्ग वर्तेल : हा पणु : सा आधीष्टानें वर्तेल : हा अर्थु : एकसे तेत्रीसि : १२ : अधीष्टानें (वर्तेल हा) पूर्वपक्ष : तीनसें अधीष्टानें मार्ग वर्तेल हा सीधांत ॥२४॥

[1]**म्हाइभट : माहादंबा : भटा आभया[अभ्या]आर्थनीं वैराग्यदेव-श्रवणीं अधिकरणकथन :** ॥ वैराग्यदेव ते भटांचे पुत्र : '**वैराग्यदेव**' हें नांव गोसावी प्रसादाचें ठेविलें : मग तैंलागौनि तयातें आवघी संबंधियें आणि आवघें गुरुकुळ '**वैराग्यदेव**' यैसें म्हणति : मग बहुतर काळें वैराग्यदेव भीक्षा करावेया आले : तेव्हेळि वैराग्यदेवां श्रवण करावया म्हाइंभटीं आणि माहादाइ आइसा भटोबासांतें प्रार्थिलें : भटो वैराग्यदेवां श्रवण करा : तवं भटीं म्हणि० म्यांचि श्रवण करावें तें तुम्हीं कां न करा : म्हाइभटी म्हणि० तुम्हांतें गोसावी अधिकरण केलें असे : मग भटोबासीं वैराग्यदेवांसि श्रवण केलें : तैसेचि वैराग्यदेवीं भीक्षा केली : आति उतखर्गें [उत्कर्षें]वैराग्य केलें : वैराग्यें देह गेलें : ॥२६॥

[2]**वांती-प्रस्नु-करणीं काइ[यि]क : मानसीके ईश्वर-युक्ति आ̣न-बादु :** । एकु दीसु कव्हणी एकासि वांति जाली : तें देखौनि पडितबामीं केसोबासीं भटोबासांतें पुसिले : हां भटो वांति कां होए : भटोबासी म्हणि० हें मीं नेणें गा : पंडीता : केस्वदेया : गोसावीयांतें पुसिलें नाहीं : मग उगेचि राहीले ।३३॥

[3]**पुरुषार्थ गमनी म्हाइंभटीं (भटोबास-)उसंगां द्रव्य घालणें** ॥ एक वेळ भट : म्हाइंभट गोसावींयाचीया भांडारीचीया साटि अ[आ]सु घेउनि कटकदेवगीरीसि गेले : तवं तेथ रायाचीया पुरु[रो]हीता आणि वीद्वांसां शास्त्र-जीज्ञासीं संदेहो नीर्वचिता नीवर्चेचि ना : मग तेहीं पुरहीतीं आउठास्यां

---

१ स्मृ. स. ३९. २ स्मृ. स. ७९. ३ स्मृ. स. १६-१७.

असूची पोटळी बांधली : आणि म्हणि० आपुलेनि जाणिवेचेनि पुरषार्थे आमचा संदेहो (जो नीर्वचील तो हे पोटळी पावे : ऐसें म्हणौनि पोटळी बांधली : परि तो सदेहो ) कोण्हाइ नीवर्चेचि ना : ऐसा आवस्वरीं भट : म्हाइंभट तेथ आले : म्हाइंभटीं म्हणि० भटो हे पोटळी तोडूं कां : मां सीष्या सारिखा असु कां वेनूं : भटोबासी मानिलें : तोडा म्हणि० मग माहाद्वारीं पोटळी बांधली होती तेथ गेले : आणि म्हाइंभटीं पोटळी तोडूनि भटोबासांचां वोटां घातली : तवं तेथ राखणाइत होते ते धांवत पुरहीतापासि गेले : आणि सांघीतलें : एकु आले असति : तेही पोटळी तोडूनि घेतली : पुरहीतें पुसिलें : ते कैसे असति : ना ते बोडिके असति : तवं पुरहीत तेथ आला : मग एकें म्हणि० हे तवं बोडिके : यांसि केंस नाहींत : यांसी बोलों नये : ॥ तवं म्हाइंभटीं म्हणि० हां हो पुरुषार्थु तो काइ केंसा नावें : कीं वीद्ये नावें : केसकरियासी बोलाल : तरि केंस सामान्य स्त्रियांसि असति : तेयांनि बोला : ना सेंडिकरियासीं बोलाल : तरि राणिचेया गोवळांसि (बोला :) ना सीखासूत्रासीं बोलाल : तरि गुरुवारांसीं बोला : आणि तयांसि द्या : ना वीद्येसि देयाल आणि बोलाल : तरि वीद्रांसा नावें सूर्यो मीं म्हांयां : पुसा मातें कोणे वीद्येचो परीक्षा : मागाल तें देइन : तवं पुरहीतीं म्हणि० हे काइ सरालेकर म्हाइंभट नव्हति : मग म्हांइंभटी सास्त्रसंदेहो होता : तो चर्चा करूनि नीरोतर केला : तयांची संदेहनीवृति केली : मग म्हाइंभटासि जैत-दुटी वाइली : जइत-पत्र दीधलें : मग म्हाइंभटांसि आलेया आइकौनि म्हाइंभटांची स्त्री देमाइसें भावाचेनि सांघातें कटकदेवगीरीसि आलीं : ते दारवठां म्हाइंभटांतें राखतें होतीं : तवं म्हाइभट आले : तयांतें देमाइसांचेनि भावें म्हणि० भटो उभे राहा : आधं पुरुषार्थ ब्राम्हणीसि लाभे तो देया : मग जा : म्हणौनि उभे केले : पालवीं धरूनि : तवं म्हाइंभटीं म्हणि० हें काइ म्यां केलें : हें केलें भटीं : आणि ते नीगौनि गेले : मजपासि कांहीं नाहीं : झाडा घेया : म्हणौनि झाडा दीधला : तवं जवळि काहीचि नदेखतीचि : मग जावों दीधले : पुढां नीगाले : तवं गावीचे ब्राम्हण मीळौनि आले : तेहीं म्हणि० भटो हा तीवटनाचा खीचू आवघां वाटूनि खाइजे : तवं म्हाइंभटीं म्हणि० ते तेथवांचि आमचे गुरू घेउनि गेले : म्हणौनि तयांसीही झाडा दीधला : मग ते उगेचि राहीले : ॥३६॥

[1]**कापूर-ग्राहीकत्वें एकि भीक्षा भट नीरोपें ग्रहण ।।** एक वेळ भटोबास : म्हाइंभट साटि असु घेउनि : गोसावीयांचीया भांडारीचीया : कटकदेवगीरीसि आले : तत्र तेथ पुरूषार्थ नीर्वचु मांडला असे : आउळास्या असूची पोटळी उभीली असे : कांही शास्त्र-संदेहो पडिला होता : तो भटांचेनि सवादें भटोबासांचा नीरोपु घेउनि म्हाइंभटीं नीर्वचु करूनि मग आउळास्यां असूची पोटळी म्हाइंभटी तोडिली : मग भटोबास-म्हाइंभट-संवादें एकी साटि असूची मेघवर्णी दुटी घेतली : (मग व्यवसाया-पासि गेले : तयातें) नाथपर कापूरू पुसत होते : तो तयांतें नसेचि : मग तेही सुधि[=शोध] साधीतली : तो रायाचीया भांडारियातें असे : तेथ जा : मग भट म्हाइंभट तेथ गेले : भांडारियानें म्हणि० आम्हासि तोळाभरि नाथपर कापूरू देया : होइल तें मोल घेया : तवं तेणें जवळिलांतें म्हणि० हे कापूरू काइ करीती : याचे दांत तरि पाढरे : तवं आणिकें एकें म्हणि० ना वराडी रीधौरीं [रिद्धपुरी] श्रीगुंडमराउळ ईश्वर-पुरुषु एक वीख्यात राज्य करित असति : तयाकारणे हे नेत असति : मग तेणें भांडारियें म्हाइंभटातें म्हणि० माझी तुम्ही एकि भीक्षा घेयाल : तरि मीं देइन : तवं म्हाइंभटीं भटांचो वास पाहीली : मग भटीं म्हणि० ईश्वरु-दास्यार्थ काइ एक न कीजे : आपुलीया आडणी आपजवीजे : कां पुढीलाचीये प्रीती घेइजे : कां पुढीलाचा आविधि चुकवावेया घेइजे : एसें म्हाइंभटांप्रति भटोबासीं नीरोपिलें : मग तेयांतें म्हणि० घेउनि : मग तया भांडारीयाची एकि भीक्षा घेतली : लवंगा मुक्षधीसि[मुखशुद्धीसि]दीधलीया : मग तेणें कापुराची पेटी आणिली : ताजवां तुकूनि एकु तोळा दीधला : एकु तैसाचि दीधला आपुला होता : मग भट म्हाइंभट नीगाले : ते रीधपुरासि आले : मग ते मेघवर्णी दुटी आणि नाथपर कापूरू गोसावियांसि बोळगवीला ।।३७।।

[2]**माकोडेयाचेनि दृष्टांतें उधरण-कथनीं वृक्षादि कथन ।।** एकु दीसु भटोबास नीरोपण करित होते : भटोबासी म्हणि० बढीचा (माकोडा) आंडें घेउनि सेंडेया जाये : हें उधरण : आणि सेंडेया बुढासि ए : हें पतन ।।३९।।

---

१ स्मृ. स. १८. २ स्मृ. स १०२.

[1]मग महादाइसीं प्रतेस्थानासि गेलीं : तेही सारंगपडितातें पुसिलें : गोसावी तुम्हा भेटले होते : ना हो आइ : मग तेहीं गोष्टी सांघितलीया : गोसावी आले : मीयां गोसावीयांतें पुसिलें : जी जी : इंद्रा आनुसरैल : गोसावीं म्हणि० इंद्रयांसि एक दरूसन होतें : तरि इद्रा अनुसरता : आणीक म्हणि० सारंगपडित काइ जी : सारंगपंडीतीं म्हणि० हो आइ : गोसावी दुर्गांपासि भेटले : मीं आड पालउ वोडउनि गेलां : गोसावीं म्हणि० हें काइ पांडेया : यातें डावलौनि कैसे गेलेति : नागालेति : तेव्हळि मीं गेलां : जए करूनि नीगालां : ४०॥

[2]**केसोबा : कामाइसें संबधनातेनि आज्ञानें लोकनींदा चकवणें ॥** केसोबासांची बहीणि कामाइसें तीयें सबंधनातेनि जेथ केसोबा बैसले आसति : तेथ कामाइसे एति : जवळि बैसति : काही धर्मवार्ता पुसति : काहीं शास्त्रसंवादु पुसति : यैसीं तीयें केशोबासांपासि संबंध-सलगीं एति जाति : उठीति-बैसति : एकु दीसु केशोबास झाडातळि बैसले असति : तव तेथ कामाइसें आलीं : जवळि बैसलीं : आणि केशोबासी म्हणि० कामाइ आजिलागोनि तुवां यैसेया न यावे हो : लोकु आपवादु बोलैल : यास्तव लोकां पाप घडेल : आजिलागोनि तुवां ऐसेया न यावें हो : तवं कामाइसी म्हणि० हा भावांडावरि कैसा आपवाद बोलैल : केसोबासीं म्हणि० भावांडें एंसें गरुकुळ जाणे : परि लोकु नेणे की : यैसें केसोबासीं सीकवीलें : मग तैंलागौनी एति ना ॥४३॥

[3]**आमृते मायाबा पुराण-श्रवणीं लखाइ गांठी हारवणें ॥** एक वेळ आमृते मायाबानि म्हणि० मी पुराणी बैसोनि पुराण परिसें आणि वोदन-स्वभाव सारी : तरि काइ तवं बाबळगावों लखाइसीं म्हणि० पुराणी जेवा तरि मीं आपुली प्रसादाची गांठी हारवीं : हो कां : मग आमृते मायाबा झोळी घेउनि पुराणी बैसले : तेथ चातुर्य-कुसळता करूनि नीगोनि आले : सांघीतलें : लखाइसांची प्रसादाची गांठी जींतली : मग याउपरि भटोबासीं म्हणि० देखीलें कीं गा हा ठावो वेन्हीं चातुर्य कुसळता होआवी : ॥४५॥

---

१ स्मृ स ५७ याच स्मनींत 'स्मृतिस्थळ' क्र ९ यांतील हकीकत झाली आहे ती येथें वगळली आहे. २ स्मृ. स. ११८ ३ स्मृ. स. १८७.

[1]**म्हाइभट कोथळोबा पूजा आनुचीत परमार्जणें ।।** गोसावीं म्हाइभटा बेलोपुरीं द्रव्य नएणीं आनुज्ञा दीधली होती : तेव्हळि गोसावी म्हाइभटांप्रति दोनि श्लोकु वाखाणिलें : **चतुर्विद्या** ०।।१।। [2]**पूर्वजन्मकृतां** ०।।२।। हे दोनि श्लोकु गोसावी म्हाइभटांप्रति वाखाणीले होते : ते युक्ति म्हाइभटोबासीं काथळोबाप्रति गीता वाखाणीली : आणि कोथळोबासि पुजा केलो : यापरी म्हाइभटीं आपूलें अनुचीत प्रमार्जिलें : जें श्रीप्रभुगोसावीयांचां सन्नेधानीं तादूळ कांडीना कोथळोबावरि म्हाइभटीं आन्यथा ज्ञान भाविलें होतें : तें श्रीप्रभगोसावीं फेडिलें : मग म्हाइभट आपुलें उणें आठवीतचि होते : मग एक दीसु गीता-व्याख्यान करूनि पूजा केली : यापरी अनुचीत प्रमार्जिलें ।।५६।।

[4]**सीस्यां प्रस्नुकरणीं स्मरण : महदबा-स्मरण-करणीं मार्ग गडबडीला : म्हांतारिया रक्षणकथन ।।** एक वेळ पंडीतबासीं : केसोबासीं-मुख्य सीक्षीं प्रस्नु केला : हां भटो तुम्ही काइ स्मरा : भटोबासीं म्हणि० मीं गोसावीयांचा त्रीकाळ पूजा-आवस्वर आठवीं : तव सीक्षी म्हणि० हां भटो तुम्हीं पूजाआवस्वर देखिले तैसे आठवाल : मां आम्हीं काइ आठवावें : आणि भटोबास सदेहीं पडिले : उगेचि राहीले : तवं माहादाइ आइसीं म्हणि० नागदेया तें म्यां गोसावीयांसि पुसिलें असे कीं : भटोबासीं म्हणि० तें कैसें रूपें : मग माहादाइ आइसीं स्मरणाचें वचन म्हणि० नाम : लीळा : मूर्ति : चेष्टा : स्मरण : आनुस्मरण : सकृतस्मरण : ऐसें माहादाइ आइसीं स्मरणाचें वचन सांघितलें : तें भटोबासीं दोन्ही हात जोडूनि नमस्करीलें : मग भटोबासीं म्हणि० स्मरणावीण मार्गु गडबडिला होता : तो म्हातारिया राखिला होता गा ।।५९।।

[5]**माहादाइसीं पानें आसुडणें : तथा संपादणें : योगा-आरूढत्वाकथन ।।** एकुवेळ भटोबास वीडा घेत होते : तवं माहादाइ आइसीं भटोबासांचीये हातीचो पानें आसुडूनि घेतली : टाकिलीं : आणि म्हणि० नागदया देवेवीण जीजत असीजे : हेंचि तव काइ : मां पानें कैसीं खाणें : ऐसीं कोपलीं : आणि

---

१ स्मृ स. २८८. २ भगवद्गीता ७-१६. ३ भगवद्गीता ६-४१. गीतेंतील मूळपाठ 'प्राप्य पुण्यकृतां' असा आहे. ४ स्मृ. स. ७५ ५ स्मृ. स. ५२.

भटोबास उगेचि राहिले : मग माहादाइ आइसी बरवेया चोखा पानांचा वीडा भटोबासांसि दीधला : तो भटोबासीं उगेयाचि घेतला : आणि म्हणि० रूपै : तें हातीचीं पानें आसुडूनि घतलीं : आणि आतां काइ म्हणौनि देत असा : मग माहादाइ आइसीं म्हणि० नागदया : गोसावीं म्हणितलें : पोरेंहो तुम्चेयाकडौनि तुम्हासि काही न व्हे वें : तुम्हां एथौनें सकळै होआवें कीं : आणि म्हणि० पीती वीखो होइजे : मग आतां माझिया प्रातीं घेया : आणि भटोबासी उगेयाचि वीडा घेतला ॥६१॥

[1]माहादबा भागवत-नृत्य-दृस्यत्वें चौकन्हाणी-आनुवादु ॥ एकु दीसु दसमीचां दीसीं नवगावीं डीडी काढीली होती : तव ते गात-वात-नाचत ऐसे गंगेकडे जाताति : तें माहादाइसीं देखिलें : आणि म्हणि० जन्हीं उडाल-कुदाल : तन्हीं चोकीं न्हाणीजाल : गाउनि गावां : तथा चौकडीए जाल कीं : गाउनि गावां ॥६२॥

[2]म्हाइभटां असुगमनी माहा[माहादाइ]-उल्लेख-स्फुरणी : तथा जाया-वाखोरेयाआंतूनि काहाडणें ॥ एक वेळ देमाइसीं म्हाइंभटांचेये पीसवीएआंतूनि न पुसत दोनि असु काढूनि घेतलीया : तथा सोडूनि घेतलीया : म्हाइंभट पाहाति तवं पीसवीयेसि दोनि असु नाहीं : मग म्हाइभटीं म्हणि० माझीए पीसवीचीया दोनि असु नाहीति : कोण्हीं काहाडीलीया : जयासि उबरेयावरि रीगावा नाहीं : तेही काढीलीया असतील : कोण्ही वडीलीचि काढीलीया असति : ऐसें म्हाइभटोबासीं म्हणि० मग माहादाइ आइसीं हेतु घेतला : काइ पां कोण्हें काढीलीया देमाइसांवांचौनि : आणिक कोण्हीचि नाहीं काहाडालीया : म्हणौनि माहादाइ आइसी आवच तें देमाइमाचीए डोइए तेल घातलें : माखीलें : मग तयाकरवि आंगीची चोळी फेडीली : आंग उटीलें : उमाइसांकरवि : पाणी सारवीलें : तव आपण चोळीचेया वाखोरें पाहिलें : पाहाति तवं चोळीचेय वाखोरां नियां दोन्हीं असु आहाति : नेगालीया : आणि चोळी घेउनि म्हाइभटांपासि आलीं : आणि म्हणि० घेया तुमचीया दोन्हीं असु : तुमचीये ब्राम्हणीचीया वाखोरां आहाति : तवं वाखोरां दोन्ही असु आहाति : मग म्हाइभटी आनतापु केला : मी पापीया हो आड : म्हणौनि माहादाइसांसि आड पडिले : मग माहादाइसी म्हणि० आतां या असु

---

१ स्मृ. स ५३. २ स्मृ. स. ३६

तेयासीचि देयावीया : आणि काहीं तयातें म्हणो नको : ऐसें माहादाइ आइसीं म्हाइभटांतें वारिलें : तें म्हाइंभटीं मानिलें : केलें : मग माहादाइ आइसीं म्हणि० आतां त्याला समस्तां गरूकुळासि दंडवत : तुम्ही गुरूकुळा-वरि आन्यथा ज्ञान भाविलें : हो कां आइ : म्हणौनि म्हाइभटीं सेणेंमातिया आंग माखूनि म्हणि० मीं पापिया : म्यां गुरूकुळावरि आन्यथा ज्ञान भाविलें : तेया माझेया आपराधासि क्षेमा करावी : म्हणौनि समस्तां गुरूकुळांसि दंडवत घातलें : मग भटोबासीं म्हणि० उठा उठा : म्हणौनि उठविलें : मग म्हाइंभटीं आवघा परिग्रहो होता तो आणूनि भटोबासांचां हाती दीधला : दंडवत घातलें : आणि भटाब्रामाप्रति म्हणि० आजि म्यां सर्वसंगप्रत्याजु[गु] केला : तैलागौनि म्हाइंभट आपणयापासिं द्रव्यसंग्रहो न करीति ॥६६॥

[1]**भटीं दोडका नीराकरणें : पडीतबा पचनकरणो हाटांतूनि आणिला म्हणणें ॥** भटोबासांसि भाजला दोडका माने : आत्यंतीक रूचे : एकु दीसु भटोबासां सांघातें पडीतबा भीक्षाआवस्वरासि गेले : तवं एका ब्राम्हणाचां मांडवीं दोडका होता : तयाकडे पंडीतबा पाहातचि राहीले : तव ते ब्राम्हणि भीक्षा घेउनि आली : तवं पंडीतबा वास पाहातचि होते : मग तीया पुसिलें : काइ पाहात असा : पंडीतबासीं म्हणि० पारिसा : तीया भीक्षा घातली : आणि भटोबास नावेक पुढारे नीगाले : आणि तीया ब्राम्हणि तो दोडका तोडूनि पंडीतबासांचां हातीं दीधला : पंडीतबास घेउनि आले : मग भाजिला : हींगु मीठ मीरीये लाउनि भटोबासांसि वोळगवीला : मग भटोबासीं म्हणि० पंडीता हा दोडका नव्हे ना तो : मीं नेघें : नां भटो नव्हे : हा म्यां हाटांतूनि आणिला : मग भटोबासीं आंगीकरिला : एक माहानुभाव ऐसें म्हणति : जेव्हळीं दोडका त्या बाइया दीधला : तेव्हळींचि भटीं देखौनि पंडीतबासांतें म्हणि० आतां तुझा कोण राखैल : पंडीतबासीं म्हणि० आतां माझा श्रीचक्रधरू राखैल ॥७४॥

[2]**भट-मार्ग-माहात्मे माघ मासे अनेम-आटण-नीक्षे[षे]दें गंगातीर-आटण-प्रसंसा ॥** एक वेळ भटोबासीं म्हणि० माह्या मासा उभए गगातीरीं स्थानवीसेख : गंबातीरीचि आटण करावें : ऐसें म्हणि० तैलागौनि माहे मासा गंगातीरीं आटण करीति ॥८४॥

---

१ स्मृ. स. २९२. २ स्मृ. स. ३०७

[1]**राघवचैतन्य : दती जोइसो : गोपाळपडोत : वीठलरावोप्रस्नें दोली सुलतान मार्गव्यावृत्ति करणें : वेधवंतो नागदेवोमार्गु नामकरणें तें जंसें असे तैसें आसो म्हणणें** ॥ राघ चैतन्य ते संन्यासी : गोपाळपडीत ते वाद्वांस : दंती जोइसी तो जोतिया : वीठलरावो तो रावो : हे चौघे **दीली सुलतानाचे** (?) सभेसि प्रसंधि : भलतोए जाणिवेची प्रक्षा [परीक्षा] : **म'हामद** [महंमद] **सुलतानाचे** सभसि भरतोही संवादु : एसे हे चौघे राज्यमानीए : मग एकु दीसी राघवचैतन्य : दतीजोइसी : वीठलरावो : गोपाळपडीत : यैसे हे चौघही **सुलतान महमदापा**सो मार्गव्यावृतीचीया गोष्टी करित होते : आमुचा मार्ग ऐसा : आमचा तो ऐसा : ऐसं या नाना मार्गीचीया गोष्टी होत होतिया : तवं राघवचैतन्यें म्हणि० **'नागदेवोभट'** नाम मार्ग एकु उदेला असे : ऐसे जवं बोलौनि राहिला तव **महमद सुलतानें** म्हणि० तें जैसें असें तैसें आसो : तुम्हीं आणोक गोष्टी करा : एंसें **महमद सुलतानें** म्हणि० तयांतें वारिलें : मग तेहीं हे गोष्टी करूं सांडिली : ऐसें कवीस्वरबासीं आइकीलें : मग कोण्हीं एकीं कवीस्वरबासांतें पुसिलें : ऐसें तो काइसेनि जाणे : मग कवीस्वरबासीं म्हणि० वीग्रहो होइल : कां वीद्यावंत होइल : परि जीव नव्हे : ऐसें कवीस्वरबासीं नीर्वचिलें ॥९५॥

[2]**कामाइसें राज्यपदग्रहीं द्रव्यसंपादणीं टींचरूं आनुवादु** ॥ कामाइसीं भटोबासां काहीं द्रव्य संपादीलें : तयाउपरि भटोबासीं म्हणि० उचीता आनुचीता पडका घेतां माझां हातीं टीचरूं पडिलें गा : ॥११८॥

[3]**डींडोरी गोंदोबा वाराणसी-गमनो आ×र-धर्म-क्रीया-करणी पर-धर्मक्रीया करवणें** ॥ डींडोरी गोंदोबायें भटोबासांतें पुसीलें : भटो माझीं सासुरींचीं वाराणसीस जावों पाहातें आहाति : तीयें मातें म्हणतें आहाति : तुम्हीं चाला : मार्ग-संबळ देउनि : घोडे देउनि : यंसें म्हणत आहाति : मी बहुत टाळितों : परि तीयें न टळति : तरि काइ करूं : एसें डींडोरी गोंदोबायें भटोबासांतें पुसिलें : भटोबासी म्हणि० : नेताति तरि जा : वाराणसी गेलेयावरि सवळेसीचि उठावें : आणि आधी चणा कां तीळ मुखीं घालावा : आणि म्हणती तेतुकें करावें : मग डींडोरी गोंदोबायें सासुरेयासवें वाराणसी गेले : मग तेथ सवळेसीचि उठोति : आणि भटोबासीं

१ स्म. स. तील वृद्धाचार २४. २ स्मृ. स. १७२. ३ स्मृ. स. १६०

म्हणि ० तें आनुष्टीति मग एर कर्म आचरति : ॥१४४॥

[1]एकवेळ दायंबातें भटोबासीं म्हणि० तुम्हीं भीक्षा कां न करा : तवं दायबायें म्हणि० गोसावीं मातें म्हणि० भोजेया आतां आनुसरा गा : ननुसरा तरि हाता संख–तुळसी एइल : परि मी ननुसरेंचि : तें मीं आपुलें पाप भोगीत आसें : ऐसें गोसावीं म्हणि० परि मीं न करींचि ॥१७१॥

[2]**वैजोबा चाडेया मुठि धरूनि गुरूकुळभाग्यें पीको म्हणणें ॥** दुकोळु पडिला : मग वैजोबायें चाडेयावरि मुठि धरिली : आणि म्हणि० मज तरि भाग्य नाहीं : तरि आतां गुरूकुळाचेनि भाग्यें पीको : ऐसें म्हणौनि सेत पेरिलें : तें थोर पीकलें : मग वैजोबाये महेस्वरपंडितातें भटोबासांपासि पाठविलें : महेस्वरभट भटोबासांपासि आले : [3]आणि (भटोबासातें) म्हणि० आमचें सेत पीकलें असे : वैजोबायें म्हणि० कोण्ही गुरूकुळ राखे आणि वीनोगी यैसे पाठवावे : भटोबासीं म्हणि० बीचारा : मग कसकसाल : मग महेस्वरपंडिती म्हणि० वैजोबायें वीचारूनीचि पाठवीलें : मग भटोबासीं महात्मेयांचीयें संबंधियें : वासणीकें : आणि कोण्हीं सलागें माहात्मीं यैसीं पाठवीलीं : आणि तयांतें म्हणि० जा रात्रि–दीस राखौनि खा : ॥१७९॥

[4]**काको आंगुष्टा क्षे[खे]द क्षोनी[खिन्नीं] ईश्वरमोहरदुएत्वा(?): काको आंगुठा दुखवणें ॥** माहात्मां म्हणि० काकोचा आंगोटा दुखवला : तवं एकी म्हणि० आगोठा काइ काकोचा : आंगुठा देवाचा कीं : देवो काकोचा ॥ १८३ ॥

[5]एक वेळ माहादाइ आइसें वेदीके गेलीं होतीं : तवं तेथ एकू ब्राम्हणू '**रूक्मीणी–सैंवर**' गात होता : तेहीं वीठलावरि अभगु दीधला : आणि माहादाइ आइसीं तयासि सीक्षापण केलें ॥१९६॥

[6]**भोंगानें आनूवादें आधीकार्या आनूवादु : आनुसरण ॥** एकवेळ भटोबासीं म्हणि० कोण्हां एका प्रस्तावेयाआनूरूप कोण्हां एकांतें म्हणि०

---

१ स्मृ. स. १४३ २ स्मृ. स. २५५. ३ या स्मृतींतील येथून अखेर पर्यंतचा मजकूर फारच मागेंपुढें झाला आहे. तो स्मृ. स. वरून दुरुस्त केला आहे. मात्र मूळांतील एकहि शद्ब बदलला नाहीं. ४ स्मृ. स. ६० ५ स्मृ. स. १३२. ६ स्मृ. स. २७५

जैसा भींगानेया आंतुल दीवा दीसे : तैसा अधिकार्या माझेया हृदयाआंतु : जे वस्तु क्रीडताए : तें देखे आणि आनूसरे ॥१९९॥

[1]एक वेळ भटोबासीं म्हणि० त्रीकाळ स्नान जीए गावीं आसे : तेया गावांतें 'तीर्थ' ऐसें म्हणिजे : तातलां धोंडां बैसति : तेया गावांतें 'क्षेत्र' यैसें म्हणिजे : नीराहारी आसति मास उपवासीनी : मासु उपवासी बैसति : तेयातें 'वर्त' ऐसें बोलिजे : तुळा पूरूखीं बैसति : यातें 'दान' बोलिजे : म्हणौनि राजसे तामसे स्थानीं न बैसावें ॥२१९॥

[2]एक वेळ कव्हणीं एकी भटोबासांतें पुसिलें : भटो गोदोहन-मंत्र केतुलेया वाचक : भटोबासीं म्हणि० आठां पानवळयापर्यंत : दारीं उभया ठाकीजे : यातें गोदोहन-मंत्र म्हणिजे ॥२२२॥

[3]**सारंगपंडीतीं श्रीप्रभु-वोवाळणी म्हणणें** ॥ सारंगपंडीत रीधपुरासि आले : तेहीं म्हणि० तुम्हीं मज कोण्हीं श्रीप्रभूतें नको दाखउं : मीचि वोळखैन : मज एळापुरीं गोसावी श्रीप्रभू दाखवीले आसति : मीचि वोळखैन : सामोरे आले तवं श्रीप्रभु क्रीडा करित होते : ऐसें देखीले : आणि म्हणि० सारंगपंडीतीं : हे घेया श्रीप्रभु गोसावी म्हणौनि साष्टांग दंडवत घातलें : दर्सन जालें : मग वीळचां पूजाआवस्वरूसमै आर्ती करितां श्लोकु केला : तो वोळगवीला : **हृदय भज परेशं स्वामिनं गुंडमाख्यम्** ॥ ऐसा श्लोकू सारंगपंडीतीं वोळगवीला ॥२२३॥

## वृद्धाचार

आतां भटोबासां खालौतरें तो वृधाचारु : ॥ छ ॥ गोसावीयांचीया श्रुती : भटोबासांचीया सुमृतीं [स्मृति] : भटोबासां खालोतरें तो वृधाचारु : बृधाचाराखालौतरें तें वर्नमान : ॥ ४ ॥ छ ॥

[4]एक वेळ कवीस्वरबासीं पंडिबासीं म्हणि० पंडीतो चाला जावों आटणा : तवं पंडीतबासीं म्हणि० तेयांते [पत्नी हिराइसाला] पुसा : मग कवीस्वरबासीं हीराइसांतें पुसिलें : मग हीराइसीं म्हणि० जा ना कां : मग नीगाले : मग दीसां दोका पंडीतबासीं म्हणि० भटो माझी कीं प्रसस्ति

१ स्मृ. स. ३१०. २ स्मृ स. ३१३. ३ स्मृ. स. २२ ४ स्मृ. स. तील **वृद्धाचार** ४ 'अज्ञात स्मृतीं'त वृद्धाचाराचे निराळे आंकडे नाहींत.

भंगली : कवीस्वरबासीं म्हणि० कां भंगली : ना त्यांतें भटीं नीरोवीलें : आणि मीं तयांतें सांडौनि आलों : म्हणौनि भंगली : मग कवीस्वरबासीं म्हणि० जा तरि : मग पंडीतबास मागौतें आले ।। २३३ ।।

केसोबासीं '**ज्ञानकळानीधी**' स्तोत्र केलें : कवीस्वरबासीं '**नरवीलापू**' केला : ।।२३४।।

[1]एकवेळ पंडीतबास बैसले होते : तवं हीराइसें आलीं : आणि पंडीतबास बैसले होते तवं तेहीं चौघडी उकलीली : आणि एकोकडे बैसा म्हणि० तवं पंडीतबासांतें हीराइसीं म्हणि ० तुम्हीचि बैसा : कां मज बैसों दया : परि तीयें न बैसतीचि : ऐसें कवीस्वरबासीं आइकोलें आणि म्हणि० **परश्री[स्त्री]-संतापाचा ज[ज्व]रू : न भोगी एसा नाहीं नरू नीर्मछरू : एकु पंडीत-दामोदरू – : वांचौनिया** : ।।२३५।।

[2]एकवेळ आनोबास आणि दंतीगोपाळबास आटण करितां नंदुरबारिएसि गेले : तेथ कामाइसांसि भेटले : आणि म्हणि० कामाइ क्षीरि : तूप : साकर ऐसें घाला वो : मग तेहीं क्षीरि : तूप : साकर एसें आभ्यागत केलें : तें जेवीले : आणि आटणासि नीगाले : तवं पुढां आणीक आभ्यागत भेटले : तेयांतें घेउनि मागौते नदुरबारिएसि आले : आणि मागौतें म्हणि० कामाइ : क्षीरि : तूप : साकर जेउं घाली . हो कां : म्हणौनि मागौतें जेवीले : मग नीत्यां आटणासि नीगाले ।।२४०।।

[3]एक वेळ आनोबा एका(कि) आटणासि नीगाले : तवं पुढां पंडीतबास : हीराइसें भेटली : भेटीचे दीस जाले : मग पंडीतबासीं आनोबासांतें म्हणि० भटीं एकांकी आटण वारीलें असे : मग आनोबा सनीर्देस आटणासि नीगाले : हळ गावी भीक्षा केली : पवर्त नमस्करिला : आणि म्हणि० मी कैसा एकला : म्हणौनि पाचास्यांचा कागद केला ।।२४२।।

---

१ स्मृ. स. वृ. ५ २ स्मृ. स. वृ. १७ ३ स्मृ स. वृ. २२

# परिशिष्ट २ रें

## 'स्मृतिसमुच्चयां'तील अधिक स्मृति

[ 'स्मृतिस्थळ' व 'अज्ञात स्मृति' या दोह्रोंतहि न येणाऱ्या स्मृति 'स्मृतिसमुच्चया'वरून पुढें दिल्या आहेत. मात्र त्यांत फक्त मथळे असलेल्या पण वृत्तांत मुळीच न येणाऱ्या ज्या अनेक स्मृति येतात, त्या येथें वगळल्या आहेत. ज्यांत केवळ सर्वसामान्य नीत्युपदेश येतो, अशाहि चार-सहा स्मृति गाळल्या आहेत.

'स्मृतिसमुच्चया'च्या तीन पोथ्या उपलब्ध झाल्या ज्या पोथीचा या ग्रंथांत उपयोग केला आहे, तीत ३५७ स्मृति व ४५ वृद्धाचार येतात. शेवटीं न सापडणाऱ्या स्मृतीचे ७० मथळे आणि चक्रधरप्रभृतींच्या शिष्यांचीं नांवें नेहमींप्रमाणें येतात. हाहि मजकूर येथें वगळला आहे.

'स्मृतिसमुच्चया'च्या अन्य पोथ्यांत स्मृतींची संख्या चारदोन आंकड्यांनीं कमी असली, तथापि वृद्धाचारादि अवांतर मजकूर प्रायः एकसारखाच असतो. ]

**म्हाइंभट श्रीप्रभुसन्निधानागमन ॥** म्हाइभट अवकासा बैसले : मग सौच्य करावया ढेंकूळ घेतलें : तवं थेंबु लागला : तें ढेंकूळ विरालें : मग म्हणि० ढेंकूळ विरालें तैसेंच देह विरैल : ऐसा संसारु नासिवंतु : आणि गोसावी म्हणि० अनुसरावें तें कैसें : वरीसा ए[ए]का तरि अनुसरावें : अवघेयाची व्यवस्था करूं : मग अनुसरों : आणि काइ : तवं देह गेलें पां : तरि काइ : तरि अवघेयाची व्यवस्था करूं : मग सा मासा : एका अनुसरों : तरि काइ : तरि अवघेयाची व्यवस्था करू : मग सा मासा : एका अनुसरों : तरि काइ : तव देह गेलें पां तरि काइ : पाखा–खांडा अनुसरों : आणि काइ : त्या आरुतेचि देह गेलें पां : तरि काइ : तरि आठां दीसां अनुसरों : आणि काइ : तवं होउनि देह गेलें पां : तरि काइ : आतां घरासि जाउं : तात्काळीक त्यांचां हातीं देवों : मग नीगों : तवंवेऱ्हीं देह गेलें पां : तरि काइ : तरि गंगेसि जाउ सौच्य करूं : मग नीगों : आणि

काइ : तवंवाटे सर्पु लागला पां : कां बळसु बैसला : कां अडखळोनि पडीला : तेणें देह गेलें पां : तरि सृष्टि कपाळीं पडीली कीं : तरि आतांचि अनुसरों : मग हातींची माती सांडीली : घरा न वचतां अनुसरले : गोसावीयांचेया सन्निधानी असावें : तरि सासुरेया हातीं असों न ल्हाइजे : आणि गोसावी रुद्धिपुरीं श्रीप्रभूचा अवतारु सांघीतला असे : तरि श्रीप्रभूचेया सन्निधाना जाओं : म्हणौनि रुद्धिपुरासि नीगाले : ते ऐका गांवासि गेले : ब्राम्हणाचीए वोसरीए नीजैले : उदीयांचि उठीले : ऐका गांवासि गेले : धोत्र फाडीलें झोळी केली : भाबैचां चतुर्दसीं भीक्षा केली : तें अवघेंचि अन्न आलें : मग नदीस गेले : जेउं बैसले : तवं धोत्राची घाणी अन्नासि लागली : तेणें वोकारी आली : एकुही घांस् पोटीं न पडेचि : मग अवघें अन्न पाणीयांतु घातलें : मग ब्राम्हणा एकाचीए वोसरीए नीजैले : उदयांचि उठीले : मार्गि उभया ठाकले : मग वीचारूं लागले : काइ पां गोसावीचेया दर्सना जाओं : कीं गांवां जाओं : ना आतां गांवासीचि जाओं : अन्नमय प्राण : प्राणमय प्रांक्रमु : काइ देहेंवीण धर्मु असे : काइ गोसावीया अनुसरवताए : ऐसीं नासली–वीटलीं अन्नें काइ सेववीतें असति आजिपासौनि : म्हणौनि सकळ पदार्थ आले परि तेही सेववति ना : आतां ये सृष्टी अनुसरवेचि ना : मग पुढीले काइ अनुसरण होइल : हे काइसेया तवं : आतां परमेश्वरपुरासीचि जाओं : मग देह जाओं भावें राहों : म्हणौनि एका गावासि गेले : भीक्षा केलीया नदीसि गेले : जेउं बैसले : तवं घांसभरि पोटीं पडीला : आणि बाहे आरुळली : एकी वासना : थापटीली : आतां म्या जींतीलें : ऐरें दीसीं घास दोनि पोटीं पडीले : मग हळूहळु पादांसासि आणिलें : ऐसे परमेश्वरपुर पावेति : तवं आहारासि आणीलें : आपण उत्तम दुटी पांगुरले होते ते एका ब्राम्हणा दीधली : तयाची घोंगडी आपण घेतली : ते उसवीली : एक आडफळें वीकीलें : तयाचा गुळ घेतला : दुरडिऐ घालूनि डोइऐ ठेउनि रुद्धिपुरासि आले : तवं पुढां मातांगु भेटला : त्यानें पुसिलें : हां गा एथें राउळ राज्य करीताति ते कोठें आहाति : तेणें म्हणि० हे नव्हेति : राउळी आतांचि बीजें केलें : तेणें गोसावीयांचीया अनुभवीचीया दोनि–ऐकि लीळा सांघीतलीयां : आणि म्हाइंभटां थोर समाधान जालें : मग तो मातांग पाठिमोरा जाला :

आणि म्हाइंभटीं पांटि खालि ठेवीली : आणि म्हणि० **न मे प्रियः** ० ॥१॥ मज देव दाखवीला : म्हणौनि तयासि साष्टांगी दंडवत घातलें : मागुती पांटी घेउनि मग श्रीप्रभूचेया दर्सनासि आले : गुळाची दुरडी गोसावीयांपुढां ठेवीली : साष्टांग दंडवतें घातली : चरणावरि माथा ठेवीला : मग गोसावीयांतें अवलोकीत पुढां बैसले : ए दीउनि सन्निधानीं राहीले : मग आबाइसांसि राख सांडावेयाचें उलींग मागीतलें : मग कीती ऐक दीवस श्रीप्रभूचां सन्निधानीं होते : तवं आमचां गोसावी आंबाहूनि हंसराजें बोलाउं पाठवीली : ते रुद्धिपुरासि आली : श्रीप्रभुगोसावीयांचें दर्सन जालें : दंडवतें घातलीं : आणि आठवलें : मग म्हणि० म्हाइंभटो तुमतें गोसावी बोलावीलें असे : गोसावीयें म्हणि० आधीं नीरोप सांघावा : मग श्रीप्रभूसि दंडवतें घालावीं : वस्तींचेया नीगावें : ऐसे म्हणि० असे : तैसेंचि म्हाइंभटीं श्रीप्रभुगोसावीयांतें पुसिलें : मग आबाइसातें पुसिलें : आबाइसीं प्रसादाचा कुसकटा दीधला : तैसेंचि म्हाइंभट नीगाले : ते क्रमेचि आले : तें येळीये मार्गि गोसावीयांतें जात देखीलें : मग गोसावीयातें सव्य जाउनि पुढां आले : गोसावीयांतें दंडवतें घातलीं : चरणा लागले : गोसावीया वडातळीं आसन जालें : म्हाइंभट पुढां बैसले : मग कुसकटाचें पोतें गोसावीया दर्सना केलें : मग गोसावीयासांगातें क्रमेंचि बेलापुरासि आले : तेथें गोसावीयांचां सन्निधानीं कोण्ही ऐक दीवस होते : ऐकें दीसीं म्हाइंभटातें गोसावीं म्हणि० भटो तुमतें श्रीप्रभुगोसावीयांचां ठाइ नीत्य वेचु कीती वेचे : म्हाइंभटीं म्हणि० जी जी कही दामु वेचे : कही सरदामु : कही पाउणदामु वेचे : तत्प्रमाण द्रव्य एथ घेउनि या : मग तुमचे सन्निधान-चरीतार्थ कीजैल : जी जी म्हणौनि चरणा लागले : मग गांवासि गेले : मग सर्वेचि गोसावी भटोबासातें म्हाइंभटातें बोलाउं पाठवीलें : ते सरालेयासि गेले : म्हाइभटा भेटि जाली : मग भटोबासीं म्हणि० म्हाइंभटो चाला : तुमतें गोसावी बोलाउं पाठवीलें असे : तवं म्हाइंभटीं म्हणि० भटो त्यातें दृव्य मागत होतां : तरि तीयें द्रव्य नेदीतीचि : वाखारी काढा : कण वीका : मग घेया ऐसें म्हणि० मग वाखारी काढीली कण वीकीले : तयाचा वीसारु घेतला असे : वाखारी मज जातु असे : तुम्ही म्हणाल तरि ऐसाचि एइन : मग भटोबासीं म्हणि० तें मी नेणें : तुमतें तवं गोसावी बोलाउं पाठवीलें

असे : भटोबासातें जेवावेया राहावीत होते : परि भटोबास न म्हातीचि : सर्वेचि भटोबास बेलोपुरां गोसावीयांपासि आले : म्हाइंभट न एतीचि : मग गोसावी उत्तरापंथेसि बीजें केलें : मग भटोबासांतें महादाइसीं श्रीप्रभूचेया सन्निधानीं आणीलें : गम म्हाइंभट आले : अवधीं भक्तजनें आली : श्रीप्रभूचां सन्निधानीं राहीलीं : दास्य करूं लागलीं : ॥१०॥

**दीघी मेइंदेवो पंडीत सीधनाथभक्तिकरणीं भटोबासानुवादें साचोकारें देवदास्यकरणीं अणु ऐक लाहीजे म्हणणें** : ॥ दीघीचे मेइंदेवोपंडीत ते कास्थ : तया सीधनाथाची भक्ति : ते प्रतदीनीं घोडेया बैसूनि सीधनाथासि ऐति : तेथ आंघोळी करीति : ऐक वेळ भटोबास गोसावीयांचेयां दास्याकारणें वांकीसि गेले होते : ते उदैक पैलाडि सीधनाथाचां देउळीं बैसले : तवं मेडदेव आले : सीधनाथाची पूजा केली : तें अवधें भटोबासीं देखीलें : आणि म्हणि० ऐसें साचोकारें या देवाचें दास्य कीजे : तरि आणु ऐक लाहीजे : तवं तेहीं म्हणि० साचोकार देवो तो कवणीऐ ठाइ असे : भटोबासीं म्हणि० हा नव्हे देवो : रुद्धिपुरी सर्वज्ञ राओ राज्य करीत असे : म्हणौनि रीधपुराकडे हात उभीला : आणि भटोबासांचेया सद्वासरीसा कोथोळोबासांसि वेध उपनला : मग तैसेचि नीगाले : भटोबासांसांघातें रुद्धिपुरासि आले : माहाद्वारीं श्रीप्रभुगोसावीयां भेटि जाली : श्रीप्रभुगोसावीं '**कोथळो**' ऐसें नांव ठेवीलें : ॥१२॥

**पोमाइसें भीक्षाकरण आगमनीं भटोबासानुवादें 'तूं भीक्षुकांची भीक्षुकी होए' म्हणणें** : ॥ पोमाइसें तीयें वांकीची : तीयें भटोबासांपासि भीक्षा करावेया आली : मग भटोबासीं म्हणि० पोमाइ तूं भीक्षुकांची भीक्षुकी होए : तूं गावांतु भीक्षा करीसील तरि तुझीयं वृतिचें नैये : तेव्हेळी भीक्षुकें भीक्षा करूनि येति : आणि पोमाइसें माहाद्वारीं उभी टाकेति : भीक्षा सद्व करीति : भीक्षुकें भीक्षा घालीति : ते जेवीति : तयाचीया वृतोचीया साटि आंसु एति : तीया गोसावीयांचीए सेवे वीनयोगा जाति : ॥१३॥

**जगळदरणेनी राहाटी गोद्वय पाठवणी माहादेवोपाठक व्यावृतिकरणीं बुधि काढली म्हणणें** : ॥ जगळदरणा तो राजौररोहीणखेडीचा स्वतंत्रु बैसणाइतु : गोसावीयांचीं अन्नेकें सामर्थ्ये आइकोनि बुधि धरीली :

गोसावीयांचीए सेवेलागूनि जगळदरणेनी राज्यस्थीतीची दांडी : माचा-मुख्य करूनि राहाटि : कांहीं दृव्य दोनि दुभतीया गाइ ऐसे पुरोहीताहातीं पाठवीलें : मग गाइ मठीं बांधलीया असति : गोसावीयांचीए पूजेचीं फुलें नीगति : ते गाइसि घालीति : खरवडि कोंडा घालीति : म्हाइंभट वीकत गवत घेउनि घालीति : तीया आटति तरि मागुतीया घालीति : आणि आणीकी तानीयां आणीति : ऐसें कोण्हीएक दीवसवेऱ्हीं चालीलें : माहादेवो पाठक आले : तेहीं म्हणितलें : राजेहो : तुम्ही पाठवीतां तें गोसावीयांचेया उपयोगा जात नाहीं : तें नागदेवोभटांचेया उपयोगा जातें : ऐसी व्यावृति केली : मग जगळदरणेनो बुधि काढीली : ॥१४॥

**पंचसतें सन्यासी न्यायभारति-मुख्य : श्रीप्रभुदर्सनागमनीं : राजमढीं भटोबासनीरोपें म्हाइंभटीं जीवन्मुक्तदशां-प्रस्नु-प्रतीष्ठा :** ॥ न्याएभारती सन्यासी : तयांसरीसे पांचसतें सन्यासी असति : ते वाराणसीहूनि गंगातीरा एत होते : तयातें आइकूनि गांवोगांवीचे ब्राम्हण लोक साउमे जाति : आदरमानेंसी गांवां घेउनि ऐति : श्रेष्ठ आराधन करीति : ऐसें पेणेंप्रति होए : ते खेडासि आले : तेथौनि अळजपुरां जात होते : तयांतें आइकौनि केसवनाएक-मुख्य समस्त माहाजन तयासि भेटावेया गेले : भेंटि जाली : मग तयांतें प्रार्थूनि रुद्धिपुरासि आणीलें : ते देवळां राहीले : आपण घरासि आले : झडकरि पाकनिष्पति करवीली : तयांतें बोलाउनि घेउनि आले : बैसों घातले : ते बैसले : तवं गोसावीं बीजें केलें : गोसावीयांतें देखतक्षेवींचि न्यायभारती-मुख्य समस्त सन्यासी उभे राहीले : सीरां गोसावीया आसन जाले : आधीं गोसावीयांचें चरण प्रक्षाळण केलें : मग गंधाक्षत केलें : मग संन्यासीयांसि केलें : क्रमेंचि भोजनें जाली : मग न्याएभारतीयें म्हणि० नाइको चाला : राउळांचेया मढा : तीहीं म्हणि० चाला : अवघे मढासि आले : रायांगणीं भेटि जाली : मग म्हाइंभटीं रायांगणीं जाडी बैसों घातलीया : तेथ बैसले : गोसावीयां पाट-गादी बैसों घातली : तेथ आसन जालें : गोसावीं काकुपूर्वक म्हाइंभटांतें अवलोकुनि मग सन्यासीयांतें अवलोकीति : परि तें म्हाइभटां नकळे : मग भटोबासीं म्हाइभटांतें म्हणि० गोसावीयां ऐसी प्रवृत्ति असे जें तुम्हीं यासि चर्चा करावी : मग म्हाइभटीं म्हणि० तुम्हीं कां बोला ना : भटोबासीं म्हणि० तें मजकरवीं गोसावी

बोलवीलें : म्हणौनि तें बोलीलों : मग म्हाइभटीं न्याएभारतीसि प्रस्नु केला : जीवन्मुक्त तो कैंचा : मग तेहीं म्हणि० तो ऐसा : म्हणौनि नीरूपीला : तयांसि म्हाइभटीं आक्षेपीलें : तो तयासि परीहारू नेदवेचि : तेहीं म्हाइभटांतें म्हणि० जीवनन्मुक्त तो कैसा : म्हाइंभटी जीवन्मुक्ताचीं लक्षणें बोलीलीं : मग जीवन्मुक्त तो ऐसा कीं म्हणौनि गोसावीयांकडे हात करूनि दाखवीलें : मग सन्यासीं म्हणि० होए भटो भलें केलें : जीवनमुक्त ते गोसावीचि होति : मग म्हाइभटीं संन्यासियांसि गंधाक्षता केलीया : ताटभरि एला–लवंगा–युक्त मुखमुधि आणीली ते दीधली : मग ते सन्यासी स्तुति करीत गेले ॥१५॥

**म्हाइंभट पुरुषार्थ–चरितार्थ पूजे चुकि** ॥ मग ते दुटी प्रावर्ण करूनि गोसावी रायांगणा बीजें केलें : गोसावीयां दुटी मीरवत देखोनि म्हाइंभटीं आपुलां मनीं म्हणि० ऐसीं वस्त्रें तीयें मीयां म्हांइयेंचि वोळगावीं कीं : ऐसें माझें ईश्वरीं प्रेवेसन हात असे : अहंता पोटीं भावीली : आणि गोसावीयां खति आली : आणि गोसावी कोप स्वीकरीला : आणि ते दुटी श्रीकरीं धरूनि रायांगणी टाकीली : भइमीं कुसकरीली : तें देखोनि समस्तें भक्तिजनें तटस्तें खंतावलीं : ऐसीं पाहातें राहीली : परी गोसावीयां कोण्हांइं वीनववेना : मग भटोबासीं म्हाइंभटांतें म्हणि० तुम्हीं आपुलां मनीं कांहीं कल्पना केली: तवं म्हाइंभटीं म्हणि० होय भटो मीयां मनोर्थु भावीला : परितोखु वाटला : मग भटोबासीं म्हणि० कटकट म्हाइंभटो : ईश्वरु पाहूनियां जीवा काइ असे : मग काइ प्रवसेन करील : तुम्हीं काइ प्रवेसन केलें : मग काइ तोखलेति : आतां जा : गोसावीयां दंडवत घाला : मग म्हाइंभटीं गोसावीयां दंडवत घातलें : आणि अनुताप करूं लागले : जी जी : मी अपराधी : मीयां आपुलां मनीं भावीलें : तेया माझेया अपराधा क्षेमा कीजो जी : गोसावीयांहूनि यें वस्त्रें काइसीं जी : परि मी नेणेंचि जी : ऐसें अनुतापौनि दुख करूं लागलें : मग गोसावीं प्रसन्न होउनि म्हणि० आवो मेला आतां होए म्हणे : आरे उठि उठि म्हणे : मग म्हाइंभट उठीले ॥१९॥

**तथा कोथळोबावरि अन्यथा बुधि चुकि** ॥ एक दीं म्हाइंभटाची ब्राम्हणी देमाइसें आणि कोथळोबा भानवसामध्यें पायांवरि पाए घालूनि

तांदुळ सडीत होते : तवं भावनसाकडे म्हाइभट आले : तेहीं तें देखीलें : आणि उभय राहूनि पाहीलें : आणि मनीं म्हणि० : एकी वासना : सब्दीं बोलीले : देहा जरि ऐसें तरि रात्रीही तैसें होत असैल : तेणें कोथळोबा दैनावले : पोळले : नीच–नीच तीळ–तीळ झींजत असेति : तें नीमीत्त म्हाइभट कोथळोबासावरि प्रसन्न नसति : तें देखौनि गोसावीयां न मनेचि : मग एक दीं गोसावींयां राजमढांतु माचेयावरि आसन असे : मग गोसावीं म्हाइभटातें अवलोकूनि म्हणि० आवो मेला जाए : कोथळा तैसा नव्हे म्हणे : पुनरपी म्हणि० ऐसें बहुत वेळ म्हणि० तें म्हाइंभटां नकळेचि : मग भटोबासी म्हाइंभटातें म्हणि० म्हाइभटो तुम्हांप्रति गोसावी कोथळे-याचा परीहारु देताति : तुम्हीं कांही कोथळेयावरि अन्यथा भावीलें : कीं कांहीं बोलीलेति : म्हाइभटीं म्हणि० हो भटो : मग म्हाइभट उठीले : अनुताप करूनि गोसावीयां साष्टांग दंडवत घातलें : आणि म्हणि० जी जी : म्यां पापोयें कोथळेयावरि अन्यथा ज्ञान भावीलें : तया अपराधा क्षेमा कीजो जी : तवं गीसावीयें म्हणि० आवो मेला जाए: कोथळेयासि दंडवत घालि जाए : कोथळा तैसा नव्हे : मग म्हाइभटीं कोथळोबासांसि साष्टांग दंडवत घातलें : आणि म्हणि० कोथळोबा मीयां पापीयें त तुम्हांवरि अन्यथा ज्ञान भावीलें होतें : तो तुमचा परीहारु गोसावीं दीधला : तरि तया माझेया अपराधा तुम्हीं क्षेमा कीजे : तवं कोथळोबासीं म्हणि० उठाउठा म्हाइभटो : तुम्हां अन्यथा जनलें हें माझेंचि पाप कि : म्हणौनि कोथळोबासीं साष्टांग दंडवत घातलें : मग उभयां आत्मत्वप्रीति जाली ॥२०॥

**आबाइसां वस्त्रप्रसंगीं जें मीठ नाहीं तें चींचेंसि खाइजे म्हणणें ॥**

ऐक वेळ माहादाइसीं श्रीप्रभुगोसावीयां वस्त्र ओळगवीलें होतें : कीती एक दीवस गोसावी प्रावर्ण केलें होतें : मग तें उत्तारयाचें जालें : तें धूनि ठेवीलें होतें : मग एक दीं तें वस्त्र वीळीचाचां पूजावसरीं आबाइसें स्नान करूनि नेसली : तें देखोनि महादाइसां न मनेंचि : मग महदाइसीं म्हणि० आबै हें वस्त्र कां नेसलीति : मग आबाइसीं म्हणि० रूपै हें जुनें जालें : गोसावीयांचेया उपयोगा न वचे : मग महादाइसी म्हणि० गोसावीयांचेया श्रीचरणाखालि घालावेया होइल : नाहींतरि मुसळां जातेया

पाटेयां सीळां गवसणी करावेया होइल : मग आबाइसीं म्हणि॰ रूपै माझें उवळें वस्त्र होतें तें पूजावसराचां समयीं हें धुतलें नेसलीयें : मग तें वस्त्र फेडीलें : आपुलें नेसलीं : मग गोसावी म्हाइभटांकरविं दोनि वस्त्रें घेववीलीं : मग म्हाइभटें प्रार्थूनि आबाइसांतें वस्त्रें समर्पीली : मग आबाइसें नेसली : मग भटोबासीं म्हाइभटां–महादाइसें–मुख्य समस्तांसि म्हणि॰ तें मीठ नाहीं जें चीचेसि खाइजे : परि तुम्ही गुरुकुळ ऐसें म्हणाल जें भटोबासीं आपुलीए माएसि वस्त्र घेतलें : म्हणौनि नेघीजे : एऱ्हवी आबाइसां वस्त्र हें श्रीप्रभूची सेवा की : एकी वासना : म्हाइभटी महादाइसांतें म्हणि॰ आबाइसां वस्त्र हें श्रीप्रभूची सेवा कीं : आणि महादाइसीं म्हणि॰ नागदेया तैं मजपासोनि टकलें : म्हणौनि गोसावीं आबाइसांची थोरी उमटवीली : मग महादाइसीं उणें पतकरीलें ॥२१॥

**गोपाळपंडितां बोधु** ॥ गोपाळपंडित सातां मासां जन्मले : चक्रपाणी पीतया नाम : आणि आजेया नावं अनंतभट : तेहीं आणूनि गोसावीयांचीए उसगीए घातलें : मग म्हणि॰ जी जी याचे डोळे उघडति ना : मग गोसावीं म्हणि॰ याचे चर्मचक्षु आहाति ते ज्ञानचक्षु होति : इतुलेनि डोळे उघडीले : म्हणौनि **'पारमांडल्य'** ऐसें म्हणि॰ : मग थोर जाले : माहापडित जाले : गोसावीयें बोजें केलेयाउपरि मग भटोबासांपासौनि बोधु जाला : भटोबासाचीए अवीद्यमानीं अनुसरले : हे वरखेडाचे ॥४०॥

**महादाइसीं मातापुरां जाणें** ॥ महादाइसें मातापुरासि गेली : पर्वत देखूनि म्हणि॰ **अमोघा सीधी जयाचां घरीं : तो मातापुरीं राज्य करी : तया नमन श्रीदत्तात्रया** ॥ म्हणौनि साष्टांग दंडवत घातले : परि पर्वतावरि न वचतीचि : एकीवासना : पर्वतावरि गेली : पर्वत नमस्करीला : परि मातापुरा न वचतीचि : (गोसावी) वारीलें म्हणौनि ॥५६॥

**ततो जायावीचारें सासु–भ्रातार–भीक्षाकरणीं अस्मदीए भीक्षादानीं उभयां सासुसुनां सांघातु** ॥ तीहीं उभयेवर्गी [ देवतासंबंधी माहादेवबा व त्याचो आई आकाइसें यांनी ] भीक्षा केलेयांउपरि मग माहादोबासांची ब्राम्हणि मागीलाकडूनि भटोबासांपासि आली : भटोबासांतें भीक्षा मागितली : मग भटोबासें तीऐसि भीक्षा दीधली : आणि आकाइसा आणि माहादोबासांची ब्राम्हणि या दोघीं सांसुसुनां सांघातु लावीला ॥६२॥

**केसोबा वीजनीं मात्र-पीत्र-श्रुश्रषा-प्रस्नुकरणीं वीद्वांस-उद्गृहणीके नीरुत्तर करणें** ।। एक दीं केसोबा वीजनीं बैसले होते : तवं तेथ आणीकु वीद्वांस आला : तेणें म्हणि० तुम्हीं ऐसें काइ केलें : ग्रहस्थाश्रमी असतां मातयापीतयाची श्रुश्रषा केलेयां काइ मोक्षु नव्हे : तवं केसोबासीं म्हणि० भटो एकु देहपति तो माता-पीता सांडीलेया वांचूनि नव्हे : तैसा जीवपति तो संबंधीयें : वर्णाश्रम : स्वदेसु : ज्ञाति : गोत्राचा त्यागु केलेयावांचूनि नव्हे : कां ना **देशमात्रादि०** ।।१।। ऐसा केसोबासीं चर्चा करूनि नीरुत्तर केला ।।११९।।

**गौराइ घ्रूतोन-मौल्य-ग्रहणी भटीं पूर्ण-मौल्य-दान-स्वीकारें नीरूपण** ।। ऐक वेळ दामा सेरु तूप वीकत होते : तें गौराइसीं तीं रुकां वीकत घेतलें : मग भटोबासीं म्हणि० गौराए तीचा रुका तीसि देसी तरि मी जेवीन : मग गौराइसीं तीचा रुका दीधला : मग भटोबासीं भोजन स्वीकरीलें : आणि म्हणि० गौराए हे कर्मराहाटी न सरे : मग दैवराहाटी प्राणीयांतें नाउणें कैसें सरे : ऐसें नीरूपण केलें ।।१९८।।

**मार्गवेध-लोकागमनीं पंडित केसवदेव केंठाइलेषापासौनि आपणपें रक्षण कथन** :।। एक वेळ भटोबासो म्हणि० पंडिता केसवदेया भटमार्गा वेधले जीव तुमचेया गळया झोंबतील गा : परि तुम्हीं आपणेयांतें राखावें गा :।।२९३।।

**तथा सास्त्रार्थयाचनीं पंडित-केसवदेव-संस्कृत-प्रसंसा** :।। एक वेळ प्रस्नानुरूप भटोबासीं म्हणितलें : ये परसास्त्रीचें जें जयासि नुमटे तें पंडिताचेया गीतांतु कीं केसवदेयाचेया लीळास्तोत्रांतु पाहावें : ऐसी प्रसंसा केली :।।२९६।।

**पंडित त्रीकाळावसर-प्रबधत्वें प्रीयत्व** :।। ऐक वेळ पंडितबासी तीन्ही पूजावस्वरु वोवीरूप बांधले : ते ऐसे : **गोसावी अरु(णो)दयावसरी । उपहुडोनि आले बाहीरि** : ते भटोबासांपुढां म्हणि० ते आइकूनि भटोबास तोखले ।।२९९।।

**क्षणप्रस्नुकथन** : ।। ऐकवळ कव्हणीं ऐकीं भटोबासांतें पुसिलें : भटो क्षेण कीतुकेयातें म्हणिजे : भटोबासीं म्हणि० सा पाणीवळी दारीं उभयां ठाकीजे : यातें '**क्षेण**' म्हणिजे :।।३१२।।

**स्वयें अभ्ये(भ्यं)ग-नीराकरण :॥** ऐकवेळ भटोबासीं म्हणि० माहात्मां आपण होउनि दीवाळीचां सणीं आदिकरूनि न्हावें नां : तें कां ना : गोसावीयें म्हणि० लीसिपुसि हे धर्म सामान्य स्त्रीयांचे कीं : ॥३१७॥

**परमेश्वरनाम-श्रवण-पूर्वक सास्त्रगुणोपगुणानुवादु :॥** ऐकवळ भटोबासी म्हणि० गोसावीयांचें नाम श्रवण जालेयां जाणीव : सीहाणीव : चातुर्यें : कुसळता : सां(शां)ति : नीवृति : क्षेमा होआवी : ॥३१९॥

**माहात्मयां स्थान-नमस्कारणीं बहुसालें दंडवतें करीतां भातवेळन-कथन ॥** एक वेळ भटोबास स्थानें नमस्करीत होते : तंव कवणें स्थानें तें नेणीजे : कव्हणीक माहात्मे बहुतें दंडवतें लवलवां घालीत होते : तें देखूनि भटोबासीं म्हणि० हां गा हे भातवेळणी काइ गा : याउपरि म्हणि० हींसान्य वीक्षेपु चुकउनि आर्ति नीर्वेदपरु स्मरे : ऐक दोनि दंडवतें न पुरती : ऐसें म्हणि० ॥३३५॥

**अंगुळीत्रए नीक्षेपणीं प्रकरणत्रए-स्मरण-कथन :॥** भटोबास नीरुपण-प्रसगें कव्हणाप्रति अगुळीयाचा नीक्षेपु करीति : तेधवां म्हणति : **'अन्य व्यावृति' : 'माहावाक्य' : 'असतीपरि'** : यें तीन्हीं प्रकरणें आठवावीं : ॥३३६॥

**कौतुकनीषेधु :॥** एक वेळ भटोबासीं म्हणि० कौतुक न कीजे कीं नीर्वंसु होइल म्हणौनि : ॥३३७॥

**भटोबासां त्रीकाळीं त्रीकाळावसरु स्मरणभगा-अपराधी म्हणौनि अनुतापु करणें :** भटोबास तीही काळीं गोसावीयाचे सवीशेष तीन्ही पूजावसर आठवीति : पदार्थागमनीं पदार्थ : लीळास्मरणी नीर्वेदु : नीरूपणसमइं नीरूपणस्मरण : वीजनसमइं वीहिरण-स्मरण : भोजनसमइं आरोगण-स्मरण : महाजेवणावळसमइं महोपाहार-आरोगण-स्मरण : महाजन-वीद्वांस-दर्सनसमइं वोळगस्मरण : नीद्रास्थानसमइं श्रीचरणालींगनस्मरण : कदाचीतु कींचीत स्मरण राहे : तरि अपराधु म्हणौनि अनुतापु करीति : ॥३४७॥

**वीयोगाग्नी(ग्नी)-तापु देहपर्यंत असणें :॥** (भटोबासां) परमेश्वरवीयोगाग्नीजनीत जो तापु तो देहपर्यंत होता : तो शैत्योपचारींही उपस[श]मेचिनां :॥३५०॥

**भटोबासीं ज्वरागमनीं होराइसें पंडिता नीरोवणें :॥** पंडितबासीं स्वप्न

देखीलें : आणि तैसाचि पाहाणपटी भटोबासां तापु आला : तवं केसोबा-पंडीतबा–मुख्य समस्तें गजबजीलीं : दीवस दोनि च्यारि जाले : मग हीराइसीं म्हणि० भटो मज कवणासि नोरोवीलें : भटोबासीं म्हणि० पंडितो मीं मागैन तें द्यावें गा : पंडितबासीं म्हणि० हो देइन : भटोबासीं म्हणि० हो कां : तरि तुज देहपर्येत हीराइची नीरोवण आहे हो : ॥३५३॥

## वृद्धाचार

गोसावी बोलीली ते श्रुति : भटोबासीं बोलीली ते स्मृति : भटोबासा-खालौतर श्रुतिसुमतियुक्त तो वृधाचारु : वृधाचाराखालौतर श्रुतिस्मृति-वृधाचारयुक्त तें वर्तमान : वर्तमानाखालौतर वर्तमानयुक्त रूढ जे मार्गप्रवर्तक त्याची जे स्थीति ते मार्गरूढि : इही पांचां प्रकारीं आचारु : आणि वीचारु : यावेगळें तें नव्हे ॥

**कवीस्वरीं 'पूजावसर' सप्तवींशति श्लोक करणें ॥** एक वेळ कवीश्वरबासीं **'वेदादयोपि न विदु : परमारथीश : ॥'** ऐसे पूजावसरीचे सातावीस श्लोक केले ॥१२॥

**तथा वोवी करणें ॥** एकवेळ कवीस्वरबासीं **जयाचीया नाम संगती एथोनि ऐसीया वोविया पढतां : जीवां होए चोखाळतां : परब्रम्हेंसी होए सायुज्यता : म्हणे कवी भास्करु ॥** ऐसीया पूजावसरींचिया वोविया साटि बांधलीया संक्षेपुमात्रें स्मराविया ॥१३॥

**तथा दृष्टांतादि लक्षण–कथन ॥** आनोबासीं केसोबासीं **दृष्टांतां** संबंधीले : तयांची लक्षणें आणि आणीकही सास्त्रलक्षणें ऐसी संस्कृतें केली ॥१६॥

**माहोरीं कवीस्वरोद्‌गृहणिके राघवभटीं मध्यस्थळग्रहणें वीद्वांस–पराजयो : कवीस्वरीं जैतपत्र देणें ॥** एक वेळ माहोरीं कवीस्वरबासांसि आणि वीद्वांसासि वादु पडिला : तवं तेणेंचि काळें आनोबास आणि राघवभट अटणवीशेषें तेणेंचि प्रांतें आले : ऐसें बोलत बोलतां कवीस्वरबास नावेक आनोजलें ऐसें आनोबासीं आइकीलें : मग वीजनीं राघवभटांतें म्हणि० कवीस्वर नावेक आनोजले ऐसे लोकु बोलत असे : राघवभटी म्हणि० हो नावेक दीसत असे : हें दर्शन कवीस्वरीं वाचीलें नाहीं : ऐसें आम्ही जाणतों : मग आनोबासीं म्हणि० कां तुम्ही हातवसां कां मातें बोलावीतील तरि मी हातुवसीन : ऐसें म्हणौनि राघवभटातें

पाठवीलें : आले : कवीस्वरांसि भेटि जाली : राघवभटीं मागील व्यवस्था सांघीतली : तवं तें अवघें लटीकें : वीद्वांस-पराजयोपूर्वक कवीस्वर महोत्कट वादु करीत असती : मग एरे दीवसीं कवीस्वरबासीं राघवदेवभटांतें म्हणि० राघवभटो आजि तुम्हीं बोला : तीहीं मानीलें : तेव्हेळीं उदैक बोलाउं आले : कवीस्वरबास तेथ कपाळ गुंडूनि गेले : बैसले : आणि म्हणि० माझां आंगीं आजि सुख नाहीं : मज बोलवेना . हे आमचे बुडुवे बोलतील : तवं माहाजनीं म्हणि० तें तुम्हीं टाइचेंचि वीचारा : यांचीया हारीं तुम्हां हारि : कवीस्वरबासीं म्हणि० यांचेनि जैतें आम्हां जैत : मग राघवभटां आणि वीद्वांसा वादु प्रवर्तला : वीद्वांसीं बोलतां म्हणि० हा आहे मेघळ : राघवभटीं म्हणि० मेघळ म्हणिजे काइ : ना मीथ्यावादु : मीथ्यावादु म्हणिजे लटीकें : ऐसा वादु करूनि राघवभटीं वीद्वांस नीरुत्तर केले : तेव्हेळीं माहाजनीं कवीस्वरबासांसि जएपत्र दीधलें ॥२६॥

**कवीस्वरीं परसरामबासां स्तोत्र पठणार्थ देणें** ॥ एक वेळ कवीस्वरबासीं परसरामबासां वीजना जातां स्तोत्र घोकावेया दीधलें : तें तेंहि तीसरेयाची पाहारीं आणुनि मागुतें दीधलें : कवीस्वरबासीं म्हणितलें : कां गा घोकीसीचिना : परसरामबासीं म्हणि० ना घोकीलें : ॥३३॥

**तथा 'रत्नमाळा' पठनार्थदानीं पठण करूनि पृच्छे कवीस्वरीं केसवदेवप्रसंसा** ॥ मग कवीस्वरबासीं '**रत्नमाळा**' स्तोत्र घोकावेया दीधलें : तें तेंही सीघ्र घोकीलें : मग म्हणि० कवीस्वरहो हा चरण कळेना : तो ऐसा लाउं : तव कवीस्वरबासी म्हणि० नको गा परसरामा केसवाचार्ये होते (ते) महेस्वरव्याकरणी होते : हें अवघेंचि कळे : ना हें ऐसेंचि नाम सारावें : ऐसी प्रसंसा केली : ॥३४॥

**दामोदरपडित देहावसानश्रवणें हीराइसां मरणप्रसंसा** ॥ एक वेळ भीक्षावसरीं कोण्हीं (ए)कीं कान्होपाध्यां भीक्षा दीधली : ते तेहीं पाणीयांतु घातली : पंडितबासां नको नको म्हणतां घातली : याउपरि पंडितबासीं म्हणि० ऐसें तुम्हीं काइं केलें : कान्होपाध्यीं म्हणि० हें आम्हां भटोबासीं सांघीतलें असे : पंडितबासी म्हणि० गोसावीयें कालउनि जेउं सांघीतलें आहे कीं : कान्होपाध्यीं म्हणि० आम्हीं बुझलों आहों तें जेउं की तुम्हीं म्हणतां तें जेवों : मग पंडितबासीं म्हणि० आतां आम्हांसि गंगातीरी वास्तव्य बोलीलें नाहीं : मग लाजीवैरागराकडे गेले : मग तेथ केतुलेनि कालें तयांचें

देहावसान जालें : तेव्हेळीं हीराइसीं आइकीलें : मग म्हणि० भलें केलें पंडितीं : मरों जाणीतलें : देहांती मजवेगळें जालें : ॥३५॥

**देहांतीं साधीं परसरामबा दाढ देणें** ॥ साधें बहुत अक्षमे जाली : अंतसमयो मांडला : मग देहांतीं साधी प्रसरामबासांसि प्रसादाची गांठी आणि दाढ प्रसन्न होउनि दीधली : ॥३८॥

**नागाइनीरोपीत सब्दोपपति : कवीस्वरीं परसरामकथन : परसरामबायें तदुपपति स्वशीष्यकथीत श्रवणें : बाइदेवोबा अपरीतोखु करणें ॥** नीरूपणाप्रसगें नाति नागाइसीं साटि उपपति धरीलिया होतीया : एक वेळ नागाइसीं तीया साटि उपपति कवीस्वरबासांसि सांघीतलीया : मग तीया साटि उपपति बाइदेवोबासाचेया सीष्यासि परसरामबासीं सांघीतलीया : तें बाइदेवोबासीं आइकीलें : आणि म्हणि० मज आणि भटोसि केसनें सौजन्य : मज न सं[सां]गेचि : मां परसरामासीं सांघीतलीया : ऐसां अपरीतोषु केला : ॥३९॥

**परसरामबासीं 'धाकुटें आचारस्थळ' : 'वीचारस्थळ' करणें** : ॥ केसोबासीं '**रत्नमाळा**' स्तोत्र करीतां वचनें नीवडीलीं होतीं : तयांतु आणीकें कांहीं परसरामबासें नीवडूनि घातलीं : मग परसरामबासीं गोपाळबासांचेंनि संवादें अन्वयो लाउनि धाकुटें '**आचारस्थळ**' आणि '**वीचारस्थळ**' केलें : ॥४१।

**तथा परसरामबाकथनीं रामेस्वरबादेहावसान** ॥ तें '**आचारस्थळ**' आन '**वीचारस्थळ**' परसरामबासीं रामेस्वरबासांपासि वाचीलें : तें परीसूनि तीहीं म्हणि० हे आचार्ये होति : परि वचनें बहुतें राहीलीं : मग रामेस्वरबासीं लीळांवरीलें पांचसें वचनें नीवडीलीं : मग '**धाकुटें आचारस्थळ**' : '**वीचारस्थळ**' करावें तवं देहावसान जालें : ॥४२॥

**रामेस्वरबा–देहावसानसमइं आगत मुरारिबाप्रति हरीबा–अवंचकत्व–कथन** ॥ रामेस्वरबासांची असवित आइकूनि मागीलापुढाराकारणें मुरारिबा आले : भेटि जाली : मग रामेस्वरबासीं म्हणि० मुरारि : अस्तमानीं आलासि : मग पेटेया हरिबातें म्हणि० हरी यातें कांहीं वंचूं नको हो : पेटेहरीबा हे परसरामबासाचे : मुरारीबा ते पेटेहरीबाचे : आधी वामनबासांचे : ॥४३॥

# परिशिष्ट ३ रें

## फरक व अधिक मजकूर

['स्मृतिस्थळां'त आलेल्या स्मृतींतील कांहीं महत्त्वाचे फरक व अधिक मजकूर येथें 'अज्ञातस्मृती'वरून दिला आहे. 'स्मृतिसमुच्चयां'तील वृत्तांत–कांहीं शाब्दिक फेरफार किंवा विस्ताराचा कमीअधिकपणा वगळ-ल्यास–सामान्यतः 'अज्ञातस्मृतीं'तील सदृश वृत्तांताशीं मुकाबला ठेवतो. **स्मृ. स.** तील सदृश स्मृतींचे क्रमांक सर्वत्र नमूद केले आहेत.

आरंभीचे कंसांतील आंकडे 'स्मृतिस्थळा'चे आहेत.]

**(क्र. १८) अ. स्मृ. १७**–'**ज्ञानभास्कर**' ऐवजीं '**ज्ञानकलानिधि**' हें ग्रंथनाम. शेवटी "भटोबासीं पोथी आपुलां हातीं घेतली : ते उदेंक तापत होते : मग ते सगडीएमध्यें घातली :" असा विचित्र मजकूर ! **स्मृ. स.** त **स्मृ. स्थ.**–प्रमाणेंच हकीकत, क्र. ६७. सिद्धांते हरबास व धाकटे सोंगोबास यांच्या 'अन्वयस्थळां'तील पुढील अवतरण पहा : "वाडेगांवकर लक्ष्मीधरीं '**ज्ञानकळानीधी**' केलें होतें : तें भटोबासीं विरहीयांचीं अंतःकरणें जातील म्हणौनि तापत होते त्याचि सगडीमध्यें घातलें : मग पाथरीपासि बाबुळगांवि '**ज्ञानभास्कर**' स्तोत्र केलें :"

**(क्र. २५) अ. स्मृ. ७८**–आधीं पुढील भाग जास्त : "श्रीप्रभुगोसावी वेढे करिति : तेव्हळि तीपूरारिभटांचा हातु धरिति : एक वेळ आकोसांचा पुत्रू माहादोबा त्यांचा हातु धरूनि वेढे केले : म्हणौनि तेयातें '**देवतासंबंधी माहादोबा**' ऐसें म्हणति :" **स्मृ. स.** ६१.

**(क्र. ३०) अ. स्मृ. ७९**–शेवटल्या दोन संक्षिप्त वाक्यांऐवजीं पुढील विस्तृत भाग येतो : "याउपरि भटोबासीं म्हणि० पंडिता केस्वदेया आतां तीरुपतीया सीवावीया : घो घालावी : काठीये कोपीन : बांधावा : कंथा सीवावीया : आंचळे नेसावे : झोळीए पात्र घालावे : भीक्षा करावी : यैसा वेखु धरावा : मग तैलागौनी तीरपतीया : कंथा सीवलीया : वस्त्रा गेरू

घानली : काठीए कौपीन : आंचळे नेसले : मग झोळीए पात्र घालूनि भीक्षा करिति : एऱ्हवी आधीं वस्त्रा गेरू नव्हती : तीरपतीया आंचळे नव्हते : कंथा नव्हतीया : वोली आखंड पांगुरति : सैंगळा नेसति : नसुधीए भीक्षा करिति : ऐसें आधी चीन्ह होतें : तें भटोबासी कृष्णभटांचिया प्रश्नणाउपरि पालटोले : " स्मृ. स्थ. १५१.

(क्र. ४०) अ. स्मृ. ७३–भटोबासाचे 'असतीपरि' काइ तुझेया बासि वीहोली : ते गोसावी मजचि वीहीली की : " असे निराळेच उद्‌गार ! स्मृ. स. त स्मृ. स्थ. प्रमाणेंच, क्र. २५८.

(क्र. ६८) अ. स्मृ. २५–" माझें ज्ञान म्हाइंभटां लक्षमीधरभटांजी ज्ञासा करीतां उजळलें " असा भटोबासाचा निराळा अभिप्राय ! स्मृ. स. त स्मृ. स्थ. प्रमाणे, क्र. ७७.

( क्र. ७९ ) हिराइसेच्या दृढत्वाची गोष्ट दामोदरपंडिताच्या आत्महत्त्येच्या प्रयत्नामुळें भटोबासाने सांगितली, असें अ. स्मृ. ७२ वरून दिसते. तो प्रयत्न असा : " मग हाकेसरीसी भटोबासांसि ज्वरनीवृति जाली : तैसेच भटोबास उठीनि बैसले : पाहाति तवं पंडितबास तेथ नाहीतिः आणि भटोबासीं म्हणि० धावां : गा धावां : पंडीत आपणयातें गंगे घालूं गेला असे : धावां धावां : म्हणौनि धाविनले : तवं पंडीतबास पोटीं दगड् बांधताति : उडी घालावी तवं भटीं पाठवीले ते धांवत आले : आणि म्हणि० पंडीतो चाला : तुमतें भटीं बोलाउं पाठवीले असे : आणि दगडु सांडूनि टाकीले : भटोबासांपासि आले : भटोबासीं म्हणि० हें काइ पडीता: एसनी आत्महत्या कैंसी आंगवीली : मग भटोबासीं धर्मवार्ता प्राणीयें वीख वाघवळ सुगी पाटी करीति : तरि तयासि आत्महननारूप मळ लागे : परि वाया न वचे : तैसेंचि आवीयेकारणें जरि करी तरि नरक होति : ऐसें नीरूपण केलें : " स्मृ. स. त याची स्वतंत्र स्मृति आहे, क्र. २९०

(अ. १२७) अ. स्मृ. १२१–भटोबासहि स्वतःचें तीर्थ घेतो ! पहा : " आणि भटोबासींहीं आपुलां चूळभरि उदक घेतलें : तवं तेणें वासणीकें म्हणि० भटो तुम्हीं कां घेतां : भटोबासीं म्हणि० तूं कां घेतासि : ना मज कर्मे नासावेया : भटोबासीं म्हणि० तरि माझीही कर्मे नासतील :

तेणें म्हणि० यैसें कैसें भटो : भटीं म्हणि० तें [ = तीर्थ] देवाचें घेइजे को : " स्मृ स. त अ. स्मृ. प्रमाणेंच, क्र. २५६.

(क्र. १४६) अ. स्मृ. १४०–राजा रामदेवराव यादव "कांबळीए मार्गीचा" असा उल्लेख. स्मृ. स. १६९.

(क्र. १४९) अ. स्मृ. १४१–रामदेवरावाची राणी कामाइ हिला तिचा सावत्र पुत्र सिंगण यानें बलात्कारानें सती जाण्यास लाविलें, अशी जास्तीची हकीकत येते. तेवढी देतों : " मग कामाइसें गावां गेलीयानंतरें बहुतेकां दीसां रावो नीवर्तला : मग रायाचेनि पुत्रें सींगणें कामाइसातें म्हणि० वेगु करा : आगि रीगावेयाची आइती करा : तवं कामाइसीं म्हणि० मज सत्व नाहीं : मी तुझीए भानवसीएचा ठोंबरा खाउनि आसेन : तवं सींगणें म्हणि० जयासि सत्व नाहीं : तयातें बाधौनि घालावें लागैल : तवं कामाइसांचा पीता मांदळीया माहादरणा तो आला : तेणें हातीं धरिली : आणि म्हणि० हें काइ कामाइ : गोड तव खाइजे : आणि कडू तवं सांडीजे : उठि : माहाद्रणेयाची लेंकि बांधौनि घातली येसे कां करीत असेसि : तेव्हळि न न्हातेनि नीगाली : मीळेवरि उभी ठेली : आणि म्हणि० नको गा सींगणा : मज भटमार्गीचा उपदेसु असे : राख : मां मी भीक्षा करीन : तेणें तुज आयुष्य भवीष्य होईल : नां घालीसी तरि तुझें नीसंतान होईल : तवं तेणें म्हणि० लोटा रे लोटा : म्हणौनि लोटलीं :" स्मृ. स. १७३.

(क्र. १८४) अ स्मृ. १९०–" आजि वरखेडाचेया चक्रपाणीचे पूत्र गोपाळ आणि केसवदेव एतील : " असा गोपाळपंडित उर्फ आनोबास व केशोबास यांच्या बंधुत्वाचा जास्तीचा उल्लेख. स्मृ. स. ४१.

(क्र. २०९) अ स्मृ. २०५–मध्यंतरीं पुढील मजकूर जास्त : " (पंडितबास केशोबास) म्हणति आजि ऐंसी धर्मवार्ता जाली : जें आवीद्येचा प्रस्नू नीगाला : जो ब्राम्हणू वीटाळला असे : तो पांतीसि योग्य नव्हे यैसी धर्मवार्ता जाली : प्राश्चीत दीधलेयावांचौनि योग्य नव्हे : तैसें सूद्रासि प्राश्चीत दीधलेया पांतीसि योग्य नव्हे : यैसी धर्मवार्ता जाली : " स्मृ. स. २१०.

(क्र. २२०) अ. स्मृ. ४४-आधीं पुढील भाग जास्त : " साधांतें

(गोसावी) म्हणि० होतें : साधेहो तुम्ही अळजपुरा जा : तेथ कळंकेस्वराचां देउळीं चोरासी नीरयें लीहीले आहाति : ते पाहावे : ऐसें साधांतें गोसावी म्हणि० होतें : मग गोसावी उत्तरपंथें बीजें केलेयाउपरि मग आसन्नेधानीं साधीं हे गोष्टि आमृते मायांबापुढें सांघितली : आणि म्हणि० तरि मी तेथ जाइन : यैसें म्हणि० होतें : मग एकु दीसु आमृतें माइदेवीभटीं साधांतें म्हणि० आइ तुम्हीं आळजपुरा जाल : तरि तेलियाचा सांघातु आळजपुरा जातु आहे : हो जाइन : म्हणौनि नीगाली : "–इ० स्मृ. स. ९९.

# टीपा

[स्थलाभावास्तव अगदीं अवश्य अशा–व त्याहि त्रोटक–टीपा दिलेल्या आहेत. वाक्यार्थस्पष्टीकरणापेक्षां संदर्भस्पष्टीकरणावर अधिक भर दिला आहे. पण जेथें संदर्भ मुळावरूनच स्पष्ट होऊं शकतो, तेथें टीपा दिलेल्या नाहींत.]

**(पा. १) सामकोसें**--'मदळसा' आम्नाय हिजपासून गणतात. **(पा. २) डांगरेसु**--आउसेचा कुत्रा.

## स्मृति

**(१) भटोबास**--नागदेव-क्वचित् 'भट' शद्व. 'चौघे भावंडें' नागदेवासूद्धां. **दादोस**--रामदेव वडणेरकर. चक्रधराचा त्याच्याशीच स्पर्धा करणारा शिष्य [स्मृ. २२१]. **गोसावी**--चक्रधर. क्वचित् गोविंदप्रभु. **श्रीप्रभु**--गोविंदप्रभु. **(४) पांच पिंपळ**--ऋद्धिपुरचें गोविंदप्रभूचें एक क्रीडास्थान. **(५) साधें**--एल्हाइ, येल्हो. चक्रधरशिष्या. इतरांस 'आलंबन' वाटण्याइतकी प्रतिष्टित [स्मृ. १९५]. **छिन्नपाप-स्थळी**--डोंबेग्राम येथील नदीकांठचें पूर्वीचें स्मशान. तेथील खडकावर चक्रधर बसत असल्यानें पंथीय त्यास पवित्र मानतात, व त्याच्या पाषाणाच्या मूर्ति-वगैरे बनवितात. **(७)** या व पुढील स्मृतींतली हकीकत डोंबेग्रामची. बादाठान (हल्लीं भामाठाण), देगांव हीं डोंबेग्रामलगतची गांवें. **राजमठ**--कुठलेंहि नृसिंह–मंदिर. येथें डोंबेग्रामचें. **(८) तो मठु**--डोंबेग्रामचा राजमठ. चक्रधर तेथें असतां प्रायः या मठांत रहायचा. **जयावरि श्रीचरणु ठेवीति**–कर्ता चक्रधर. **पातुलिया**--डोंबेग्रामच्या राजमठाच्या चक्रधरस्पर्शपूनित उंबरठ्याचीं केलेली कटोऱ्यासारखीं काष्ठपात्रें. **चक्रपाणिबास**--नागदेवपुत्र व चक्रपाणि आम्नायाचा प्रवर्तक. **(९) संदर्भ**--बेलापुर येथून चक्रधरानें 'उत्तरा पंथें' वा त्यापूर्वीं देवगिरीस कायमचें गमन केलें, म्हणून बेलापुरदर्शनानें बाइदेवाचे प्राण जाण्याची भीति. **(११) संदर्भ**--ऋद्धिपुरच्या ईश्वरनायक महाजनाच्या कन्येशीं गोविंद-प्रभु लग्न करणार होता, म्हणून म्हाइभटानें स्वखर्चानें सर्व तयारी

केली. पण ऐनवेळीं गोविंदप्रभूची इच्छा बदलून लग्न फिसकटलें! याच प्रसंगीं महादाइसेनें 'धवळयां'चा पूर्वार्ध गाइला. पुढें ईश्वरनायकाची कन्या स्वतःस गोविंदप्रभूची पत्नी समजून आजन्म अविवाहित राहिली! गोविंदप्रभुनिधनानंतर ईश्वरनायकानें नागदेव-म्हाइभटांवर मुलीसाठी वाटणीचा दावा केला. पण तो हरला! **गोसावीयांची...जात असे**-गोविंदप्रभूला त्या मुलीशी लग्न करण्याची इच्छा आरंभी तरी कां व्हावी, या जाणिवेने म्हाइभटानें पुढें मुलीला वांटा दिला. **आउसें**-प्रथम जोगीण, पुढें चक्रधरशिष्या (१५-१७) '**उद्धरण**'-'सूत्रपाठां'तील एक भाग. '**शास्त्रप्रकरणान्वयो**,' '**प्रकरणान्वयो**'-'सू. पा.'तील 'अन्यव्यावृत्ति' ते 'उद्धरण'पर्यंतचीं नऊ प्रकरणें. '**दृष्टांत**'-चक्रधराचे त्याच्या सूत्रांवरील दृष्टांत. '**दहावें प्रकरण**'-वरील नऊ प्रकरणें व 'दृष्टांत' हें दहावें. '**दृष्टां(दार्ष्टा)तिक**'-'दृष्टांता'वरील केशोबासाचें व्याख्यान. '**आचार**,' '**विचार**'-'सू. पा.'तील भाग. (२२) **रूपै**-महादाइसा. (२३) **तयांसि पूर्वी...साच जालें**-आपलोस आपली भक्ति शेवटी वाटेल, असें चक्रधर महादाइसेला म्हणाला होता, तें खरें झालें. **उत्तरार्धीचि**- 'लीलाचरित्र,' उत्तरार्ध १०, यांतील. (२४) **देहांतीं...बोलिजे**-आयुष्याच्या अखेरीस संन्यास घेणें हें ससारावर 'अर्धे उदक' सोडणें होय. (२५) **माहादोबा**-'स्मृ. स.' प्रमाणें हा साळकर-आम्नाय-प्रवर्तक. **दीढु वेढा**-परिशिष्ट ३, [२५] पहा. (२६) **भावार्थ**--चांगदेव एकाच दिवशीं सात वासनिकांकडे जेवला, पण त्यानें शेवटीं भिक्षान्न मागून तें नदीतीरीं भक्षण केल्यानें त्याजकडून धर्मबाह्य काहीं घडलें नाही. (३२) **पांचै नामिं**--श्रीकृष्णादि 'पंचकृष्णां'च्या नामस्मरणांत. (३६) **संदर्भ**-'मीठ वीखो-' 'सू. पा.' आ. मा. २५३. (३७) **म्हणितलें**--अर्थात् चक्रधरानें (४०) '**असतीपरी**' 'सू. पा.'तील भाग. (४५) **प्रीतीचें प्रणाम**--'तुम्हां परस्परें परम प्रीति होआवी-' 'सू. पा.' आ. १३६. (४६) **जासलवटस्थानीं व्हावें**--स्वयंपाकांत ज्याप्रमाणें पळी तिखट व गोड अशा दोन्ही प्रकारच्या पदार्थांत घातली जाते, त्याप्रमाणें 'नित्य' व 'नैमित्य' हे दोन्ही विधि आचरावे. 'स्मृ. स' ३२१ त यापूर्वी 'ऐथ उपपती नोवरीऐचीः' हें वाक्य जास्त. **सेनपुंजी...करावें**--शेण वेंचणाऱ्या पोरी शेणाचा

अमुक लगदा माझा, तमुक माझा असें हातादिकांनीं दर्शवून त्यांवर आपली मालकी अहमहमिकेनें प्रस्थापित करतात, तसें अहमहमिकेनें दास्य करावें. (४७) **निमित विधि**—प्रसंगोपात्त केलेली सत्कृत्यें. जसें, गुरुसेवा, रुग्णशुश्रुषा, शास्त्राध्यापन इ. **नित्यविधि**––स्वतः नेहमीं फिरणें व भिक्षान्न सेवून ईशचिंतन करणें.––हे दोन पंथीय आचार होत. **निमित विधि करावा**––अटनादिकांपेक्षां परसेवा अधिक पुण्यप्रद, म्हणून 'निमित विधि' करावा. **मज...सगतीचि**––नागदेव म्ह. मला ३॥ वर्षांत चक्रधरसेवा करून त्याची जितकी कृपा संपादतां आली तितकी भांडारेकार यास 'निमित्त विधि' नीट न साधल्यानें १६ वर्षांतहि संपादतां आली नाही. **भांडारेकार**––दामोदरभट नामक चक्रधराचा त्याच्या हयातीत वारलेला शिष्य. (५२) **छर्दोबा**––रंगार–वासनी, वऱ्हाड, येथील सारंगपाणी नामक ब्राम्हण. हा प्रथम चक्रधरशिष्य होता, पण पुढें इतका 'बिघडला' कीं, शूद्र परस्त्रीशी रत होणें, छर्दितान्न–वमन–भक्षण करणें व आपला गुरु चक्रधर कीं नागदेव हेहि न आठवणें–येथपर्यंत त्याची मजल गेली ! दुसऱ्या प्रकारावरूनच त्याला 'छर्दोबा' नांव पडलें. **भावार्थ**–आजचा सदाचारी उद्यां दुराचारी होऊं शकेल. (५७) **माट झाडिं**––ब्रम्हविद्यारूप दाट जंगलांत. (६१) **अमृते मायांबा**––अमृत आम्नायाचा प्रवर्तक. (६९) **सदर्भ**––गोविंदप्रभूकडून परतून आलेलें उंची वस्त्र चक्रधरानें इंद्रभटास प्रसाद म्हणून दिलें होतें. (७५) **तरी पुरुष...दर्शन होइल**––प्रस्तावना, परिच्छेद ११, ४ [अ] पहा. (७६) **'आचारस्थळ'**–'सू. पा.'तील 'आचार.' (८३) **सबंधु वारीला**––'संबंधियांचा संबंधु तो विशेषता त्याज्य–' 'सू. पा.' आ. १. **दोहीं देवांचा**––गोविंदप्रभु व चक्रधर यांचा. **गुढयासरीसे**––तटस्थपणा वा शरणागति यांच्या द्योतक अशा विशिष्ट ध्वजा त्याकाळीं असाव्या. (९०) **देमती**––देमाइसा नामक चक्रधरशिष्या. (९२) **नाथोबा**––चक्रधरशिष्य. 'मडळीक' हें टोपणनांव. (९३) **नाथोसि...हांसों नको**––नाथोबाचें वागणें 'लीला–चरित्रा'वरून पुष्कळदां हास्यास्पद वाटतें. तशांत एवंगुणविशिष्ट नाथोबानें कटकदेमाई व वंकी यांना स्वतःचे शिष्य बनविल्यामुळें [स्मृ. १३१] तर त्यांचें हसें होणें जास्तच स्वाभाविक आहे ! पण अखेर त्यानें नागदेव हा मुख्य

आचार्य म्हणून आपल्या या शिष्यांना त्याचें शिष्यत्व पत्करावयास लावलें. म्हणून नागदेव म्ह० आतां कुणी नाथोची थट्टा करूं नका. (९७) **तो-** लुखाईचा नवरा. (९८) **लोहोबंध...कांहीं असे**-लोखडी शृंखलांनीं बद्ध केलेला गाडा-संसारबंधन-तुटेल, असा कांहीं उपाय आहे काय? (९९) **चोळीका-क** पोथींत 'पोळीका' पाठ नसून 'चोळीका' हाच पाठ आहे. **ख-ग-घ** त 'पोळीका' पाठ असून 'सकळ' लिपींत प-च हे परस्परांचें संकेत होतात. म्हणून प्रथम 'चोळीका' हा अपपाठ वाटला. पण पुढें पाहण्यांत आलेल्या 'स्मृ. स्थ.'च्या इतर कांहीं पोथ्यांत व सिद्धांते हरिबास-सोंगोबास 'अन्वयस्थळां'त 'चोळीका' पाठ आढळल्यानें अखेर तोच कायम केला आहे. (१००) **साटी...नाहीं**—'जरठां धर्मी अधिकारु नाहीं-' 'सू. पा.' वि २५७. **जैसें...पडे**—घुणाक्षरन्यायानें कीटकाकडून लांकडावर क्वचित् एखाद्या अक्षराचा आकार उमटावा, तद्वत्, वृद्धत्वा-मुळें खेइभट हा ज्ञानग्रहणास अपात्र असतांहि त्यास ज्ञान झालें! (१०४) **चौदा वैरी**— १० ज्ञानकर्मेंद्रिये व ४ मन, बुद्धि, अहंकार, चेतना. **अशेष देवताचक्र**—पिंडी व ब्रम्हांडी प्रत्येकीं ८१ कोटि, १। लक्ष, १० इतक्या देवता आहेत. (१०६) **पिंडें...खेळों**—विषयसेवन करूं. (१०८) **वीस-संख्या**—सुतकाचे १० दिवस. (१०९) **खळीयेचें प्रमाण**—'विजना जातां जैसा कांहीं खळिये बैसावया नेइजताये'-'सू. पा.' आ. मा १८८. (१११) **वानरेस[श]**—एकदां नागदेव वानराप्रमाणें झाडावर निर्भयपणें उडत वगैरे होता, म्हणून चक्रधरानें त्यास हें टोपणनांव दिलें. (११३) **यैसा द्वारकेचा...होतें**—रामापेक्षां द्वारकेच्या बाजारपेठेचें-म्हणजेच श्रीकृष्णाचें-वर्णन केलें असतें, तर तुमची पापनिवृत्ति झाली असती. रामापेक्षां श्रीकृष्ण श्रेष्ठ, हा भाव. **अभंगु**—प्राचीन ग्रंथांत ओंवीला अभंग व अभंगाला ओंवी म्हटल्याचीं उदाहरणें आढळतात. तेव्हां येथें हा शब्द मूळांत वृत्त[Metre]पर आहे, हें उघड आहे. 'A part for the whole' या न्यायानें अभंग वा ओंवी म्हणजेच ग्रंथ. (११४) **दसांके**—दहा कडव्यांचें. येथें दहा कडवीं धृवपदासुद्धां. चौपदी वगैरेसारखा एक पद्यप्रकार. (११५) **बाइदेया...करावें**--चक्रधराच्या लीलास्थानांच्या आसपास राहून—किंवा त्यांच्या अनुरोधानें-अटन करावें, म्हणजे अटना-

बरोबरच हीं तीर्थस्थानेंहि नमस्करितां येतील (१२३) **नाथाची**—नाथ पंथ व महानुभाव पंथ यांच्यांत नेहमीं स्पर्धा असल्यानें येथें महादाइसेची कोणत्या तरी नाथपंथीय कवीवर कडी दर्शविली आहे! (१२५) **दाइबा**—चक्रधरशिष्य. 'भोजेया' टोपणनांव. (१३२) **बंदीजन**—चक्रधरानें उज्जनीचे बंदी सोडविल्याचा मोघम उल्लेख ग्रंथांतरी येतो, पण त्यांचा नीट खुलासा होत नाहीं. **आतां तुम्हां...भेटि दीजैल**—प्रस्ता. ११, ४ [अ] पहा. **मग तेहीं क्षेपावें**—त्या ज्ञानाप्रमाणें आचरण करावें. (१३७) **रेंभाइसें**—कुमर आम्नायाची प्रवर्तिका. **यें राजकुमरें**—'सू. पा.' वि. २४३ पहा. (१३८) **वांकुडे दाइंभट**—'दायेंबा' आम्नायाचा प्रवर्तक. (१३९) **गदोनायक**—देवगिरीच्या यादवांचा कोशाध्यक्ष. राजानें त्याला एकदां अटक केली असतां तो चक्रधरकृपेनें सुटला. (१४०) **खेइभट**—स्मृ. ९८-१०१ मधील खेइभट सेगांवचा व नागदेवशिष्य. हा चक्रधरशिष्य. **प्रसादाचि रोटी**—चक्रधराच्या पानांतील प्रसाद म्हणून ठेवलेली. [१४१] **उपाध्ये**—जानो उपाध्ये. चक्रधरशिष्य; पण यानें नागदेवापासून संन्यास घेतला [स्मृ. १८२]. (१४२) **सारंगपंडित**—चक्रधरशिष्य. उमाई त्याची पत्नी. सारंगपंडितापाशीं चक्रधरप्रसादाचा लाडू होता. (१४६) **'विजना गेले होते'** याऐवजीं 'चक्रतीर्थाकडे गेले होते'-अ. स्मृ. १४०, स्मृ. स. १६९. 'चक्रतीर्थ' निंबजवळचें एक स्थान. **गणेस**(श)--हेंहि तसेंच एक स्थान. (१४८) **गोसावीं...रायाचा**--'महाराष्ट्रीं असावें'-'सू. पा.' आ. २४ (१४९) **आदिभावो चुकवा**--पापपुण्याचें आदिकारण जी स्वतःची वासना, इच्छा ती चुकवा, नाहीशी करा म्हणजे स्वेच्छेनें सती जाऊं नका. बलात्कारानें जावें लागल्यास आत्महत्त्यादोष लागणार नाहीं. **येरीं**-सिगणानें; परिशिष्ट ३, [१४९] पहा. (१५०) **वेध**-ईशप्राप्तीची तळमळ. **बोध**-ईश्वर, जीव, देवता व प्रपंच [सृष्टि] या चार मूलतत्त्वांचें ज्ञान. **देहविद्या**—योगभ्रष्ट पुरुषास ईश्वर अशी शक्ति देतो कीं, जिच्यामुळें त्याला पुढील जन्मीं सुवर्णाप्रमाणें उज्ज्वल देह प्राप्त होतो. ही शक्ति म्हणजेच देहविद्या. सदर दिव्य देह सृष्टिसंहारापर्यंत तसाच कायम राहतो. 'देहविद्ये देहोचि फळ—' 'सू. पा.' वि. मा. १६ पहा. **वेधु आणि बोधु...देहविद्या होइल**-वेध-बोध व संन्यासेच्छाहि आहे, तर मृत्यूनतर

देहविद्या मिळेल. **अडनि...होइल**--वेध-बोध आहे, पण कांहीं अडचणीं-मुळें संन्यास घेतां आला नाही, तर अशा स्थितींत मनोमन संन्यास घेतलेलाच आहे, या जाणिवेनें ईश्वर मोक्ष देईल. **ना वेद(ध)...सून्य जाइल**—वेध-बोध आहे, पण संन्यासेच्छा नाहीं, तर 'सृष्टि सू(शू)न्य' जाईल—ईशप्राप्ति होणार नाही. 'सू. पा.' उद्धरण २३ पहा. **परि बोधाचें...तोखु उरैल**—पण ईशप्राप्ति न झाली तरी 'बोधाचें साध्य' म्हणजे चैतन्यमायाप्राप्ति होईल. चैतन्यमायेचें पद विनाशी असल्यानें हा जीव तेथून लौकरच पतन पावेल. तथापि पतनानंतरहि त्यानें आपला 'बोध' कायम ठेवल्यास त्यावर ईश्वर कधीं काळीं कृपा करील. **बोध नाहीं...ज्ञान देइल**—प्रस्ता. ११, ४ [अ] पहा. (१५३) **संबंधाचि मुदी**—चक्रधरस्पर्शपूनित धातूची अंगठी. (१५६) **माचा**--चक्रधरस्पर्शपूनित लांकडी सिंहासन. **व्यक्तिभंग**--चक्रधरसंबंधाच्या वस्तूंची मोडतोड करणें हा 'व्यक्तिभंग' होय. त्या वस्तु मोडतोड न करतांच पूज्य मानल्या पाहिजेत. मोडतोडीनें त्यांतील 'प्रसन्नता' जाते. पण खुद्द नाग-देवानेंच हा नियम मोडला [स्मृ. ८ पहा]! (१६२) **वोहटळिचो...कीं वो**--उतारावरचा दगड उतारावर कितीहि उंच जागीं ठेवला, तरी तो गडगडत खालीं येणारच! (१६३) **श्रीदेवोराउळ**--चक्रधर. (१६७) '**रुक्मिणिसैंवर**'--पुढील स्मृ. १७४ च्या अनुरोधानें हें 'रुक्मिणि-सैंवर' म्हणजे धवळचांचा पूर्वार्ध वाटतो. (१७०) **ब्रम्हविद्येचा...फळ होये**—ब्रम्हविद्या शिकणारा जर 'साधनचरितार्थ'—म्हणजे त्या विद्ये-प्रमाणें यशस्वी आचरण-करील, तर मोक्ष मिळवील. पण तो 'गळीत'—भ्रष्ट-झाल्यास त्याला 'मुख्य देवता' जी चैतन्यमाया तिचें विनाशी पद प्राप्त होईल. (१७४) **तें**--स्मृ. ११ वरील टीप पहा. **गोसावी**-गोविंद-प्रभु. (१७५) **बाइसा**--नागांबिका नामक वृद्ध व प्रमुख चक्रधरशिष्या. हिच्यावरूनच स्मृ. २६० त चक्रधराला 'बाइसांचा देव' म्हटलें आहे. एकदां ती होडींत बसून नदींतून चालली असतां तिला चक्रधरास ठार मारल्याचें खोटेंच सांगण्यांत आलें. त्याबरोबर ती निचेष्ट होऊन प्रवाहांत पडली, व नाहींशी झाली! (१७८) **गोसावियांचिये कन्येसि**--गोविंदप्रभूची मानलेली कन्या जानाइसा हिला. थूगांवच्या 'माहादाये' ब्राम्हणाची ही मुलगी

सांवळापुरास दिली होती. सांवळापुराचा उल्लेख स्मृ. १९० त आहे. (१८२) **तुमची...करी**--जानो उपाध्ये यानें वृद्धपणीं सन्यास घेतला, आजारामुळें अटनाऐवजीं त्यास रावसगांवीं राहावें लागलें व त्याची तरुण विधवा पुतणी कमळाइसा ही त्याजपाशीं शुश्रुषेसाठीं राहिली, यामुळें त्याला आपली निंदा होण्याचें भय वाटलें. पण नागदेव म्ह० तशी निंदा कुणी --अर्थात् सूज्ञ--करणार नाहीं. (१८३) **कमळाइसा**--जानो उपाध्याचा वडील भाऊ पुरुखदेव याची ही मुलगी [' स्मृ. स ' २०९]. ही उपाध्य आम्नायाची प्रवर्तिका. (१८५) **वासनिक...आंतु** गोपाळपंडितानें अद्यापि संन्यास घेतला नव्हता, तो फक्त अनुगृहीत होता. (१९२) **' तळेगांवाकडे '** या ऐवजीं ' कौंडण्यपुराकडे '--अ. स्मृ.' ५४. **जो प्रस्नु केला**--हा प्रश्न ' संसृती--छेदु होये ' इ० असून तो पुढें आलाच आहे. (१९४) **' महावाक्य'**--' सू पा.'तील भाग. **पूर्वि गोसावीं...होइल**-- चक्रधर एकदां नागदेवास म्हणाला होता, एखाद्याचें कल्याण व्हावयाचें असल्यास तें तुझ्या आप्तत्वामुळें--व तन्मूलक शिफारशीमुळें--होईल की काय ?--जीवाचें भलेंबुरें करणारा ईश्वरावतार चक्रधर हा असून त्याबाबत कुणाचें नातेंगोतें व शिफारस यांचा कांहीहि उपयोग व्हावयाचा नाहीं, हा भाव. (१९५) **देसावरि**--कल्याण, सिन्नर हा प्रांत. यालाच ' ढोरेडोंगर ' म्हणतात. येथें ' एकांतवास ' हा अर्थ. **खांडे काढूनि**-- ज्ञानरूप तरवार उपसून. पहा : ' ऐसा कवणे मायेचा पोटा उपजैल जो देशावरि खांडें काढूनि जाए : '--' सू. पा. आ. मा. २१५. **जेथ पायें...नेणिजे** - --पायाची वार्ता डोक्यास नाहीं, इतका नितांत एकांतवास. (१९८) **तेलेंचि प्रांतें**--तळेगांवदशासर, वऱ्हाड (' स्मृ. स.' २३२). **चगाख्य**--ऋद्धिपुरचें गोविंदप्रभुनिक्षेपस्थान. (१९९) **संदर्भ**--चक्रधराचें वास्तव्य पैठणास बरेंच झालें' म्हणून त्याच्या पश्चात् पैठणादि 'गंगातीर' त्याच्या विरहाग्नीत जळत आहे. (२०१) **पैठण...वेळवति ना**--नागदेव म्ह० पैठणचा चक्रधर व ऋद्धिपुरचा गोविंदप्रभु यांच्या अभावीं या दोन गांवीं माझे तांदुळ शिजत नाहीत, मला राहवत नाहीं. (२०६) **धर्माकारणें...माहारवाडा**--धर्मासाठी ज्या गोष्टी अपवित्र, त्याज्य मानावयाच्या, त्यांत आप्तेष्ट येतात, म्हणून त्यांना त्याज्य मानावे, हा भाव. (२०९) पहा ' तिर्यंचामध्यें अवतारति '-- ' सू. पा. '

वि. १०६. हा अवतार चक्रधर नसून दुसराच होय. (२१६) **प्रसादाचा चौरंगु**--चक्रधरस्पर्शपूनित चौरंग. **धानाइ**--सारगपंडितकन्या. (२१७) **वरीषसंख्या**--शास्त्रज्ञान व तदनुसार आचरण यांची परीक्षा पाहण्यासाठीं गुरूनें शिष्यास नेमून दिलेला काल. (२२०) '**कळकी नारायण**'-- हें देऊळ अळजपुर [एलिचपुर, वऱ्हाड] येथचें. परिशिष्ट ३, [२२०] पहा. (२२१) **नाम नामीयें...किं रे**--दादोस म्ह. चक्रधराचें नाम व स्वतः चक्रधर याचें महत्त्व तुला [जानो उपाध्याला] व नागदेवाला, मला नाहीं. (२२३) **तै सांपडतीसि...नव्हे नाथो**--(**सदर्भ**-एकदा चक्रधराच्या सांगण्यावरून मौज म्हणून नाथोबानें भिकाऱ्यांप्रमाणें बाजारांत कापड अथरून त्यावर लोकांकडून पै-पैसा गोळा केला, व तें द्रव्य चक्रधराच्या सूचनेप्रमाणें विनियोगास आणलें.) नाथोबा म्ह. चक्रधर विद्यमान असतांना ही द्रव्याची कडई सांपडली असती, तर तिचा विनियोग मीं चक्रधरासाठीं केला असता. त्यावेळीं ' सातरा पसरून ' मिळविलेलें द्रव्य असें उपयोगास आणणारा मीच तो नाथोबा नव्हे काय? (२२४) **तेथ गोसावीं...केलें असे**--राक्षसभुवनास चक्रधर पूर्वी कधीं गेला, म्हणून ती ' भूमिका सत्वस्थ ' झाली, हा एक अर्थ. किंवा नाथोबाच्या मृत्युकाली त्यास चक्रधरानें दर्शन दिलें, ही श्रद्धा येथें अभिप्रेत आहे,हा दुसरा अर्थ. ' स्मृ. स.' २५० त ' गोसावीं ' शब्दापुढें ' देहांतीं ' हा जास्तीचा शब्द येतो, तो दुसऱ्या अर्थास पोषक आहे. कारण हा ' देहांत ' चक्रधराचा नसून नाथोबाचा होय. (२३२) **एक उजनियेहूनि आले**--' स्मृ. स.' ३३३ प्रमाणें ' चाटे ' (वस्त्राचे व्यापारी) आले. **पिस्या...दुरि**--नागदेव म्ह. एखाद्या वेड्याच्या मनांत अत्यंत दूर अशा पिंपळगांवला जाण्याचें आलें, तर तो तेथें बिलकूल त्रास न मानतां जाईल. तसें, मला चक्रधराचें वेड असल्यानें उज्जनीस जाणें कठीण थोडेंच आहे? पण तें अविहित आहे (स्मृ. १३२). ' स्मृ. स.' ३३३ मध्यें या वाक्यानंतर ' मज काइ न वचवे '-असें जास्तीचें वाक्य आहे. (२३३) **तीन्ही निषेध**--' वीखो (विषय) : अन्य धर्मः हींसा-' ' स्मृ. स.' ३०१. ' असतीपरि ' १ मध्यें पहिल्या दोन ' निषेधां 'चीं ' विकार ' व ' विकल्प ' हीं नांवें येतात. (२३५) **बाहें प्रकारीं**--हे दहा प्रकार असे : १ अटन. २ विजन. ३ भिक्षा. ४ भोजन. ५ निद्रा. ६ स्मरण.

७ प्रसादसेवा. ८ उचित अन्न. ९ उचित वस्त्र. १० अलिंग वृत्ति. कुठें कुठें याहून निराळीं नांवें आढळतात. (२३६) **एकु अर्थु**--ब्रम्हविद्येचा अर्थ. 'अवघांचि' तृतीया विभक्ति. (२४२) **काइसेयावरूनि तें नेणिजे**-'मग भटोबासांपुढां (भास्करानें) **चक्रे श्रीमति गोकुळे नवनवक्रीडा-समाडंबर :।** हें पांच श्लोक म्हणितले--' 'स्मृ. स.' २२१. (२४३) **वरवडाची...येइल**--वरपांगीं सत्कृत्य करतां करतां तें अखेर अंतःकरण-पूर्वकहि घडूं लागेल. (२४४) **केमद्या**-केमदेव नामक नामदेवासारखा दुसरा एक कवि. (२५०) **वचनरूपा परमेश्वराचा पतीत**--परमेश्वर वचनरूप असल्यानें वचनाचा योग्य अर्थ करावा. न केल्यास तो मनुष्य परमेश्वराचा 'पतीत'—अपराधी—होईल. (२५१) **घटिकेचीया... होइल**--दिवसभर अटन केल्यानें जितकें पुण्य मिळेल, तितकें घडिभर शास्त्रश्रवण केल्यानेंहि होईल. (२५२) **सामान्य स्त्रीचा दृष्टांत**-'अनुसरलियांचेया दोनचि घडीया पुरती' या सूत्रावरील 'दृष्टांता'मधलें 'ते [वेश्या] जरि सेवटी एकाची होए : तरि पतिव्रतेचे लोक होति [पतिव्रतेच्या लोकाप्रत जाते],' हें वाक्य पहा. (२५४) **वारितुरंग...असति** एकदां चक्रधरानें बेलापुरास 'वजरी' [हा शब्द वऱ्हाडात रूढ आहे] घडविली होती. स्नान करतांना अंगास पाणी लावून वजरीनें तें घांसा-वयाचें असतें, म्हणून तिला त्यानें लक्षणेनें 'पाणघोडा' म्हटलें. ही लीला महादाइसेला मृत्युकालीं आठवली. (२५५) **संदर्भ**--'चना विखो'-'सू. पा.' आ. मा. १४३. (२५९) '**निर्वचन**'--'सू. पा.' तील भाग.

## वृद्धाचार

(२) **जाइदेवभट**-जायाबा-आम्नाय-प्रवर्तक. (५) **बहुत दूषणें**-'कव्हणी लींग मांडील : कालेंकरून मेंढे-बोकड पडतील'-'स्मृ. स. वृ.' ७. (९) **प्रवृत्ति**-भास्करभट्ट सध्यांच मरावा, ही इच्छा. (१०) **आचरतया...नास्ति**-सामान्यतः आचारनिष्ठ पुरुषाचा सत्वभंग झाला, म्हणजेच त्याच्या मोक्षप्राप्तिसाधनांत विघ्न उत्पन्न होतें. पण त्याच्या पूर्वसुकृतानुसार त्याचा सत्वभंग झालेला नसला, तरी सुद्धां देवताक्षोभामुळें त्याला

विघ्न उत्पन्न होऊं शकतें. (१६) **बोधुभेद...नयेचि**–वादांत भास्करानें हरगवालिा पंथाचें तत्त्वज्ञान सांगूनहि त्याला त्याचें पृथक्त्व–वैशिष्टय–प्रतीत झालें नाहीं. येथें 'अवबोध' [निर्णय, ज्ञान] हा पा० घेतां येण्याजोगा आहे. (१७) **येकमेकांचें करवीलें**–अर्थात् चक्रधरानें, 'सू. पा.' आ. १३० पहा. **परि भेटिकाळीं दोहींतें व्यापीलें**—भेट झाली असतां 'ठायिक' [यजमान, पण गृहस्थाश्रमी वा एकाच स्थलीं कायम राहणारा नव्हे] व 'अभ्यागत' यांनीं आदरातिथ्य करणें–करूं देणें हें विहित आहे, हा भाव. (२०) **गांठीया**–माच्याच्या गांठी (स्मृ. १५६).

(पा. ९०) **एकाचें नांव नेणिजे : तो अम्नाय** १३–अमृत आम्नाय. स्मृ. ६१ वरील टीप पहा.

# शद्बकोश

अ

अक्ष-क्षे-म–अशक्त, आजारी.
अटन–फिरणें, प्रवास.
अडणि-नि-संकट; अडचणीमुळें.
अडणें–खंडन करणें; गांजणें.
अतीत–आतिथ्य.
अदृष्टार्थीयें–मुमुक्षु.
अधिकरण–आचार्य, आचार्यत्व.
अधिकार-री-र्या-र्ये–आचार्य, आचार्यत्व; स्वामी, मालक.
अधिष्ठान–आश्रयस्थान.
अधोपरी–खालीं.
अनधिकार–अपात्रता.
अनस्फूर्ति–विस्मृति, मांद्य.
अनुकूळ–पंथाशीं अनुकूळ असलेला.
अनुद्यम–निरुद्योग.
अनुमोदणें–मान्यता देणें; मान्यतामूलक उल्लेख करणें.
अनुसरण-णें–संन्यास, संन्यास घेणें; फक्त स्मृ. १८७ त उपदेश घेणें.
अन्याकार–विषादजनक चेहरेपालट.
अन्वयो लावणें–संबंध जोडून क्रमवार रचणें.
अपरीतोषु–खेद.
अपरोक्ष–साक्षात्कार.
अप्रास्य–उपासतापास; कष्ट.
अबद्ध–अर्थशून्य.
अभंगीं–अढळ; वृत्तविशेषांत किंवा ग्रंथाच्या शेवटीं.
अभंगु देणें–वृत्तविशेष किंवा ग्रंथाचा शेवट-कर्तृत्व-देणें.
अभिमानि-ये–अभिमान धरणारा.
अभिळास-णें–वांछा, मोह; वांछा-मोह धरणें.
अभ्यागत–पाहुणे, पाहुणचार.
अभ्यागता म्हणणें–पाहुणचार स्वीकारण्याची विनंति करणें,
अमृतश्राविया–अमृत स्त्रवणाऱ्या.
अर्ध कुपीं अर्ध सुपीं–अर्धवट काम.
अर्धोदक–अर्धवट संन्यास.
अवकास–शौचविधि.
अवग्रहण–स्वीकार.
अवचटे–अकस्मात्.
अवभेद–निराळेपणा, पृथक्त्व.
अवसर-रि–वेळ, वाट, अडथळा.
अवसान–मृत्यु.
अवस्था–भावनेचा झटका, समाधि वा 'स्थित.'
अवस्थान–वास्तव्य.

**अविहित**–निषिद्ध.
**असतेनि**–अनुकूल असलेल्या.
**असन्निधान**–अविद्यमानता, पश्चात्.
**असिका-सेखा**–सर्व.
**अस्तोति**–स्थिति.

आ

**आइत-ति**–तयारी.
**आइ·सें**–प्रौढ, सन्मान्य स्त्री.
**आउठ**–साडेतीन.
**आखरा**–गांवाजवळ.
**आगळें**–पुष्कळ, मोठें.
**आंगसीक**–प्रसादवस्त्र.
**आंगोळी**–बोट.
**आति**–आहे.
**आदि**–कारण, मथळा.
**आदिभाव**–स्वतःची वासना, इच्छा.
**आन**–शपथ.
**आनेआन**–भिन्नभिन्न.
**आपणपें**–स्वतःला.
**आंपलवणें**–आपुलकी, कैवार, पक्षपात वाटणें.
**आपोसन धरणें**–जेवण्याचें खोळंबणें.
**आफळणें**–थोपटणें.
**आफाविणें**-बोलाविणें.
**आरत**–व्यथा.
**आरुतें**–नंतरचें.
**आरोगण**–जेवण.
**आर्तादानी**–पीडितांस जवळ करणारा.
**आलंबन**-आश्रय, आधार.
**आंवाका**–शक्ति, धीर.
**आंवाकेनि**–ईर्षेनें.
**आव्हान**–बोलाविणें.
**आस्थानि**–सभा.
**आहाति**–आहेत.
**आळवि**-टप्प्यांत.
**आळविणें**–वर्णन करणें, समजूत घालणें.
**आळुमाळ**–थोडा-डी·डें.

इ

**इउला**–थोडा
**इटोला**–तीन दगडांची चूल.
**इष्टि**–याग.

उ

**उखरडि**–वस्त्रहीनतेमुळें हात, पाय पोटाशीं घेऊन.
**उघाणि**–वाद.
**उजडे**–तुटेल.
**उठि-बैसि**–वागणूक.
**उणा**–कमी.
**उदार्य**–पंथांत शिरलेले लोक, सर्व साधारण पंथीय; उदारपणा.
**उद्ग्रहणिका**–प्रत्युत्तर, उत्तरपक्ष.
**उपगळिये**–पाठीवर.
**उपन्नणें**–उत्पन्न होणें.
**उपरियेवरि**–वर.
**उपलक्षु देणें**–कळू देणें.
**उपसाहणें**–क्षमा करणें.

**उपाधिमंत**–अधिकारी, सन्मान्य.
**उपानौ-ह्**–वाहाणा.
**उपालंब**–निंदा.
**उबारा**–तेज.
**उमटु**–ज्ञान.
**उवायां**–लघुशकेला.
**उसीटें**–उष्टें.

ए

**एकांकी**–एकटा-टी-टें.
**एकीवासना**–दुसरें मत, अभिप्राय.

ओ

**ॐपडे**–कीटकाकडून लांकडावर अचानक उमटणारें अक्षर.
**ओळंबे**–भुइछत्री, क्षुद्र वनस्पति.

क

**कटकटा**–हायहाय.
**कडियें**–कडेवर.
**कणव**–दया.
**कंथडीकार**–कंथाधारी अनुयायी.
**करवती**–वस्त्राचें केलेलें उदकपात्र.
**कवडा**–मोठी कवडी.
**कवळीये धरणें**–आलिंगन देणें.
**कवाड घालणें**–दार बंद करणें.
**कस-वटी**–परीक्षा.
**कसकस**–घांसाघीस, वाद.
**कहीं**–कधीं, केव्हां.
**कळासि बैसणें**–मनांत बेमालूम, कायम ठसणें.
**कळेवर**–कळाहीन देह.
**कां अपजौनि**–याचना, मागणी करून.
**काइसेन-नि**–कशानें.
**काइसेया**–कां, कशाला.
**कानाखुरांसकट**–सर्वस्वासुद्धां.
**कांबि**–काठी, छडी.
**काम्य**–फलाशेनें केलेलें कर्म.
**कांस**–कूस.
**काहाळेकांड पडणें**–मरणें.
[काहाळ-भेरी-वाजली असतां शब्दवेधानें कांड-बाण-मारून लक्ष्यभेद करण्यांत येत असे, त्यावरून हा वाक्प्रचार निघाला.]
**काह्या**–कशास.
**काळाक्षरापासौनि**–केवळ पोथींतील मुळाक्षरांवरून.
**कुरंधन**–तृणविशेष.
**कुहिरी**–एकप्रकारच्या खाण्याच्या शेंगा.
**कें**–कुठें.
**कै**–कधीं, केव्हां.
**कोचा**–कोशाध्यक्ष.
**कोंणि-नटां**–कोंपऱ्यांत.
**कोरक**–तुकडा.

ख

**खळी**–खड्डा, स्मशान.
**खळीव**–खळ घातलेला ली-लें.

**खांड**–भग्न.

**खांडूक**–फोड, व्रण.

**खांडें**–तरवार.

**खांवणि**–मनोगत.

**खिरारी**–गोप.

**खोती**–पृथ्वीवर.

ग

**गजबजणें**–गडबडून जाणें.

**गडदे**–खड्ड्यांत.

**गनंग**–टहाळ, दाणे.

**गर्व झाडणें**–घमेंड जिरविणें.

**गळीत**–भ्रष्ट.

**गाउनि**–गांवाहून.

**गाडा**–मोठी गाडी.

**गारीआंतु**–खड्ड्यांत.

**गुजरध्वनि**–आकृष्ट करणारा आवाज.

**गुढी**–ध्वजा.

**गोटि**–दगड.

**गोमटें**–कल्याण, पुण्य.

**गोरूं**–गुरें.

घ

**घडउनि**–रचून.

**घलणें**–घालणें.

**घालूनि**–घालून.

**घे-दे म्हणौनि**–हिरीरीनें.

**घेया घेया**–घ्या घ्या.

**घोळिला**–घुमणारा.

**घोळीति**–चाळवितात, भुलवितात; पुनः पुन्हां करतात.

च

**चणा**–हरभरा.

**चंद्रमय होणें**–रसमय होणें, द्रवणें.

**चरित**–आचरण; सिद्धि; यशस्वी.

**चरितार्थ**–सिद्धि; सार्थकता; आचरण.

**चर्या**–कृति.

**चांग**–चांगलें.

**चाटे**–अध्ययन करणारे ब्राम्हणपुत्र.

**चाड**–अभिलाषा.

**चिन्ह पालटणें**–ओळख, ओळखीची खूण न राहणें.

**चीमुटलेयां**–चिमटा घेतला असतां, दुःख दिलें असतां; पीडितांस, दीनदुबळ्यांस.

**चोखाळणें**–साफ करणें, होणें.

**चोजविणें**–संतोषणें.

**चोळीका**–वाममार्गी पंथ.

**चौं**–चार.

**चौक**–मंगल कार्यांत प्रथम रांगोळी भरून तीवर उंची वस्त्र टाकून केलेलें आसन; देवळासमोरच्या सभामंडपांतील खांबांमधली चौकोनी जागा.

**चौकि**–देवडी.

**चौथरीया**–चौकोनी.

**चौपदी**–पद्यविशेष.

छ

**छत्र**–अन्नछत्र.
**छिन्नपाप**–डोंबेग्रामचें स्थलविशेष.
**छिन्नस्थळी**–डोंबेग्रामचें स्थलविशेष; तेथील पाषाण.

ज

**जगती**–आवार.
**जगबोळ**–नाश.
**जन्मबीजाल**–जन्माला घातले जाल.
**जवळि(के)चे** निकट संबधाचे.
**जाकलीति**–व्यापतात.
**जाडी**–कांबळी, सतरंजी.
**जावळाचे**–जुळे.
**जावूनि**–जाऊं.
**जासलवट**–मोठी पळी.
**जिणें**–जगणें.
**जिणणें**–जिंकणें.
**जेउनि**–जेऊं.
**जें म्हणौनि**–ज्या हेतूनें.
**जेहीं**–ज्या, ज्यानें.
**जैत**–जय.
**ज्या(जिया)ला**–जगला.

झ

**झळंबणें**–चिकटून राहणें; झपाटणें.
**झाडि**–जंगलांत.
**झोळी देणें**–संन्यास देणें.

ट

**टिक**–खडा, हिरा.

ठ

**ठकठक करणें**–त्रासदायक भुणभुण लावणें.
**ठसु**–मनांत ठसण्याजोगा-गी-गें.
**ठाइ-य**–ठिकाणीं; ठिकाण.
**ठावो करणें**–ताट मांडणें; जागा करणें.
**ठावोवेऱ्हीं**–वेळपर्यंत.

ड

**डांडाळें**–व्यसनें.
**डिंभ**–मुलगा, लेंकरूं.
**डिवुं**–शिंगानें डिवचूं.
**डो**–नारळाच्या करवंटीचें पात्र.

त

**तनकट**–क्षुद्र गवत.
**तन वोरणें**–तृणप्राय लेखणें.
**तवं**–तों, तर, तेव्हां, साठी, पर्यंत.
**तळी-ळीं**–ताट; खालीं.
**ताट करणें**–वाढणें.
**तातलीं**–तापलीं.
**तांबाजाळि**–लाल ज्वालेंत.
**तावी**–जाळतो-ते तें.
**ति-तीं**–त्यांनीं.
**तिर्यंच**–वांकड्या गतीनें सरपटणारे प्राणी.
**तुटि**–ताटातूट.
**तुरुक**–मुसलमान.
**तूं म्हणौनि**–आपण होऊन.
**तेउति**–तशी.

तेव्हेळीं—त्यावेळीं.
तोकडि—अल्प.
तोखणें—आनंदित होणें.
तोडगळसुरी—सौभाग्यसूचक काळी पोत.
तोष्यु—ज्यास संतोष द्यावयाचा तो.
त्यजौनि—सोडू.
त्यें—तो-ती-तें, तीं, त्या.
त्राहाटीलीया—वाजल्या.
त्रीसुधी—तीनदां.

थ

थडी—कांठ.
थीगळ—फाटकें वस्त्र.
थीलर—डबकें.

द

दर्सनीए—दर्शनेच्छु.
दवडणें—घालवून देणें.
दशा-सा—वय; स्थिति.
दसांके—पद्यविशेषाचें.
दसी—वस्त्राची दशी.
दांडि—पालखी.
दातार—दाता.
दादुला—पुरुष.
दादुलेपनाचा—पराक्रमाचा.
दारवठा—उंबरठा.
दिसवडी—रोजरोज.
दी—दिवस.
दीवी—दिवा.
दुकळु—दुष्काळ.
दुना-नि—दुप्पट.
दुरळा—खडतर.
दुरांतरें—लांबच्या ठिकाणीं.
दुर्भी-दृभ-क्ष—दुष्काळ.
दृष्टिपूत करणें—नजरेनें पवित्र करणें.
देउनि—देऊं.
देखणें—दृष्टि.
देवो होणें—ईशप्राप्ति होणें, मोक्ष मिळणें.
देसु उचलणें—मलुख उध्वस्त होणें.
देसावरि—देशाच्या शेवटी.
देह तुटणें—अशक्त, आजारी होणें.
देहयुक्त—सशक्त.
देहविद्या—जिच्यामुळें पुढील जन्मीं दिव्य देह मिळतो, ती विद्या, शक्ति.
देहां—दिवसा.
देहांत, देहावसान मांडणें—मरणासन्न होणें.
द्वारसंका—दरवाजाची बाजू, कड.

ध

धाकुनलीया—लहान, तरुण.
धाडि—स्वारी, पुतणी.
धांवणें—बोलावणें, धरणें.
धीष्करीति—धिःकारतात.
धु-धों—धुऊं.
धु-धू-नि—नाश, निवारण; धुऊन.
धुरा—धुरीण.

धुवा—धांवा.

न

नख फेडणें—नखें काढणें.
न धरणें—ज्ञान न होणें.
ननुष्ठे—अनुष्ठान होत नाहीं.
न पळणें—निर्वाह, विधिपालन न होणें.
न बैसणें—पाठ न होणें.
न मनेचि—ऐकत-लें नाहीं; आवडलें नाहीं.
न लोटणें—उत्तरपक्ष न करतां येणें.
नातोंडु—नातवंड.
नाना—अथवा.
नामना, नांवं सारणें—नांव, कीर्ति सांगणें.
नामीयें—नामस्मरण करणारे.
नावेक—क्षणभर; किंचित्.
निका—उत्कृष्ट.
निक्षेप करणें—मूठमाती देणें.
निक्षेपस्थान—समाधीची जागा.
निच—नित्य.
निडळ—कपाळ.
निफजविणें—शिजविणें.
निफन्नले—जन्मले.
निमित-त्य—प्रसंगोपात्त केलेला-ली-लें.
नियत—निश्चित, नित्य.
निरउ-व-णुकेचें—सोंपविल्याचें, ओळखीचें.
निरपौनि—धुऊन, पुसून.
निरय—नरक.
निरालंबनता—आश्रयहीनता.
निरोविणें—सोंपविणें,
निर्वचणें—निरूपण, स्पष्टीकरण करणें.
निर्वचु—निरूपण, स्पष्टीकरण, निर्णय.
निर्वडी—लगेच; घाई, कौशल्य, तयारी.
निर्वेदपूर्वक—पश्चात्तापपूर्वक, विरक्तिपूर्वक.
निवळता—शैथिल्य; मालिन्य.
निवृत—विरक्त.
निष्करीति—निराकरण करतात.
निन्हां—अगदी, केवळ.
नीरोध—त्रास.
नुधरे—उद्धरत नाहीं.
नुपलखत—कळूं न देतां.
नुमटे—ज्ञान होत नाहीं.
नेघीजे—न घ्यावा-वी-वें.
नेदावा—न द्यावा.
नेमु सारणें—विधि उरकणें.
नैये—येत नाहीं.
न्याव—न्याय.

प

पचन—स्वयंपाक.
पडिताळणें—परीक्षा पाहणें, शोधणें.
पढणें—अध्ययन करणें; सांगणें.
पढिये-ति—आवडते.

**पतीत**–अपराधी, पातकी.
**पदन पाडणें**–योग आणणें.
**पधरीलें**–गमन करते झाले.
**पर-रु**–श्रेष्ठतम, परमेश्वर.
**परद्वारी**–व्यभिचारी.
**परमार्ग**–महानुभाव पंथ.
**परवंट**–स्त्रिया लुगडें नेसतांना पोटाशीं वरवंटा करतात तो.
**परायेचे**–वयाचे.
**परा(प्रा)वर्ण** वस्त्र.
**परावाचा**–ईश्वरी वाणी.
**परिवार**–अनुयायी.
**परीग्रहो**–सामानसुमान.
**परीछेद करणें**–खाण्यापिण्याबाबत त्रागा करणें.
**परीहार**–निर्वाळा, निरसन.
**परेस**–परमेश्वर.
**पवणें**–मिळविणें.
**पसाइता**–प्रसादवस्तु देऊन सांत्वन करतां, करणारा.
**पसि**–पेक्षां.
**पळांति**–घेरतात, वेढतात.
**पां**–अरे, अहो, पहा.
**पाखवा**–प्रेमाची ऊब.
**पाग**–पागोटें, पटका.
**पाजूनि**–पाजूं.
**पाटकुळीये**–पाठीवर.
**पाट-बाज**–नवारीची खाट.
**पाटा फुटणें**–अज्ञानपटल दूर होणें, ज्ञानदृष्टि येणें.
**पाटावुं**–उंची रेशमी वस्त्र; रेशमी.
**पाटियें**–टोपलींत.
**पांति**–पंगत.
**पातुलि**–काष्ठपात्रविशेष.
**पात्र**–भांडें; व्यक्ति.
**पाथर**–फत्तर.
**पानकापड**–ओल्या वस्त्राची पट्टी.
**पाये पसरणें**–थोडा प्रवेश होतां पूर्ण प्रवेश करून घेणें, अधिकार प्रस्थापित करणें.
**पाग्रेवणि**–पादतीर्थ.
**पासवडी**–जाड पांघरूण, चादर.
**पाहार**–प्रहर.
**पाळूनि**–पाळूं.
**पिंड**–देह
**पीक**–विडयाची थुंकी.
**पुसपुसों**–विचारून विचारून.
**पेंणि**–मजल, मुक्काम.
**पैला-ऱ्हां**–पलीकडील.
**पो**–शेणाचा लगदा.
**पोतें**–ब्रम्हचर्यरूप गोणी, खजिना.
**पोफळ**–सुपारी.
**पोफळफोडणा**–अडकित्ता.
**पौळी**–आवाराची भिंत.
**प्रतिभिज्ञा**–ज्ञान, माहिती.
**प्रतिवाया**–पातकाच्या.

**प्रतीबंधलें**–झालें नाहीं.
**प्रत्या**–अनुभवास.
**प्रत्याग**–त्याग, सोडणें.
**प्रयुक्ति**–उद्दिष्ट.
**प्रवृत**–प्रपची.
**प्रवृत्यंतर**–मृत्यु; गमन.
**प्रसस्ती**–कल्याण.
**प्रस्तावा**–प्रसंग, निरूपण, योग्य काल.
**प्रस्तावीक**–प्रसंगोचित.

फ

**फांकणि**–ताटातूट.
**फुटा**–वस्त्र.
**फिटणें**–दूर, नष्ट होणें.
**फेडणें**–काढणें.
**फोकवरि**–फोकांनीं.

ब

**बडुवा**–शागीर्द.
**बंबाळ**–प्रज्वलित.
**बहळ**–विपुल.
**बळवंडें**–बळेंच.
**बळाधिकारु**–बलात्कार.
**बाइल**–स्त्री.
**बांधों**–लिहूं (स्मृ. १५).
**बारस**–द्वादशी.
**बाहीरवाहीरीं-रे**–बाहेरच्या बाहेर.
**बाहे**–भुजा.
**बाळारथी**–बालकें खेळविणारा.
**बिढार**–बिऱ्हाड.
**बीजें करणें**–गमन करणें.
**बुझणें**–समजूत पटणें.
**बुझ**–समजूत, ज्ञान, शहाणपण.
**बुधि-द्धि-चि**–बुद्धिपुरस्सर.
**बुंथि**–बुरखा.
**बेंबीळ**–अशक्त, नित्राण.
**बोडी**–डबकें.
**बोधवत**–उपदेशी.
**बोलना**–बोलणें, भाषा.
**बोळेवरि**–बोळचांनीं.
**ब्राम्हणी**–बायको, अर्थात् ब्राम्हणाची.

भ

**भलतया**–वाटेल त्याला.
**भलतेथ**–वाटेल तेथें.
**भलतेधवा**–वाटेल तेव्हां.
**भरलेपणें**–आंत्र आणून, ऐटीनें.
**भरु धरणें**–नाद घेणें.
**भाउं**–कल्पूं.
**भाटो**–'बहीणजांवई,' मेव्हणा.
**भांडारी**–कोशाध्यक्ष.
**भानवस**–स्वयपाकघर.
**भावें**–कल्पनेनें.
**भितभंग**–भितीचें खिंडार.
**भितरा-रि**–आंत, हृदयांत.
**भिक्षुक**–संन्यास घेतलेला पंथीय.
**भीक्षा करणें**–संन्यास घेणें.
**भूमीवरी घालणें**–जमिनीवर अंग

टाकणें.
**भेण**–भीतीनें.

### म

**मढि**–मठ.
**मढीले**–मुलामा दिला, सजविले.
**मगळा**–संमाराबाबत निग्राण असा.
**मंडळ**–प्रदेश.
**महाजन**–प्रतिष्ठित लोक.
**महात्मा-त्मी**–संन्यास घेतलेले पंथीय पुरुष व स्त्री.
**मळा**–बाग.
**मा**–आणि, मग.
**माचा**–लांकडी सिंहासन.
**माट**–दाट.
**माथा**–मस्तक.
**मान**–वेळ, अनुमान.
**मानणें-वणें**–कबूल करणें, पटणें, संतुष्ट होणें.
**मायधुवा**–मायलेंकी.
**मालगंठी**–उंची पीतांबर.
**मासा-दीसा**–महिना-पंधरा दिवस.
**माहासुरवाडाचे**–फार सुखप्रिय, सुबत्तेंतील.
**माहो**–माघ.
**मियां**–मीं.
**मीसें**–निमित्तानें.
**मुदी**–अंगठी.
**मुरडणें**–परत फिरणें.
**मुळवणि**–उच्चाटन.
**मुळीहूनि**–मुळापासून, पायाशुद्ध.
**मैळणें**–मलीन होणें, पाप लागणें.
**मोहर**–समोरची बाजू.
**म्हातारदाम**–म्हातारपणासाठी ठेवलेला पैसा.
**म्हाळी**–वृक्ष.

### य

**यांहांसीं**–यांना.
**यें**–हा-ही-हें, हीं, या.
**येउते**–पर्यंत.
**येकवळा**–मीलन.
**येकाधां-धियें**–एखाद्या.
**येर**–एक; अन्य, इतर; बाकीचा-ची-चें; एकमेक.
**येसणें-ना**–एवढें-ढा.
**येहीं**–या.
**यो**–येवो.

### र

**रंधन**–स्वयंपाक.
**रवण**–मोठें मैदान, रमणा.
**रसवृति**–रसपरिपोष.
**रसीं पडणें**–गुंग होणें.
**राखण घालणें**–पाळत ठेवणें.
**राजभरा**–वैभवशाली.
**राजीक**–अशांतता, बंडाळी.
**राज्य करणें**–नांदणें.
**राणा**–गुरव.
**रांधवनकारी**–स्वयंपाकीण.
**राभस्य**–अविचार, दांडगेपणा.

**रामहाटु**–द्वारकेंतली बाजारपेठ.
**राहाटी**–राहणी.
**राहाण घालणें**–अंगांत दैवत आणून बोलविणें.
**राहावा**–मुक्काम.
**रिगणें**–प्रवेश करणें.
**रिगावा**–प्रवेश.
**रीचवीली**–ओतली.
**रुके**–रुपये.
**रुजायुक्त**–आजारी.
**रूंरूं करणें**–त्रासदायक भुणभुण लावणें.
**रेघ**–मर्यादा.
**रोख जाणें**–भांडण मिटणें.
**रोवे**–रडते.

## ल

**लवलवौनि**–घाईघाईनें.
**लाहणें**–मिळणें.
**लाहें**–घाईघाईनें.
**लाळीलें-ताळीलें**–लालनपालन केलें.
**लिखित**–पत्र
**लिंग**–महादेव.
**लिंपौनि**–बंद करून.
**लो**–ळळा.
**लोहे**–द्रव्याची कढई.
**लोहोबंध**–लोहशृंखलांनीं बद्ध.

## व

**वचणें**–जाणें.
**वज्री**–अंग घासण्याची विटकर, दगड.
**वडपिंपळीं लावणें**–उत्तरक्रिया पुरी करणें [दहनस्थानावर मुख्यतः पिंपळ लावीत असत, त्यावरून ]
**वडिल**–श्रेष्ठ, गुरु.
**वधि**–वद्य.
**वरवडाची**–बाह्यतः केलेली.
**वरिष-दीस**–वर्ष-सहा महिने.
**वरैता**–नवरा.
**वर्तणें**–जगणें, असणें.
**वसो**–बैल.
**वा**–वाहता.
**वाइ**–कांठानें, बाजूनें.
**वाणें**–वाहणें, नेणें; देणें.
**वाइली**–दिली.
**वाउ-वू-नि**–वाहून.
**वांकि**–पायांतील अलंकारविशेष.
**वाखाणणें**–निरूपण करणें.
**वांचौनि**–कारणाशिवाय.
**वाटाउवें**–वाटसरानें.
**वाटे**-रस्त्यानें.
**वाति**–वाहतात.
**वायां-यें वायां-यें**–कारणावांचून.
**वारणें**–मनाई करणें.
**वारितुरंग**–पाणघोडा.
**वास**–तोंड, मुक्काम.
**वासना**–इच्छा, मत.

**वासनिक**–संन्यास घेण्याची इच्छा मनांत बाळगणारा उपदेशी.

**वास पाहणें**–तोंडाकडे पाहणें.

**वासीया**–वास्तव्य.

**विउनिया**–जन्म देऊन.

**विजन करणें**–ईशचिंतनासाठीं जंगलांत जाणें.

**विव्वांस**–विद्वान्.

**विंचुवें खादणें**–विंचवानें चावणें.

**विभाग**–संपत्तीचा वाटा, ताटातूट.

**विमर्शणें**–विचार करणें, बुद्धि चालविणें.

**विमान**–डोलारा.

**विरहीत**–न कळत; वांचून.

**विराम**–नाश, अंत; स्थिरता.

**विरोदी-धी**–स्त्रियांचा पायाच्या बोटांतील अलंकार.

**विरोध फेडणें**–भांडण मिटविणें.

**विवर्ण**–निस्तेज.

**विसंवादु**–विरोध.

**विहिणें**–उचित ठरविणें.

**विळचां**–ठराविक वेळीं, रात्रीं.

**वीधान**–विधिपालन.

**वीळवेऱ्हीं**–ठराविक वेळपर्यंत, रात्रींपर्यंत.

**वृति**–वतन.

**वेकास जाणें**–उणेंअधिक बोललें जाणें.

**वेगवतर**–वेगानें.

**वेंचणें**–खर्च करणें.

**वेंठ**–दान, फुकट.

**वेठौनि**–अर्पण करून.

**वेढे**–फिरणें; कर्णालंकार.

**वेधवंतो-धाचार्य**–आकृष्ट करणारा.

**वेधु**–ईशप्राप्तीची तळमळ.

**वेलाउळ**–बंदर.

**वेव्हा-व्यवहा-रा**–व्यापारी.

**वेव्हारु लावणें**–फिर्याद करणें.

**वेळविणें**–शिजविणें.

**वो**–ग.

**वोखटें-टा**–वाईट, पाप.

**वोत**–ओढा.

**वोपविणें**–देणें.

**वोवाळणि घालणें**–दान, बक्षीस देणें.

**वोवाळनियां**–आरती; ओंवाळून टाकलेलें द्रव्य.

**वोसरोनि**–कमी होऊन.

**वोहटळ**–उंचावरचा उतार.

**वोळगणें**–आश्रय, सेवा करणें.

**व्यतिरेक**–वियोग, अर्थात् व्यर्थ घालविणें.

**व्यक्तिभंग**–पवित्र वस्तूंची मोडतोड.

**व्यापारु**–व्यवहार, कार्य.

**व्यावृति**–वगळणें, झांकणें.

**व्येसन**–वाईट संवय; आवड.

## श

**शाद्र**–शास्त्र, शास्त्रपर.

**शोधनी**–शोध.
**श्रवण करणें, होणें**–उपदेश घेणें.
**श्रुति**–चक्रधरवचन.

## स

**संवत्सर**–वर्ष.
**संवर्तमान**–हयात.
**संवादणें**–चर्चा करणें, चर्चा करून संमति मिळविणें.
**संसी**–वर्णन करी.
**सगडी**–शेगडी.
**सगर**–पाऊलवाट.
**संक्रमणें**–संचार करणें.
**संग्रह्**–सांठा, रीत.
**सं-सां-डणें**–सोडणें, टाकणें.
**सद्यस्त**–लगेच, अर्थात् अधाशी-पणानें, यथास्थित; ताजें.
**संतान**–नंदनवनांतील पांच प्रमुख झाडांपैकीं एक; शीतल छाया देणारें झाड.
**संदीं**–मधोमध.
**सन्निधान**–सहवास, विद्यमानता.
**सपांतीं**–एका पंगतींत.
**समुचयो**–लोकांचा जमाव.
**संपादणें**–देणें, मिळविणें.
**संबंध-धी**–आप्त; संबंध आलेली वस्तु वा माणूस.
**संबंधु लावणें**–'अन्वयो लावणें' पहा.
**संबोखणें**–उद्देशून बोलणें.
**संभ्रमीता**–उत्कंठाजनित गडबड उडतां, आदर दर्शवितां.
**संभ्रमु करणें, होणें**–आतिथ्य, सन्मान करणें.
**सम्येक**–पूर्णपणें, अर्थात् जवळ.
**सरणें**–मरणें.
**सरवळीया**–खोर करण्याचा पदार्थ-सरोळे.
**सरळि**–सहजसाध्य.
**सरीर संपादणें**–अंग सुजणें.
**सरीसी-से**–बरोबर.
**सर्पें खादणें**–सापानें चावणें.
**सलागा**–प्रपंची.
**सवेंचि**–लगेच.
**सवीवरु**–स्पष्टीकरणासुद्धां.
**सव्य**–डावा-वी-वें.
**सळें**–ईर्षेनें.
**सा**–सहा.
**साउमा-मे**–समोर.
**सांक-ख-ळें**–पायांत घालण्याची सांखळी.
**सांगा-घा-ति**–सोबती.
**सांघातु**–सोबत.
**सातरा पसरणें**–रस्त्यावर वा बाजा-रांत कापड अंथरून त्यावर पै-पैसा भिक्षा जमविणें.
**सांताउ**–शांतविणारा.
**सांपें**–सध्यां.
**सामान्य स्त्री**–वेश्या.

**सावेया**–सहजच, अप्रयासें.
**सिक्षापण**–शिकवणूक.
**सिक्षापिणें**–शिकविणें.
**सिखासूत्र**–शेंडी-जानवें; ब्राम्हणी गृहस्थाश्रम.
**सियाळीये**–हिवाळ्याच्या.
**सिवंणियांसि**–पक्ष्यांना, चिमण्यांना.
**सींपा**–शिंपी.
**सीवणि**–अंगांत घालण्याचें शिवलेलें वस्त्र.
**सीस**–डोकें.
**सुचीक**–सूचना देणारें.
**सुनेन**–कुत्र्यानें.
**सुरंगु मिरविणें**-शृंगारभाव दर्शविणें.
**सुश्रसा**–सेवा
**सुश्रुषितें**–शिष्यांनीं.
**सूचक**–समयसूचक.
**सूदलें**–दिलें.
**सूनि**–देऊन.
**सें**–आठवण
**सेनपुंजो**-शेण जमविणारी मुलगी.
**सेंद**–कापूर ठेवण्याची नारळाच्या आकाराची डबी.
**सेवा**–दास्य, कण.
**सेवैया**–खीर करण्याचा पदार्थ–शेवया.
**सोखन**–उपासतापासानें शरीरशोष.
**सोनटके**–सोन्याचीं नाणीं.
**सोनेसळा**–'पिंवळा' पीतांबर.
**सोपस्कर**–नीटनेटका-की-कें; चोखंदळ.
**सोये**–खूपसता.
**सौकर्यत्वें**–सुंदरतेनें, सुंदर.
**स्थाननिदर्शें**–पवित्रस्थलांच्या आसपास, त्यांच्या अनुरोधानें.

## ह

**हरीखैली**–आनंदित झाली.
**हळवैलीं-पळवैलीं**–जळलेलीं-पोळलेलीं, दुःखी-कष्टी झालेलीं.
**हळु**–हलकी.
**हाकारा**–बोलावणें.
**हाटवटी**–बाजारओळ.
**हात झाडणें**–निराश होणें.
**हातरीती**–विधवा.
**हातवणी**–हात धुण्याचें पाणी.
**हारी-रीं**–ओळ, रांग; रांगेंत.
**हावरु**–हुंदका; हट्ट.
**हीमट**–हिरमुसलेलें.
**हेतु**–इच्छा, कल्याण; कल्याणासाठीं.
**हेळा**–निंदा, अपमान.
**होड**–पैज.

## क्ष

**क्षेणु**–आमंत्रण; क्षण.
**क्षेदु**–खेद, दुःख.
**क्षेपणें**–कंठणें; करणें.
**क्षेम**–आलिंगन.

# व्यक्तिनामांची सूची

[व्यक्तिनामांपुढील आंकडे स्मृति–वृद्धाचारांचे आहेत. सूचींत बऱ्याच जणांचा व्यावहारिक नांवांनीं निर्देश केलेला आहे. ग्रामनामांची सूची अनवश्यक म्हणून दिली नाहीं.]


अनंत कोचा–१८७.
अनंतदेव–७५.
आउसा–११, १७८, १९१, १९६-९७, १९९.
आकाइसा–२५.
आकाई (नागदेवशिष्या)–१३०.
आकाई (रामदेवमाता)–५६.
आपलो–२३.
आबाई–१, ८३, ८५, १९२.
इंद्रभट–२१, ६९, ७०, १८०.
ईश्वरनायक–११.
उमाई (नागदेवभगिनी)–१, १९३-९४' १९९.
उमाई (सारंगपंडितपत्नी)–१४२, २१६.
कमळाइसा–१८३, २२२.
कान्होपाध्ये–९३, वृ. १२.
कामाइसा, भद्रकार (राणी)–१४५-४६, १४८-५०.
कृष्णभट, काळे–२१, ३०, ११४.
केमद्या–२४४.
केशवाचार्य–५५, ११६-१८.
केशोबास–१२-१७, ५६, ६०-६१, ६३, ६६, ६८, ७१, ८०, ८८, ९४-९५, १०४-०६, १११, १२४, १३१, १५९-६०, १८४, २०१, २०९-१०, २१८, २२५, २३७, २४०, २४५-४६, २५३, २५७; वृ. १, ३-४.
खेइभट (चक्रधरशिष्य)–१४०.
खेइभट, सेगांवकर (नागदेवशिष्य)–९८-१०१.
गदोनायक–१३९.
गोंदोबा, गति–२३८.
गोपाळदेव–१३.
गोपाळपंडित (आनोबास)–१०३, ११३, १४५, १८४-८७, २३४; वृ. ५-६, १०-११, १६-१९.
गोपाळबास, दंती–वृ. ८-९, २१.
गोल्हो–३३.
गोविंदपंडित, डिंडोरी–६४, १५२.

गोविंदप्रभु (श्रीप्रभु, गोसावी)–१-५, ११, २५, ४७, १११, १४७, १७८, १९०, २१०, २४७, २६०-६१.
गौराई (इंद्रभटाची पत्नी)–१८०.
गौराई, उंबरी–७६-७७, ८२, ११०, १६०, १६२, १८९, २५५.
गौराई, परंडकर–२००.
गौराई, विहिटेकार–२०६.
चक्रधर (गोसावी)–१-४, ६, ८, १४, २३, २७, ३१, ३५-३६, ४५, ४७-४८, ५७, ५९, ६१-६२, ६६-६७, ६९-७०, ७२, ८४-८५, ८९-९०, ९३, १०५-०७, १११, १२५, १२८, १३०-३२, १३९-४२, १४४, १४६, १४८, १६३, १८०, १८३, १९२, १९४, १९६-९९, २१०, २१४, २२०-२१, २२३-२४, २३२, २५४, २५७-६१; वृ. १, ९.
चक्रपाणिभट–८; वृ. २.
चांगदेव–२४, २६.
जाइदेवभट–वृ. २.
जानाइसा (गोविंदप्रभूची कन्या)–१७८, १९०.
जानो उपाध्ये–९३, १४१, १८२-८३, २२१-२२.
दाइंबा (भोजेया)–१२५.
दाइंभट, वांकुडे–१३८.
दामोदरपंडित (पंडितबास)–५४, ५८, ६०-६१, ६३, ६६-६८, ८८-९१, ९४-९५, १२४, १३०, १६०, १७९, २०९-१०, २१८, २४०-४१, २४४-४५, २५३, २५६-५९, २६१; वृ. १-४.
दामोदरभट, भांडारेकार–४७.
देमाइसा (देमती)–९०.
देमाई, कटककार–९२-९३, १३१-३६; वृ. ३.
धनेश्वरभट–वृ. २.
धानाई–२१६.
नरेंद्र–६४, ११३.
नाईकबाई–१६३-६५.
नागदेव (भटो-बास)–१-६१, ६३-१०३,१०५-३८, १४०-४२, १४४-६२, १६६, १६८, १७०-७१, १७५-२४३, २४५-६१; वृ. १-३, ५, १२-१३, २२.
नागाई, नाति–२०९; वृ. २२.
नागाई (भास्कराची पुतणी)–२३८.

नागांबिका (बाइसा)–१७५, २६०.
नाथोबा–९२-९३, १३१, १४१, २२३-२४
नामदेव, विष्णुदास–२४४.
नृसिंहकवि–११३.
परशराम–वृ. ६, १२, १६, १८, २३.
पोमाई–५, २००
बाइदेव–५-६, ९, ११५; वृ. ६, १७.
भानुभट, कटककार–१५५-५८.
भास्करभट्ट बोरीकर (भानुभट, कवीश्वर-बास)–८, ५५, ६९, ७४, ११६-१७, ११९-२२, २०२-०४, २०९, २१८, २३७, २४२ ,२४४; वृ. २, ५, ६-१०, १२, १६, २१-२३.
मलेकोयाबा–१०६.
महादाइसा–१-५, २२-२३, ६२, ९३, १०४, १११, १२३, १३२, १६३-६९, १७४-७७, २५४-५५.
महादेवबा (दाइंबापुत्र)–वृ. २०.
महादेवबा, देवतासंबंधी–२५.
महादेवबा, विरूपाख्य–८०.
महादेवभट–१.
महेश्वरपंडित–८५, २०९; वृ. १-२, २२.
माइदेव, अमृते–६१; वृ. १.
मालोबास (कविबास)–६३, ७९, १४४, १४७, २००, २०२, २१६, २२५, २५३.
मेइदेव (कोथळोबा)–५, ४७, ७६, १७७, १९३, १९५.
म्हाइभट–४, ११, १९-२०, ६८-६९, १३९-४३, १६९, १७२-७४, १९२, १९४, १९६-९८, २४७.
येल्हो (एल्हाई, साधें)–५, ६५, ८४, ८७, १४१, १५६, १९५, २२०.
रंभाई–१६१-६२.
रामदेव अपर–६४.
रामदेव (आकाईचा मुलगा)–५६-५७, ५९-६१.
रामदेव (दादोस)–१, २२१.
रामदेव, यादव (राजा)–८६,११३, १४५-४६, १४८-४९.
रामदेव, वाळुके–७२-७३, १०१.
राघव-घो-भट–२५३; वृ. १५.
रामेश्वरबास–वृ. ६.
रामोपाध्ये–वृ. १२.
रूपदेवबा–३६, ८०.
रेमाइसा, कुमरें–१३७-३८; वृ. १३.
लखुदेवबा–१८१.
लखुदेवभट–वृ. २.
लक्ष्मींद्रबास, राजुरकर–१०, १७.
लक्ष्मींद्रबास, विरहे–५, १८-२०,

६८, १७४, २३३.
लुखाई, बाबुळगांवकर–९७.
वंकी–९२-९३, १३१.
वासुदेवभट–वृ. १०-११, १६.
विनायकदाए–११२; वृ. २३.
वैजोबा–१, ८३, ८५.
साकाई (गोल्होची आजी)–३३.
साकाई (नागदेवशिष्या)–१०८.
सारंगपंडित–१४२, २१६.
सा गपाणि–१८७.
सारंगपाणि (छर्दोबा)–५२.
सारंगपाणिभट–१.
सालकवि–११३.
सिती–३३.
हरगर्व–११३; वृ. १६.
हरिबा, वांकले–१२१.
हिराई–२५५.
हिराई (दामोदरपंडिताची पत्नी)–
५४, ५८, ७९, २४१;
वृ. १४.

# शुद्धिपत्र

[१ 'पंडित' शद्वांतील प्रथमाक्षरावरचा अनुस्वार जागोजाग सुटला आहे. २ तृतीया विभक्तींतील 'गोसावी' शद्वांतील अंत्याक्षरावरचें अनुनासिक जागोजाग सुटलें आहे. ३ रेफ असलेल्या बऱ्याच शद्वांवर चुकून अनुस्वार पडला आहे. ४ 'येइल' इ० क्रियापदांतील मध्यस्थानची 'इ' चुकून दीर्घ पडली आहे. ५ कांहीं सामासिक शद्व चुकून तोडले गेले आहेत. ६ कांहीं स्थलीं अक्षरें, अनुस्वार वा काना-मात्रा-वेलांटी-उकार अस्पष्ट उमटली आहेत. ७ क्वचित् विरामचिन्हांच्या चुका आहेत.–ही स्थलें सहज लक्ष्यांत येणारी असल्यानें येथें दुरुस्त केली नाहीत. वाचकांनी दुरुस्त करून घ्यावीं.

'गोसावीं' (तृतीया) शद्वाव्यतिरिक्त इतर शद्वांवरील तृतीया, सप्तमि इ. विभक्ति दर्शविणारीं अनुनासिकें मुळातच नसल्यानें तेथे दुरुस्ती करावयास नको. क्वचित् मुळांतच अनुस्वारहि नाहीत (जसें, 'सन्यासी' पा. ११२).]

## प्रस्तावना

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ५ | नमना | नमुना |
| ,, | १३ | त्यावर | त्यांवर |
| २ | २६ | त्याचा | त्यांचा |
| ३ | पादटीप ओळ ३ | निबध | निबंध |
| ,, | ,, ओळ ६ | 'स्मतिस्थळ' | 'स्मृतिस्थळ' |
| ४ | १४ | नागदेवप्रभति | नागदेवप्रभृति |
| ५ | ३ | 'स्म. स. व.' | 'स्मृ. स. वृ.' |
| ६ | ७ | मरलीधर– | मुरलीधर– |
| ,, | ८ | चकीचा | चुकीचा |
| ,, | १५ | बनवन | बनवून |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८ | १६ | सादृशामुळें | सादृश्यामूळें |
| २५ | २३ | यांची | याची |
| ,, | २८ | ‘अन्वयास्थळा…’ | ‘अन्वयस्थळा…’ |
| १७ | २२ | ³राजौरकर | राजौरकर. |
| १९ | २ | ु लगा | मुलगा |
| २२ | २१ | पथाचा | पंथाचा |

## स्मृतिस्थळ ते सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ३ | सारगपंडित | सारंगपंडित |
| ३ | १२ | दु:ख | दु:खें |
| ४ | १३ | श्रीप्रभसि | श्रीप्रभूसि |
| ४-९ | १९-२५ | वाजें | बीजें |
| ५ | ४ | नमस्करील | नमस्करीलो |
| ६ | ८ | हेंने णिजे | हें नेणिजे |
| ,, | २१ | कव्हणा | कव्हणा |
| ,, | २७ | केल | केली |
| ७ | १२ | सग | मग |
| ,, | १९ | देऊक्षवाडेयाचेनि | देऊळवाडेयाचेनि |
| ८ | ५ | लावूं | लावूं : |
| १० | १ | श्रीचक्रधरू | ‘श्रीचक्रधरू’ |
| १२ | ३ | गहस्मरणापसि | गृहस्मरणापसि |
| ,, | ४ | आणिकाळीं | आणिकाकाळीं |
| ,, | २८ | ठेवं | ठेवूं |
| १३ | ७ | वासनिकों | वासनिकीं |
| ,, | २० | जविले | जेविले |
| १४ | १७ | एकु ॥ | ॥ एकु |
| १५ | १५ | तयातें | असे तयातें |
| ,, | २० | गउदे | गडदे |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १७ | ५ | कसा | कैसा |
| १८ | २ | तैसेंचि | तैसेंचि : |
| ,, | २-३ | ते नेंये | तेणें ये |
| २० | १८ | भटांचिय | भटांचिये |
| २१ | २६ | सन्न | प्रसन्न |
| २२ | १९ | अनुस्फूर्ति | अनस्फूर्ति |
| ,, | ,, | काळों | काळी |
| २५ | २३ | आवै | आबै |
| ,, | ,, | बैजोबाचां | वैजोबाचां |
| २७ | २४ | ठाकनि | ठाकूनि |
| २९ | १० | हळहळु | हळुहळु |
| ३० | १३ | भटोबासों | भटोबासीं |
| ,, | २८ | भटौबासांचे | भटोबासांचे |
| ३१ | १ | भेटोबासीं | भटोबासीं |
| ,, | ४ | कुटंबें | कुटुंबें |
| ,, | १० | पोळीका | [२]चोळीका (या शद्बावर पुढील पादटीप: २ पोळीका ख, ग, घ.) |
| ,, | (पादटीप) | २ घडे... | ३ घडे... |
| ३२ | २० | अन्नीबास | अन्नोबास |
| ३३ | २२ | दासीं | दीसीं |
| ३६ | ९ | जावीं | जावों |
| ३७-८६ | १९-११ | यक्ति–क्तीं | युक्ति–क्तीं |
| ३८ | ४ | गद्य | ‘ गद्य ’ |
| ,, | १७ | साघो | सांघो |
| ,, | २७ | त्याचा | त्यांचा |
| ३९ | १८ | तयाचें | तयांचें |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३९ | २१ | अतः– | अंतः– |
| ४० | ५ | महावाक्य | ‘ महावाक्य ’ |
| ४१ | १७ | वस्त्र-दसीयांचांचि | वस्त्र दसीयांचांचि |
| ४२ | ११ | भीक्षकाचां | भीक्षुकाचां |
| ४३-११३ | २१-१८ | खति | खंति |
| ४५ | ५ | पुम्हां | तुम्हां |
| ,, | ७ | जन्म वीजाल | जन्म श्रीजाल |
| ४७ | २५ | हां हा | हां हो |
| ४८ | ११ | (मज) | (मज) |
| ,, | २७ | गोसावीयांचो | गोसावीयांचीया |
| ४९ | १८ | लाटेति | लोटेति |
| ५१ | २१ | पाठकी | पाठको |
| ५२ | ६ | गरुभावंडीही | गुरुभावंडीही |
| ,, | ११ | मदीयेसि | मुदीयेसि |
| ५४ | ८ | राधा | रांधा |
| ,, | १० | रभायो | रंभायो |
| ,, | १२ | अखड | अखड |
| ,, | २५ | नोगाबा | नोगावा |
| ५५ | ५ | नाइकबाइय | नाइकबाइयें |
| ,, | १५ | जाण | जाणे |
| ५६ | ८ | जा | जो |
| ५७ | २ | ईश्वरविरत्या | ईश्वरविरहृचा |
| ,, | ४ | दाखवालें | दाखवीलें |
| ,, | १६ | शुभ | शुभं |
| ,, | २८ | वाइसां | बाइसां |
| ५८ | ,, | झाडनि | झाडूनि |
| ५९ | १५ | उपाध्यबासांचा | उपाध्यबासांची |
| ६० | ८ | तषा | तृषा |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६० | २९ | : न करा | न करा : |
| ६१ | ७ | नमटे | नुमटे |
| ,, | १६ | तळेगावांकड | तळेगावांकडे |
| ६२ | १५ | भटा | भटो |
| ,, | १९ | काइ : | काइ |
| ,, | २८ | काढनि | काढूनि |
| ६३ | ५ | धेयावें | घेयावें |
| ६४ | ११ | मयां | मीयां |
| ,, | २६ | परडकर | परंडकर |
| ६६ | १० | वीतडीला | वीतंडीला |
| ,, | १६ | चद्रमय | चंद्रमय |
| ६७; ७१ | २-४-१०; १९ | सबं... | संबं... |
| ७० | १९ | पिपळगावीं | पिंपळगावी |
| ७१ | २४ | वीजन | वीजनी |
| ,, | २७ | तं | तूं |
| ७२ | ३ | हीती | ह्ोती |
| ,, | ८ | सिष्यत्य | सिष्यत्व |
| ७३ | १ | चुकवनि | चुकवूनि |
| ,, | १४ | -मंळनें- | -मैळनें- |
| ,, | १८ | प्रकारों | प्रकारीं |
| ,, | २३ | एव | एवं |
| ७६ | ,, | श्रीमकुटावरि | श्रीमुकुटावरि |
| ,, | ,, | वारीतुरंगवज्री | वारीतुरंग वज्री |
| ,, | २८ | अनमोदूनि | अनुमोदूनि |
| ७७ | २ | कवणे | यें कवणे |
| ७८ | ८ | यइल | येइल |
| ८० | ,, | असालें | असीलें |
| ,, | १० | तरि । | तरि द्या |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ८० | १२ | त्र्यबका | त्र्यंबका |
| ,, | २०-२१ | प्रवत... | प्रवर्त... |
| ८१ | ८ | पंडि बा ीं | पंडितबासीं |
| ,, | १८ | त्यांचेया | त्याचेया |
| ८३ | ४ | म्हणौनि : | : म्हणौनि |
| ८६ | १० | मखें | मुखें |
| ,, | १४ | तैँचि | तैंचि |
| ,, | १६ | गद्यें | ' गद्यें ' |
| ८६-८७ | २७-८ | अतिं-तीं | अंतिं-तीं |
| ८७ | २९ | आपणाचि | आपणचि |
| ८८ | ९ | चकलें | चुकलें |
| ८९ | १० | भानुरस्मि-बंबाळ | भानुरस्मि बंबाळ |
| ,, | २० | एसीं | ऐसीं |
| ९२ | १३ | सयोगी– | संयोगी– |
| ९४ | १८ | गरू | गुरू |
| ,, | २० | हसराज– | हंसराज– |
| ,, | २२ | आनसरलीं | आनुसरली |
| ९५ | १८ | सवंत्सरी | संवत्सरी |
| ९६ | ६ | नीवताचेया | नीवृताचेया |
| ९६-९९-१०४ | ८-१८-२४ | एसे-सें | ऐसे-सें |
| ९६ | ११ | माहानभावो | माहानुभावो |
| ,, | २४ | परपरा– | परंपरा– |
| ९७ | ७ | १२ | १२३ |
| ,, | १४ | आइसा | आइसीं |
| ९८-१०१ | ३-१६ | सदेहो-हीं | संदेहो-हीं |
| ९८ | १६ | वीद्येचो | वीद्येची |
| ९९ | ४ | उमीली | उभीली |
| ,, | ५ | सवादें | संवादें |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ९९ | ५ | नोरोपु | नीरोपु |
| ,, | १२ | याचे | यांचे |
| ,, | २४ | बोळगवीला | वोळगवीला |
| ,, | २६ | नारोपण | नीरोपण |
| ,, | ,, | बढीचा | बुढीचा |
| १०० | ९ | **संबध...** | **संबंध...** |
| ,, | १७ | हा | हां |
| १००-०३ | १८-३ | गरूकुळ ळासि | गुरूकुळ-ळासि |
| १०२ | ६ | 'णती | प्रीती |
| ,, | ७ | प्रातीं | प्रीती |
| ,, | ८ | **माहादबा** | **माहादंबा** |
| ,, | १८ | उबरेयावरि | उंवरेयावरि |
| ,, | २१ | आवच तें | आवचीतें |
| ,, | २४ | चोळीचेय | चोळीचेया |
| १०३ | ८ | आणनि | आणूनि |
| ,, | ९ | भटाबासाप्रति | भटोबासांप्रति |
| ,, | २७ | गंबातीरीचि | गंगातीरीचि |
| १०४ | ६ | भलतोही | भलताही |
| १०५ | १२ | बीचारा | वीचारा |
| १०६ | २१ | बृधाचारा... | वृधाचारा... |
| १०७ | ८ | दया | देया |
| ,, | २२ | पवर्त | पर्वत |
| १०९-१९ | (उजवीकडील पृष्ठा-वरचा मथळा) | **अ. स्मृ. तील** | **स्मृ. स. तील** |
| १०९ | ८ | भाबैचां | भावैचां |
| ,, | ११ | पाणौयांतु | पाणीयांतु |
| ११२ | २० | न्यायशारतौ- | न्यायभारती- |
| ११३ | ४ | जीवनन्मुक्त | जीवन्मुक्त |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ११३ | १३ | प्रेवेसन | प्रवेसन |
| ,, | १५ | भइसीं | भुइसीं |
| ११४ | १ | भावनसाकडे | भानवसाकडे |
| ,, | १६ | त | तरि |
| ११५ | ६ | चीचेंसि | चींचेंसि |
| ११६ | १४ | नाउणें | नाडणें |
| ,, | १५ | केंठा... | कंठा... |
| ,, | २३ | प्रबधत्वें | प्रबंधत्वें |
| ११७ | १८ | स्मरणभगा– | स्मरणभंगा– |
| ११८ | ३ | नोरोवीलें | नीरोवीलें |
| १२१ | १० | हरबास | हरिबास |
| १२२ | ३ | सैंगतळा | सैंगतळप |
| ,, | ९ | लक्षमीधरभटाजी | लक्षमीधरभटा जी- |
| १२३ | १४ | येसे | यैंसे |
| ,, | २३ | एँसी | ऐसी |
| १२६ | २४ | प्रणाम | प्रमाण |
| १२७ | २१ | संवंधु | संबंधु |
| ,, | २५ | मडळीक | मंडळीक |
| १३१ | ८ | [(१८५) आंकड्या- **मग रांजना भरूं**<br>पुढें प्रथम हा जादा **गेले– कर्म** उदकपात्र,<br>मजकूर घालावा.] | |
| १३८ | २१ (डावी बा.) | रचं | रचूं |
| १४० | ११ (उ० ,, ) | मलुख | मुलुख |
| १४३ | ९ ( ,, ,, ) | बोधवत | बोधवत |
| १४४ | ५ (डावी ,, ) | मगंळा | मगंळा |
| १४७ | ६ ( ,, ,, ) | संवादर्णे | संवादणें |
| १५२ | १० ( ,, ,, ) | सा गपाणि | सारंगपाणि |